# १

## ग्रामीण वित्तपुरवठा

**घटक रचना :**

१.१ पाठाची उद्दिष्टये

१.२ प्रस्तावना

१.३ संकल्पना

१.४ ग्रामीण वित्तपुरवठयाचे स्वरूप

१५ ग्रामीण वित्तपुरवठयाचे प्रकार

१.६ ग्रामीण वित्तपुरवठयाचे महत्त्व

१.७ सारांश

१.८ स्वाध्याय

१.९ संदर्भ सूची

## ८.१ पाठाची उद्दिष्टये

१) ग्रामीण वित्तपुरवठा संकल्पनेचा अभ्यास करणे.

२) ग्रामीण वित्तपुरवठयाच्या स्वरूपाचा अभ्यास करणे.

३) ग्रामीण वित्तपुरवठयाच्या प्रकारांचा अभ्यास करणे.

४) ग्रामीण वित्तपुरवठयाचे महत्त्व अभ्यासणे.

## ८.२ प्रस्तावना

स्वातंत्र्यपूर्व काळापासून भारत हा कृषी प्रधान देश म्हणून ओळखला जातो. कृषी विकासासाठी वित्तपुरवठ्याचे महत्व सर्व ज्ञात आहे. रिझर्व बँकेने सुरुवातीपासून ते पतपुरवठा संस्थांच्या विकासातून साधण्याचा प्रयत्न केला. १९५० आणि १९६० च्या दशकात अपुऱ्या ग्रामीण पतसुविधेकडे केंद्र शासन आणि रिझर्व बँक यांचे लक्ष होते. १९५१ मध्ये नेमलेल्या ऑल इंडिया रुरल क्रेडिट सर्व्हेच्या शिफारशी १९५४ मध्ये स्वीकारून शेती कर्ज पुरवठ्यास चालना देण्यात आली. सहकारी बँका आणि सहकारी पतसंस्था यांच्या भाग भांडवलात सहभागी होण्यासाठी राज्य सरकारे आणि भूविकास बँकांना दीर्घ मुदतीची कर्जे उपलब्ध व्हावीत, म्हणून रिझर्व्ह बँकेने १९५६ मध्ये नॅशनल ॲग्रीकल्चर

munotes.in

क्रेडिट (लाँग टर्म ऑपरेशन्स) फंड स्थापन केला. दुष्काळाच्या परिस्थितीत राज्य सहकारी बँकांना मध्यम मुदतीची कर्जे देण्यासाठी जून १९५६मध्ये नॅशनल ॲग्रीकल्चरल (स्टॅबिलायजेशन) फंड सुरू केला. दुष्काळामुळे शेतीची कर्जे वसूल होत नसतील, तर राज्य सरकारमार्फत सहकारी पतसंस्थांना अनुदान देण्यासाठी नॅशनल ॲग्रीकल्चरल क्रेडिट (रिलीफ ॲण्ड गॅरंटी) फंड चालू केला.



**https://www.agrowon.com**

या सर्व प्रयत्नांशिवाय रिझर्व्ह बँकेने १ जुलै १९६३ रोजी कृषी पुनर्वित्त महामंडळाची ॲग्रीकल्चरल रिफायनान्स कॉर्पोरेशनची (एआरसी) स्थापना केली. राज्य सहकारी बँका, भूविकास बँका आणि व्यापारी बँका यांनी दिलेल्या शेती कर्जापोटी त्यांना पुनर्वित्त सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी हे महामंडळ स्थापन करण्यात आले. पण अनुभव असा राहिला की सहकारी क्षेत्रातील कर्जपुरवठा संस्था फार सक्षम नव्हत्या. १९६६मध्ये सरकारने ऑल इंडिया रुरल क्रेडिट रिव्ह्यू कमिटी नेमली. समितीने शिफारस केली की कृषी पत पुरवठ्यामध्ये व्यापारी बँकांनी सहकारी बँकांना सहाय्यभूत व्हायला हवे. १९६९ मध्ये बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले आणि त्यापाठोपाठ प्राधान्य क्षेत्रांना कर्ज पुरवठा असे धोरण राबविण्यात आले. शेतीचा कर्ज पुरवठा हा प्राधान्य क्षेत्रात आला. त्यानंतर लीड बँक योजना आली आणि प्रत्येक व्यापारी राष्ट्रीयीकृत बँकेकडे एकेका जिल्ह्याच्या विकासाची जबाबदारी टाकण्यात आली. इतक्या सगळ्या उपायांनीसुद्धा ग्रामीण विकासासाठी पुरेसा कर्जपुरवठा होत नसल्याचे जाणवल्यामुळे १९७५मध्ये एआरसी या महामंडळाची व्याप्ती वाढवून त्याची भूमिका वित्तपुरवठ्याबरोबरच विकासात्मक आणि प्रोत्साहनात्मक करून त्याचे नामकरण ॲग्रीकल्चरल रिफायनान्स ॲण्ड डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (एआरडीसी) असे करण्यात आले. शिवाय १९५० आणि १९६०च्या दशकातील पंचवार्षिक योजनांचा भर औद्योगिक विकासावर राहिला आणि त्यामुळे कृषी क्षेत्राकडे जरा दुर्लक्ष झाले. शेतीसह ग्रामीण विकासाकडे आणि विशेषतः वित्त पुरवठ्याकडे पुन्हा लक्ष देण्यासाठी एआरडीसीची कल्पना साकारण्यात आली. सदर एआरडीसीची उद्दिष्ट्ये अशी होतीः-

केंद्र सरकाच्या निर्देशानुसार रिझर्व बँकेने १९७९ मध्ये कमिटी टू रिव्ह्यू ॲरेंजमेंट फॉर इन्स्टिट्यूशनल क्रेडिट फॉर ॲग्रीकल्चर ॲण्ड रुरल डेव्हलपमेंट अशी समिती नेमली. एकात्मिक ग्रामीण विकासासाठी पतपुरवठा करण्यात येणाऱ्या समस्यांचा एक कलमी विचार करण्यासाठी, त्याला जोरकस दिशा देण्यासाठी एक स्वतंत्र संस्था असावी अशी शिफारस समितीने केली. त्यानुसार संसदेने १९८१ मध्ये कायदा पारित करून १९८२ मध्ये नॅशनल बँक फॉर ॲग्रीकल्चर ॲण्ड रुरल डेव्हलपमेंटची (नाबार्ड) स्थापना केली.

## ८.३ संकल्पना

ग्रामीण भागातील शेती, शेतीजोड व पूरक व्यवसाय, ग्रामीण लघुउद्योग, कारागिरांचे व्यवसाय इत्यादींच्या विकासासाठी होणारा संस्थात्मक व बिगर संस्थात्मक वित्तपुरवठा म्हणजेच ग्रामीण वित्तपुरवठा होय.

ग्रामीण वित्तपुरवठयाचा प्रमुख उद्देश म्हणजे ग्रामीण भागाचा विकास म्हणजेच ग्रामीण भागातील राहणाऱ्या घटकांचा विकास होय. ग्रामीण भागाच्या अर्थव्यवस्थेचा विचार करता ग्रामीण भागातील शेतकरी, कारागीर हे येथील शेती व ग्रामीण व्यवसायावर अवलंबून होते. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास व्हावयाचा असेल तर ग्रामीण भागातील शेती व ग्रामीण उद्योग विकसित होणे गरजेचे होते. कारण ग्रामीण भागातील शेती व ग्रामीण हे मागास होते. पारंपारिक पद्धतीने केले जात होते. त्यांच्या विकासासाठी शेतकरी व व्यावसायिकांना कर्जपुरवठयाची गरज होती.

ग्रामीण वित्तपुरवठयाची पार्श्वभूमी विचारात घेता आपल्या लक्षात येईल की, भारत ग्रामीण वित्तपुरवठा करणारा असा संख्यात्मक घटक स्वातंत्र्यपूर्व  काळात नव्हता. त्यावेळी ग्रामीण भागातील शेतकरी व ग्रामीण उद्योग यांच्या पैशाची गरज भागविण्याचे कार्य खऱ्या अर्थाने सावकार या घटकाने केलेले पाहावयास मिळते. त्याच प्रमाणे जमीनदार एतद्देशीय फंड इत्यादी बिगर संस्थात्मक घटकांनी ग्रामीण भागात कर्जपुरवठा केलेला पहावयास मिळतो. सावकारी कर्ज किंवा इतर बिगर संस्थात्मक मार्गाने मिळणाऱ्या कर्जाचा विचार करता हे कर्ज शेतकऱ्याची पत ओळखून जमिनीच्या तारणावर दिले जात असे. या कर्जावरील व्याजदर अधिक असे. सावकारी कर्जातून शेतकऱ्याची बऱ्याच वेळा पिळवणूक झालेली पहावयास मिळते. याबरोबर खरोखर प्रामाणिकपणे सावकारी व्यवसाय करणारे व्यावसायिकसुद्धा होते. परंतु त्यांचे प्रमाण खूपच कमी असलेले पहावयास मिळते. असे असले तरीदेखील ग्रामीण वित्तपुरवठयाला  दुसरा मार्ग नव्हता.

यातील दुसरा टप्पा म्हणजे सन १९७० ला बँक ऑफ हिंदुस्थान या व्यापारी बँकेची स्थापना झाली. तेथूनच खऱ्या अर्थाने व्यापारी बँकांची वाटचाल सुरु झाली. भारतात इंग्रजांचे राज्य असल्याने भारतातील व्यापारी बँक व्यवसायाचे कार्य इंग्लंड मधील बँक व्यवसायाच्या धर्तीवर सुरु केलेलं पाहावयास मिळते. सन १८०६ मध्ये बँक ऑफ बेंगॉल, सन १८४० मध्ये बँक ऑफ बॉम्बे, सन १८४३ मध्ये बँक ऑफ मद्रास ह्या व्यापारी बँका स्थापन झाल्या. मात्र त्यानंतर २० व्या शतकाच्या पहिल्या दशकातील स्वदेशी चळवळीमुळे केवळ भारतीय लोकांकडून बऱ्याच व्यापारी बँका स्थापन झाल्या. ह्या बँकांवर कोणत्याही मध्यवर्ती बँकेचे नियंत्रण नव्हते. त्यामुळे ह्या बँका व्यवसायिक दृष्टिकोन लक्षात घेऊन फायदेशीर व्यवसायांनाच म्हणजे हॉटेल, बांधकाम, मोठे उद्योगधंदे यांना कर्जपुरवठा करत असत. शेती व्यवसाय हा किफायतशीर नसल्याचे सांगून शेती व ग्रामीण उद्योगांना कर्जपुरवठा करण्यास व्यापारी बँका नाखूश होत्या. ह्या सर्वांचा परिणाम म्हणून सन १९१३ ते १९२९ ह्या कालखंडात १०८ व्यापारी बँका बुडाल्या.

१ एप्रिल १९३५ रोजी रिझर्व्ह बँकेची स्थापना झाली. मध्यवर्ती बँकेची गरज लक्षात घेऊन १ जानेवारी १९४९ रोजी रिझर्व्ह बँकेचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. बँकिंग व्यवसायावर नियंत्रण ठेवणे तसेच बँकांची मध्यवर्ती बँक म्हणून तिच्याकडे जबाबदारी देण्यात आली. पुढील टप्प्यात सन १९४० ला सर्व घटक राज्यात सावकारी व्यवसायावर नियंत्रण घालून सावकारी व्यवसाय हा कायद्याने रजिस्ट्रर ऑफ मनीलेंडर्स यांच्याकडे नोंदविण्याचे ठरले. सरकारच्या नियंत्रणाशिवाय सावकारी व्यवसाय करता येणार नाही असे कायद्याने ठरले. त्यामुळे सावकारी जाचातून शेतकऱ्याची एक प्रकारे सुटका झाली. तर दुसऱ्या बाजूला सहकाराच्या माध्यमातून चाललेल्या विकासाला वेग देण्यासाठी सन १९५४ साली ग्रामीण पत सर्वेक्षण समिती नेमण्यात आली. या समितीच्या शिफारशीनुसार देशात कृषी वित्तपुरवठा पद्धतीची पुर्नरचना करण्यात आली. यानुसार सरकारने रिझर्व्ह बँकेमार्फत सहकारी पतपुरवठा पद्धतीमध्ये सहभागी असावे. सहकार क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाची सोय असावी व पतपुरवठयाची सांगड विक्री व्यवस्थेशी असावी अशी समन्वित योजना आखण्यात आली. यातूनच पुढे सहकारी त्रिस्तरीय रचनेने खेडेगावात जाऊन शेतीविकासास चालना मिळवून दिली. सन १९५४ ते १९६९असा दीड दशकांचा काळ भारतात सहकारी क्षेत्राचा सुवर्णकाळ मनाला जातो. कारण या काळात सहकार क्षेत्रामार्फत हा ग्रामीण वित्तपुरवठा झाल्याने तेल काढणे, साखर काढणे, गूळ तयार करणे, कुक्कुटपालन, फळबागायत, मासेमारी, डेअरी अशा सर्व बाजूंनी शेती व संलग्न क्षेत्राचा विस्तार झाला. व्यापारी बँकाबाबत स्वातंत्र्यप्राप्तीनंतर विचार केल्यास या बँकांनी आपले कार्यक्षेत्र जोरदार वाढविण्यास सुरुवात केली. मात्र त्यांच्यापासून होणारा वित्तपुरवठा हा हितसंबंधित व्यक्ती व संस्था, उद्योग यांना होत होता. स्वाभाविकच जनमानसातून ह्या व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्याची मागणी सातत्याने जोर धरू लागली. सन १९६८ मध्ये भारत सरकारने 'सामाजिक नियंत्रण योजना' कार्यान्वित आणली. ह्या योजनेने बँकांच्या कार्यवाहीत कार्यात्मक व संघटनात्मक स्वरूपाचे बदल घडविले. ह्यातील एक भाग म्हणजे कर्जाचा प्रवाह अग्रक्रम क्षेत्राकडे आणि विशेषतः शेती, लघुउद्योग व निर्यात या क्षेत्राकडे वळविणे हा होता. संघटनात्मक बदलाचा भाग म्हणून 'राष्ट्रीय पत मंडळ' फेब्रुवारी १९६८ मध्ये स्थापण्यात आले. या मंडळाकडे एक महत्त्वाचे कार्य सोपविले. राष्ट्रीय उत्पन्न निर्मिती, रोजगार निर्मिती, आर्थिक शक्तीचे विकेंद्रीकरण, परकीय चलनाची मिळकत या दृष्टीने जी क्षेत्र महत्त्वाची वाटतात अशा क्षेत्रांना म्हणजेच शेती, ग्रामीण लघुउद्योग, निर्यात यांना कर्जपुरवठा करणे. असाच एक महत्त्वाचा संघटनात्मक निर्णय १९ जुलै १९६९ रोजी घेण्यात आला. भारतातील मोठया प्रमुख १४ व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. ह्या बँका पुढे सार्वजनिक क्षेत्रातील व्यापारी बँका म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या.

व्यापारी बँकांचे म्हणजेच बँक व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण करणे हा त्यावेळी घेतलेला निर्णय पूर्णपणे राजकीय होता. 'गरिब हटाव' या कार्यक्रमाचा भाग म्हणून हे पाऊल उचलण्यात आले होते. मात्र ह्या राजकीय निर्णयाचे बँकिंग क्षेत्रावर दूरगामी स्वरूपाचे परिणाम झाले. थोडक्यात बँकांवर सामाजिक जबाबदारी दिली गेली. अग्रक्रम क्षेत्राला मोठया प्रमाणत झाले. थोडक्यात बँकांवर सामाजिक जबाबदारी दिली गेली. अग्रक्रम

क्षेत्राला मोठया प्रमाणत कर्ज देण्याचे धोरण ठरले गेले. यामुळे शेतीक्षेत्र, ग्रामीण उद्योग, कारागीर इत्यादींना मोठया प्रमाणात कर्जाची उपलब्धता होऊ लागली.

ग्रामीण वित्तपुरवठयांमध्ये रिझर्व्ह बँकेने विशेष लक्ष दिले होते. सहकारी चळवळीच्या माध्यमातून ग्रामीण पतपुरवठयांचे रिझर्व्ह बँकेचे कार्य सतत विस्तारी असलेली १९५४ च्या भारतीय ग्रामीण पतपुरवठा सर्वेक्षणात म्हटले आहे. रिझर्व्ह बँक ही आंतरराष्ट्रीय व्यापार व बँकिंग क्षेत्रातील मध्यवर्ती बँक म्हणून ओळखली जात असल्याने तिच्याकडील काही जबाबदाऱ्या विभागल्यास ती अधिक म्हणून ओळखली जात असल्याने तिच्याकडील काही जबाबदाऱ्या विभागल्यास ती अधिक चांगले काम करू शकेल. यासाठी जुलै १९८२ मध्ये शेती, ग्रामीण उद्योग, कारागीर इ. ग्रामीण वित्तपुरवठा व्हावा. शेतीक्षेत्रासाठी स्वतंत्र वित्तपुरवठा व्हावा यासाठी 'नाबार्ड' ची स्थापना करण्यात आली.

## ८.४ ग्रामीण वित्तपुरवठयाचे स्वरूप

ग्रामीण वित्तपुरवठयाचे स्वरूप विचारात घेत असताना साहजिकच संस्थात्मक व बिगर संस्थात्मक अशा दोन्ही पद्धतीने त्याचा विचार करावा लागतो. त्यानुसार त्याचे स्वरूपसुद्धा वेगवेगळे असलेले पाहावयास मिळतात.

**१) शेती विकास :**

ग्रामीण वित्तपुरवठयाचा विचार करता, ग्रामीण वित्तपुरवठयातील सर्वाधिक वित्तपुरवठा हा शेतीसाठी केला जातो. म्हणूनच ग्रामीण वित्तपुरवठा म्हणजेच शेती वित्तपुरवठा असे ढोबळपणाने म्हटले जाते. त्यामुळे शेतीवित्तपुरवठा म्हणजेच शेती विकास हे या वित्तपुरवठयाचे ठळक दिसून येते.

**२) उत्पादक कर्ज :**

ग्रामीण वित्तपुरवठयाचे स्वरूप उत्पादक आहे. कारण शेती व ग्रामीण उद्योगासाठी उत्पादन कार्य करण्यासाठी हे कर्ज दिले जाते. हे उत्पादक कर्ज असल्याने त्याची येणाऱ्या उत्पादनातून परतफेड होते. या कर्जातून शेतकरी शेतीसाठी लागणाऱ्या प्राथमिक तसेच मोठे खर्च या कर्जातून भागवितो.

**३) अनुत्पादक / प्रासंगिक कर्ज :**

ग्रामीण वित्तपुरवठयामध्ये नुसते उत्पादक कर्ज दिले जाते असे नाही. शेतकऱ्याला घरातील लग्नकार्य, आजारपण इ. आकस्मिक कारणांसाठीसुद्धा कर्जाची गरज असते. हे कर्ज अनुत्पादक असते. तरीसुद्धा संस्थात्मक व बिगर संस्थात्मक अशा दोन्ही संस्थांना हा कर्जपुरवठा करावा लागतो. मात्र समोरील व्यक्तीची परतफेड करण्याची क्षमता विचारात घेऊन हा कर्जपुरवठा केला जातो.

**४) शेतीपूरक व्यवसायासाठीचे कर्ज :**

ग्रामीण वित्तपुरवठयामध्ये शेतीला कर्जपुरवठा केला जातो. म्हणून त्याचे स्वरूप शेतीपूरक व्यासायांनासुद्धा कर्जपुरवठा केला जातो. म्हणून त्याचे स्वरूप शेतीपूरक व्यवसायासाठी कर्ज असे दिसून येते. यामध्ये दुग्धव्यवसाय, शेळीमेंढीपालन, कुक्कुटपालन इ. व्यवसाय समाविष्ट होतात.



https://marathisanhita.com

**५) शेती प्रक्रिया विकास कर्ज :**

ग्रामीण वित्तपुरवठयामध्ये शेतीप्रक्रियेला अत्यंत मोलाचे स्थान देण्यात आले आहे. त्यामध्ये मसाला उद्योग, साबण उद्योग, फळप्रक्रिया उद्योग त्यामध्ये काजू, आंबा, फणस इ. शेतीमालावर प्रक्रिया करण्यासाठी ग्रामीण वित्तपुरवठा केला जातो. त्यामुळे ग्रामीण वित्तपुरवठयाचे स्वरूप हे शेती प्रक्रिया उद्योगांसाठी कर्जपुरवठा करणे असे दिसून येते.

**६) ग्रामीण उद्योग व लघुउद्योगासाठी कर्ज :**

ग्रामीण वित्तपुरवठयामध्ये शेतीबरोबरच ग्रामीण लघुउद्योग व मोठे उद्योग यांनासुद्धा कर्जपुरवठा केला जातो. त्यामध्ये ग्रामीण कारागीर यांचे व्यवसाय या शिवाय तेल, साबण, गिरण उद्योग इत्यादींचा यामध्ये समावेश होतो.

**७) व्यापारी शेती विकास :**

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांमध्ये व्यापारी शेतीसंदर्भातील चळवळ उभी राहावी यासाठी मुख्य भाग येतो तो म्हणजे वित्तपुरवठा होय. शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त व्यापारी पिके घ्यावीत व व्यापारी शेती विकसित करावी यासाठी ग्रामीण वित्तपुरवठा मदत करतो. त्यामुळे ग्रामीण वित्तपुरवठयाचे हे स्वरूप आहे.

**८) निर्वाह शेतीसाठी कर्जपुरवठा :**

ग्रामीण भागातील शेती करणाऱ्या शेतकऱ्यांपैकी ७० टक्केपेक्षा अधिक शेतकरी निर्वाह शेती करतात. त्यामध्ये त्याच भागातील अन्नधान्य उत्पादन शेतकरी घेत असतात. अशा शेतकऱ्यांना निर्वाह शेतीसाठीसुद्धा कर्जाची गरज असते. त्यामुळे ग्रामीण वित्तपुरवठयाचे हे स्वरूप दिसून येते.

**९) दारिद्र्यरेषेखालील घटकांच्या विकासासाठी कर्ज :**

ग्रामीण वित्तपुरवठयामुळे दारिद्र्यरेषेखालील असणाऱ्या घटकाच्या विकासासाठी कर्जपुरवठा केला जातो. यापाठीमागील मुख्य उद्देश दारिद्र्यरेषेखालील असणाऱ्या घटकांना आर्थिक साहाय्य देऊन त्यांनी स्वतः किंवा समूहाचा व्यवसाय विकसित करून त्यातून आपली उन्नती गाठणे हा आहे.

**१०) शेती विविधीकरण :**

ग्रामीण वित्तपुरवठयामुळे शेतकरी आज विविध प्रकारची शेती करतो. त्यामुळे फळे, फुले, अन्नधान्य,मांस उत्पादन इ. बरोबरच निर्वाह पिकांसोबत व्यापारी पिकेही घेतली जातात. त्यामुळे पारंपारिक शेती बाहेर जाऊन शेती करू लागला हाच उद्देश शेती विकासामध्ये ग्रामीण वित्तपुरवठयाचा असलेला पाहावयास मिळतो किंबहुना हे त्याचे स्वरूप असलेले पाहावयास मिळते.

**११) ग्रामीण विविधीकरण :**

ग्रामीण वित्तपुरवठयाचा उद्देश हा शेती विकासाबरोबरच ग्रामीण भागामध्ये विविध लघुउद्योग, व्यवसाय, सेवा व्यवसाय विकसित व्हावेत असा आहे. कारण ग्रामीण भाग किंवा प्रत्येक गावांमध्ये तशा प्रकारच्या व्यवसायासाठीचे पाठबळ दिसून येते. बराचसा वर्ग ग्रामीण भागामध्ये विविध मार्गाने वळताना पाहावयास मिळतो आहे. शेती विकसित करणे, पर्यटन इ. विविध माध्यमांतून गावाकडे वळणाऱ्या लोकांमुळे ग्रामीण विविधीकरणाला चालना मिळते आहे यासाठी ग्रामीण वित्तपुरवठा मदत करतो आहे.

**१२) संस्थात्मक वित्तपुरवठा हा शाश्वत वित्तपुरवठा :**

ग्रामीण वित्तपुरवठयाचे स्वरूप विचारात घेता ग्रामीण वित्तपुरवठयामध्ये संस्थात्मक वित्तपुरवठा हा स्वतंत्र प्रकार असलेला पाहावयास मिळतो. त्यानुसार त्याचे स्वरूप खालील मुद्दयाद्वारे आपणास स्पष्ट करता येईल.

**I) कायदेशीर व कायमस्वरूपी वित्तपुरवठा :**

ग्रामीण वित्तपुरवठयामध्ये संस्थात्मक वित्तपुरवठा हा कायदेशीर वित्तपुरवठा आहे. हा वित्तपुरवठा शासकीय माध्यमातून होणारा वित्तपुरवठा आहे. त्यामुळे हा वित्तपुरवठा अखंडीत तसेच कायमस्वरूपी असलेला पाहावयास मिळतो.

**II) विकासाला चालना :**

संस्थात्मक वित्तपुरवठयामुळे विकासाला चालना मिळते कारण हा कर्जपुरवठा शेतकऱ्याची फसवणूक करणारा नसतो. त्यामुळे हया कर्जाच्या आधारावर शेतकरी कारागीर आपल्या शेती व इतर व्यवसायाचा विकास वाटतो व त्यातून खऱ्या अर्थाने विकासाला चालना मिळते.

**III) किचकट वित्तपुरवठा :**

संस्थात्मक वित्तपुरवठा हा शेतकऱ्यांना चांगला विषय असला तरी शेतकऱ्यांच्या दृष्टीने हा वित्तपुरवठा मिळविण्यासाठी अतिशय त्रासदायक आहे. कारण त्याला फॉर्म भरण्यापासून ते आवश्यक कागदपत्र जमविणे व नंतर कर्जमंजुरीची वाट पाहणे हे त्याला किचकट वाटते.

**१३) बिगर संस्थात्मक वित्तपुरवठयातील अशाश्वता :**

ग्रामीण वित्तपुरवठयाचे दुसरे टोक म्हणजे बिगर संस्थात्मक कर्जपुरवठा, ह्या वित्तपुरवठयामध्ये मोठी अशाश्वता दिसून येते. त्यामुळे ह्या वित्तपुरवठयाचे स्वरूप स्वतंत्र आहे.

**१) सावकारीपाश :**

बिगर संस्थात्मक कर्जपुरवठा म्हणजे सावकार, जमीनदार, व्यापारी दलाल यांच्याकडून मिळणारे कर्ज होय. मात्र या कर्जाचे स्वरूप हे सावकारी पाशाचे असलेले पाहावयास मिळते. कारण ह्या कर्जातून शेतकऱ्यांची मोठी फसवणूक केली जात असे व त्यातूनच तो कर्जबाजारी होत असे. आजही ह्या स्वरूपामध्ये मोठा बदल झालेला दिसून येत नाही.

**२) बिगरकायदेशीर कर्जपुरवठा :**

बिगर संस्थात्मक कर्जपुरवठा हा बिगरकायदेशीर कर्जपुरवठा आहे. त्यावर शासनाचे नियंत्रण नाही. त्यामुळे हा कर्जपुरवठा कायमस्वरूपी नसलेला पाहावयास मिळतो. तसेच ह्या कर्जपुरवठयातून शेतकऱ्याचे भले होईलच हे सांगता येत नव्हते. कारण ह्या कर्जातून मोठया प्रमाणात फसवणूकच होत होती. यासाठी सावकारावर नियंत्रणासाठी सावकारी नियंत्रण कायदा झाला. तरीसुद्धा आजही अशा प्रकारची फसवणूक ह्या कर्जपुरवठयातून होताना पाहावयास मिळते.

**३) सहज उपलब्ध :**

बिगर संस्थात्मक कर्ज हे सहज उपलब्ध होते. यासाठी किचकट कागदपत्र गोळा करणे, फॉर्म भरणे, कर्ज मंजुरीची वाट पाहणे ह्या गोष्टी नसतात. हे कर्ज कर्ज घेणारा व कर्ज देणारा यांच्या विश्वासातील मोठा भाग असतो. त्यामुळे कोणत्याही तारणावर दोन ओळी लिहून हे कर्ज मिळत असे.

**आपली प्रगती तपासा.**

ग्रामीण वित्तपुरवठयाचे स्वरूप सांगा.

## ८.५ ग्रामीण वित्तपुरवठयाचे प्रकार

आपल्या देशाचा विचार करता ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने शेती व्यवसाय त्याचबरोबर ग्रामीण उद्योग, कारागिरांचे व्यवसाय इत्यादीवर अवलंबून



munotes.in

असलेली पाहावयास मिळते. त्यामुळे ग्रामीण भागातील ह्या व्यवसायांना स्वतंत्रपणे ग्रामीण वित्तपुरवठा असणे गरजेचे होते. त्यानुसार नियोजन करून ग्रामीण भागाकडे वित्तपुरवठा वळविण्यासाठी प्रयत्न केले गेले व त्याला यशही आलेले पाहावयास मिळते. अशा ह्या ग्रामीण वित्तपुरवठयाचे प्रकार विविध असलेले पाहावयास मिळतात. काही ठिकाणी कर्जाच्या उपयोगावरून कर्जाचे प्रकार पडतात. काही ठिकाणी कर्जाच्या परतफेडीच्या मुदतीवरून कर्जाचे प्रकार पडतात. थोडक्यात ह्या कर्जाच्या प्रकारानुसार ह्या ठिकाणी मांडणी केलेली आहे.

ह्यामध्ये बँकिंग व्यवहारात नव्याने समाविष्ट झालेल्या बदलाचाही विचार करण्यात आला आहे. १९८८ साली सर्व्हिस एरिया ॲप्रोच (Service Area Approach) चा बँकिंग नियमानुसार सरकारच्या सहभागामुळे दर २० कि. मी. मागे एक शाखा अशा प्रकारे सर्व व्यापारी व ग्रामीण बँकांनी शाखा स्थापन करून आपले बँकिंग करावे असे ठरले होते. त्यावेळी लोकसंख्येचा विचार करता १०,००० लोकसंख्येमागे एक शाखा असे प्रमाण होते.

सन २०१२ च्या बदलत्या बँकिंग नियमानुसार त्या त्या क्षेत्रातील बँकांनी २००१ च्या जनगणनेनुसार २००० लोकसंख्या असलेल्या गावात एक शाखा स्थापन करावयाची आहे. बँकांनी आपल्या ठरवून दिलेल्या गावामध्ये अशा प्रकारची व्यवस्था निर्माण करावयाची आहे. या शाखेच्या माध्यमातून दिलेल्या तीन गोष्टींपैकी एक सेवा त्या गावात राबविणे गरजेचे आहे.

१) संबंधित बँकेने आपली शाखा स्थापन करून बँकिंग कार्य करणे.

२) A.T.M. व्यवस्था त्या गावात निर्माण करणे.

३) U.S.B. (Ultra small Branch) म्हणजेच त्या बँकेची छोटी शाखा त्या गावात स्थापन होईल. त्या ठिकाणी बँकेचा एक अधिकारी कायमस्वरूपी तेथे असेल. सुरुवातीला बँकेचा व्यवहार कर्जविषयक माहिती अशा स्वरूपाचे तो कार्य करेल. पुढे त्याच्या कार्याची व्याप्ती वाढवणारी आहे.

थोडक्यात ह्या तीन पर्यायांपैकी एक पर्याय निवडून या बँकांनी निवडलेल्या गावामध्ये कार्य करावयाचे आहे. अशा बँका कोणकोणत्या प्रकारचे कर्ज देतात. त्याच्या कर्जप्रकारामध्येही काही बदल करून नवीन प्रकारे ह्या बँका कर्ज देत आहेत त्याची माहिती पुढीलप्रमाणे.

**अ) कर्जाच्या कालावधीनुसार :**

शेतकरी जेव्हा कर्ज घेतो त्यावेळी त्याला विविध कारणासाठी कर्जाची गरज असते. ते कर्ज तो किती कालावधीसाठी घेतो त्यानुसार या कर्ज प्रकारचे तीन प्रकार होतात.

**१) अल्पमुदत कर्ज :**

या प्रकारची कर्जमुदत ३ महिने ते १५ महिने या कालावधीत हे कर्ज परत करावे लागते. त्यामुळे ह्या कर्जाला अल्पमुदत कर्जपुरवठा असे म्हणतात. यात प्रामुख्याने पीक कर्जाचा समावेश होतो. या कर्जाची गरज शेतकऱ्याला बी-बियाणे, रासायनिक व सेंद्रिय खाते, मजुराची मजुरी, पशूचे खाद्य व चारा, इ. ह्या उत्पादक कारणासाठी तर घरगुती दैनंदिनी खर्च इ. अनुत्पादक कारणासाठी असलेली पाहावयास मिळते. या कर्जाची परतफेड येणाऱ्या उत्पादनातून करावी हा उद्देश आहे.

**२) मध्यम मुदत कर्ज :**

जे कर्ज १५ महिने ते ५ वर्षांच्या कालावधीसाठी घेतले जाते त्या कर्जाला मध्यम मुदत कर्ज असे म्हणतात. जमीन सपाटीकरण, बांधबंदिस्ती, बैलजोडी किंवा गाडी खरेदी करणे, गाई, म्हैशी, बकऱ्या इत्यादी पशुधन खरेदी करणे, मध्यम मुदतीची कृषी अवजारे इत्यादी कारणासाठी मध्यम मुदत कर्ज घेतले जाते. ह्या कर्जाचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांना शेतीमध्ये भांडवली गुंतवणूक करण्यासाठी मदत करणे. हे कर्ज प्रामुख्याने उत्पादक स्वरूपाचे असते. अशा कर्जाची परतफेड ही एका हप्त्यात न करता हंगामानुसार हप्त्याहप्त्याने केली जाते. ह्या कर्जाची रक्कम ठराविक अशी नसते. शेतकऱ्याच्या कार्याला लागणारी, परंतु त्याचे उत्पादन लक्षात घेऊन पाच वर्षाच्या मुदतीत परतफेड होईल एवढे कर्ज मंजूर केले जाते.

**३) दीर्घ मुदत कर्ज :**

जे कर्ज पाच वर्षे कालावधीपेक्षा अधिक कालावधीसाठी घेतले जाते त्या कर्जाला दीर्घ मुदत कर्जपुरवठा असे म्हणतात. शेतीमध्ये ज्या मोठया स्वरूपाच्या भांडवली गुंतवणुका कराव्या लागतात त्यासाठी दीर्घ मुदत कर्जपुरवठा केला जातो. नवीन शेतजमीन खरेदी करणे, नवीन विहीर खोदणे व पाईपलाईन टाकणे, कापणी, मळणी, फवारणी यंत्रे, ट्रक्टर व वाहतूक साधने खरेदी, साठवणूक गृह बांधणे इत्यादी कारणासाठी दीर्घकालीन कर्जाची गरज भासते. हे कर्ज उत्पादक स्वरूपाचे असते. ह्या कर्जाची रक्कम शेतकऱ्याच्या गरजेवर, तसेच परतफेडीच्या तयारीवर अवलंबून असते. दीर्घकालीन कर्जाची रक्कम मोठी असल्याने कर्जाची परतफेड ही शेतकऱ्याच्या उत्पादनावर मासिक, त्रैमासिक, सहामाही, वार्षिक अशा हप्त्यामध्ये केली जाते.

**ब) उत्पादकतेच्या आधारावर :**

**१) उत्पादक ऋण :**

शेतीमध्ये उत्पादनाची क्रिया चालू राहण्यासाठी शेतकऱ्याला निरनिराळ्या प्रकारचे खर्च करावे लागतात. त्याला बियाणे, खाते, कीटकनाशके खरेदी करणे, मजुरांची मजुरी द्यावी लागते. बैलजोडी, अवजारे याशिवाय शेतीतील बांधबंदिस्ती, कुंपण तयार करणे इत्यादीसाठी शेतकऱ्याला कर्ज घ्यावे लागते. या घेतलेल्या कर्जाचा संबंध प्रत्यक्षपणे उत्पादनाशी असतो. घेतलेले कर्ज हे मिळणाऱ्या उत्पादनातून व्याजासहित परत करण्याची क्षमता कर्जदात्याकडे असते. अशा प्रकारचे कर्ज हे उत्पादक कर्ज म्हणून ओळखले जाते.

**२) अनुत्पादक ऋण :**

शेतकरी जे कर्ज कौटुंबिक, आकस्मिक येणाऱ्या अडचणी तसेच लग्नकार्य, कोर्टकचेऱ्या, आजारपण इत्यादीसाठी काढतो, ज्यातून उत्पादनात भर पडत नाही अशा कर्जाला अनुत्पादक ऋण असे म्हणतात. या कर्जाचा विचार करता या कर्जाची परतफेड शेतकऱ्याकडून सहजरीत्या होताना बघावयास मिळत नाही.

**३) उपभोग ऋण :**

शेतकऱ्याने स्वतः च्या कुटुंबाच्या उदारनिर्वाहासाठी घेतलेले ऋण, की जे अप्रत्यक्षपणे उत्पादनाशी जोडलेले असते अशा कर्जाला उपभोग ऋण म्हणतात. शेतकऱ्याच्या शेतीउत्पादन कालावधीमध्ये शेतकऱ्याला त्याच्या कुटुंबाचा जीवनचरितार्थ भागविण्यासाठी अन्नधान्याची गरज असते. अशा वेळी कर्ज काढतो व आपली उपभोगाची गरज पूर्ण करतो. मात्र ह्या कर्जाचा विचार बँकाही करतात त्यामुळे ह्या कर्जाची परतफेड होईल याची त्यांना खात्री असते.

**III) तारणाच्या दृष्टिकोनातून कर्जाचे प्रकार :**

कर्जासाठी तारण द्यावे लागते. दिल्या जाणाऱ्या तारणानुसार कर्जाचे पुढील प्रकार पडतात.

**१) जिंदगी तारणावरील कर्ज :**

कर्जाची परतफेड व्हावी म्हणून कर्ज घेणाऱ्याने जिंदगी मालमत्ता तारण द्यावयाची असते. अशा जिंदगी मालमत्तेची किंमत कर्जाच्या रकमेपेक्षा अधिक असते. जर अशा कर्जाची परतफेड झाली नाही, तर तारण दिलेली मालमत्ता कर्ज देणाऱ्या बँकेकडे जमा होते.

**२) विनातारण वा वैयक्तिक कर्ज :**

या प्रकारत मोडणारे कर्ज वैयक्तिक तारणावर दिले जाते. सर्वसाधारणपणे पीककर्जे ही वैयक्तिक तारणावरच दिली जातात. यासाठी कोणत्याही प्रकारचे तारण मालमत्ता आवश्यक नसते. मात्र गोदामाच्या पावत्या, शेअर्स, विमा पॉलिसी इत्यादी गोष्टी तारण ठेवून वैयक्तिक कर्ज दिले जाते.

**क) किसान क्रेडिट कार्ड (KCC) :**

ह्या कर्ज प्रकारात शेतकऱ्याची पुढील ५ वर्षाची पीक कर्जाची गरज लक्षात घेऊन कर्ज मंजूर केले जाते. हे कर्ज सर्व शेतकरी वर्गाला खुले असलेले पाहावयास मिळते. हे कर्ज अल्प व मध्यम मुदतीचे कर्ज असते. शेतकरी आपल्या जमिनीवर जी लागवड करतो किंवा पीक घेतो त्या पिकाच्या वाढीसाठी हे कर्ज दिले जाते. ह्या कर्जामध्ये शेतकऱ्याला १० टक्के खावटी/ वैयक्तिक गरजासाठी कर्जरूपाने रक्कम दिली जाते, तर मंजूर कर्ज रकमेच्या २० टक्के रक्कम शेतीसाठीची अवजारे व इतर खर्चासाठी रक्कम मंजुरी केली जाते.

munotes.in

शेतकरी शेती कसत असताना शेती कसणे व उत्पादन हाती येणे यामध्ये बराच कालावधी असतो, तसेच शेती कसण्यासाठीसुद्धा मोठया खर्चाची गरज असते. ही शेतकऱ्याची गरज शेती उतपादन घेत असताना कर्जरूपाने भागली शेतकरी अधिक चांगल्या प्रकारे उत्पादन घेत असताना कर्जरूपाने भागली तर शेतकरी अधिक चांगल्या प्रकारे उत्पादन घेऊ शकेल. यासाठी किसान क्रेडिट कार्ड ही कर्जे पद्धती अस्तित्वात आणली.

शेतकऱ्याला मिळणारे कर्ज हे शेतकऱ्याची पिकाखालील असलेल्या जमिनीनुसार व त्यावरील घेत असलेल्या पिकानुसार उपलब्ध होते. विविध पिकानुसार कर्जाची रक्कम ठरली जाते. आंबा कलम १ कलमामागे १२०० ते १५०० या प्रमाणे कर्ज संकरित भात पीक हेक्टरी २५,०००/- अशा प्रकारे जसे पीक असेल त्याप्रमाणे कर्जाची उपलब्धता होते. पिकानुसार हेक्टरी जेवढी जमीन असते तेवढे जरी कर्ज उपलब्ध होत असले तरी प्रत्येक शेतकऱ्याला जास्तीत जास्त ३०००००/- रु. पर्यंत व्याज दरात सवलत मिळू शकेल. त्यामध्ये ५० हजार रु. पर्यंत कर्ज असल्यास १% टक्का व्याजदर व पुढील ३ लाख रु. पर्यंतच्या कर्जावर २% टक्के व्याजदर असेल. मात्र ३ लाख रु. पर्यंतच्या कर्जावर  व्याजाची रक्कम ही रेग्युलर बँकिंग नियमानुसार असेल.

हे कर्ज शेतकऱ्याला ५ वर्षांसाठी मंजूर केले जाते. असे असले तरी ह्या कर्जाची रक्कम दरवर्षी पूर्णपणे भरणा करून कर्जाचे नूतनीकरण करणे गरजेचे आहे. तसे झाले तरच वरील व्याजदरामधील सूट मिळू शकेल. ही परतफेड पिकापासून मिळणाऱ्या उत्पादनाच्या काळात करावयाची आहे. कर्जाची परतफेड त्या वर्षात झाली तरच हे कर्ज नियमित समतोल होते.

केसीसीमध्ये कर्ज लाभार्थाला तीन वर्षांसाठी रु. ५०,०००/- पर्यंत अपघात विमा संरक्षण दिले जाते. त्यासाठी नाममात्र रु. १५/- इतके आकारले जातात.

कर्जधारकाला किसान क्रेडिट कार्ड / स्मार्ट कार्ड / एटीएम कार्ड दिले जाते. त्यानुसार ह्या कार्डाद्वारे बँकांच्या इतर शाखामधूनही तो आपले व्यवहार करू शकतो.

प्रत्येक बँकेला आपल्या कर्जव्यवहारामध्ये २० टक्के रक्कम कृषी कर्ज व शेतीपूरक व्यवसायासाठी कर्जपुरवठा करणे हे बंधनकारक आहे.

**२) जनरल क्रेडिट कार्ड (GCC):**

ह्या प्रकारचे कर्ज हे साधारणतः भूमिहीन व अल्पभूधारक यांच्यासाठी उपयुक्त होऊ शकते. घरबसल्या जे जे व्यवसाय आपणास करता येतील त्या सर्व व्यवसायांचा ह्या प्रकारच्या कर्जात समावेश होतो. त्यामध्ये पत्रावळी, लावणे, झाडू वळणे, चहा स्टॉल इत्यादी व्यवसायांचा समावेश होतो. ह्या कर्जप्रकारामध्ये खावटी रक्कम व व्यवसायासाठीची रक्कम मिळून जास्तीत जास्त २५०००/- रु. पर्यंतच कर्ज उपलब्ध होते. हे कर्ज ३ ते ५ वर्षे मुदतीसाठी मंजूर केले जाते. परंतु ह्या कर्जाचे नूतनीकरण दर वर्षी होणे गरजेचे आहे. जर नूतनीकरण झाले तरच हे कर्ज पुढे चालू राहील. या कर्जासाठी मात्र कर्जधारकाला व्याजदरात कोणतीही सवलत नाही. बँकेचा नियमित

munotes.in

व्याजदर ह्या कर्जावर आकाराला जातो. हे कर्ज पूर्णपणे मध्यम मुदतीचे कर्ज म्हणून ओळखले जाते.

**३) इन्व्हेस्टमेंट क्रेडिट कार्ड (ICC) :**

हा कर्जप्रकार दीर्घमुदत कर्जप्रकार आहे. शेतीमधील भांडवली गुंतवणूक वाढली पाहिजे. शेतकऱ्याने शेतीविकासासाठी विविध कार्ये हाती घेतली पाहिजेत. त्यातूनच त्याचे उत्पादन वाढेल. पॉवर टिलर, बैलजोडी-गाडी, सिंचन व्यवस्था निर्माण करणे, डॉक्टर इत्यादीसाठी हे कर्ज दिले जाते. ह्या कर्जाची परतफेडीची मुदत १२ ते १५ वर्षे इतकी असते.

या कर्जासाठी कोणत्याही प्रकारची व्याजदर सवलती नाही. बँकेच्या नियमित व्याजदराने हे कर्ज शेतकऱ्याला दिले जाते. यासाठी १ लाख रु. पर्यंत कर्ज असेल, तर त्याला कोणतेही तारण लागत नाही. मात्र १ लाख रु. वर कर्ज गेले असेल तर त्याला तारण द्यावे लागते. यासाठी कर्ज घेणारी व्यक्ती ही शेतकरी असणे गरजेचे असणे गरजेचे आहे.

**४) आर्टिझन क्रेडिट कार्ड (ACC) :**

ग्रामीण भागातील कारागीर वर्ग, ज्याच्याकडे विविध कला असतात त्या कलेचा वापर करून त्यांचे व्यवसायात रुपांतर करणाऱ्या वर्गासाठी ही कर्जयोजना आहे. मातीची कलाकुसरीची भांडी बनविणे, बुरुड काम, सुतार काम, सोनार काम इत्यादी ग्रामीण भागातील कारागिरांना त्यांच्या व्यवसायाच्या विकासासाठी ह्या ए.सी.सी. कर्ज प्रकारातून वित्तपुरवठा केला जातो.

ह्या कर्जप्रकारामध्ये कारागिराला जास्तीत जास्त २ लाख रु. इतके कर्ज दिले जाते. यासाठी कोणत्याही प्रकारची व्याजदर सवलत नाही. बँकेच्या नियमित व्याजदरानुसार हे कर्ज कारागिरांसाठी उपलब्ध होते.

**५) सेल्फ एम्प्लॉयमेंट क्रेडिट कार्ड (ACC) :**

ग्रामीण भागामध्ये स्वयंरोजगार करणाऱ्या व्यक्ती की ज्या उत्पादित स्वरूपाचा व्यवसाय करतात. यामध्ये ज्या व्यवसायातून नियमित उत्पादन मिळणाऱ्या व्यवसायाचा विचार केलेला आहे. रिक्षा व्यवसाय, इस्त्री व्यवसाय, ट्रॅक्टर व्यवसाय इत्यादी व्यवसाय की ज्यातून नियमित फायदा मिळतो. असा व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीला या कर्जप्रकारातून वित्तपुरवठा होतो. हे कर्ज ५० लाख रु. पर्यंत बँक देऊ शकते मात्र यासाठी 'क्रेडिट गॅरंटी ट्रस्ट फॉर मेडिअम, स्मॉल इंटरप्रायझेस' या ट्रस्टने त्या व्यक्तीच्या कर्जाची हमी घेणे गरजेचे आहे. ही भारत सरकारने उभारलेली ट्रस्टआहे. ह्या ट्रस्टतर्फे ज्या व्यक्ती व्यापार किंवा इतर व्यवसाय करतात त्यांना त्यांच्या व्यवसायाची हमी देते यासाठी ह्या ट्रस्टकडे ५ लाख रु. कर्ज असेल तर १ टक्का ५ लाख रु. कर्ज असेल तर १ टक्का ५ लाख रु. च्या वर कर्ज असले तर ११/२ टक्के रक्कम ट्रस्टकडे भरावी लागते. अशा वेळी ह्या व्यवसायाला हमी देण्याचे काम ही ट्रस्ट करते. एखाद्या वेळी अचानक येणाऱ्या संकटामुळे त्या व्यवसायाचे नुकसान झाल्यास ही ट्रस्ट त्या संदर्भातील जोखीम

munotes.in

स्वीकारते. मात्र व्याजदराने सवलत ह्या कर्जासाठी नाही. स्वयंरोजगार क्रेडिट कार्ड अंतर्गत विविध कारणांसाठी कर्जे दिली जातात त्यांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे.

**१) किरकोळ व्यापार :**

जी व्यक्ती दुसऱ्याकडून माल विकत घेते व व्यापार करते अशा व्यापाऱ्याला किरकोळ व्यापार म्हणतात. अशा प्रकारचे व्यापारी आपल्या व्यापारासाठी आवश्यक तेवढे कर्ज प्रकारामध्ये घेतात.

**२) लहान व्यवसाय :**

ज्यामध्ये इस्त्री व्यवसाय, रिक्षा व्यवसाय, खाद्यपदार्थ विकणे, बेकरी व्यवसाय, बांधकाम व्यवसाय (कारागिरांचा) इत्यादी लहान स्वरूपातील व्यवसाय या साठी स्वतंत्रपणे कर्जपुरवठा केला जातो.

**३) व्यवसायिक स्वयंरोजगार :**

ग्रामीण भागातील टेलरिंग व्यवसाय, डॉक्टर, इंजिनीअर इत्यादी स्वतःचा व्यवसाय करणारे प्रशिक्षित व्यावसायिक यांच्यासाठी ही कर्जव्यवस्था असलेली पाहावयास मिळते.

**४) रस्त्यावरील व पाण्यातील वाहतूक व्यवसाय :**

यामध्ये रिक्षा, ट्रक, ट्रॅक्टर, होडया इत्यादी वाहनांच्या खरेदीसाठी कर्जपुरवठा करण्याचे कार्ये ह्या प्रकारात होताना पाहावयास मिळते.

**५) लघुउद्योग :**

ग्रामीण भागातील सर्व लहान उद्योगांचे ह्या कर्जप्रकारामध्ये समावेश करण्यात आलेला आहे. फर्निचर मार्ट, काजू उद्योग, फॅब्रिकेशन अशा प्रकारचे सर्व लघुउद्योग ह्या प्रकारात येतात.

अशा प्रकारे ग्रामीण उद्योगांना, शेती, कारागीर यांना ग्रामीण वित्तपुरवठयाच्या माध्यमातून कर्जपुरवठा केला जातो.

**आपली प्रगती तपासा**

१) ग्रामीण वित्तपुरवठयाचे प्रकार सांगा.

## ८.६ ग्रामीण वित्तपुरवठयाचे महत्त्व

ग्रामीण वित्तपुरवठयामुळे शेती विकासापासून ते ग्रामीण भागातील लघुउद्योग, कुटिरउद्योग, प्रक्रिया उद्योग इ. बाबींचा विकास झाला. त्यामुळे पर्यायाने ग्रामीण भागाच्या विकासाला चालना मिळाली. ग्रामीण भागाच्या विकासामध्ये ग्रामीण वित्तपुरवठयाचे

महत्त्व अनन्यसाधारण असलेले पाहावयास मिळते. त्याचे स्पष्टीकरण पुढील मुद्दयांद्वारे देता येईल.

**१) शेतीच्या विकासास मदत :**

ग्रामीण वित्तपुरवठयामुळे शेती विकासाला चालना मिळाली. पारंपारिक शेती प्रक्रियेतून आधुनिक शेतीकडे शेतकऱ्यांना नेण्याचे काम ग्रामीण वित्तपुरवठयाने केले. त्यामुळे अन्नधान्याची शेती, फळांची शेती, फुलांची शेती, मांस उत्पादन, दुग्धव्यवसाय इत्यादीला मोठया प्रमाणात चालना मिळालेली दिसून येते.

**२) ग्रामीण व्यवसायांचा विकास :**

ग्रामीण भागातील विविध व्यवसायांना वित्तपुरवठा हा ग्रामीण वित्तपुरवठयातून झाल्याने ग्रामीण व्यवसायांच्या विकासाला चालना मिळालेली दिसून येते. मातीची भांडी, वीटभट्टी, मातीचे शो-पीस, सोनार काम, लोहार काम, सुतारकाम इत्यादी व्यवसायांचा विकास ग्रामीण भागात मोठया प्रमाणावर होत आहे.

**३) शेतकरी, कारागीर यांचा आर्थिक व सामाजिक स्तर उंचावण्यास मदत :**

ग्रामीण वित्तपुरवठयामुळे शेतकरी, ग्रामीण उद्योजक, कारागीर यांना त्यांच्या व्यवसायासाठी कर्जाची उपलब्धता झाली. त्यामुळे त्यांचे व्यवसाय विकसित झाले. व्यवसायातून त्यांना अधिक प्राप्ती होण्यास मदत झालेली दिसून येते. त्यामुळे त्यांच्या राहणीमानातसुद्धा सुधारणा झालेली पाहावयास मिळते. आर्थिक विकासामुळे सामाजिक विकासाला चालना मिळाली. थोडक्यात ग्रामीण वित्तपुरवठयामध्ये शेतकरी, कारागीर या वर्गाची आर्थिक स्वरुपात प्रगती झाली. त्यामुळे त्यांच्या मुलांना, कुटुंबातील घटकांना आवश्यक असणाऱ्या बाबी शिक्षण, आरोग्य, कपडा इ. बाबींमध्ये सुधारणा करता येणे शक्य झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्याची सामाजिक पतसुद्धा सुधारलेली दिसून येते.

**४) शेती पूरक व जोड व्यवसायांचा विकास :**

पूर्वी शेतकरी फक्त अन्नधान्यावर आधारित होता. कारण त्याच्या आर्थिक मागासलेपणामुळे त्याला शेतीमध्ये आर्थिक गुंतवणूक करणे शक्य नव्हते. मात्र ग्रानिम वित्तपुरवठयामुळे शेतकरी उत्साही दिसून येतोय. शेती अन्नधान्याबरोबरच सोबत तो दुग्धव्यवसाय, शेळीमेंढीपालन इ. व्यवसाय त्याने करावयास सुरुवात केलेली दिसून येते. पश्चिम महाराष्ट्रात आपणास सर्वांनाच माहिती आहे घरोघरी दुग्धव्यवसाय केला जातो. त्या सर्वाचे श्रेय खऱ्या अर्थाने ग्रामीण वित्तपुरवठयाला असलेले दिसून येते.

**५) बेकारी कमी होण्यास मदत :**

शेती, शेती जोड पूरक व्यवसाय, लघुउद्योग, कुटीरउद्योग शेती उत्पादनावर प्रक्रिया उद्योग, शेतीचे विविधीकरण या सर्व घटकांचा ग्रामीण वित्तपुरवठयामुळे मोठया प्रमाणात विकास होतोय. परिणामी ग्रामीण भागातील बेरोजगार वर्गांना हाताला काम मिळालेले

दिसून येते. तसेच येते. तसेच भूमिहीन शेतमजूर, तसेच रोजंदारीवर काम करणाऱ्या वर्गाला मोठया प्रमाणात रोजगाराची निर्मिती होते.

**६) ग्रामीण विविधीकरणाला चालना मिळाली :**

ग्रामीण भागामध्ये आज शेतीसोबत अनेक छोटे-मोठे उद्योग केले जातात. मसाला उद्योग, गिरण उद्योग, लाकडी खेळणी, तसेच फर्निचर, काजू उद्योग, मातीपासून आकर्षक भांडी बनविणे इत्यादी उद्योग ग्रामीण भागात वाढत आहेत. पूर्वी शेती व जोडव्यवसाय यांच्या पलिकडे व्यवसायांचा विकास नव्हता. मात्र आज ग्रामीण वित्तपुरवठयामुळे अशा प्रकारचे सर्व स्तरांतील उद्योगांचा विकास होणे शक्य झाले आहे.

**७) ग्रामीण औद्योगिकरणाला चालना :**

आज ग्रामीण भागामध्ये लघुउद्योग व कुटीरउद्योग याचबरोबर मोठे उद्योग यांना हळूहळू चालना मिळत आहे. कारण पूर्वी ग्रामीण भागातील कारागीर व इतर व्यावसायिक यांना प्रमुख अडचण होती ती म्हणजे पैसा, आज ग्रामीण वित्तपुरवठयामुळे या उद्योगांना वित्तपुरवठा झाला. त्यामुळे साहजिकच ग्रामीण भागातील व्यवसायांची वृद्धी होण्यास मदत झालेली दिसून येते.

**८) व्यापारी शेतीचा विकास :**

भारतीय शेती व्यवस्थेमध्ये बहुतांश वर्ग हा पैशाअभावी पारंपारिक शेतीमध्ये गुंतला होता. परंतु ग्रामीण वित्तपुरवठा जेव्हापासून शेती व्यवसायाला कर्ज देऊ लागला त्यानंतर हळूहळू पारंपारिक शेतीचे स्वरूप बदलून व्यापारी शेतीकडे शेतकऱ्याचे लक्ष गेलेले बघावयास मिळते. आधुनिक व व्यापारी शेतीकडे शेतकरी वळलेला दिसून येतो.

**९) ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास :**

भारतीय अर्थव्यवस्था ही पूर्वी शेतीप्रधान होती, मात्र आज अर्थव्यवस्थेतील शेतीचे व्याप्तीचे प्रमाण इतर अर्थघटकांपेक्षा कमी असलेले पाहावयास मिळते. याचा अर्थ शेतीमध्ये आपण मागे आहोत असे नाही. कारण शेतीमध्ये आपण उत्तरोत्तर प्रगती करतो आहोत. शेती हा ग्रामीण भागाचा आत्मा आहे. शेती विकासाबरोबरच आपण ग्रामीण भागातील विविध क्षेत्रांतील व्यवसायाला चालना देत आहोत त्यामध्ये कृषी पर्यटन, कृषी उद्योग, ग्रामीण लघु व मध्यम उद्योग, कुटीरउद्योग इ. विविध क्षेत्रांचा विकाससुद्धा झपाटयाने होत आहे. त्यामुळे साहजिकच ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास होतोय. त्यापाठीमागे मुख्य कारण म्हणजेच ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास होतोय. ह्या सर्व विकासाला खरी मदत आहे ती ग्रामीण वित्तपुरवण्याची होय.

**१०) संस्थात्मक वित्तपुरवठयामुळे सावकारी पाशातून मुक्तता :**

भारतीय शेतकऱ्याला संस्थात्मक वित्तपुरवठा होण्याअगोदर सावकाराचे साम्राज्य ग्रामीण भागावर होते. शेतकऱ्यालासुद्धा सावकार हा मोठा आधार होता. मात्र बहुतांश सावकारांनी शेतकऱ्याची अनेक मार्गाने पिळवणूक केली त्यामुळे ग्रामीण भागात

कर्जबाजारीपणा वाढवण्यास सुरुवात झाली. संस्थात्मक वित्तपुरवठयामुळे मात्र हळूहळू सावकारी पाशातून शेतकऱ्याची सुटका होऊ लागली. कारण ह्या वित्तपुरवठयामध्ये फसवणूक नव्हती.

**११) दारिद्रय निर्मुलन :**

भारतीय शेतकऱ्याचे खऱ्या अर्थाने दारिद्रय निर्मुलन करण्याचे काम ग्रामीण वित्तपुरवठयामुळे झाले. बहुतांश शेतकरी वर्गाने आपला शेती व्यवसाय, लघुउद्योग, कुटीरउद्योग यासाठी कर्ज घेऊन आपल्या व्यवसायाची पर्यायाने आपली प्रगती केली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील दारिद्रय कमी होताना पाहावयास मिळत आहे.

## ८.७ सारांश

ग्रामीण भागात मुख्य व्यवसाय शेती असल्यामुळे शेतकऱ्यांना नेहमीच कर्जाची गरज भासत असते. कारण शेती व्यवसाय हा पूर्णपणे निसर्गावर अवलंबून असल्यामुळे निश्चित असे उत्पादन मिळत नाही, त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्याला कर्जाची गरज भासत असते. उत्पादक कर्जापेक्षा शेतकऱ्यांना अनुत्पादक कर्जाची गरज शेतकऱ्यांना भासत असते. परंतु अनुत्पादक स्वरूपाचे कर्ज हे संस्थात्मक क्षेत्रातून मिळत नाही, त्यामुळे शेतकऱ्यांना असंस्थात्मक मार्गातून कर्ज घ्यावे लागते व अशा कर्जाच्या व्याजाचा दर हा अधिक असतो. त्यामुळे एखादा कर्जाच्या चक्रात अडकला तर त्याला त्यातून बाहेर पडणे कठीण होते.

## ८.८ स्वाध्याय

१) ग्रामीण वित्तपुरवठयाची संकल्पना स्पष्ट करा.

२) ग्रामीण वित्तपुरवठयाचे स्वरूप स्पष्ट करा.

३) ग्रामीण वित्तपुरवठयाचे प्रकार सांगा.

४) ग्रामीण वित्तपुरवठयाचे महत्त्व विशद करा.

## ८.९ संदर्भ सूची


1. Dantwala M.L Indian Agriculture Since Independence Oxford and IBH Publishing Co. Pvt. Ltd. New Delhi – 110 001 1990.

2. Badi R.V. Badi N.V. Rural Marketing: Badi R.V. Badi N.V. Rural Marketing : Habeeb U.R., Rahman K.S. Rural Marketing in Indai HPH- Mumbai 400 004 --- 2003.

3. Rural MarketingGopalaswamyVikas Publishing House New Delhi.

4. Kashyp Pradeep, Rant Siddhartha The Rural Marketing, Biztantra, Mumbai. 2005.

5. Kamat Minouti : Krishanmoorthy R. Rural marketing, Himalaya Publishing House, "Ramdut", Dr. Bhalerao Marg, Girgaon, Mumbai 400004 p.nos.1 to 15 Tel no. 022-23860170 / 2003.

6. Desai Vasant Small-scale industries and entrepreneurship Himalaya Publishing House, "Ramdut", Dr. Bhalerao Marg, Girgaon, Mumbai 400004./1998 p.no.29.

7. Sherlekar S.A Marketing Management Himalaya publishing House/ 2004.

❖❖❖❖

munotes.in

# २

# ग्रामीण कर्जबाजारीपणा

**घटक रचना :**

२.१ पाठाची उद्दिष्टे

२.२ प्रस्तावना

२.३ संकल्पना

२.४ ग्रामीण कर्जबाजारीपणाची कारणे.

२.५ ग्रामीण कर्जबाजारीपणाचे दुष्परिणाम

२.६ ग्रामीण कर्जबाजारीपणावर उपाययोजना

२.७ सारांश

२.८ स्वाध्याय

## २.२ पाठाची उद्दिष्टे

१. ग्रामीण कर्जबाजारीपणा ही संकल्पना अभ्यासणे.

२. ग्रामीण कर्जबाजारीपणाची कारणे व त्याचे दुष्परिणाम यांचा अभ्यास करणे.

३. ग्रामीण कर्जबाजारीपणावर काय उपाय-योजना सुचविता येईल याचा अभ्यास करणे.

## २.२ प्रस्तावना

भारत देश ५ लाखांहून अधिक खेड्यांचा बनलेला आहे. या खेड्यांचा म्हणजेच ग्रामीण भागाचा विचार करता हा ग्रामीण भाग शेती, शेतीपूरक व जोड व्यवसाय, प्रक्रिया व्यवसाय, ग्रामीण उद्योग या व्यवसायावर अवलंबून आहे. यातील मोठा वर्ग हा शेतीवर उपजीविका करणारा आहे. जोपर्यंत ही भारतीय शेती व ग्रामीण उद्योग विकसित होत नाही तोपर्यंत ही ग्रामीण अर्थव्यवस्था दुबळीच राहणार आहे.

आजही भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेला म्हणावा तसा आकार प्राप्त झालेला नाही त्यापाठीमागे अनेक कारणे दिसून येतात, त्यातील महत्त्वाचे कारण म्हणजे ग्रामीण अर्थव्यवस्थेला होणारा अपुरा ग्रामीण वित्तपुरवठा होय. कारण ग्रामीण अर्थव्यवस्था असणारा शेतकरी व कारागीर वर्ग यातील बहुतांश वर्ग हा दारिद्र्यामध्ये जगणारा, अल्प भूधारक, मध्यम भूधारक असल्याने त्यांना जोपर्यंत आर्थिक पाठबळ मिळत नाही तोपर्यंत ह्या वर्गाच्या ताब्यातील शेती व व्यवसाय विकसित होणार नाही.

munotes.in


साहजिकच देशाला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीपासूनच शेतीला वित्तपुरवठा व्हावा यासाठी सहकारी तत्त्वावर प्रयत्नही झाले. मात्र त्यांचा आवाका हा फारच लहान होता. स्वातंत्र्यानंतरसुद्धा बरीच वर्षे शेती व ग्रामीण उद्योगाला योग्य पद्धतीने पतपुरवठा होईल अशी व्यवस्था विकसित नव्हती.

त्याचाच फायदा त्यावेळी सावकार, जमीनदार यांनी घेतला व शेतकरी व कारागीर कर्जबाजारी होण्यापाठीमागे हा सावकारी फास आहेच, त्या व्यतिरिक्त ग्रामीण शेतकरी कर्जबाजारी होण्यापाठीमागे अनेक कारणे आहेत. हा कर्जबाजारीपणा कमी होण्यासाठी शासन व शेतकरी या दोन्ही पातळीवर प्रयत्न होणे गरजेचे आहे. यालाही पहिल्यांदा शेती विकास होणे गरजेचे आहे. त्यासाठी शेती विकासाच्या पायाभूत सुविधांचाही शासनाने विकास करणे गरजेचे आहे व शेतकऱ्याने शेतीवर अवलंबून न राहता त्याने शेतीजोड किंवा पूरक व्यवसायाचा आग्रह धरला पाहिजे. तरच ग्रामीण कर्जबाजारीपणा कमी होऊ शकतो.

## २.३ संकल्पना

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सरकारने ग्रामीण भागात कर्जपुरवठा करण्यासाठी सहकारी संस्था, व्यापारी अधिकोष इ. चा विकास केला. या संस्था अल्प व्याजदरात ग्रामीण कर्जपुरवठा करतात. तरी अजूनही ग्रामीण भागात सावकारी पद्धतीचे वर्चस्व कमी झालेले दिसून येत नाही. तसेच ग्रामीण भागातील शेतकरी, ग्रामीण उद्योजक, कारागीर इ.च्या बाबतीत सावकारी पाश्याव्यतिरिक्त इतरही अनेक समस्या आहेत की त्यामुळे ग्रामीण भागातील हे घटक कर्ज काढतात, काढलेले कर्ज हे परत करू शकत नाहीत. त्यामुळे ते कर्जाच्या विळख्यात हळूहळू सापडत जाताना पाहावयास मिळतात.

भारतीय शेतकरी 'कर्जात जन्मतो, कर्जात जगतो आणि कर्जात मरतो' असे म्हणतात.



**https://maharashtratimes.com**

भारतीय शेतकरी आपले उत्पन्न कमी असल्यामुळे त्याला आपला दैनंदिन उपभोग खर्च चालविणे कठीण जाते. अशा वेळी मुलांचे शिक्षण, लग्नकार्य, आरोग्य इत्यादी गरजा पूर्ण करण्यासाठी त्याला कर्ज काढावे लागते. सामाजिक व धार्मिक रूढी नुसारही तो विविध कारणांसाठी कर्ज काढतो. ही सर्व कर्जे अनुत्पादक स्वरूपाची आहेत. त्यामुळे शेतकरी आपले उत्पादन वाढवील आणि त्या वाढविलेल्या उत्पादनातून कर्जाची परतफेड करील

याची सुतराम शक्यता पाहावयास मिळत नाही. या सर्व घटकांना सरकार किंवा सहकारी संस्था यांच्याकडून पुरेसे कर्ज मिळू शकत नाही त्यामुळे नाईलाजास्तव सावकाराकडून म्हणजेच बिगर संस्थात्मक मार्गाने कर्जपुरवठा स्वीकारावा लागतो. मात्र सावकार किंवा बिगर संस्थात्मक घटक जेव्हा शेतकरी कारागीर इ. घटकांना कर्जपुरवठा करतात तेव्हा दुसऱ्या बाजूने ह्या घटकांना लुबाडण्याचे कार्यही करतात.

भारतीय ग्रामीण शेतकरी, कारागीर, उद्योजक हे जोपर्यंत कर्जमुक्त होत नाही तोपर्यंत ते शेती व ग्रामीण उद्योगांमध्ये अधिक गुंतवणूक करू शकत नाहीत. पऱ्यायाने मिळणारे उत्पादन हे कमी असणार आहे. ग्रामीण कर्जबाजारीपणाची वैशिष्ट्ये वेगवेगळी आहेत.

१) सुमारे ७०% टक्के शेतकरी, ग्रामीण कारागीर व उद्योजक कर्जबाजारी आहेत.

२) लहान शेतकरी यांच्यावरील कर्जाचा बोजा अधिक आहे.

३) अल्पमुदतीसाठी घेतलेल्या कर्जाचे प्रमाण जास्त आहे.

थोडक्यात ग्रामीण भागातील शेतकरी, ग्रामीण उद्योजक, कारागीर इ. घटकांना उत्पादक व अनुत्पादक अशा दोन्ही कारणांसाठी कर्जाची गरज असते. मात्र घेतलेल्या कर्जाची योग्य कालावधीत परतफेड होत नाही पर्यायाने ते कर्ज वाढत जाते अशा वेळी हा घटक कर्जबाजारी म्हणून ओळखला जातो. अशा प्रकारचा ग्रामीण भागातील कर्जबाजारी असणारा मोठा वर्ग आहे. त्या वर्गाच्या कर्जबाजारीपणाला ग्रामीण कर्जबाजारीपणा असे म्हणतो.

ग्रामीण कर्जबाजारीपणाविषयी आतापर्यंत अनेक अंदाज व्यक्त करण्यात आले आहेत. १९५१ च्या राष्ट्रीय  आय समितीच्या अहवालानुसार ग्रामीण भागात ९१३ कोटी रु. कर्जाची मागणी होती. अखिल भारतीय ग्रामीण प्रत्यय सर्वेक्षण समिती १९५१-५२ च्या अहवालानुसार ग्रामीण भागात ७५० कोटी रु. कर्जाची गरज होती. रिझर्व्ह बँकेने १९६१-६२ मध्ये केलेल्या अखिल भारतीय ग्रामीण कर्ज आणि गुंतवणूक सर्वेक्षणानुसार ग्रामीण भागातील लोकांनी सुमारे २,७८८ कोटी रु. इतके एकूण कर्ज घेतले होते, त्यापैकी ७५% टक्के शेतकरी वर्गाने कर्ज घेतलेले होते.

प्रो. दांतवाला यांच्या अध्यक्षतेखालील समितीने कर्जाबाबतचा अंदाज पुढील प्रमाणे व्यक्त केला होता. सन १९७०-७१ मध्ये शेतीसाठी अल्प मुदतीचे १२०० कोटी रु., मध्यम मुदत १०० कोटी रु. आणि दीर्घकालीन मुदत १६० कोटी रु. कर्ज लागेल. राष्ट्रीय कृषी आयोगाने १९८५ मध्ये ९,४०० कोटी रु. ची कर्जाची गरज व्यक्त केली होती. नवव्या योजनेनुसार सन २००१-०२ पर्यंत शेतकऱ्यांना अल्प, मध्यम व दीर्घमुदत कर्जासाठी २,२९,७५०कोटी रु. ची गरज लागेल, असा अंदाज व्यक्त केला होता. २०१६-१७ या आर्थिक वर्षात, १०. ६५ लाख कोटी रुपयांचे कृषी कर्ज वितरित केले गेले.

## २.४ ग्रामीण कर्जबाजारीपणाची कारणे

ग्रामीण कर्जबाजारीपणाची कारणे विचारात घेता त्याचे दोन प्रकारांत विभाजन करण्यात आले आहे. अ) शेतीविषयक कारणे ब) शेतीव्यतिरिक्त कारणे. त्याची माहिती पुढीलप्रमाणे.

**अ) शेतीविषयक कारणे :**

आपल्या देशातील सर्वसामान्य शेतकरी वर्ग गरीब आहे. त्याच्या जवळ शेतीव्यवसायात गुंतविण्यासाठी भांडवल नाही. ही गरज भागविण्यासाठी त्याला कर्जाची गरज भासते. शेतकऱ्यांना ज्या वेगवेगळ्या कारणांसाठी पैशाची गरज भासते त्यावरून शेतकऱ्यांना आवश्यक कर्जाचे प्रकार पडतात.

**१) अल्प मुदत कर्ज :**

अल्प मुदत कर्जे शेतकऱ्यांना पंधरा महिन्यांसाठी आवश्यक असतात. शेतीहंगामात बरेच नियमित खर्च करावे लागतात. त्याचबरोबर कुटुंबाच्या चालू उपभोगाच्या गरजा भागविण्यासाठी या कर्जाची आवश्यकता भासते. अल्पमुदत कर्जे पीक हाती आल्यानंतर शेतमालाची विक्री केली की ताबडतोब फेडली जातात. शेती हंगामातील चालू खर्च भागविण्यासाठी हे कर्ज आवश्यक असते. त्यामध्ये मशागत, खते, बियाणे, मजुरी इ. कारणांचा समावेश होतो. हे कर्ज सभासदांना पिकाच्या तारणावर दिले जाते. हे कर्ज रोख वस्तूच्या स्वरूपातही दिले जाते.

**२) मध्यम मुदत कर्ज :**

शेतीतील काही विकासात्मक बाबींसाठी शेतकऱ्याला जास्त पैशाची गरज असते. जास्त पैसा तो अल्पमुदतीत परत करू शकत नाही. यासाठी या कर्जाची परतफेडीची मुदत २ वर्षे ते ५ वर्षे इतकी असते. अशा प्रकारचे कर्ज शेतीला बांध घालणे, जमीन सपाट करणे, बैलाची किंवा दुभत्या जनावरांची खरेदी करणे, लहान यंत्रे खरेदी करणे, विहीर खोदणे, सिंचन व्यवस्था इ. साठी दिले जाते. या कर्जाची परतफेड निर्धारित कालावधीत सुलभ हप्त्यांने करावी लागते.

**३) दीर्घमुदत कर्ज :**

ही कर्जे पाच ते पंचवीस वर्षे मुदतीसाठी घेतली जातात. या कर्जाची रक्कम मोठी असते. त्यामध्ये विहीर खोदून पाईपलाईन ओढणे, ट्र@क्टरसारखी अवजारे, जमिनीमध्ये कायमस्वरूपी सुधारणा इत्यादी कारणांसाठी शेतकरी दीर्घमुदत कर्ज घेतो. ही कर्जे दीर्घ मुदतीत सुलभ हप्त्यांने फेडली जातात.

वरील तिन्ही कर्ज कालावधीनुसार प्रकारांचा विचार करता शेतकरी कर्ज घेतो ते शेतीसाठीच्या विकासासाठीच घेतो. परंतु काही कारणास्तव त्याने घेतलेल्या कर्जाची परतफेड करणे त्याला जमत नाही. पर्यायाने तो शेतकरी हळूहळू कर्जबाजारीपणामध्ये अडकतो.

**ब) शेतीशिवाय ग्रामीण कर्जबाजारीपणाची कारणे -**

**१. ग्रामीण दारिद्र्य :**

शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणास त्याची गरिबीच जास्त जबाबदार असते. शेतकऱ्याला उत्पादक कामाबरोबर अनुत्पादक कामासाठीही कर्ज घ्यावे लागते. कारण त्याची स्वत:ची बचत कमी असते. नैसर्गिक परिस्थितीची प्रतिकूलता जर असेल, तर उत्पादनात घट होते. म्हणून तो कर्जाची परतफेड करू शकत नाही. सीमांत आणि लहान शेतकरी उत्पादक कामापेक्षा अनुत्पादक म्हणजे उपभोगासाठीच कर्जाचा वापर करतात.




https://www.agrowon.com

**२. जमीन धारणा पद्धती :**

पूर्वी भारतात जमीनदारी पद्धती, महलवारी पद्धती, रयतवारी पद्धती अस्तित्वात होती. जमीनदार वर्ग शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणावर खंड आकारणी करीत होते. बऱ्याच वेळा शेतीतून येणाऱ्या उत्पादनातून खंडाची रक्कम देणेसुद्धा शक्य होत नसे. परंतु उत्पादन मिळो न मिळो खंडाची रक्कम द्यावीच लागत होती. अशा वेळी बऱ्याचदा जमीनदार, सावकार यांच्याकडून कर्जे घ्यावी लागत होती.

**३. सावकारी पद्धतीचे दोष :**

देशातील स्वातंत्र्य मिळूनसुद्धा २९७० पर्यंत ग्रामीण शेतकऱ्यांना संस्थात्मक कर्जपुरवठा शेतकऱ्यापर्यंत पोहोचलेला नव्हता. त्यामुळे शेतकऱ्याला सावकाराशिवाय पर्याय नव्हता. व्याजाचे दर जास्त, खोट्या नोंदी, जमीन तारण ठेवून हडप करणे इ.



https://www.lokmat.com/pune



munotes.in

सावकारी पद्धतीतील दोषामुळे कर्जबाजारीपणात वाढ होते. बऱ्याचदा शेतकऱ्यांचा कर्जाची परतफेड होऊनही कर्ज शिल्लक दाखविले जाते. यातूनच शेतकऱ्याची लुबाडणूक केली जाते.

**४. कमी जमीन धारण क्षेत्र :**

आपल्या देशात झालेले जमीनविषयक कायदे यामुळे जमिनीचे मोठ्या प्रमाणात तुकडीकरण व विभाजन झालेले पाहावयास मिळतात. याचबरोबर वाढती लोकसंख्या हे जमिनीच्या आंतरविभाजनाचे प्रमुख कारण आहे. यामुळे देशातील बहुसंख्य शेतकऱ्यांचे जमीनधारण क्षेत्र कमी आहे. त्यामुळे कुटुंबाचा आकार व कमी जमिनीतून येणारे कमी उत्पादन याचा मेळ बसत नाही. त्यामुळे प्रतिवर्षी शेतकरी कर्जबाजारी होत राहतो.

**५. उत्पादनातील अनिश्चितता :**

आपल्या देशात केवळ ३९ टक्के क्षेत्राला जलसिंचनाच्या सुविधा उपलब्ध आहेत. बाकी शेती पूर्णपणे पावसावरती अवलंबून आहे. पावसाची अनिश्चितता निर्माण झाल्यास उत्पादनाबाबत अनिश्चितता निर्माण होते. त्यामुळे ज्या वर्षी उत्पादन येत नाही किंवा कमी येते त्यावेळी शेतकऱ्यांना आपला खर्च भागविण्यासाठी कर्ज काढावे लागते.

**६. वडिलोपार्जित कर्ज :**

भारतीय शेतकऱ्याबाबत एक विधान केले जाते. भारतीय शेतकरी जन्मतो कर्जात, जगतो कर्जात आणि कर्जातच मृत्यू पावतो. कारण वडिलोपार्जित मालमत्तेबरोबर वडिलोपार्जित कर्जाचा भारही शेतकऱ्याला सहन करावा लागतो. सावकाराचे कर्ज नंतर आयुष्यभर वाढतच जाते अशा रीतीने शेतकऱ्याच्या कर्जबाजारीपणाचे हे एक प्रमुख कारण दिसून येते.

**७. जोडव्यवसायांचा अभाव :**

शेती व्यवसायाबरोबर जर एखादा जोडधंदा असेल तर एखाद्या वेळी शेतीवर कुऱ्हाड कोसळली तर जोडधंद्यावर तरी शेतकरी जगू शकतो. परंतु आपल्या देशामध्ये शेतकऱ्याच्या शेतीच्या जोडीला धंदा असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण फारच कमी आहे. त्यामुळे अशा शेतकऱ्यांना शेती उत्पादन कमी आल्यास कर्जबाजारीपणाला सामोरे जावे लागते.

**८. शेतमाल विपणनात फसवणूक :**

शेतकरी जेव्हा आपला शेतमाल विक्रीसाठी बाजारपेठेत आणतो त्यावेळी त्याला मध्यस्थ वर्ग विविध माध्यमातून फसवणूक करतो. कमी वजनमापे वापरणे, प्रतवारी न करणे, अनधिकृत कपाती करणे इत्यादीमुळे शेतकऱ्यांना आपल्या शेतमालाची योग्य किंमत प्राप्त होत नाही, किंबहुना शेतकऱ्यालाच या संपूर्ण प्रक्रियेमध्ये तोटा सहन करावा लागतो. त्यामुळे त्यांना जगण्यासाठी कर्जबाजारी व्हावे लागते.

**९. अचानक येणारे संकट :**

शेतकऱ्यावर अनेक संकटे येतात. शेतीसाठी आवश्यक असणारे जनावर अचानक मरते. घरातील एखादी व्यक्ती दीर्घ आजाराने जाग्यावर पडते, अशा वेळी शेतकऱ्याला ती तातडीची गरज भागविण्यासाठी कर्ज काढावे लागते.

**२०. मागासलेली शेती :**

भारतीय शेतीचा विचार करता आजही बहुतांश शेती ही पारंपरिक पद्धतीनेच कसली जाते. त्यामुळे ही शेती मागासलेली पाहावयास मिळते. पर्यायाने कमी उत्पादन शेतकऱ्याला प्राप्त होते. तर दुसऱ्या बाजूला आधुनिक पिके घेणे किंवा बहुपिकाचा विचार याही गोष्टी पाहावयास मिळत नाहीत त्यामुळे साहजिकच कमी उत्पादन प्राप्त होते. साहजिकच उदरनिर्वाहासाठी शेतकऱ्याला कर्ज काढावे लागते.

**२२. धार्मिक व सामाजिक कारणे :**

आपल्या देशात लोकांवर धार्मिकतेचा पगडा मोठा असल्यामुळे शेतकरी आपले धार्मिक सण, उत्सव, समारंभ मोठ्या हौसेने साजरे करतात. जन्म, विवाह, मृत्यू या प्रसंगी शेतकरीसुद्धा आपली खोटी प्रतिष्ठा पणाला लावून लागेल तेवढा खर्च करतो. हे सर्व खर्च तो कर्ज काढूनच करत असतो. त्यामुळे अगोदर कर्जामध्ये असणारा शेतकरी अधिक कर्जबाजारी होतो.

**२२. मोठे कुटुंब :**

ग्रामीण भागात आजही एकत्रित कुटुंब व्यवस्था असलेल्या काही ठिकाणी कुटुंबाचा आकार मोठा असतो, मात्र ठराविकच लोक त्यामध्ये कमविते असतात. कुटुंबामध्ये आजारपण, शिक्षण, कपडेलत्ते इ. साठी नियमित खर्च होत असतात. परंतु कुटुंबाच्या आकारामुळे कुटुंबप्रमुखाला ह्या सर्व गरजा भागविणे कठीण होते. अशा वेळी त्याला वेळोवेळी कर्ज काढावे लागते.

**२३. कोर्टकचेऱ्या :**

ग्रामीण भागात आजही गटबाजी, भावकीतील हेवेदावे या कारणातून शुल्लक कारणावरून कोर्टकचेऱ्या चालू असतात. त्यामध्ये पाण्याचा पाट, जमिनीचा बांध किंवा हद्द इ. किरकोळ कारणावरून ही भांडणे होतात. मात्र खोट्या प्रतिष्ठेपायी कोर्टकचेऱ्या खेळत स्वत: कर्जबाजारी होताना पाहावयास मिळतात.

**आपली प्रगती तपासा :**

१) ग्रामीण कर्जबाजारीपणाची कारणे सांगा.

## २.५ ग्रामीण कर्जबाजारीपणाचे दुष्परिणाम

शेतकरी कर्ज कोणत्या कारणासाठी घेतो, त्याचा तो योग्य वापर करतो का या गोष्टीवर कर्जबाजारीपणा अवलंबून आहे. शेतकऱ्याने जर उत्पादक कार्यासाठी कर्ज घेतले तर त्याचा

वापर उत्पादक कार्यासाठीच केला तर ते कर्ज शेतकऱ्याला तारते. त्यामुळे ते कर्ज नेहमी चांगले असते. मात्र काही शेतकरी वर्ग हा उत्पादक कार्यासाठी घेतलेले कर्ज अनुत्पादक कार्यासाठी वापरतात त्यामुळे त्या कर्जाची परतफेड होत नाही. हेच कर्ज शेतकऱ्याला कर्जबाजारी बनविते. त्यांचे होणारे दुष्परिणाम पुढीलप्रमाणे आहेत.

**१) भूमिहीन शेतमजुरात वाढ :**

आपल्या देशातील कर्जबाजारी असणारा मोठा शेतकरी वर्ग हा अल्प व मध्यम भूधारक असल्याने कर्ज काढतानाच त्याला आपली जमीन गहाण ठेवावी लागते. मात्र कर्जाची रक्कम जसजशी वाढत जाते तसा सावकार गहाण ठेवलेली जमीन ताब्यात घेतो. तर काही ठिकाणी ह्या कर्जापायी शेतकऱ्यांची हतबलता लक्षात घेऊन अनेक प्रकारचे डाव टाकून ही जमीन गिळंकृत केली जाते. अशा रीतीने कर्जबाजारी शेतकऱ्याचे भूमिहीन शेतमजुरात रूपांतर होते.

**२) ग्रामीण दारिद्र्यात वाढ :**

ज्या वेळी शेतकरी कर्जबाजारी होतो. त्यावेळी शेतीवरील त्याचे लक्ष कमी होते. त्यामुळे शेतीची उत्पादकता अल्प राहते. ज्या सावकाराकडून कर्ज घेतलेले असते त्याच सावकाराला तो कमी असलेला शेतमाल विकावा लागतो. पर्यायाने शेतकऱ्याला जगण्यासाठी आणखी कर्ज काढावे लागते. अशा प्रकारे त्या शेतकरी कुटुंबाला दारिद्र्यात जगावे लागते.

**३) शेती उत्पादनात घट :**

दरवर्षी प्राप्त झालेल्या उत्पन्नातून शेतकरी कर्जाचा बोजा कमी करण्याचा आटोकाट प्रयत्न करतो. त्यामुळे शेतीव्यवसायासाठी गुंतवणूक करण्यात त्यांच्याकडे पैसा शिल्लक राहत नाही. त्यामुळे शेतीसाठी आवश्यक साधने योग्य वेळी उपलब्ध न झाल्याने शेती उत्पादनात घट होते.

**४) देशाच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेवर परिणाम :**

ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विचार करता त्याचा मूलाधार हा शेती हा होय. परंतु कर्जबाजारी झालेल्या कुटुंबाचा विचार करता कर्जबाजारीपणामुळे दिवसेंदिवस शेतीमधील गुंतवणूक कमी झाल्याने शेती उत्पादनात घट झाली. अशा प्रकारे संपूर्ण देशातील कर्जबाजारी झालेल्या शेतकरी कुटुंबामुळे त्या कुटुंबांचे उत्पादन झालेच, पर्यायाने देशाच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेवरही त्याचा परिणाम झालेला दिसून येतो.

**५) सामाजिक प्रतिष्ठा कमी :**

कर्जबाजारी झालेला शेतकरी किंवा कारागीर हा हळूहळू समाजामध्ये त्याला वावरताना आपण काही चुकीचे केल्याची भावना सातत्याने त्याला अस्वस्थ करीत असते. समाजाचा दृष्टिकोनसुद्धा त्याच्याकडे पाहण्याचा बदलून जातो. त्याची समाजातील पत पूर्णपणे नष्ट होते. अशातून त्या शेतकरी कुटुंबाला अधिक नैराश्य येते.

**६) शेतकऱ्यांमध्ये व्यसनग्रस्तता वाढते :**

शेतकरी स्वत:वर असणारा कर्जाचा बोजा कमी करण्याच्या प्रयत्नात असतो. यामुळे तो सतत चिंताग्रस्त असतो. या चिंताग्रस्ततेमुळे हाती घेतलेले कार्य तो नीटपणे करू शकत नाही. असलेल्या कर्जाचा बोजा कमी होण्यापेक्षा अधिक वाढतच जातो आहे. हे ध्यानात आल्यावर आपली त्या दिवसाची चिंता मिटावी यासाठी तो व्यसनाला जवळ करतो, अशा प्रकारे कर्जबाजारी व्यक्ती व्यसनाधीन होताना पाहावयास मिळते.

**आपली प्रगती तपासा :**

१. कर्जबाजारीपणाचे परिणाम लिहा.

## २.६ ग्रामीण कर्जबाजारीपणावर उपाययोजना

ग्रामीण कर्जबाजारीपणा कमी करण्यासाठी उपाय योजताना मुळातच शासकीय पातळीपासून ते शेतकरी कुटुंबापर्यंत हे उपाय राबविले गेले तरच खऱ्या अर्थाने ग्रामीण कर्जबाजारीपणा कमी होऊ शकेल यासाठीच्या उपाययोजना पुढीलप्रमाणे.

**२) जुन्या कर्जाबाबत समझोता :**

प्रत्येक राज्य सरकारने याबाबत कायदेही केलेले आहेत, मात्र त्याची अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. तसेच सावकारावर नियंत्रण घालणाऱ्या कायद्याने अजूनही सावकारी व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीवर या कायद्याने  कोणतीही कारवाई होताना पाहावयास मिळत नाही.

**२) नवीन कर्जावर नियंत्रण :**

जुन्या कर्जाबाबत माफीचा किंवा तत्सम निर्णय घेत असतानाच दुसऱ्या बाजूला शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या कर्जावर नियंत्रणही ठेवणे तेवढेच आवश्यक आहे.

**३) धार्मिकतेवरील होणाऱ्या खर्चावर आळा घालणे :**

शेतकऱ्याचा मुळातच धार्मिकतेचा प्रश्न लक्षात घेऊन सण समारंभ, रूढी, परंपरा यावर मोठ्या प्रमाणात खर्च करणे बंद केले पाहिजे. आवश्यकतेनुसार हा खर्च कर्ज न काढता करणे गरजेचे आहे, तरच शेतकरी कर्जबाजारी होणार नाही.

**४) साक्षरता प्रसार करणे :**

शेतकरी कुटुंबामध्ये असणाऱ्या अशिक्षितपणामुळेच हा कर्जबाजारीपणाचा राक्षस शेतकऱ्याच्या घरात घुसतो. यासाठी साक्षरतेचे प्रमाण वाढले पाहिजे. सर्व पुढील पिढीला सक्तीचे शिक्षण दिले पाहिजे तरच पुढील पिढी खऱ्या अर्थाने जीवन जगण्यासाठीचे योग्य धडे गिरवील. तसेच प्रौढ साक्षरतादेखील विचारात घेणे गरजेचे आहे. यामुळे कुटुंबनियोजनही होईल. कुटुंब छोटे असेल, तर शेतकऱ्याला अधिक प्रगतीसाठी वाव असेल.

**५) शेती जोडव्यवसाय व पूरक व्यवसाय व पूरक व्यवसायाचा विकास झाला पाहिजे :**

शेतकऱ्याच्या शेतीबरोबरच जोड किंवा पूरक व्यवसाय असेल, उदा. दुग्धव्यवसाय, शेळीमेंढीपालन इत्यादी व्यवसाय असेल. उदा. दुग्धव्यवसाय, शेळीमेंढीपालन इत्यादी व्यवसाय शेतकऱ्याला कमी उत्पादनाच्या दाढेतून वाचवू शकतात. शेतीमध्ये तोटा झाला तर निदान या जोड व्यवसायातून कुटुंबाचा उदरनिर्वाह होऊ शकतो. यासाठी शेतीजोड व पूरक व्यवसायाचा विकास होणे गरजेचे आहे.

**६) ग्रामीण विविधीकरणाला चालना :**

शेती व्यवसायाबरोबरच ग्रामीण भागात ग्रामीण विविधीकरणाला चालना मिळणे गरजेचे आहे. तेल उद्योग, साबण उद्योग, फळप्रक्रिया उद्योग, मटकी उद्योग, इ. व्यवसायाला ग्रामीण भागात प्रसार, प्रचार व बाजारपेठ निर्माण झाल्यास ग्रामीण शेतीवरील ताण कमी होईल व तेवढ्याच प्रमाणात कर्जबाजारीपणाचे सावटही दूर होऊ शकेल.

**७) संस्थात्मक कर्जाची लोकांना सवय लावणे :**

शेतकरी जेव्हा बिगर शासकीय मार्गाने कर्ज घेतो त्यावेळी त्याला तेथील सावकार, जमीनदार इ. मंडळी त्याची फसवणूक करू शकतात. यासाठी शासकीय मार्गाने होणाऱ्या कर्जपुरवठ्याचा शेतकऱ्यांनी स्वीकार केला पाहिजे जेणेकरून त्याची फसवणूक तरी होणार नाही.

**८) सहकारी व्यवस्थेचा प्रसार होणे गरजेचे :**

शेतकरी जेव्हा वैयक्तिक पातळीवर श्रम करतो, शेती विकसित करतो. त्यावेळी त्याच्यावर कर्जापासून सर्वच पातळीवर निर्बंध असतात. अशा वेळी शेती किंवा शेतीपूरक व्यवसाय जर शेतकऱ्यांनी सहकारी तत्त्वावर केले तर त्यांना एकमेकाची साथ मिळेल व कर्जबाजारीपणापासून त्यांची सुटका होऊ शकेल.

**९) सिंचनाचा विकास :**

सिंचनाचा विकास झाल्यास शेतकरी दुबार, तिबार शेती उत्पादन घेईलच याचबरोबर शेती उत्पादन शाश्वती निर्माण होईल व यातूनच कर्जबाजारीपणा दूर होऊ शकेल.

**२०) आधुनिक शेतीचा प्रसार-प्रचार :**

शेतकरी कुटुंबामध्ये आधुनिक शेती किंवा व्यापारी शेतीचा प्रसार-प्रचार होणे गरजेचे आहे. त्याचबरोबर नवनवीन संशोधित होणारे शोध शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. शेतीमधील नवनवीन प्रयोग लोकांपर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे.

## २.७ सारांश

ग्रामीण भागातील कर्जबाजारीपणा आणि दारिद्र्य यामध्ये परस्पर संबंध आढळून येतो. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी आणि शेतमजुरांनी केलेल्या आत्महत्या ह्या कर्जबाजारीपणातूनच केल्याचे आढळून येते. शेतकरी आणि शेतमजुरांना वर्षभर जीवन

निर्वाह करण्यासाठी लागणारे उत्पन्न प्राप्त होत नाही. काम करण्याची क्षमता असतानासुद्धा रोजगार उपलब्ध होत नाही. त्याचा परिणाम आपले आयुष्य कामविरहित म्हणजेच बेरोजगार म्हणून काढावे लागते. राहणीमानाचा योग्य स्तर गाठणे शक्य होत नाही. अशा प्रकारची अवस्था ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर आढळून येते. यावरून ग्रामीण दारिद्र्य आणि ग्रामीण भागातील कर्जबाजारीपणा यांचा परस्पर संबंध आढळून येतो. ग्रामीण भागातील कर्जबाजारीपणा कमी करण्यासाठी शासकीय पातळीवर अनेक प्रकारचे उपक्रम योजले/राबविले जातात. मात्र अशा उपक्रमांची योग्य प्रकारे जोपर्यंत अंमलबजावणी होत नाही तोपर्यंत ग्रामीण भागातील दारिद्र्य व कर्जबाजारीपणा दूर होणे शक्य नाही.



https://www.lokmat.com

## २.८ स्वाध्याय

१) ग्रामीण कर्जबाजारीपणा म्हणजे काय? हे सांगून ग्रामीण कर्जबाजारीपणाची कारणे सांगा.

२) ग्रामीण कर्जबाजारीपणामुळे निर्माण होणारे दुष्परिणाम सांगा.

३) ग्रामीण कर्जबाजारीपणावर उपाययोजना सुचवा.

❖❖❖❖

munotes.in

# ३

# ग्रामीण वित्तपुरवठ्याची साधने

**घटक रचना :**

३.१ पाठाची उद्दिष्टे

३.२ प्रस्तावना

३.३ ग्रामीण वित्तपुरवठ्याची साधने/ विविध मार्ग

- ३.३.१ संस्थात्मक वित्तपुरवठा
- ३.३.२ बिगर संस्थात्मक वित्तपुरवठा
- ३.३.३ सरकार
- ३.३.४ सूक्ष्म वित्तपुरवठा

३.४ सारांश

३.५ स्वाध्याय

## ३.१ पाठाची उद्दिष्टे

१. ग्रामीण वित्तपुरवठ्यामध्ये कोणकोणत्या संस्था, व्यक्ती, बँका यांचा सहभाग असतो त्याचा अभ्यास करणे.

२. ग्रामीण वित्तपुरवठ्यातील संस्थात्मक वित्तपुरवठ्यातील विविध मार्गांचा अभ्यास करणे.

३. ग्रामीण वित्तपुरवठ्यामध्ये बिगर संस्थात्मक घटकांच्या सहभागाचा अभ्यास करणे.

४. ग्रामीण वित्तपुरवठ्यातील सरकारच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

५. ग्रामीण वित्तपुरवठ्यातील सूक्ष्मवित्तपुरवठ्याची भूमिका अभ्यासणे.

## ३.२ प्रस्तावना

भारतामध्ये कृषी हा महत्त्वाचा व्यवसाय आहे. कृषी व्यवस्थेचा विचार करता भारतातील ग्रामीण भागाचा विचार प्राधान्याने करावा लागतो. त्यामुळे ग्रामीण भागाचा विकास हा महत्त्वाचा मुद्दा आपल्यासमोर असलेला पाहावयास मिळतो.

munotes.in

ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेचा विचार करता शेती त्याचबरोबर ग्रामीण उद्योग या सर्वांचा त्यामध्ये समावेश होतो. भारतातील हा ग्रामीण भाग ६ लाखांहून खेड्यांचा बनलेला आहे. ह्या सर्व खेड्याचा विकास केव्हा होईल. जर ह्या ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था विकसित झाली तर.

भारतातील हा शेतकरी वर्ग गरीब आहे. त्याला त्याचा जीवनचरितार्थ चालविण्यापासून ते आपला व्यवसाय करण्यापर्यंत पैशाची गरज लागते. जोपर्यंत ही लागणारी पैशाची गरज योग्य पद्धतीने भागली जात नाही तोपर्यंत ह्या ग्रामीण भागाचा विकास होणार नाही. ह्या पैशाच्या गरजेबरोबर इतरही सोयीसुविधांचा विचार होणे गरजेचे आहेच.

भारतामधील या ग्रामीण भागामध्ये ह्या वित्तपुरवठ्याची गरज भागविण्यासाठी अनेक व्यक्ती, संस्था, बँका यांनी त्या काळामध्ये प्रयत्न केले आहेत. स्वातंत्र्यपूर्वकाळ व स्वातंत्र्यउत्तर काळ अशा दोन्ही कालखंडांत ग्रामीण वित्तपुरवठ्याचे प्रयत्न झालेले पाहावयास मिळतात. त्याचाच अभ्यास या पाठात करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## ३.३ ग्रामीण वित्तपुरवठ्याचे विविध मार्ग / साधने

ग्रामीण वित्तपुरवठ्याचा प्रश्न हा भारतीय अर्थव्यवस्थेचा एक सर्वाधिक महत्त्वाचा प्रश्न ठरतो. कारण ग्रामीण भागातील लोकांचे राहणीमान अत्यंत खालच्या पातळीवर असलेले आजही बघावयास मिळते. ग्रामीण भागातील पूर्वीपासून चालत आलेला कर्जबाजारीपणा आपण पाहिला. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मानला गेलेल्या शेती व्यवसाय, लघु-कुटीर उद्योग, कारागिरांचे उद्योग या व्यवसायांचा जोपर्यंत विकास होत नाही तोपर्यंत ग्रामीण भागाचा पर्यायाने ग्रामीण भागातील शेतकरी, कारागीर, व्यावसायिक यांचा विकास होणार नाही. यासाठी ग्रामीण वित्तपुरवठ्याची गरज लक्षात घेऊन हळूहळू हा वित्तपुरवठा कसा ग्रामीण भागात पोहोचला याचा अभ्यास आपण मागील पाठात केला आहे. या ठिकाणी आपणास ग्रामीण वित्तपुरवठा करणाऱ्या घटकांचा अभ्यास करावयाचा आहे. हा अभ्यास करताना पूर्वीपासून ज्या घटकांनी ग्रामीण भागाला वित्तपुरवठा केलेला आहे त्याचा विचार होणे गरजेचे आहे.

आज आपणास ग्रामीण वित्तपुरवठ्याचे प्रामख्याने दोन मार्ग पाहावयास मिळतात. संस्थात्मक वित्तपुरवठा, बिगर संस्थात्मक वित्तपुरवठा या दोन माध्यमांतूनच आपणास वित्तपुरवठा होतो. असे जरी असले तरी खऱ्या अर्थाने स्वातंत्र्यपूर्वकाळात खऱ्या अर्थाने ग्रामीण भागात वित्तपुरवठा करणारा जो घटक होता तो म्हणजे बिगर संस्थात्मक घटक होय. त्यानंतर हळूहळू संस्थात्मक घटकांवर काही शासकीय निर्बंध व कायदे करून स्वातंत्र्यानंतर ग्रामीण वित्तपुरवठ्यात त्यांचा सहभाग मिळविलेला पाहावयास मिळतो. आज संस्थात्मक घटकांच्या माध्यमातून ग्रामीण भागामध्ये सर्वाधिक वित्तपुरवठा होतो आहे. असे जरी असले तरी, बिगर संस्थात्मक वित्तपुरवठा करणाऱ्या घटकांचे महत्त्व कमी होताना बघावयास मिळत नाही. आज बिगर संस्थात्मक मार्गाने होणारा वित्तपुरवठा अगदी नगण्य आहे, मात्र त्यांचे महत्त्व तेवढेच मोलाचे आहे. अशा या संस्थात्मक व बिगरसंस्थात्मक वित्तपुरवठ्याचे मार्ग अनेक आहेत.

munotes.in

**कोष्टक क्र. १**

**ग्रामीण वित्तपुरवठ्यातील विविध स्त्रोतांचा वाटा (टक्केवारी)**

| अ.क्र. | वित्तपुरवठा स्रोत | १९५१-५२ | ६१-६२ | ८१-८२ | ९५-९६ |
|---|---|---|---|---|---|
| अ | बिगर संस्थात्मक स्त्रोत | | | | |
| I | सावकार | ६९.७ | ४९.२ | १६.१ | ७.० |
| II | व्यापारी | ५.५ | ८.८ | ३.२ | ५.० |
| III | नातेवाईक | १४.२ | ८.८ | ८.७ | ३.० |
| IV | जमीनदार | ३.३ | १४.५ | ८.८ | २.०० |
| | एकूण | ९३.७ | ८१.७ | ३६.८ | ३५.०० |
| ब | संस्थात्मक साधने | | | | |
| I | सरकार | ३.१ | १५.५ | ३.९ | ५.०० |
| II | सहकारी संस्था | ३.३ | २.६ | २९.९ | ४०.०० |
| III | व्यापारी व ग्रामीण बँका | ०.९ | ०.६ | २९.४ | ३०.०० |
| | एकूण | ७.३ | १८.७ | ६३.२ | ७५.०० |
| | बिगर संस्थात्मक व संस्थात्मक स्त्रोत | १०० | १०० | १०० | १०० |

**Economic Survey १९९८-९९**

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, स्वातंत्र्यानंतर काही वर्षे बिगर संस्थात्मक वित्तपुरवठ्याचा वाटा ग्रामीण वित्तपुरवठ्यात मोठ्या प्रमाणात आहे. मात्र नंतर नंतर हा वाटा कमी होताना दिसून येतो. संस्थात्मक वित्तपुरवठ्याचा वाटा सन १९८० नंतर वाढताना दिसून येत आहे.

**ग्रामीण वित्तपुरवठ्याची साधने :**

भारतामध्ये ग्रामीण भागासाठी होणाऱ्या वित्तपुरवठ्याच्या साधनांचा किंवा स्त्रोतांचा विचार करता अनेक साधने अगदी प्राचीन काळापासून कार्यरत असलेली पाहावयास मिळतात. त्यांचे प्रामुख्याने आपण येथे चार प्रकार केलेले आहेत.

१) संस्थात्मक साधने

२) बिगर संस्थात्मक साधने

३) सरकार

४) सूक्ष्म वित्तपुरवठा

munotes.in

### ३.३.१ संस्थात्मक वित्तपुरवठा :

ग्रामीण वित्तपुरवठ्याचा विचार करता संस्थात्मक वित्तपुरवठ्याची भूमिका आज महत्त्वाची असलेली पाहावयास मिळते. स्वातंत्र्यपूर्व काळाचा विचार करता सन १९०४ च्या कायद्याने सहकारी वित्तपुरवठ्याची सुरुवात झाली. त्यामुळे खऱ्या अर्थाने संस्थात्मक वित्तपुरवठ्याची सुरुवात ह्या सहकारी वित्तपुरवठ्याने झाली असे सांगता येईल.

देश स्वातंत्र झाल्यानंतर रिझर्व्ह बँकेचे राष्ट्रीयीकरण व नंतर व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. त्यानंतरच खऱ्या अर्थाने संस्थात्मक वित्तपुरवठा सुरू झाला.

**कोष्टक क्र. ३**

**ग्रामीण भागात संस्थात्मक साधनांद्वारे होणारा वित्तपुरवठा (कोटी रु.)**

| साधन | २००१-०३ | २००३-०३ | ०३-०४ | ०४-०५ | ०५-०६ |
|---|---|---|---|---|---|
| १) सहकारी अधिकोष | २७,०८० | २४,३०० | २६,९६० | ३१,००० | ३९,४०४ |
| २) व्यापारी व ग्रामीण प्रादेशिक अधिकोष | ३६,९३० | २६,९६० | ६०,०३० | ७७,५०० | १,४१,०८३ |
| ३) एकूण १ +३ =०३ | ६४,००० | ७०,८१० | ८६,९६० | १,०८,५०० | १,८०,४८६ |

Economic Survey २००६-२००७.

वरील कोष्टकामध्ये सहकारी बँका, व्यापारी बँका, ग्रामीण बँका यांचा ग्रामीण वित्तपुरवठ्यातील सहभाग २००१ पासून २००६ पर्यंत दाखविलेला आहे. हा ग्रामीण वित्तपुरवठ्यातील सहभाग वाढला असलेला दिसून येतो.

अशा प्रकारे संस्थात्मक वित्तपुरवठा करणाऱ्या विविध स्त्रोतांची / भागांची माहिती पुढीलप्रमाणे देता येईल.

### अ) सहकारी त्रि-स्तरीय वित्तपुरवठा :

भारताच्या आर्थिक विकासाला हातभार लावणारी एक महत्त्वाची चळवळ म्हणून सहकारी चळवळीकडे पाहिले जाते. ग्रामीण भागातील काही लोक सहकार तत्त्वावर एकत्र येतात व सहकारी पतसंस्थांची स्थापना करतात. ह्या संस्थांमार्फत शेतीसाठी अल्प व मध्यम मुदतीची कमी व्याज दराने कर्जे उपलब्ध करून दिली जातात. ह्यासाठी सहकारी पतपुरवठ्याची त्रि-स्तरीय रचना केलेली आहे.

### १) प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था :

हिचे कार्यक्षेत्र एक गाव किंवा आजूबाजूचे काही गाव एकत्र येऊन ही संस्था स्थापन केली जाते. हिलाच विविध कार्यकारी सहकारी सोसायटी असे म्हणतात. हिचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची व ग्रामीण उद्योजकांची कर्जाची गरज भागविणे होय. त्याचबरोबर शेतकऱ्याला लागणाऱ्या निविदा पुरविणे, त्यांचा उत्पादित झालेला शेतमालाची

munotes.in

विक्री करून देणे इत्यादी कार्ये तिला करावी लागतात. प्राथमिक, सहकारी, पतपुरवठा संस्थेला जिल्हा बँक कर्जपुरवठा करते त्याचप्रमाणे तिच्यावर नियंत्रणही ठेवते, तर प्राथमिक सहकारी संस्था ही आपल्या सभासदांना अल्पमुदतीसाठी कर्जपुरवठा करते.

**३) जिल्हा बँक :**

जिल्हा सहकारी बँक हिचे कार्यक्षेत्र जिल्हा हेच असते. जिल्ह्यांतील प्राथमिक-सहकारी पतपुरवठा संस्था ह्या तिच्या सभासद असतात. त्याचबरोबर जिल्ह्यांतील इतर सहकारी संस्था त्यामध्ये खरेदी विक्री संस्था प्रक्रिया संस्था ह्या संस्थाही जिल्हा बँकेच्या सभासद असतात. जिल्हा बँकेने काही वर्षे वैयक्तिक सभासदसुद्धा केले होते. आता मात्र तशी कोणतीही पद्धत अस्तित्वात नाही. जिल्हा बँक आपल्या सभासद बँकांना कर्जपुरवठा करते. त्याचबरोबर या सहकारी संस्थांवर नियंत्रणही ठेवते. त्यांना मार्गदर्शन करते. जिल्हा बँक ही ह्याही पलीकडे जनतेला बँकिंगची खुली सेवाही देते. त्यामध्ये शेतकरी व इतर वर्गांना मध्यम मुदतीची कर्जे देतात. जिल्हा बँकेला कर्जपुरवठा करण्याचे कार्य राज्य सहकारी बँक करते.

**३) राज्य सहकारी बँक :**

राज्य सहकारी बँकेचे कार्यक्षेत्र राज्य असते. ह्या बँकांची दोन पद्धतीने स्थापना होते. त्यामध्ये जिल्हा सहकारी बँका एकत्र येऊन राज्य सहकारी बँक स्थापन होते. तर काही ठिकाणी राज्य सहकारी बँक स्थापन होते व ती आपल्या शाखा राज्यभर उघडते. राज्य सहकारी बँक ही सहकारी पतपुरवठा क्षेत्रातील शिखर बँक आहे. ही बँक राज्यातील सहकारी चळवळीचे नेतृत्व करते. ग्रामीण भागातील शेतकरी व ग्रामीण उद्योजक यांना कर्जपुरवठा व्हावा म्हणून तिची भूमिका महत्त्वाची असते. ह्या बँकेला रिझर्व्ह बँक, तसेच नाबार्डकडून कर्जपुरवठा होतो. त्यानंतर ही बँक जिल्हा बँका, तसेच जिल्ह्यातील सहकारी संस्थांना कर्जपुरवठा करते.

एकूण वित्तपुरवठ्याचा विचार करता सहकारी वित्तपुरवठ्याचा वाटा सन १९५७ मध्ये ३.३ टक्के होता. सन १९९१-९२ मध्ये २१.६ टक्के वर गेला. सन २००६ मध्ये ४२४७९.८० कोटी कर्ज वितरित केले म्हणजेच २०.८९ टक्के वाटा सहकारी वित्तपुरवठ्याचा होतो.

असे जरी असले तरी दुसऱ्या बाजूने काही राज्यांमध्ये म्हणजेच बिहार, पश्चिम बंगाल, ओरिसा इत्यादी राज्यांमध्ये सहकारी चळवळ तेवढ्या प्रमाणात यशस्वी झालेली दिसून येत नाही.

**आपली प्रगती तपासा :**

१. सहकारी वित्तपुरवठ्याची त्रिस्तरीय रचना सांगा.

**ब) व्यापारी बँका आणि शेती वित्तपुरवठा :**

**प्रास्ताविक :**

सुमारे १९६७ पर्यंत भारतातील व्यापारी बँक व्यवसाय ब्रिटिश परंपरेनुसार विकसित होत गेलेला आढळतो. व्यापारी बँकांची मालकी व त्यांच्या रचनेची चौकट ह्यावर भारतातील बड्या उद्योगगृहांचे नियंत्रण होते. त्या काळात वित्तीय मदतीचा ओघ ग्रामीण विभागाकडे व विशेषत: शेतीक्षेत्राकडे वळलाच नाही. इंग्लंडमधील व्यापारी बँकांच्या तत्त्वानुसार भारतातील व्यापारी बँकांनी सुरक्षितता, रोखता आणि लाभप्रदता ह्याकडे प्रामुख्याने लक्ष दिले परिणामत: त्यांनी फक्त सुस्थिर अशा उद्योगांना व व्यापारव्यवसायाला अल्पकालीन कर्जे देण्याइतकाच आपला बँक व्यवसाय मर्यादित केला होता.

**१) व्यापारी बँकांवरील सामाजिक नियंत्रण :**

वरील पार्श्वभूमीवर सन १९६७ मध्ये भारतातील व्यापारी बँकांवरील 'सामाजिक नियंत्रणा'चे धोरण अनुसरण्याचे ठरविण्यात आले. भारतातील व्यापारी बँकांवरील सामाजिक नियंत्रणाचा सन १९६७ मध्ये निर्णय घेतल्यानंतर देशात नॅशनल क्रेडिट कौन्सिलची स्थापना फेब्रुवारी १९६८ मध्ये करण्यात आली.

नॅशनल क्रेडिट कौन्सिलची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे.

१) भारतातील अर्थव्यवस्थेतील निरनिराळ्या क्षेत्रांना भावी काळात त्यांच्या विकासाच्या दृष्टीने किती कर्ज लागेल याचा अंदाज करणे.

२) व्यापारी बँकांकडून गुंतवणुकीसाठी कर्जाचे वाटप होत असताना अर्थव्यवस्थेतील निरनिराळ्या क्षेत्रांचे प्राधान्य गट ठरविणे असे ठरवत असतात. व्यापारी बँकांजवळील उपलब्ध वित्तीय साधनसामग्री व देशातील अग्रहक्क दिल्या गेलेल्या विविध क्षेत्रांची कर्जांची आवश्यकता यांचा योग्य मेळ घालणे.

३) व्यापारी बँका, सहकारी बँका व इतर वित्तीय संस्था ह्यांच्या कर्ज व गुंतवणूक धोरणांमध्ये सुसूत्रता घडवून आणणे व देशाच्या वित्तीय साधनसाम्रगीचा जास्तीत जास्त कार्यक्षमरीत्या उपयोग करून घेतला जाईल हे पाहणे. वरील भूमिकेस अनुसरून व्यापारी बँकांच्या संचालक मंडळाची पुनर्रचना करण्यात आली. ह्या मंडळांवर विविध क्षेत्रांतील प्रत्यक्ष अनुभव असणाऱ्या तज्ज्ञ व्यक्तींची नेमणूक करण्यात आली. शिवाय व्यापारी बँकांचे चेअरमन म्हणून बँक व्यावसायिक तज्ज्ञांची नेमणूक करण्यात आली.

परंतु भारतातील व्यापारी बँकांवरील सामाजिक नियंत्रणाचे धोरण अपेक्षेप्रमाणे परिणामकारक ठरले नाही, हे सरकारला कळून चुकले. म्हणून वर निर्देशिलेली सामाजिक नियंत्रणाची उद्दिष्टे पूर्ण करण्याच्या दृष्टीने व देशाच्या अर्थव्यवस्थेतील अग्रक्रम असलेल्या विविध क्षेत्रांना योग्य पतपुरवठा करता यावा ह्या उद्देशाने १९ जुलै १९६९ रोजी देशातील १४ प्रमुख व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले.

munotes.in

## २) राष्ट्रीयीकृत व्यापारी बँकांचा ग्रामीण भागांतील शाखा विस्तार :

भारतातील राष्ट्रीयीकृत व्यापारी बँकाचे एक उद्दिष्ट म्हणजे ग्रामीण भागांच्या सर्वांगीण विकासाला व विशेषत: शेतीक्षेत्राच्या विकासाला आवश्यक असलेला वित्तपुरवठा करणे हे आहे.

राष्ट्रीयीकृत बँकांचा ग्रामीण भागांत आपल्या अधिकाधिक शाखा उघडण्यामागे आणखी एक उद्देश आहे. प्राथमिक सहकारी पतसोसायट्यांची व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची स्वातंत्र्योत्तर काळातील वाटचाल पाहता, अशा सहकारी पतसंस्थांमार्फत भारतात प्रचंड संख्येने असणाऱ्या सर्व शेतकऱ्यांच्या वित्तीय गरजा पूर्ण होण्याची शक्यता नसल्याचे दिसून आले. त्याचबरोबर भारतातील शेती क्षेत्राचे विविधीकरण, यांत्रिकीकरण व आधुनिकीकरण होत असल्याकारणाने शेती क्षेत्राच्या वित्तीय गरजा झपाट्याने वाढत आहेत व त्या फक्त सहकारी पतसंस्थांकडून पुऱ्या होण्याची शक्यता नाही म्हणून ग्रामीण भागात राष्ट्रीयीकृत बँकांच्या अधिकाधिक शाखा उघडून त्यांच्या मार्फत शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करून त्यांना अल्प, मध्यम व दीर्घ मुदतीची कर्जे देऊन शेती क्षेत्राचा विकास घडवून आणणे, हे उद्दिष्ट व्यापारी बँकांच्या शाखाविस्तारामागे आहे.

**राष्ट्रीयीकृत व्यापारी बँकांच्या ग्रामीण भागातील शाखा-विस्तार**

| वर्ष | एकूण शाखा | ग्रामीण भागातील शाखा | एकूण शाखांशी ग्रामीण भागातील शाखांचे प्रमाण (टक्केवारी) |
|---|---|---|---|
| १९-७-१९६९ | ८,२६० | १,८६० | २२ |
| ३०-६-१९८३ | ४२,०८० | ३३,७१० | ५४ |
| ३०-६-१९८८ | ५५,४१० | २९,३८८ | ६२ |
| १९९१ | ६०,६५० | ३२,७५० | ५४ |
| १९९८ | ६४,२४० | ३२,८८० | ५१ |

वरील तक्त्यांवरून असे दिसून येते की, (सन १९६९ म्हणजेच व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण होण्यापूर्वी सन १९६९ मध्ये व्यापारी बँकांच्या ग्रामीण भागात फक्त १८६० शाखा होत्या व त्यांच्या एकूण शाखांच्या फक्त २२ टक्के शाखा ग्रामीण भागात होत्या. त्याशी तुलना करता सन १९८८ च्या जूनअखेर राष्ट्रीयीकृत बँकांच्या एकूण ५५,४१० शाखांपैकी २९,३८८ शाखा म्हणजे ६२टक्के शाखा ग्रामीण भागात कार्य करीत आहेत.

राष्ट्रीयीकृत व्यापारी बँका खाजगी क्षेत्रात व इतर अनुसूचित बँका आणि क्षेत्रीय ग्रामीण बँका ह्यांच्या एकूण शाखांची संख्या सन १९९० जून अखेर ५९.३८८ इतकी होती व त्यांपैकी ३२,०८९ शाखा म्हणजेच ६०.५ टक्के शाखा ग्रामीण भागांत कार्य करीत आहेत.

**३) व्यापारी बँकांपुढील काही समस्या :**

**१) रचनेसंबंधी समस्या :**

भारतात ६.३ लक्ष खेडी आहेत. ह्या सर्व खेडेगावांत व्यापारी बँकांच्या शाखा नजीकच्या भविष्यकाळात पोहोचणे हे पर्वतप्राय काम आहे. त्यासाठी प्रचंड प्रमाणावर प्रशिक्षित बँक-कर्मचारी वर्ग लागणार आहे. हे काम प्रचंड आहे. त्याशिवाय तारणपत्रे व दागदागिने ठेवण्यास सुरक्षित जागा उपलब्ध होणे इत्यादी अडचणी येणार आहेत. त्या समाधानकारक रीतीने सोडविणे हे प्रचंड काम आहे.

**२) कार्य पद्धतीबाबत समस्या :**

छोट्या-मोठ्या खेड्यांतील बहुसंख्य शेतकरी निरक्षर आहेत. त्यामुळे कर्ज काढताना आवश्यक असलेली कागदपत्रे तयार करण्याचे काम गुंतागुंतीचे होते.

**३) कायदेविषयक व प्रशासकीय समस्या :**

जमीन मालकीसंबंधीच्या नोंदी अद्याप पूर्णपणे नोंदविण्यात आलेल्या नाहीत. जमिनीच्या मोजणीबाबतचे कागदपत्र, सात-बाराचा उतारा, गहाणखत तयार करणे व या सर्व गुंतागुंतीच्या बाबी आहेत व त्यात बराच काळ जातो.

**४) व्यापारी बँकांच्या खर्च व नफ्यासंबंधी समस्या :**

छोट्या-मोठ्या खेड्यांतील बहुसंख्य शेतकरी निरक्षर आहेत त्यामुळे कर्ज काढताना आवश्यक असलेली कागदपत्रे तयार करण्याचे काम अत्यंत गुंतागुंतीचे होते. छोट्या-मोठ्या खेड्यांत बँकेचा सर्व खर्च निभावून जाणे कठीण असते. मग प्रश्न असा की, हे नुकसान कोणी सोसावयाचे.?

**५) बहुसंख्यात्मक वित्तपुरवठ्याच्या धोरणामुळे निर्माण होणाऱ्या अडचणी :**

भारतातील बऱ्याच खेडेगावांत प्राथमिक सहकारी सोसायट्या, व्यापारी बँकांच्या शाखा, क्षेत्रीय ग्रामीण बँका इत्यादी शेती क्षेत्रास कर्ज पुरविण्याचे कार्य करीत असतात. देशातील मर्यादित वित्तीय साधनसामग्रीचा अत्यंत कार्यक्षम उपयोग होण्याच्या दृष्टीने वरील वित्तीय संस्थांत शेतकऱ्यांना कर्ज देताना अयोग्य स्पर्धा टाळणे आवश्यक आहे. ह्याचाच अर्थ वरील वित्तीय संस्थांच्या कार्यात योग्य समन्वय घालणे आवश्यक आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) व्यापारी बँकांच्या समस्या सांगा.

**क) रिझर्व्ह बँका :**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ही आपल्या देशाची मध्यवर्ती बँक आहे. १९३५ मध्ये या बँकेची स्थापना झाली. देशाची अर्थव्यवस्था विचारात घेऊन सुरुवातीपासूनच या बँकेत शेती कर्ज विभाग सुरू करण्यात आला. या विभागाची प्रमुख कार्ये म्हणजे शेतीकर्जपुरवठ्याच्या बाबत सखोल अभ्यास करणारा तज्ज्ञ नोकरवर्ग नेमणे आणि शेतीकर्जपुरवठ्याच्या संदर्भात केंद्र

सरकार, राज्य सरकार आणि इतर बँका यांना सल्ला देणे. त्याचबरोबर कर्जपुरवठ्याबाबत योग्य पद्धतीने धोरणांची अंमलबजावणी करणे या दृष्टीने ती सरकारी बँक आणि बँकांची बँक म्हणून कार्य करते. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर खऱ्या अर्थाने शेतीकर्जपुरवठ्याच्या बाबतीत रिझर्व्ह बँक महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे. १९४८ साली रिझर्व्ह बँकेचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. तो पर्यंत रिझर्व्ह बँकेचे शेतीकर्जविषयक कार्यक्षेत्र मर्यादित होते. १९५१ मध्ये रिझर्व बँकेने अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समितीने केलेल्या अनेक शिफारशी विचारात घेऊन ग्रामीण पतपुरवठ्याची पुरर्रचना केली. समितीने केलेल्या शिफारशीमध्ये ग्रामीण पतपुरवठ्याबाबत सहकारी पतपुरवठ्याचा सहभाग खूपच कमी असल्याने सहकारी पतयंत्रणेचे सामर्थ्य वाढणे गरजेचे असल्याचे सांगितले त्यासाठी अनेक उपाय सुचविले.

यासाठी ग्रामीण पतपुरवठ्याची समन्वित योजना म्हणजेच शेती पतपुरवठ्याची शेतमालविक्रीशी संबंध प्रस्थापित करणे ही होती. या योजनेसाठी सरकारचा म्हणजेच बँकेचा सहभाग महत्त्वाचा होता. त्यासाठी प्रशिक्षित कर्मचाऱ्यांकडून सहकारी चळवळीचे संचालक करून सहकारी चळवळ समर्थ होण्यासाठी सरकारने सहकारी पतपुरवठा, खरेदी-विक्री संस्था इत्यादी मध्ये भागभांडवल खरेदी करून सहभागी व्हावे असे ठरले गेले. सहकारी पतपुरवठा संस्था ह्या बहुविध कार्यकारी सेवा संस्था झाल्या पाहिजेत. त्यांनी गुदामव्यवस्था निर्माण करून द्यावी, देशात गुदामांचे जाळे असावे. या सर्व समितीच्या शिफारशीनुसार रिझर्व्ह बँकेने दोन निधी उभे केले. १) राष्ट्रीय कृषी कर्ज निधी २) राष्ट्रीय शेती कर्जपुरवठा निधी.

### १) राष्ट्रीय कृषी कर्ज निधी :

समितीच्या शिफारशीनुसार १९५६मध्ये या निधीची स्थापना करण्यात आली. शेतीक्षेत्राला दीर्घमुदतीचा कर्जपुरवठा करण्यासाठी रिझर्व्ह बँकेने या निधीची स्थापना केली. राज्य सरकारांना सहकारी बँकांचे भागभांडवल खरेदी करता यावे यासाठी दीर्घमुदतीचे कर्ज राज्य सरकारांना या निधीतून दिले जाते. या निधीतून राज्य सहकारी बँकांना मध्यम मुदतीची कर्जे दिली जातात.

### २) राष्ट्रीय शेतीकर्जपुरवठा निधी :

आपल्या देशातील शेतीव्यवसायात अनेक आपत्तींना तोंड द्यावे लागते. दुष्काळ, अतिवृष्टी, वादळ यांसारख्या नैसर्गिक संकटांमुळे शेती उत्पादनाबाबत अनिश्चितता निर्माण होते. त्यामुळे शेतकरी घेतलेले कर्ज सहकारी पतपुरवठा संस्थांना परत करू शकत नाहीत. त्यामुळे सहकारी बँका रिझर्व्ह बँकेला कर्ज परत करू शकत नाहीत. ही अडचण दूर करण्यासाठी हा निधी निर्माण करण्यात आला. या निधीतून आपत्तीच्या काळात कर्जपुरवठ्यात स्थिरता आणण्यासाठी जादा पतपुरवठा केला जातो.

### रिझर्व्ह बँकेची कार्ये :

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ही सरकारी बँक असल्याने साहजिकच ग्रामीण वित्तपुरवठा तिची भूमिका विविधतेने असलेली बघावयास मिळते. त्यानुसार तिची कार्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) शेती कर्जपुरवठा :**

रिझर्व्ह बँक राज्य सहकारी बँकांमार्फत ग्रामीण भागात अल्प, मध्यम व दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा करते.

**अ) अल्पमुदतीचा कर्जपुरवठा :**

राज्य सहकारी बँकांना अल्पमुदतीचा कर्जपुरवठा हंगामी शेती शेतीकामाकरिता बँकदरापेक्षा २ टक्के कमी दराने जास्तीत जास्त १५ महिने मुदतीकरता केला जातो. रिझर्व्ह बँक हे कर्ज राज्य सहकारी बँकांना कर्जपुरवठा करण्यासाठी दिले जाते. राज्य सरकारच्या हमीवर रिझर्व्ह बँक राज्य सहकारी बँकांना कर्जपुरवठा करते. सहकारी बँकांसाठी २ टक्के सवलत देऊन राज्य सहकारी बँकांना कर्जपुरवठा होतो. शेतकऱ्यांची कर्जाची अल्पमुदत गरज पूर्ण करण्याकरता आणि ग्रामीण कर्जपुरवठ्याची रचना सुदृढ करण्याकरिता हे कर्ज दिले जाते.

**ब) मध्यम मुदत कर्ज :**

सन १९५३ मध्ये रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कायद्यात करण्यात आलेल्या दुरुस्तीनुसार रिझर्व्ह बँक राज्य सहकारी बँकांना १५ महिन्यांपासून ते ५ वर्षांपर्यंतच्या मुदतीचे कर्ज देऊ शकते. या कर्जाकरिता राज्य सरकारची हमी आवश्यक असते. या कर्जाचा उपयोग शेतीमध्ये स्थायी स्वरूपाच्या सुधारणा करण्याकरिता होतो. अल्प व मध्यम मुदत दोन्ही प्रकारचा कर्जपुरवठा रिझर्व्ह बँक राज्य सहकारी बँकांना करते. राज्य सहकारी बँक जिल्हा सहकारी बँकेला, तर जिल्हा सहकारी बँक ही आपल्या कार्यक्षेत्रातील प्राथमिक पतपुरवठासंस्थांना करते. याचबरोबर ग्रामोद्योग सहकारी संस्थांनाही कर्जपुरवठा केला जातो.

**क) दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा :**

शेती व्यवसायासाठी विहीर खोदणे, यंत्रसामुग्रीची खरेदी, जलसिंचनाची सुविधा इत्यादी कारणासाठी हा दीर्घमुदत कर्जपुरवठा केला जातो. यासाठी रिझर्व्ह बँक राज्यभूविकास बँकांना १५ वर्षे मुदतीचे कर्ज उपलब्ध करून देते. राज्य भूविकास बँकांना कर्ज रोख्यांच्या तारणावर रिझर्व्ह बँक कर्ज देते. याशिवाय राज्य सहकारी बँका, जिल्हा सहकारी बँक, राज्य भूविकास बँका यांचे भागभांडवल खरेदी करण्यासाठी राज्य सरकारला दीर्घमुदतीचे कर्ज दिले जाते.

**२) नियंत्रणात्मक कार्ये :**

सन १९६५ च्या बँकिंग लोन्स ॲक्टनुसार रिझर्व्ह बँक सहकारी बँकांवर नियंत्रण ठेवते. या कायद्यानुसार राज्य सहकारी बँक, जिल्हा मध्यवर्ती बँक व प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था यांना कार्य करावे लागते. भूविकास बँका, प्राथमिक पतपुरवठा संस्था आणि १ लाख रु. पेक्षा कमी भांडवल असणाऱ्या बिगर शेती सहकारी संस्थांना यातून सूट देण्यात आलेली आहे त्यांना हा कायदा लागू नाही. या कायद्यानुसार प्रत्येक सहकारी बँकेला आपल्या कर्जाच्या मागणी राशीपैकी ३५ टक्के रक्कम रोख सोने किंवा हुंड्या यांच्या स्वरूपात ठेवावी लागते. जिल्हा सहकारी बँक सोडून इतर बँकांना शाखा उघडण्याकरिता रिझर्व्ह

munotes.in

बँकेची परवानगी घ्यावी लागते. रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार सहकारी बँकांना आपल्या ठेवी, विमा योजना लागू होतात. ठराविक काळाने हिशेब तपासणी करण्याचा अधिकारही रिझर्व्ह बँकेला प्राप्त झाला आहे.

**३) सहकारी चळवळीस प्रोत्साहनात्मक व समन्वयाबाबतची कार्ये :**

रिझर्व्ह बँक देशातील सहकारी संस्थांची शिस्तबद्ध वाढ व्हावी म्हणून महत्त्वाची कार्ये करते. या कार्यात सहकारी व्यवस्थापन, हिशेबतपासणी, देखरेख, गुंतवणकीचे धोरण, व्याजविषयक धोरण इत्यादी सल्ला दिला जातो. राज्य सरकारांना सहकारी धोरण ठरविण्यात रिझर्व्ह बँक मदत करते. राज्य सरकार, केंद्र सरकार आणि सहकारी संस्था यांच्यात समन्वय साधण्याचे कार्य रिझर्व्ह बँक करते. सहकारी बँकांना कर्जपुरवठाविषयक धोरण ठरविताना येणाऱ्या अडचणींमध्ये सल्ला देण्याचे कार्य रिझर्व्ह बँक करते.

**आपली प्रगती तपासा :**

१) रिझर्व्ह बँकेची कार्ये लिहा.

**ड) प्रादेशिक ग्रामीण बँका / विभागीय ग्रामीण बँका :**

**प्रास्ताविक :**

श्रीमती इंदिरा गांधी यांनी पंतप्रधान असताना व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. भारतातील एकूण लोकसंख्येपैकी ७० टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. १९५१ पासून आर्थिक विकासासाठी नियोजनाचा मार्ग अमलात आणला गेला तरी देखील ग्रामीण भागाच्या विकासामध्ये सुसूत्रता आढळून न आल्यामुळे ग्रामीण बँका सुरू करण्याचा संकल्प करण्यात आला.

२ ऑक्टोबर १९७५ रोजी म्हणजेच गांधीजींच्या जयंतीनिमित्त ५ प्रादेशिक ग्रामीण बँकांची स्थापना करण्यात आली. या बँकांमध्ये उत्तर प्रदेशात मोरादाबाद व गोरखपूर, हरियाणा भिवानी, राजस्थानात जयपूर, पश्चिम बंगालमध्ये मालडा येथे या बँका सुरू करण्यात आल्या. उत्तर प्रदेशातील बँक सिंडिकेट बँकेने, हरियाणातील बँका पंजाब नॅशनल बँकेने पुरस्कृत केल्या. फेब्रुवारी १९७६ मध्ये विभागीय ग्रामीण बँक कायदा करण्यात आला. मार्च १९७९ मध्ये विभागीय ग्रामीण बँकेचे नियंत्रण रिझर्व्ह बँकेकडे देण्यात आले. सन १९७५ पासून ते सन १९७९ पर्यंत प्रक्रिया ग्रामीण बँकांनी कायद्याचे स्वरूप देण्याकरिता वापरावी लागली.

**इ) नाबार्ड आणि ग्रामीण कर्जपुरवठा (National Bank for Agricultural and Rural Development and Rural Finance):**

ग्रामीण भागातील वित्तविषयक गरजांची प्रभावीपणे पूर्तता करता यावी यासाठी १९८२ पूर्वी भारतीय रिझर्व्ह बँकेत एक स्वतंत्र विभाग होता. या विभागामार्फत ग्रामीण भागातील सहकारी पतसंस्था आणि बँकांना पुनर्वित्तपुरवठा केला जात होता. यातूनच ग्रामीण विकास आणि वित्तपुरवठा करण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर एक शिखर बँक (Apex Bank) असावी असा विचार पुढे आला. यातूनच राष्ट्रीय ग्रामीण आणि कृषी विकास बँकेची (नाबार्ड)

स्थापना जुलै १९८२ मध्ये करण्यात आली. नाबार्डचा रिझर्व्ह बँकेशी थेट संबंध आहे. या बँकेच्या उभारणीसाठी रिझर्व्ह बँकेने निम्मे भांडवल पुरवले आहे आणि निम्मेभांडवल भारत सरकारने पुरविले आहे.

**फ) स्टेट बँक ऑफ इंडिया :**

१९५४ च्या अखिल भारतीय ग्रामीण पुरवठा पाहणी समितीच्या शिफारशीनुसार इंपिरियल बँकेचे रूपांतर करून स्टेट बँक ऑफ इंडियाची स्थापना करण्यात आली. सहकारी क्षेत्रातील बँका आणि इतर बँका यांना मोठ्या प्रमाणात पैसे भरणे, पैसे काढणे यांच्या सोयी उपलब्ध करून देणारी राज्य सरकार पुरस्कृत समर्थ आणि एकात्म स्वरूपाची बँक स्थापन करण्याच्या उद्देशाने स्टेट बँकेची स्थापना झाली. या बँकेत इंपिरियल बँकेबरोबरच जयपूर बँक, बडोदा बँक, बिकानेर बँक, म्हैसूर बँक, इंदौर बँक, पतियाळा बँक, राजस्थान बँक, हैद्राबाद बँक, सौराष्ट्र बँक, त्रावणकोर बँक यांचाही समावेश करण्यात आला.

स्टेट बँक ही ग्रामीण भागातील अग्रणी बँक आहे. ग्रामीण भागात शाखा उघडण्याची सुरुवात स्टेट बँकेने केली. शेतीक्षेत्राला आणि लघुउद्योगांना कर्जपुरवठा करण्यास स्टेट बँकेने सुरुवात केली. इतर व्यापारी बँकांना ग्रामीण भागात कार्य करण्याची दिशा स्टेट बँकेने दिली. शेती क्षेत्राला कर्जपुरवठा करण्यासाठी ग्रामीण भागात शेती. विकास शाखाची स्थापना केली. ग्रामीण विकासाच्या दृष्टीने अनेक विकास योजना राबवण्यात स्टेट बँकेने सुरुवात केली.

- **उद्देश व कार्य :**

१) संपूर्ण देशभर स्टेट बँकेच्या शाखांचा विस्तार करून कार्यक्षम यंत्रणा आणि सरकारची भागीदारी असलेली समर्थ व्यापारी बँक निर्माण करणे.

२) ग्रामीण भागात कर्जपुरवठा उपलब्ध करून देण्याकरिता बँक सोयींचा विकास करणे.

३) कर्जपुरवठ्याच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा विकास साधणे.

४) नवीन शाखा आणि ग्रामीण भागात उघडून ग्रामीण बचतीला प्रोत्साहन देणे. रिझर्व्ह बँक आणि सरकारकडून मिळणारी आर्थिक मदत कर्जरूपाने ग्रामीण जनतेपर्यंत पोहोचवणे.

५) सहकारी बँक व्यवसायाच्या भक्कम पायावर विकास होण्यासाठी योग्य त्या कर्जधारणाची व कार्यपद्धतीची अंमलबजावणी करणे.

६) सहकारी खरेदी-विक्री व्यवस्थेस प्रोत्साहन देणे. ग्रामीण भागात गोदाम व्यवस्थेचा विकास करण्यासाठी आर्थिक मदत करणे.

७) सहकारी क्षेत्राच्या प्रत्येक विभागाच्या विकासासाठी सर्व प्रकारची मदत करणे.

**स्टेट बँक आणि सहकारी क्षेत्र :**

१९९६ साली रिझर्व्ह बँकेने नेमलेल्या अभ्यास गटाने सहकारी क्षेत्राच्या अर्थविषयक गरजा पूर्ण करण्याच्या संदर्भातील स्टेट बँकेची भूमिका स्पष्ट केली आहे. सहकारी बँक

munotes.in

व्यवसायाच्या भक्कम पायावर विकास होण्यासाठी योग्य त्या कर्जधोरणाची व कार्यपद्धतीची अंमलबजावणी करणे आणि त्यासाठी स्टेट बँकेचा ग्रामीण कर्ज विभाग आणि रिझर्व्ह बँकेचा शेती कर्ज विभाग यामध्ये निकटचे सहकार्य निर्माण करण्यात आले.

**१) सहकारी पतसंस्थांना मदत :**

राज्य सहकारी बँका व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचा दैनंदिन व्यवहार चालावा म्हणून सहकारी कर्ज रोख्याच्या तारणावर सवलतीच्या व्याजदराने स्टेट बँक त्यांना कर्ज आणि अधिकर्ष सवलत देते. सहकारी बँकांचा ग्रामीण भागात विकास व्हावा त्यांनी योग्य त्या प्रमाणात शेती व्यवसायाला कर्जपुरवठा करावा म्हणून स्टेट बँक त्यांना कर्जपुरवठा करते. आतापर्यंत सहकारी संस्थांना जे कर्ज मिळाले आहे त्यापैकी ७८ टक्के कर्ज स्टेट बँक व तिच्या संलग्न बँकांनी दिले आहे. सहकारी बँकांना सवलतीच्या व्याजदराने कर्जपुरवठा केला जातो.

**२) सहकारी विपणन आणि प्रक्रिया संस्थांना मदत :**

सहकारी विपणन संस्थांना मालाच्या तारणावर २५ ते ४० टक्के स्टेट बँक देते. याचबरोबर या संस्थांना खेळत्या भांडवलासाठी स्टेट बँक कर्ज देते. काही राज्यांमध्ये सहकारी साखर कारखान्यांना साखरेच्या तारणावर स्टेट बँक व तिच्या संलग्न बँका कर्जपुरवठा करतात. सरकारी हमीवर सहकारी बँकांना, सहकारी साखर कारखान्यांवर स्टेट बँक व त्यांच्या समूह बँका क्लिन क्रेडिट पुरवतात. औद्योगिक वित्तपुरवठा महामंडळाचे दीर्घ मुदतीचे कर्ज उपलब्ध होईपर्यंत दरम्यानच्या काळात सहकारी साखर कारखान्यांना अस्थायी कर्जपुरवठा करतात.

**३) भूविकास बँकांना मदत :**

मध्यवर्ती भूविकास बँकांची ऋणपत्रे ठराविक प्रमाणात स्टेट बँक खरेदी करतात. तसेच मध्यवर्ती भूविकास बँकांना त्यांच्या ऋण पत्रांची विक्री होईपर्यंत अंतरिम साहाय्य स्टेट बँक देते. तसेच राज्य सरकारच्या हमीवर स्टेट बँक मध्यवर्ती भूमिकास बँकांच्या ऋणपत्रांच्या तारणांवर कर्जपुरवठा करते. रिझर्व्ह बँक आणि आयुर्विमा महामंडळ यांच्या साहाय्याने भूविकास बँकाच्या ऋणपत्रांचा १० टक्के भाग खरेदी करते. तसेच भूविकास बँकांच्या रकमांचा स्थलांतर करण्यासाठी स्टेट बँक सोय उपलब्ध करून देते.

**४) गोदामांना आर्थिक मदत :**

ग्रामीण भागात गोदामांची स्थापना करणे शेतमाल विपणन संस्थांसाठी आवश्यक असते. स्टेट बँकेने मध्यवर्ती गोदाम महामंडळाचे भागभांडवल खरेदी करुन आर्थिक साहाय्य केले आहे. स्टेट बँक गोदामातील मालाच्या तारणावर बँक कर्ज देते. इतर कर्जावरील व्याजदरापेक्षा या कर्जावर व्याजदर कमी असतो.

**५) रकमेच्या स्थलांतराच्या सोयी :**

स्टेट बँक सहकारी बँकांना रकमांच्या स्थलांतराची सुविधा मोफत उपलब्ध करून देते. त्यामुळे रकमांचे स्थलांतर मध्यवर्ती सहकारी बँकेकडून, राज्य सहकारी बँक आणि रिझर्व्ह

बँकेपर्यंत करता येते. ज्या ठिकाणी रिझर्व्ह बँकेची शाखा नसेल अशा ठिकाणी रिझर्व्ह बँकेची प्रतिनिधी म्हणून सहकारी बँकांच्या स्थलांतरास स्टेट बँक हातभार लावते. अशा रीतीने राज्य सहकारी बँकेला आठवड्यातून तीनदा, जिल्हा मध्यवर्ती आणि इतर सहकारी बँकांना आठवड्यातून एकदा रकमांचे स्थलांतर करण्याची सोय स्टेट बँक उपलब्ध करून देते. तसेच सहकारी बँकांचे धनादेश आणि बिले सवलतीच्या बँकदराने वसूल करण्याचे कार्य स्टेट बँक करते.

**स्टेट बँक व अग्रणी बँक योजना :**

दोन अभ्यास गटांच्या शिफारशीनुसार १९७० मध्ये लिड बँक योजना देशातील ३४३ जिल्ह्यांत लागू करण्यात आली. लिड बँकेच्या प्रमुख उद्देश नेमून दिलेल्या जिल्ह्यातील कर्जाच्या गरजांचे संरक्षण करणे व त्यानुसार कर्जवाटपाची समन्वित योजना तयार करणे त्यानुसार कर्जवाटपात वाढ करणे असा होतो. ग्रामीण भागातून ठेवी गोळा करून त्याचा उपयोग समाजातील कमकुवत वर्गाला कर्जपुरवठा करण्यासाठी करतो. त्या आधारे जिल्ह्याचा विकास करणे यासाठी अग्रणी बँक योजना तयार करण्यात आली होती. अग्रणी बँक योजनेनुसार स्टेट बँक आणि तिच्या संलग्न बँकांना १२५ जिल्हे देण्यात आले. त्यापैकी ७२ जिल्हे स्टेट बँकेस वाटून देण्यात आले आहेत. ३३ जिल्हे स्टेट बँकांच्या संलग्न बँकांना वाटून देण्यात आले. १९७३ मध्ये कर्जविषयक गरजांचे अहवाल स्टेट बँक व तिच्या संलग्न बँकांनी सादर केले. स्टेट बँकेशी संलग्न असणाऱ्या बँकांनी जिल्ह्याचा आर्थिक विकास वेगाने व्हावा यासाठी तालुक्यांचा बारकाईने अभ्यास करून जिल्हा कर्ज योजना सादर केल्या आहेत त्यांची अंमलबजावणी केली आहे. झालेल्या कामाचे प्रगतीचे मूल्यमापन करण्यासाठी अडचणी समजून घेऊन या दूर करण्यासाठी अनेक सर्वेक्षण स्टेट बँकेने पूर्ण केली आहेत.

**स्टेट बँक व एकात्मिक ग्रामीण विकास :**

१९७७ पासून स्टेट बँकेने एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम राबविण्यास सुरुवात केली. या योजनेनुसार निवडक खेड्यातील आर्थिक आणि सामाजिक पारिस्थिती सुधारण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातात. ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकांचे जीवनमान सुधारण्यासाठी अनेक योजना राबविल्या जातात. शेतीबरोबर जोडधंद्यांनाही कर्जपुरवठा केला जातो. त्याचबरोबर ग्रामीण आरोग्य आणि घर बांधणीसाठीही कर्ज दिले जाते. देशातील २५९ खेड्यांत ही योजना स्टेट बँकेने राबविली आहे. अनेक खेड्यांची सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक पाहणी पूर्ण झाली आहे. त्यांच्या साठी योजना तयार होत आहेत. खेड्याच्या सर्वांगीण विकासासाठी एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम राबविला जातो. उत्पादक कार्याबरोबर सामाजिक आणि सांस्कृतिक विकासालाही या योजनांमध्ये प्राधान्य दिले जाते. या योजनांमध्ये आवश्यक त्या ठिकाणी स्टेट बँक, राज्य सरकार, औद्योगिक संस्था, इतर वित्तीय संस्था याचेही सहकार्य होते. योजनेंतर्गत १९७८ मध्ये १५४४६ खातेदारांना ३१८ कोटी रुपये कर्ज वाटप करण्यात आले आहे. प्रायोगिक तत्त्वावरील या योजना यशस्वी ठरल्यानंतर देशभर हा कार्यक्रम स्टेट बँक आपल्या शाखांना फी राबविणार आहे.

**स्टेट बँक व विभेदित व्याजदर योजना :**

विभेदित व्याजदर योजनेनुसार आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या लोकांना सवलतीच्या व्याजदराने कर्जपुरवठा केला जातो. ही योजना केंद्र सरकारने १९७२ साली लागू केली. मार्च १९७८ पर्यंत स्टेट बँक समूहाने या योजनेंतर्गत ७२८६०० खातेदारांना ३४ कोटी रुपयांचे कर्ज वाटप केले. अनुसूचित जाती व जमातीच्या लोकांसाठी असणाऱ्या महामंडळामार्फत देखील स्टेट बँक समूह सवलतीच्या व्याजदराने कर्ज देते. उत्पादक कामाबरोबर नैसर्गिक आपत्ती, आजारपण, सामाजिक व सांस्कृतिक खर्चासाठी देखील या योजनेंतर्गत कर्ज दिले जाते. ग्रामीण कारागिरांना प्रामुख्याने या योजनेतून लाभ होतो. अपंग, अनाथ व स्त्रियांसाठी सुधारगृहे या योजनाही सवलतीच्या दराने कर्जवाटप केले जाते. आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या व अडीच एकरपेक्षा कमी जमीन असणाऱ्यांना ४ टक्के या सवलतीच्या व्याजदराने डिसेंबर १९८४ अखेर १४ लाख ७० हजार खातेदार १३२ कोटी रुपये कर्जवाटप करण्यात आले आहे.

देशाच्या आर्थिक विकासामध्ये स्टेट बँकेने भरीव कामगिरी केली आहे. शेतीविकासासाठी कर्जपुरवठा आणि ग्रामीण विकास यामध्ये स्टेट बँकेची भूमिका महत्त्वाची आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) नाबार्डचे कार्य सांगा.

२) स्टेट बँक आणि सहकारी क्षेत्र यावर टिपा लिहा.

**ग) अग्रणी बँकयोजना :**

**१) शेती कर्जवाटपासंबंधी प्रादेशिक विचार :**

नॅशनल क्रेडिट कौन्सिलने केलेल्या शिफारशींवरून बँकेच्या व वित्तपुरवठ्याच्या विकासामध्ये प्रादेशिक विचार आणण्यात आला. या प्रादेशिक तत्त्वाचा अवलंब रिझर्व्ह बँकेने डिसेंबर १९६९ मध्ये सुरू केलेल्या अग्रणी बँक योजनेने व्यवहारात केला असे पहिल्या टप्प्यामध्ये या योजनेचे उद्दिष्ट म्हणजे बँक सेवेची गरज असणारे प्रदेश शोधून काढणे व तेथे बँकेच्या शाखा उघडणे.

योजनेच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये जिल्हावार कर्जयोजना तयार करणे व त्या प्रदेशाच्या विकासाच्या दृष्टीने जरूर त्या बँकविकासाच्या योजना आखणे.

**२) अग्रणी बँक योजना : ध्येय व उद्दिष्टे :**

रिझर्व्ह बँकेने सुरू केलेल्या अग्रणी बँकयोजनेने, देशातच मोठ्या प्रमाणावर ठेवी गोळा करणे व समाजातील कमकुवत गटाच्या लोकांना कर्जपुरवठा करणे ही उद्दिष्टे साध्य करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.

रिझर्व्ह बँकेने वरील सर्व शिफारशी तत्त्वत: मान्य केल्या व 'अग्रणी बँक योजना' सुरू केली. या योजनेखाली स्टेट बँक, तिच्या ७ संलग्न बँका, १४ राष्ट्रीयीकृत व्यापारी बँका व २ खाजगी क्षेत्रातील व्यापारी बँका यांच्यामध्ये देशातील सर्व जिल्हे वाटून देण्यात आले.

१) तेथील बँकांच्या विकासासाठी असणारा वाव व उपलब्ध साधनसामग्री यांचे सर्वेक्षण करणे.

२) बँकांबरोबर व्यवहार न करणाऱ्या व केवळ सावकारांवर अवलंबून राहणाऱ्या व्यापारी व उद्योगसंस्थांची व शेतकऱ्यांची पाहणी करणे.

३) कर्ज देणे व विक्री यांची सांगड घालण्याच्या दृष्टीने जिल्ह्यातील शेतमालाच्या व औद्योगिक वस्तूंच्या विक्रीव्यवस्थेची आणि साठवणुकीच्या सोयीची पाहणी करणे.

४) खते व इतर शेतीच्या आदानांच्या साठवणुकीचा व शेतीक्षेत्रातील यंत्रसामग्रीच्या दुरुस्तीच्या सोयीचा अभ्यास करणे.

५) छोटे कर्जदार आणि शेतकरी यांना सल्लामसलत देण्यासाठी योग्य तो कर्मचारीवर्ग नेमणे व त्यांच्या प्रशिक्षणाची तरतूद करणे, तसेच कर्ज दिल्यानंतरची कार्यवाही व कर्जाच्या उपयोगासंबंधीची पाहणी यांचे त्यांना शिक्षण देणे.

६) खेडेगावामध्ये कर्ज देणाऱ्या इतर लहानसहान संस्थांना मदत करणे.

७) सरकारी व निमसरकारी संस्थांशी कर्जवितरणाच्या बाबतीत संपर्क ठेवणे.

**३) अग्रणी बँकयोजनेची प्रगती :**

बँकांनी ३७७ जिल्ह्यांसाठी कर्जाच्या योजना तयार केल्या. त्यापैकी ३० जून १९७८ पर्यंत ३५९ जिल्ह्यांमध्ये कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरू झाली होती. उरलेल्या १८ जिल्ह्यांसंबंधीचे कर्जयोजना बनविण्याचे काम ३१ मार्च १९७८ च्या बेतास संपेल, अशी अपेक्षा होती.

**४) अग्रणी बँक योजनेवरील टीका :**

अग्रणी बँक योजनेवर सैद्धान्तिक व व्यावहारिक अशा दोन्ही दृष्टिकोनातून टीका करण्यात आली आहे.

अग्रणी बँकांचे त्यांच्या जिल्ह्यांमधील काम पाहता अनेक शंका निर्माण होतात. एक व्यापारी बँकेच्या शाखेला इतकी सगळी कामे पार पाडण्यास सांगणे हे अवास्तव नव्हे काय? अनेक कामे करण्यावर कार्यशक्ती खर्च करून ती कामे असमाधानकारक रीतीने करीत राहण्यापेक्षा अग्रणी बँकांवर सोपविल्या गेलेल्या कार्यापैकी थोड्याच कार्यावर प्रयत्न केंद्रित करणे श्रेयस्कर झाले नसते काय? ह्या बँकांवर सोपविली गेलेली अनेक तांत्रिक कामे पार पाडण्यासाठी आवश्यक तो कर्मचारी वर्ग या बँकाजवळ आहे काय? संशोधन व सर्वेक्षणाचे जिल्ह्यातील काम झाल्यानंतर त्या कामासाठी असणाऱ्या नोकरवर्गाचे भवितव्य काय? अग्रणी बँकेला जिल्ह्यातील इतर बँका सहकार्य देतील काय? इतर बँकांमधील अधिकाऱ्यांपेक्षा अग्रणी बँकेचा अधिकारी कनिष्ठ असल्यास हे सहकार्य त्यास मिळत राहील काय? अग्रणी बँकांची काही कार्ये बहुउद्देशीय सहकारी संस्थांशी मिळतीजुळती नाहीत काय? अशा अनेक शंकांमुळे अग्रणी बँकाकडून अपेक्षा मोठ्या असल्या तरी प्रत्यक्षात त्यांच्याकडून फारच अल्प कार्यवाही होईल अशी भीती व्यक्त करण्यात येते.

munotes.in

**आपली प्रगती तपासा :**

१) अग्रणी बँक योजनेची ध्येय आणि उद्दिष्टे लिहा

**ह) शेती पुनर्वित्त व विकास निगम :**

शेतीपुरवठा क्षेत्रातील एक महत्त्वाची भावना म्हणजे जुलै १९६३ मध्ये शेती पुनर्वित्त व विकास निगम ह्याची स्थापना. ह्या निगमचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे भारतातील शेतीक्षेत्रास उपलब्ध असलेल्या वित्तीय साधनसामग्रीत भर घालून शेतकऱ्यांना मध्यम व दीर्घ मुदतीची अधिकाधिक कर्ज मिळण्याची व्यवस्था करणे हे आहे.

हा निगम मुख्यत: शेती क्षेत्राच्या विकासासाठीच अप्रत्यक्ष रीतीने वित्तीय मदत पुरवितो. ज्या शेती प्रकल्पांसाठी सहकारी पतसोसायट्या किंवा भूविकास बँका मोठ्या प्रमाणावर मध्यम किंवा दीर्घ मुदतीचे कर्ज आपल्या वित्तीय साधनसामग्रीतून देऊ शकत नाहीत, अशा मोठ्या शेती प्रकल्पांसाठी हा निगम मोठ्या प्रमाणावर, पण अप्रत्यक्ष रीतीने वित्तीय साहाय्य उपलब्ध करून देतो. त्याचप्रमाणे शेतीक्षेत्राच्या विकासासाठी मोठे शेती प्रकल्प बनविण्यासाठी हा निगम प्रेरणा पुरवितो.

**१) निगमाची प्रगती :**

- जून १९७८ मध्ये संपलेल्या वर्षात त्या निगमाने एकूण रु. २३.८ कोटी इतक्या रकमेचा पुनर्वित्त स्वरूपात पुरवठा केला.

- निगमाच्या स्थापनेपासून आजपर्यंत पुनवित्त स्वरूपात शेतीक्षेत्रास दिलेली वित्तीय मदत रु. १०४९ कोटी इतकी होती.

- ह्या निगमाने आजपर्यंत अप्रत्यक्ष रीतीने दिलेल्या एकूण वित्तीय साहाय्यापैकी लघुपाटबंधारे प्रकल्पांना ७३१ कोटी शेतांच्या यांत्रिकीकरणासाठी रु.१४५.५ कोटी, गुदाम बांधणीसाठी रु. ६४.३ कोटी आणि भूविकासासाठी रु. २९.५ कोटी इतकी वित्तीय साहाय्य दिले आहे.

- ह्या निगमाचे एक उल्लेखनीय कार्य म्हणजे सन १९७७-७८ ह्या वर्षी व्यापारी बँकांमार्फत शेतीक्षेत्रास दिलेले पुनर्वित्तीय साहाय्य हे होय.

- या नियमांचे आणखी एक महत्त्वाचे कार्य म्हणजे घटक राज्यांमध्ये जी आर्थिक विषमता दिसून येते, ती पुनर्वित्तीय मदतीद्वारा कमी करण्याचा प्रयत्न करणे हे आहे. ह्या उद्दिष्टांमुळे भारताच्या पूर्व ईशान्य विभागांकडे ह्या निगमाद्वारा अधिकाधिक पुनर्वित्तीय साहाय्य दिले जात आहे.

ह्या निगमास विविध शेती प्रकल्पांना अप्रत्यक्ष रीतीने वित्तीय मदत देता यावी म्हणून जागतिक बँकेकडून वित्तीय मदत मिळते. उदाहरणार्थ, सन १९७८ पर्यंत ह्या निगमाने जागतिक बँकेच्या मदतीने अप्रत्यक्ष रीतीने ३५ शेती प्रकल्पांना वित्तीय साहाय्य दिले.

**ज) शेतकी वित्त निगम :**

शेतकी वित्त निगमाची स्थापना सन १९६८ मध्ये करण्यात आली.

सुरुवातीला या निगमाचे अधिकृत भांडवल रु. १०० कोटी होते. विक्रीसाठी काढलेले भांडवल रु. १० कोटी व वसूल झालेले भांडवल रु. ५ कोटी इतके होते.

शेतकी वित्त निगमाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे सहकारी सोसायट्यांना व व्यापारी बँकांना पूरक म्हणून कार्य करणे या मार्गाने शेती क्षेत्रातील वित्तपुरवठा वाढविणे.

१. शेतीक्षेत्राला आवश्यक असलेली यंत्रसामग्री, खते, रोगनाशके इत्यादी शेती आदानांच्या वितरणास मदत करणे.

२. शेतीला बाजार मिळावा व गुदामांची सोय व्हावी, यासाठी प्रयत्न करणे, त्याचप्रमाणे खाद्यवस्तूंचे उत्पादन करणारे उद्योग व त्यांचे उत्पादन वाढविण्यासाठी वित्तीय मदत करणे.

३. पशुपालन व्यवसायाच्या सहकारी संस्थांना प्रोत्साहन देणे.

४. शेतमालाच्या उत्पादनास व वितरणास मदत करणे.

शेती वित्त निगमाद्वारे शेतीक्षेत्रास प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष अशा दोन्ही पद्धतीने वित्त पुरविले जाते.

शेती वित्त निगमाने प्रत्यक्ष कर्ज दिलेल्या काही शेती योजना म्हणजे बिहारमधील क्षेत्रीय विकासास दिलेली मदत, तामिळनाडूच्या वालुकामिश्रित जमिनीची सुधारणा व केळ्यांच्या निर्यात योग्य उत्पादनाच्या प्रकल्पास दिलेली वित्तीय मदत, हरियाणा व आंध्र प्रदेश येथील विहिरीसाठी दिलेली मदत.

सहकारी व व्यापारी बँकांमध्ये सुसूत्रता साधता यावी म्हणून शेती वित्त निगमाने राष्ट्रीय घटक राज्य व जिल्हा पातÈयांवर सल्ला मंडळे स्थापन केली आहेत.

शेतीक्षेत्राला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीने कर्जदेणे हे शेतकी वित्त निगमाचे प्रमुख कार्य आहेच, पण त्याचबरोबर शेतीक्षेत्रास वित्तपुरवठा करणाऱ्या वित्तीय संस्थांच्या कार्यात सुसूत्रता आणण्यासाठी प्रयत्न हे या निगमाचे कार्य आहे.

**च) शेतकी पत निगम :**

भारतातील राजस्थान, ओरिसा, बिहार, आसाम व पश्चिम बंगाल ह्या घटक राज्यांत सहकारी पतसंस्थांची मर्यादित प्रगती झाल्याकारणाने, वरील घटक राज्यांनी रिझर्व्ह बँकेच्या शिफारशीनुसार सन १९५८ मध्ये शेतकी पत निगम ह्याची स्थापना केली.

ह्या निगमातर्फे शेतकऱ्यांना शेतमाल विक्री संस्थांना, शेतमालाच्या प्रक्रिया उद्योगांना आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना कर्जपुरवठा केला जातो. शेतमालाची विक्री व वितरण करणारे माध्यम म्हणूनही हे निगम कार्य करते.

**१) लहान शेतकरी विकास संस्था :**

सर्वसाधारणपणे असे आढळून आले की, जरी शेतीक्षेत्रात सहकारी पतसोसायट्या व्यापारी बँका व क्षेत्रीय ग्रामीण बँका पतपुरवठ्याचे कार्य करीत असल्या तरी संस्थात्मक वित्तपुरवठा योजनांपासून लहान शेतकऱ्यांच्या पतपुरवठ्याचा प्रश्न सुटलेला नाही. ग्रामीण भागातील लहान शेतकरी अशा संस्थांच्या कार्यकक्षेपासून बाजूलाच राहतात किंवा फेकले जातात. अशा लहान शेतकऱ्यांना आवश्यक असलेल्या पतपुरवठ्याची कोणतीच योजना किंवा यंत्रणा अस्तित्वात नव्हती.

म्हणूनच सन १९६९ च्या ग्रामीण पतपाहणी समितीने यासाठी लहान शेतकरी विकास संस्था स्थापन करण्याची शिफारस केली. ज्या शेतकऱ्यांकडे लहान, पण आर्थिकदृष्ट्या सक्षम ठरू शकेल अशा शेतजमीन आहेत व ज्यांना शेतीच्या आदानासाठी कर्जाची आवश्यकता आहे. अशा लहान शेतकऱ्यांसाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे.

सुरुवातीस भारतातील ३० जिल्ह्यांत ही योजना प्रयोगादाखल सुरू करण्याचे ठरले.

ह्या योजनेचे उद्दिष्ट म्हणजे लहान शेतकऱ्यांचे प्रश्न समजून घेणे, त्यांना सहकारी पतसोसायट्यांकडून कर्ज मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे व त्यांचे उत्पादन व उत्पन्न वाढविण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांवर देखरेख ठेवणे हे आहे. लहान शेतकऱ्यांना कर्ज देता यावे म्हणून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व भूविकास बँकांना ह्या योजनेमार्फत वित्तपुरवठा केला जातो. ह्या योजनेचा चौथ्या पंचवार्षिक योजनेत समावेश करण्यात आला होता व ३० जिल्ह्यांतील सुमारे १५ लक्ष लहान शेतकऱ्यांना ह्या योजनेचा लाभ झाला.

### ३.३.२ बिगर संस्थात्मक वित्तपुरवठा :

बिगर संस्थात्मक साधने म्हणजे खाजगी वित्तपुरवठा होय. ज्यावर पूर्वी शासनाचा कोणताही अंकुश नव्हता. बँकिंग नियमानुसार त्यांची कार्यपद्धती नव्हती. असे असतानासुद्धा स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यप्राप्तीच्या नंतरच्या काही वर्षापर्यंत बिगर संस्थात्मक साधनांचे महत्त्व सर्वाधिक होते. कारण ह्या काळात ग्रामीण भागातील घटकांना वित्तपुरवठा करणारा असा कोणताही घटक नव्हता. अशा गरजेच्या काळात खऱ्या अर्थाने ग्रामीण भागात वित्तपुरवठा करण्याचे कार्य बिगर संस्थात्मक घटकांनी केले आहे. या घटकांची माहिती पुढीलप्रमाणे देता येईल.

**१) सावकार :**

अनेक शतकांपासून ग्रामीण भागात शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करणारा एक महत्त्वाचा घटक म्हणजे सावकार होय. सावकाराने ग्रामीण भागातील शेतकऱ्याला शेती विकासासाठी तसेच त्याच्या वैयक्तिक कारणांसाठीसुद्धा कर्ज दिलेले दिसून येते. सावकाराचे राज्य अनेक शतकापासून जे चालू होते ते अगदी सन १९७० पर्यंत पाहावयास मिळते. जनतेची वित्तपुरवठ्याची गरज खऱ्या अर्थाने ह्या काळात सावकार या घटकाने भागविलेली पाहावयास मिळते. सावकाराचे प्रामुख्याने दोन प्रकार पडतात. १) व्यावसायिक सावकार २) व्यावसायिकतेतर सावकार व्यावसायिक सावकार हा प्रामुख्याने शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करण्याचा व्यवसाय करणारा घटक होता. तर व्यावसायिकेतर सावकार हा सावकारी

व्यवसाय प्रमुख व्यवसाय करणारा नव्हता, त्यामध्ये मोठा जमीनदार, व्यावसायिक यांचा समावेश असे. त्यांच्या प्रमुख व्यवसायाबरोबर सावकारी हा व्यवसाय ते करत असत.

**I) सावकाराची कार्यपद्धती :**

सावकार कर्ज देताना कर्जदारांची पत विचारात घेऊनच कर्ज देत असे. त्याच्याजवळील मालमत्ता, त्यांची कर्जफेडीची पात्रता, त्यांचे समाजातील वर्तन ह्या गोष्टींचा विचार करूनच सावकार कर्ज देत असे. सावकारी कर्ज हे अल्पमुदतीसाठी असे. शेतकऱ्याची शेतीसाठीची गरज, तसेच कुटुंबाचा शेतीकाळामध्ये उदरनिर्वाह व्हावा म्हणून तसेच सामाजिक व धार्मिक सण-समारंभ इत्यादी साठीही तो कर्ज देत असे. सावकार हा मागताक्षणी कर्ज देत असे. ह्या साठी त्याची जमीन, घर इत्यादी सारखी मालमत्ता सावकार आपणाकडे तारण ठेवत असे. बऱ्याच वेळा गहाण खत म्हणून खरेदीखतसुद्धा लिहून घेणारे काही सावकार होते. बँकेचे कर्ज मिळविण्यासाठी लागणारी खटपट ह्या सावकारी कर्जासाठी करावी लागत नव्हती. मात्र ह्या सावकारी व्याजाचा दर मोठ्या प्रमाणात आकारला जात असे. कर्जवसुलीसाठी साम, दाम, दंड, भेद या वृत्तीचा तो वापर करत असे. कर्जवसुली न झाल्यास सामाजिक प्रतिष्ठेचा वापर करून गहाण ठेवलेल्या मालमत्तेवर ताबा मिळवत असे. अशा ह्या सावकारी व्यवसायात अनेक दोष होते. कर्जाच्या परतफेडीचा हिशोब योग्य पद्धतीने न ठेवणे, शेतकऱ्याकडून जादा कर्जाची रक्कम जमा करणे, गहाण खत म्हणून खरेदीपत्र करून घेणे, कर्जदाराकडून मोफत कामे करून घेणे, कर्जाची परतफेड होत नसल्यास त्यास विविध माध्यमातून त्रास देणे, अशा अनेक चुकीच्या पद्धतीचा वापर सावकार करत असे.

**II) सावकारावर नियंत्रण :**

सावकारांचे गैरव्यवसाय आणि अनिष्ट प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी १९४० पर्यंत सर्व राज्यात कायदे करण्यात आले. १९७५मध्ये महाराष्ट्रात कायदा करण्यात आला. त्यानुसार ५००/- रु. पेक्षा कमी उत्पन्न असलेल्या सर्वांची कर्जे माफ करण्यात आली. या कायद्यामध्ये सर्वसमावेश अशा तरतुदी केल्या गेल्या.

१) सावकारी व्यवसाय करावयाचा असेल तर 'रजिस्ट्रार' ऑफ मनीलेंडर्स' यांच्याकडे नोंदणी करून परवाना घेणे आवश्यक.

२) सावकारांनी कर्जदाराला दिलेल्या कर्जाची माहिती दिलेल्या विहित नमुन्यात सरकारला देणे गरजेचे.

३) नोंदणी झालेल्या म्हणजेच ज्यांच्याकडे परवाना आहे अशाच सावकाराला कर्जवसुलीसाठी कोर्टात दाद मागता येईल.

४) विना परवाना सावकारी व्यवसाय करणे गुन्हा ठरविण्यात आले आहे.

५) कोणताही बेकायदेशीर व्यवहार उघडकीस आल्यास सावकाराचा परवाना रद्द करण्यात येईल. तसेच कायद्यात गुन्ह्याबद्दल शिक्षेची तरतूद.

६) कर्जदाराचा त्याच्या कर्जाचा हिशेब सावकाराने देणे गरजेचे आहे. तसेच पावत्या सावकाराने देणे गरजेचे.

७) कर्जदाराचा छळ करणे, इतर कपाती करणे इत्यादीवर कायद्याने बंधने घालण्यात आली.

सावकारी व्यवसायावरील निर्बंधामागील प्रमुख कारण म्हणजे सावकारी व्यवसायातून होणारा कर्जपुरवठा हा शेतकऱ्यांना सोईस्कर होता. सहज उपलब्ध होणार होता. म्हणून सावकारी पद्धतीत सुधारणा करून सावकारी व्यवसायातून ग्रामीण भागात योग्य पद्धतीने कर्जपुरवठा करणे शक्य होईल. कारण तेव्हा सावकारी व्यवसायाला पर्यायी व्यवसाय ग्रामीण भागात नव्हता. यासाठीच सावकाराच्यावर शासकीय नियंत्रण लादून सावकाराच्या साधनसामग्रीचा, भांडवलाचा, ज्ञानाचा, कर्जपुरवण्याच्या सोप्या पद्धतीचा उपयोग ग्रामीण भागाच्या विकासासाठी कौशल्याने करून घेणे गरजेचे होते. आज अनेक सावकार ह्या कायद्याच्या अखत्यारीत परवाना धारण करून आपला व्यवसाय ग्रामीण भागात करत आहेत.

सन १९५१-५२ मध्ये एकूण कृषी कर्जात सावकारांनी दिलेल्या कर्जाचा वाटा ६९.७ टक्के होता. तो १९९५-९६ मध्ये केवळ ७.०० टक्के झाला याचाच अर्थ असा की, वर्तमानकाळात ग्रामीण वित्तपुरवठ्याची इतर संस्थात्मक साधने वाढत आहेत, किंबहुना मोठ्या प्रमाणात कर्जपुरवठा करत आहेत, पर्यायाने सावकारी कर्जपुरवठ्याची टक्केवारी कमी होत आहे.

**२) जमीनदार :**

जमीनदार हा सावकारी व्यवसाय करणारा घटक नाही. मात्र जमीनदारांवर अवलंबून असणारे छोटे शेतकरी, शेतमजूर, जमीनदारांची कुळे यांना जेव्हा पैशाची गरज पडते त्यावेळी कर्जासाठी जमीनदाराकडे जातात. जमीनदाराकडून मिळणारे कर्ज हे सोपे होते. मात्र सावकाराचाच व्याजदर जमीनदार आकारत असे. साहजिकच सावकारी प्रवृत्तीचाच हा जमीनदार असल्याने कुळांची फसवणूक करून, शेतकऱ्यांची फसवणूक करून त्यांच्या जमीन आपल्या घशात घालणारा घटक म्हणूनच त्याच्याकडे पाहिले जाते. थोडक्यात सावकारी कर्जव्यवहारातील सर्व दोष जमीनदारांच्या बाबतीतही आढळतात.

**३) व्यापारी व दलाल :**

शेतकरी आपल्याजवळील विकता येण्यासारखा शेतमाल व्यापारी व दलाल यांना विकतात. मात्र शेती हंगामात शेतीच्या कामासाठी, तसेच कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी शेतकर्याला पैशाची गरज असते. अशा वेळी व्यापारी व दलाल ह्या शेतकऱ्यांना आपला माल आम्हालाच विकावा या अटी शर्तीवर कर्ज देतात. शेतकरी व व्यापारी यांचे जवळचेही संबंध असतात. त्यामुळे कर्ज देण्यात व्यापाऱ्याला कोणतीही अडचण वाटत नाही.

या कर्जाचे शेतकऱ्यांना बरेच फायदे होतात. शेतकऱ्याला कोणतेही तारण न देता, कोणत्याही कागदपत्राचा खटाटोप न करता अगदी सहज सुलभ शेतकऱ्याला कर्जपुरवठा प्राप्त होतो. व्याजाचा दरही मोठा आकारला जात नाही. मात्र याबरोबर काही तोटेही शेतकऱ्याला सहन करावे लागतात. शेतकऱ्याला पीक आल्याबरोबर ताबडतोब व्यापाऱ्याला विकावे लागते. त्यावेळी मिळणारी किंमत ही बऱ्याच वेळा कमीच असलेली पाहावयास मिळते. शेतकऱ्याची सौदाशक्ती या ठिकाणी कमी पडते. त्यामुळे त्या शेतमालाला मिळणारी किंमत बाजारभावापेक्षा कमी मिळते.

सन १९५१-१९७१ या काळात ५.५ टक्क्यांवरून ८.४ टक्के इतके कर्जपुरवठा व्यापारी व दलाल या घटकांनी केलेला आहे. तर सन १९९५-९६ मध्ये तो कर्जपुरवठा ५.०० टक्के इतका घटलेला पाहावयास मिळतो. या साधनाचे महत्त्व पूर्वी मोठे होते. आज मात्र ह्या पतपुरवठ्याची जागा संस्थात्मक वित्तपुरवठा घेताना बघावयास मिळत आहे.

**४) नातेवाईक :**

बरेच शेतकरी आपल्या गरजेनुसार अडचणीच्या काळात आपल्या नातेवाईकांकडून व मित्रमंडळींकडून कर्ज घेतात. हे कर्ज पैशाच्या स्वरूपात किंवा धान्याच्या स्वरूपात घेतले जाते. बऱ्याचदा ही कर्जे अनौपचारिक स्वरूपाची असल्याने ती व्याजाविरहित असतात. पीक निघताच ही कर्जे परत केली जातात. काही नातेवाईक शेतकऱ्याला दिलेल्या कर्जावर व्याज आकारतात. हा व्याजदर योग्य प्रमाणात असतो. अशी कर्जेही दीर्घकाळासाठी असलेली दिसून येतात. नातेवाईकांकडून कर्जे घेण्याचा सर्वात महत्त्वाचा फायदा म्हणजे शेतकऱ्याची फसवणूक व पिळवणूक होत नाही. खोटी कागदपत्रे तयार करणे, हिशेबात घोळ घालणे, जमीन बळकावणे यासारखे गैरव्यवहार होत नाहीत. परंतु नातेवाईकांकडून कर्जे काढण्यावर मर्यादा पडतात. तसेच शेतकऱ्याने मागितल्याबरोबर कर्ज मिळेलच असे नाही.

अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा समितीच्या मते १९५१-५२ मध्ये एकूण शेती पतपुरवठ्यापैकी नातलगांनी दिलेली कर्जे १४.२ टक्के होते. १९६१-६२ मध्ये हे प्रमाण घटून ८.८ टक्के झाली १९९५-९६ मध्ये ते केवळ ३.०० टक्के होते. म्हणजेच वर्तमानकाळात नातेवाईक आणि मित्र यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या कर्जाचे प्रमाण बरेच घटलेले आहे.

**५) निधी व चिटफंड्स :**

पूर्वी ग्रामीण भागात बँक सेवा उपलब्ध नव्हती. बँक सेवा पुरविण्यासाठी दक्षिण भारतात निधी ही कर्जसंस्था अस्तित्वात आहे. निधी हे आपले सभासद बनवितात. त्यांच्याकडून ठेवी स्वीकारतात. त्याचप्रमाणे भागभांडवलाची विक्री करतात. या भांडवलाचा उपयोग ग्रामीण भागात कर्ज देण्यासाठी केला जातो. निधी ह्या कर्जसंस्था आहेत. तरीसुद्धा सावकारी व्यवसायापेक्षा त्यांचे व्याजदर कमी असतात. मात्र थकबाकीवर जास्त व्याजदर आकारला जातो. सभासदांची गरज भागल्यावर इतरांनासुद्धा निधींकडून कर्जपुरवठा होतो.




https://www.bhopalsamachar.com

munotes.in

या उलट चिटफंड्स हे ग्रामीण भागामध्ये बचत गोळा करणारी आणि सभासदांना कोणतेही बंधन नसलेली संस्था आहे. ह्या संस्थेचा सभासद व्यक्ती कधीही होऊ शकते. सभासद होणे किंवा सभासदत्व कमी करणे यासाठी व्यक्तीला स्वातंत्र्य असते. अशा प्रकारच्या संस्था दक्षिण भारतात मोठ्या प्रमाणात आहेत. तेथील ग्रामीण पतपुरवठ्याची गरज अग्रक्रमाने भागवितात. असे चिटफंड्स किंवा भिशी कोणतीही एक व्यक्ती सुरू करू शकते. सभासद आपले हप्ते या प्रमुखाकडे भरतात. या नियमित गोळा होणाऱ्या रकमेची कर्जरूपाने वाटणी केली जाते किंवा त्याचे इतरही अनेक प्रकार आहेत. नोंदणी क्रमांकानुसार कर्ज देण्याची पद्धती, चिट्ठी उचलून ज्याचे नाव असेल त्याला कर्ज दिले जाते किंवा जमा रकमेचा लिलाव केला जातो जो अधिक बोली लावेल त्याला कर्ज दिले जाते. निधी किंवा भिशी हा एक जुगार असतात.

अखिल भारतीय ग्रामीण पतपाहणी समितीने या संस्थासंदर्भात काही सूचना केल्या आहेत. या संस्थेचे सभासदत्व ग्रामीण भागातील सर्व लोकांना करणे. चिटफंड्स ची १/३ रक्कम प्राथमिक सहकारी संस्थेकडे ठेव ठेवणे, तसेच १/६ रक्कम आपत्कालीन तरतूद म्हणून ठेवण्यात यावी. संकटकाळात या रकमेचा उपयोग होईल. उर्वरित १/३ रक्कम ही सभासदांना कर्जरूपात वाटण्यात यावी.

अशा रीतीने बिगर संस्थात्मक मार्गाने ग्रामीण भागात वित्तपुरवठा पूर्वी होत होता. आजही होत आहे. मात्र त्याचे प्रमाण भरपूर कमी आहे, कारण १९७० नंतर खऱ्या अर्थाने बँकिंग व्यवस्था ग्रामीण भागात तळागाळात पसरण्यास सुरुवात झाली. त्याचे कर्जावरील कमी व्याज, फसवणूक न होण्याची हमी या सर्वच कारणांनी आज संख्यात्मक वित्तपुरवठा हा विकसित झाला आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१. ग्रामीण भागात वित्तपुरवठा करणाऱ्या बिगर संस्थात्मक घटक सांगा.

### ३.३.३ सरकार :

भारतात सरकारकडून विशेषत: राज्य सरकारकडून कृषी व्यवसायासाठी अल्प आणि मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा केला जातो. सरकार ही कर्जे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे देते. महाराष्ट्रात महसूल विभाग, पंचायत समिती, गट विकास अधिकारी याच्यामार्फत - रूपाने अल्पकालीन कर्जे दिली जातात. ही कर्जे शेतजमिनीच्या तारणावर दिली जातात. सरकार दिलेल्या कर्जावर अल्प व्याजदर आकारते. कर्जाची परतफेड शेतकऱ्याने जमीन महसूल भरताना करावयाची असते. व्याजदर कमी असल्याने शेतकरी ही कर्जे घेण्यास उत्सुक असतात. मात्र बऱ्याच वेळा सरकारी अधिकाऱ्यांचा प्रतिसाद नसल्याने शेतकरी ह्या कर्जापासून वंचित राहतो.

प्रत्यक्ष कर्जासोबत अप्रत्यक्ष कर्जपुरवठामध्ये केंद्र सरकार व राज्य सरकार बँकांना कृषी व्यवसायासाठी कर्जपुरवठा व्हावा यासाठी भागभांडवल खरेदी, तसेच कर्ज देणे या दोन्ही मार्गांचा अवलंब करते. राज्य सरकारांनी सहकारी पतसंस्था व सहकारी बँकांना ३५० ते ४०० कोटी रु. अल्पकालीन कर्जे दिली. त्याचा वापर कृषी कर्जासाठी केला आहे.

### ३.३.४ सूक्ष्म वित्तपुरवठा :

आज स्वयंसाहाय्यता गट हा शब्द परवलीचा झालेला पाहावयास मिळतो. स्वयंसाहाय्यता ही चळवळ महिलांची, तसेच आर्थिक मागास पुरुषांच्या आर्थिक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी असलेली चळवळ आहे. यामध्ये नुसती आर्थिक प्रश्नांची सोडवणूक एवढाच उद्देश नसून महिलांच्या वैयक्तिक, सामाजिक, आरोग्यदृष्ट्या प्रश्नांची सोडवणूक करणे हा उद्देशदेखील आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात महिलांच्या कल्याणासाठी अनेक योजना राबविल्या. परंतु गेल्या पंचवीस वर्षांत महिला सबलीकरणावर भर देऊन पुरुष व स्त्रिया यांच्यात सर्व बाबतीत समानता प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने स्वयंसाहाय्यता समूह चळवळ जोमाने सुरू आहे. स्वयंसाहाय्यता गटाची चळवळ ही खऱ्या अर्थाने विविध कार्ये हाती घेऊन जन्माला आलेली चळवळ आहे. त्यामध्ये महिला बचतगट, समूह गट, शेजार गट, सूक्ष्मवित्तपुरवठा, स्वल्पवित्तसमूह, स्वावलंबी बचत गट, काटकसर व कर्ज गट इत्यादी कार्ये हे गट करत आहेत.

आज ग्रामीण भागाचा विचार करता अनेक बचतगट हे ग्रामीण भागामध्ये आपल्या सदस्यांची बचत गोळा करतात. त्याचबरोबर त्यांना त्यांच्या गरजानुसार व गटांच्या नियमावलीनुसार कर्ज वाटप करतात. काही बचत गट आपल्या सदस्यांचा व्यवसाय विकसित करण्यासाठी गटाच्या माध्यमातून कर्जपुरवठा करत आहेत.

अलीकडच्या काळात बचतगटांच्या माध्यमातून ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात कर्जपुरवठा केला जातो. देशातील जवळपास ५६३ जिल्ह्यांमध्ये स्वयंसाहाय्यत्ता गटामार्फत सूक्ष्म वित्तपुरवठा कार्यक्रम राबविला जातो. यासाठी ४८ व्यापारी अधिकोष, १९६ प्रादेशिक ग्रामीण अधिकोष, ३१६ सहकारी अधिकोष यांच्या माध्यमातून ह्या गटांना कर्जपुरवठा होतो. सन २००६ पर्यंत बँकांशी जोडल्या गेलेल्या एकूण २४.८ लाख बचत गट आहेत. ह्या गटांना २००६ पर्यंत १३,५१२ कोटी रुपये कर्जवाटप केले गेले आहे.

## ३.४ सारांश

ग्रामीण वित्तपुरवठ्यांचा प्रश्न हा भारतीय अर्थव्यवस्थेचा एक सर्वाधिक महत्त्वाचा प्रश्न ठरतो. कारण ग्रामीण भागातील लोकांचे राहणीमान अत्यंत खालच्या पातळीवर आहे. भारतीय शेतीमध्ये निर-निराळ्या प्रकारचे कर्ज आवश्यक आहे. त्यांची निश्चित मात्रा किती आहे हे सांगणे कठीण आहे. कारण शेतीच्या उत्पादनात बरीचशी अनिश्चितता असल्याने कर्जाची रक्कमसुद्धा कमी-जास्त होऊ शकते. परंतु भविष्यकाळात ही गरज वाढती राहील ही गरज भागविण्यासाठी शासकीय पातळीवर अनेक प्रकारचे प्रयत्न केले जातात. त्यामध्ये प्रामुख्याने सहकारी त्रिस्तरीय वित्तपुरवठ्यांची व्यवस्था, भू-विकास बँकेची स्थापना, व्यापारी बँकांकडून शेतीसाठी होणारा वित्तपुरवठा, राष्ट्रीयीकृत व्यापारी बँकांचा ग्रामीण भागातील शाखा विस्तार इत्यादी उपक्रमांचा उल्लेख करता येईल.

munotes.in

## ३.५ स्वाध्याय

१) ग्रामीण वित्तपुरवठ्यातील संस्थात्मक साधनांची माहिती द्या.

२) ग्रामीण वित्तपुरवठ्यातील बिगर संस्थात्मक विविध मार्गांची माहिती द्या.

३) ग्रामीण वित्तपुरवठ्यातील सूक्ष्म वित्तपुरवठ्याची भूमिका सांगा.

४) ग्रामीण वित्तपुरवठ्यातील सरकारची भूमिका सांगा.

५) ग्रामीण वित्तपुरवठ्यातील विविध मार्ग किंवा साधनांची माहिती द्या.

❖❖❖❖

munotes.in

# ४

# नाबार्ड

## (NATIONAL BANK FOR AGRICULTURE AND RURAL DEVELOPMENT)

**घटक रचना :**

४.० पाठाचे उद्देश

४.१ प्रास्ताविक

४.२ नाबार्डची स्थापना

४.३ नाबार्डचे उद्देश

४.४ नाबार्डचे भागभांडवल आणि व्यवस्थापन

४.५ नाबार्डचे कार्य

४.६ नाबार्डची भूमिका आणि मूल्यमापन

४.७ स्वाध्याय.

## ४.० पाठाचे उद्देश

- नाबार्डची स्थापना अभ्यासणे.
- नाबार्डच्या स्थापनेचे उद्देश अभ्यासणे.
- नाबार्डचे भागभांडवल आणि व्यवस्थापन अभ्यासणे.
- नाबार्डच्या कार्याचा अभ्यास करणे.
- नाबार्डच्या कार्याची फलनिष्पत्ती व मूल्यमापन करणे.

## ४.१ प्रास्ताविक

कृषी क्षेत्राचे देशाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासातील महत्त्वपूर्ण स्थान विचारात घेऊनच भारताच्या मध्यवर्ती बँकेने म्हणजेच रिझर्व्ह बँकेने आपल्या स्थापने (१९३५) पासूनच शेतकी पत-पुरवठा विभाग (Agricultural Credit Department) सुरू केला. देशातील विविध घटक राज्यांतील राज्य सहकारी बँकांच्या मार्फत अप्रत्यक्षरीत्या शेतीक्षेत्रास अल्प, मध्यम आणि दीर्घ मुदतीचा पतपुरवठा करीत असे.

munotes.in

रिझर्व्ह बँकेचे ग्रामीण पतपुरवठा करण्याबाबतचे काम सतत वाढत जाऊन विस्तृत रूप प्राप्त झाले. रिझर्व्ह बँक एकाच वेळी औद्योगिक क्षेत्र, आंतरराष्ट्रीय व्यापार क्षेत्र, चलनव्यवस्था, व्यापारी बँकांवरील नियंत्रण इत्यादी कामांची मोठी जबाबदारी पार पाडीत होती. अशा वेळी ग्रामीण पतपुरवठ्यासारखा एखाद्या विशिष्ट क्षेत्रात स्वतःला जास्त गुंतवून घेण्यापेक्षा बँकांनी शेती विकासासाठी दिलेल्या कर्जासाठी पुनर्वित्त सेवा उपलब्ध करून देण्यासाठी रिझर्व्ह बँकेने सन १९६३ मध्ये शेती पुनर्वित्त व विकास महामंडळाची स्थापना केली. व्यापक प्रमाणावर शेती विकासासाठी व ग्रामीण विकासासाठी कर्जपुरवठा करण्यात अनेक अडचणी येत होत्या. शेती व ग्रामीण विकासासाठी संस्थात्मक कर्जपुरवठा करण्यासाठी रिझर्व्ह बँकेने एक समिती नेमली, तिने शेती व ग्रामीण विकासासाठी राष्ट्रीय पातळीवर एक बँक स्थापन करावी, अशी शिफारस केली.

## ४.२ नाबार्डची स्थापना

कृषी विकासाबरोबरच ग्रामीण विकास साध्य करण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर शिखर बँक स्थापन करण्याचा निर्णय भारत सरकारने घेऊन १२ जुलै १९८२ मध्ये नाबार्डची स्थापना केली. ही बँक रिझर्व्ह बँकेची शेती कर्जपुरवठा करण्याच्या मुख्य कामाबरोबर कृषी पुनर्वित्त विकास महामंडळाची कार्ये व ग्रामीण विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी करून विविध संस्थांच्या कार्यात समन्वय साधण्याचा प्रयत्न करील.

कृषी आणि ग्रामीण विकासासाठी राष्ट्रीय बँक (NABARD)

https://www.scotbuzz.org

munotes.in

## ४.३ नाबार्डचे उद्देश

**१) शेतीविषयक कर्ज उपलब्ध करणे :**

शेती विकासासाठी आवश्यक असलेल्या आदानाची गरज पूर्ण करण्यासाठी तसेच आवश्यक बी-बियाणे, रासायनिक खते तसेच यांत्रिक साधने याचा पुरवठा करण्यासाठी कर्ज उपलब्ध करून देते. ग्रामीण भागातील शेतकऱ्याला कृषी आदाने परवडणारे नसते. म्हणून शेतीचा विकास साधण्यासाठी कर्ज उपलब्ध करतात.

**२) लघुउद्योगास भांडवल उपलब्ध करून देणे :**

शेतीबरोबरच लघुउद्योग, कुटीरउद्योग, ग्रामीण हस्त उद्योग, तसेच लघुत्तम उद्योग यांना आवश्यक असणारी आर्थिक मदत तसेच भांडवल उपलब्ध करून देणे आणि ग्रामीण भागातील लोकांना रोजगार व सामाजिक स्थिरता उपलब्ध करण्यासाठी प्रोत्साहन देणे.

**३) संस्थांच्या कार्याचे सुसूत्रीकरण करणे :**

लघुउद्योग, ग्रामोद्योग, कुटीरउद्योग तसेच अत्यंत छोट्या उद्योगाशी संबंधित असलेल्या मध्यवर्ती सरकार, घटक राज्य सरकार, योजना आयोग आणि भारतीय घटकराज्य पातळीवरील सर्व संस्थांच्या कार्याचे सुसूत्रीकरण करणे.

**४) कृषी साहाय्यभूत व्यवसायांना साहाय्य :**

ग्रामीण भागात फलोद्यान, दुग्धव्यवसाय, पशुपालन, कुक्कुटपालन तसेच इतर व्यवसाय करत असताना अनेक प्रकारची गुंतवणूक करावी लागते, तसेच भांडवलाची गरज निर्माण होते. या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि या संबंधित असलेली विकासात्मक भूमिका पार पाडण्यासाठी अर्थसाहाय्य करणे.




https://www.readermaster.com

**५) ग्रामीण भागाचा विकास करणे :**

ग्रामीण भागातील लोकांना रोजगार उपलब्ध करून देणे, राहणीमानाचा दर्जा उंचावणे, तसेच ग्रामीण भागाची समृद्धी वाढविणे आणि समन्वित ग्रामीण विकास घडून आणणे.

**६) भू विकास बँकांना दीर्घमुदत पतपुरवठा करणे:**

ग्रामीण भागातील भू-विकास बँकांना दीर्घ मुदतीपर्यंत पतपुरवठा करणे हे उद्देश नाबार्डचे आहे. कारण ग्रामीण भागातील लोक अधिक प्रमाणात कर्ज हे धान्योत्पादन, बागायती शेती, पडीक जमीन लागवडीखाली आणण्यासाठी घेतात. अशा व्यवसायास दीर्घकाळ लागतो.

**७) नैसर्गिक आपत्तीत मदत :**

भूकंप, दुष्काळ, पूर अशा नैसर्गिक आपत्तीमुळे मोठ्या प्रमाणत प्राणहानी व वित्तहानी होते. तसेच शेती क्षेत्रातदेखील मोठ्या प्रमाणात नुकसान होते. अशा वेळी ग्रामीण भागात निर्माण झालेल्या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी मदत करणे.

munotes.in

**८) विकासात्मक प्रकल्प हाती घेणे :**

ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी अनेक प्रकल्प हाती घेणे. उदा. संशोधन, विस्तार कार्य इत्यादी.

**९) राज्य सहकारी बँकांना वित्तपुरवठा :**

राज्य सहकारी बँकांना २० वर्षे मुदतीचा दीर्घमुदतीचा वित्तपुरवठा करणे हादेखील नाबार्डचा उद्देश आहे.

**१०) प्रशिक्षण सुविधांची उपलब्धता :**

विविध कार्यासाठी कार्यरत असलेल्या संस्थांना प्रशिक्षित नोकर वर्गाची गरज असते. त्यासाठी स्वतंत्र अशी प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करणे हा उद्देश आहे.

**११) पतपुरवठ्यावर नियंत्रण ठेवणे :**

ग्रामीण भागात शेती हा व्यवसाय महत्त्वाचा आहे, तसेच उपजीविकेचे साधन व अर्थव्यवस्थेचा कणा आहे. म्हणून विविध शेती पतपुरवठा संस्थाचे निरीक्षण करून त्यांच्यातील असलेल्या त्रुटी दूर करण्यास मदत करणे, समस्या निर्माण झाल्यास त्याचे समाधान करणे हा उद्देश आहे.

**१२) जिल्हा मध्यवर्ती बँकांना पतपुरवठा :**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना व या बँकांच्या नवीन विस्तारित शाखांवर नियंत्रण ठेवण्याच्या उद्देशाने नाबार्डची स्थापना केलेली आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१. नाबार्डचे उद्देश सांगा.

## ४.४ नाबार्डचे भागभांडवल आणि व्यवस्थापन

### ४.४.१ नाबार्डचे भांडवल :

नाबार्डची रिझर्व्ह बँकेशी सांगड घातलेली आहे. बँकेच्या एकूण भागभांडवलापैकी ५०% टक्के रिझर्व्ह बँकेने आणि ५०% टक्के भारत सरकारने दिले आहेत. नाबार्डचे सुरुवातीचे अधिकृत भागभांडवल ५०० कोटी रुपयांचे असून वसूल भांडवल १०० कोटी रुपयांचे होते. १९९९ मध्ये हे भांडवल २०० कोटी रुपयांपर्यंत वाढविण्यात आले. हे भांडवल पुढील मार्गांनी प्राप्त होते.

अ. भारत सरकार

ब. कृषी दीर्घकालीन निधी व स्थिरीकरण निधीतून काही रक्कम

क. रिझर्व्ह बँकेकडून अल्पकालीन व खेळते भांडवल.

ड. जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय विकास निधी.

इ. कर्जरोखे व बाँडस विक्री - अलीकडे नाबार्डच्या संसाधनात लक्षणीय वाढ झाली आहे. कारणे -

अ) व्यापारी बँकांनी ग्रामीण पायाभूत सुविधांच्या विकासासाठी उभारलेला निधी (RIDF) .....

ब) राष्ट्रीय बँकेने करमुक्त बाँडद्वारे मोठी रक्कम उभारली आहे.

क) खाजगी बँकांकडून अग्रक्रम क्षेत्रासाठी मोठ्या रकमेच्या ठेवी.

ड) बँकेच्या वसूल भांडवलातील वाढ सन २००१-०२ मध्ये नाबार्डची अधिक साधनसामग्रीतील वाढ ६२८० कोटी रुपयांची झाली आहे.

### ४.४.२ नाबार्डचे व्यवस्थापन :

नाबार्डचा कारभार १६ संचालक मंडळ पाहतो त्याची नियुक्ती पुढीलप्रमाणे होते.

१. रिझर्व्ह बँकेचा डेप्युटी गव्हर्नर हा राष्ट्रीय बँकेचा चेअरमन असतो.

२. रिझर्व्ह बँक ३ संचालक नेमते.

३. केन्द्र सरकार ३ संचालक नियुक्त करते.

४. सहकारी बँकांमधील २, व्यापारी बँकातील १ तज्ज्ञ संचालक अशी नेमणूक केली जाते.

५. ग्रामीण अर्थव्यवस्था व ग्रामीण विकास यांच्याशी संबंधित २ संचालक नियुक्त केले जातात.

६. राज्य सरकारे २ संचालक नियुक्त करते.

७. एक मॅनेजिंग डायरेक्टर असतो.

## ४.५ नाबार्डचे कार्य

राष्ट्रीय बँकेला दोन महत्त्वाची कार्ये पार पाडावी लागतात.

१) शिखर बँकेचे कार्य

२) पुनर्वित्त संस्था म्हणून कार्य - पूर्वी ही कामे रिझर्व्ह बँक करत होती. महामंडळाची सर्व कामे नाबार्डकडे सोपवण्यात आली आहेत. नाबार्डची कार्ये पुढीलप्रमाणे आहेत.

**१. पुर्नपुरवठा :**

नाबार्ड पुनर्वित्त संस्था म्हणून उत्पादन व गुंतवणुकीसाठी देशातील कृषी क्षेत्र, लघुउद्योग, कुटीर व ग्रामीण उद्योग, हस्तकला व्यवसाय, कारागीर इ. क्षेत्रांना पुर्नपुरवठा करते. यामुळे ग्रामीण विकास साधण्यासाठी उत्तेजन मिळावे हा हेतू असतो.

**२. कर्जपुरवठा :**

रिझर्व्ह बँकेने मान्यता दिलेल्या राज्य सहकारी बँका. ग्रामीण विकास बँका, भूविकास बँका आणि इतर संस्थांना नाबार्ड हा अल्प, मध्यम व दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा करते.

**३. राज्य सरकारांना दीर्घमुदतीचे कर्ज :**

राज्यातील सहकारी पतपुरवठा संस्थाचे भागभांडवल खरेदी करण्यासाठी नाबार्ड राज्य सरकारांना २० वर्षे मुदतीची कर्जे देते.

**४. कृषी व ग्रामीण संस्थांना साहाय्य :**

कृषी क्षेत्राशी व ग्रामीण भागाच्या विकासासाठी संबंधित, पण केन्द्र सरकारच्या परवानगीने असलेल्या कोणत्याही संस्थेला नाबार्ड दीर्घमुदतीचे कर्ज देते. अशा संस्थांचे भागभांडवल भागरोख विकत घेऊन त्याच्या भांडवल उभारणीस साहाय्य करण्याचे कार्य नाबार्ड करते.

**५. सहकारी संस्थांच्या कृषी व ग्रामीण विकास कार्यात समन्वय साधणे :**

देशातील कुटीरउद्योग, लघुउद्योग व इतर उद्योगाच्या विकासाच्या दृष्टीने केन्द्र सरकार, राज्य सरकार, नियोजन मंडळ व अखिल भारतीय आणि राज्य पातळीवर इतर संस्थांच्या कार्यात समन्वय साधून सुसूत्रीकरण करण्याचे कार्य नाबार्ड करते.

**६. पर्यवेक्षकाचे कार्य :**

विभागीय ग्रामीण बँक, जिल्हा सहकारी बँका, राज्य सहकारी बँक यांच्या कार्याची तपासणी करण्याचे अधिकार नाबार्डला आहे. संस्थांच्या कार्यासंबंधी सूचना करणे व मार्गदर्शन करण्याचे कार्य करते.

**७. ग्रामीण सुविधांना साहाय्य :**

ग्रामीण विभागात पतपुरवठ्याच्या दृष्टीने म्हणजेच शिखर संस्था म्हणून नाबार्ड कार्य करते, शेतीचे यांत्रिकीकरण, लघु-पाटबंधारे प्रकल्प, वृक्ष संवर्धन व इतर प्रकल्पासाठी नाबार्ड कर्जपुरवठा उपलब्ध करून देते.

**संशोधनास प्रोत्साहन निधीची स्थापना :**

कृषी क्षेत्रात अधिक संशोधन व्हावे. ग्रामीण विकासाचे प्रकल्प तयार करावेत व त्यामधून ग्रामीण विकासाला प्रोत्साहन मिळावे यासाठी आर्थिक मदत देण्यासाठी नाबार्ड संशोधन व विकास निधीची स्थापना करते.

munotes.in

## ४.६ नाबार्डची भूमिका आणि मूल्यमापन

पतपुरवठा आणि आर्थिक विकासातील नाबार्डची भूमिका पुढीलप्रमाणे-

**१) शिखर बँक :**

ग्रामीण भागातील शेती विकासासाठी लघुउद्योग विकास, कुटीर उद्योग विकास, विविध कार्यक्रम इ. साठी अर्थसाहाय्य करणे व त्यासाठी आवश्यक अंमलबजावणी करणे ही नाबार्ड सर्वात ग्रामीण विकासाशी निगडित सर्व कार्यक्रमासाठी लागणारा निधी ही एकमेव संस्था उपलब्ध करून देते.

**२) अल्प मुदतीच्या कर्जात वाढ :**

नाबार्ड स्थापन झाल्यापासून कृषी व ग्रामीण विकासाच्या योजना अधिक कार्यक्षमरीत्या राबविल्या आहेत. त्यामध्ये अल्प मुदतीच्या कर्जात वाढ करण्यात आली त्यामुळे सन-२००१-०२ मध्ये अल्प मुदतीत ८६७० कोटी रुपयांचा कर्जपुरवठा केला.

**३) २० कलमी कार्यक्रमाची अंमलबजावणी :**

२० कलमी कार्यक्रमानुसार लहान व सीमांत शेतकरी, ग्रामीण भागातील मागासलेला वर्ग, तळागाळातील लोक यांना विशेष आर्थिक मदत दिली. त्यामध्ये नाबार्डच्या स्थापनेपासून ३१ मार्च २००२ पर्यंत ७८ लाख दारिद्र्य कुटुंबाचा समावेश झाला.

**४) मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा :**

रिझर्व्ह बँकेने पूर्वी मान्य केलेल्या मध्यम मुदतीच्या कर्जपुरवठ्याच्या मर्यादा नाबार्ड आजही पाळत आहे. त्यानुसार नाबार्ड पुनर्वित्त पुरवठा करण्याचे कार्य करते.

**५) दीर्घ मुदतीचे कर्ज :**

सरकारी सोसायट्यांचे भाग खरेदी करण्याच्या दृष्टीने राज्य सरकारांना वित्तीय साहाय्य करण्याच्या हेतूने ही बँक दीर्घ मुदतीचे कर्ज देते.

सन-१९९९-२००० मध्ये यासाठी २०० कोटी रुपयांचे मध्यम व दीर्घ मुदतीचे कर्ज दिले.

**६) सहकार विकास निधीची स्थापना :**

शेतीसाठी संसदीय समितीने केलेल्या शिफारशीनुसार नाबार्डने 'सहकारी विकास निधी' ची स्थापना केली. या निधीसाठी नाबार्डला मिळालेल्या नपा◌ायाचा काही हिस्सा प्रतिवर्षी वापरला जातो.

**७) उद्देशनिहाय कर्ज वाटप :**

नाबार्ड हे विविध उद्देश समोर ठेवून पुनर्वित्त कर्जात वाढ करते. त्यामध्ये लघुसिंचन, जमीन सुधारणा, शेती यांत्रिकीकरण, पूरक व्यवसाय, जोड व्यवसाय याचा समावेश होतो. या

सर्वात अधिक कर्जवाटप हे लघुसिंचन आणि शेतीच्या यांत्रिकीकरणासाठी केला जातो. नंतर क्रमशः इतर व्यवसायाला आर्थिक मदत करतात.

**८) ग्रामीण पायाभूत सुविधासाठी साहाय्य :**

नाबार्डने राज्य सरकारांनी पायाभूत सुविधांचे जे प्रकल्प कार्यरत केले आहेत. त्यांना कर्ज पुरवठा करण्याचे धोरण स्वीकारले आहे. त्यामध्ये जलसिंचन प्रकल्प, रस्ते, पूल, पूर नियंत्रण योजना, पाणी व्यवस्थापन इ. चा समावेश होतो. या ग्रामीण पायाभूत सुविधासाठी नाबार्ड केंद्र सरकारच्या मदतीने आर्थिक मदत करत असते.

**९) मागासलेल्या भागाचा विकास :**

ज्या भागात शेतीचा विकास कमी झालेला आहे. अशा राज्यातील कृषी क्षेत्रात गुंतवणूक वाढविण्याकडे विशेष लक्ष देते. ५०% वित्तपुरवठा मागास राज्यांना केला जातो. त्याचा फायदा मोठ्या प्रमाणावर झालेला आहे.

**१०) बिगर कृषीक्षेत्राला मदत :**

नाबार्ड बिगर कृषी क्षेत्राला मदत करत असते. लघुउद्योग, कुटीरउद्योग, सहकारी साखर कारखाने, सूतगिरण्या व अन्य औद्योगिक संस्थांना वितपुरवठा केला जातो.

**११) व्यावसायिक कार्यक्षमतेसाठी प्रयत्न :**

प्राथमिक कृषी व ग्रामीण विकास बँका राज्यकृषी व ग्रामीण विकास बँकाच्या संघटनात व्यवस्थापकीय कार्यक्षमता सुधारण्याचा प्रयत्न केला जातो.

**१२) पर्यवेक्षण :**

राज्य सहकारी बँका, मध्यवती बँका इ. रिझर्व्ह बँकांच्या नियंत्रणाखाली असल्या तरी त्याच्या पर्यवेक्षणाची जबाबदारी ही नाबार्डवर सोपवलेली आहे. यासाठी नाबार्डने एक पर्यवेक्षण मंडळाची स्थापना केली आहे. नाबार्डने २००१-०२ पर्यंत १७ राज्य सहकारी बँका व १८४ मध्यवर्ती सहकारी बँकांचे कायदेशीर निरीक्षण केले आहे.

**नाबार्डच्या कार्याचे मूल्यमापन :**

खुस्रो समितीकडे नाबार्डचे कार्य सोपविले असून समितीच्या मते नाबार्डने पुर्नर्विकासाचे कार्य चांगले पार पाडले नाही. शेती व लघु-कुटिरोद्योगांच्या साहाय्याने ग्रामीण भागाचा विकास झाला. पण नाबार्डबाबत काही दोषही दाखविले आहेत.

१) नाबार्ड विविध राज्यांतील सहकारी व्यवस्थापनावर पूर्ण नियंत्रण ठेवण्यात समर्थपणे कार्य करू शकली नाही.

२) अनेक घटक राज्यांत वित्तीय शिस्त निर्माण करण्यात नाबार्ड अयशस्वी ठरली.

३) सहकारी बँकांची थकबाकी कमी करण्यासाठी नाबार्ड अपयशी ठरली.

munotes.in

४) नाबार्डला देशात सर्वत्र निरोगी पतपुरवठा करण्यात यश प्राप्त झाले नाही.

५) अपुऱ्या साधनसामग्रीच्या कमतरतेमुळे योग्य विकास साधता आला नाही.

६) काही राज्यांमध्ये नाबार्डने चांगले कार्य केले असले तरी दुर्लक्षित राज्यांमुळे प्रादेशिक असमतोल निर्माण झालेला दिसून येतो.

७) रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया व सरकारच्या नियंत्रणामुळे नाबार्डच्या कार्यक्षमतेत बाधा निर्माण होते.

८) सर्व प्रकारच्या वित्तपुरवठा करणाऱ्या संस्थांमध्ये योग्य प्रकारचा समन्वय नाबार्डला साधता आला नाही. त्यांचे योग्य सहकार्य मिळत नसल्याने नाबार्डची कार्यक्षमता कमी होते.

९) शेतमालाच्या अनियमित पुरवठ्यामुळे शेतकऱ्याला व शेती व्यवसायाला अनिष्ट परिणाम सोसावे लागतात. त्यावर नाबार्डला उपाययोजना करता आली नाही.

१०) ग्रामीण भागातील व कृषी व्यवसायातील समस्या सोडविण्यात नाबार्ड अपेक्षित यश प्राप्त करू शकली नाही.

## ४.७ स्वाध्याय

१) नाबार्ड स्थापनेमागचे उद्देश स्पष्ट करा.

२) नाबार्डचे भागभांडवल व व्यवस्थापनाची चर्चा करा.

३) नाबार्डची कार्ये स्पष्ट करा.

४) 'नाबार्ड ग्रामीण विकासात महत्त्वाची भूमिका बजावते' चर्चा करा.

❖❖❖❖

munotes.in

# ५

# प्रादेशिक ग्रामीण बँका
# (REGIONAL RURAL BANKS)

**घटक रचना :**

५.० पाठाचे उद्देश

५.१ प्रास्ताविक

५.२ प्रादेशिक ग्रामीण बँकांचे उद्देश

५.३ प्रादेशिक ग्रामीण बँकांचे स्वरूप

५.४ प्रादेशिक ग्रामीण बँकांची कार्ये

५.५ प्रादेशिक ग्रामीण बँकांची प्रगती

५.६ प्रादेशिक ग्रामीण बँकांच्या समस्या

५.७ स्वाध्याय

## ५.० पाठाचे उद्देश

१. प्रादेशिक ग्रामीण बँकेच्या स्थापनेचा उद्देश अभ्यासणे.

२. प्रादेशिक ग्रामीण बँकेचे स्वरूप आणि कार्ये समजावून घेणे.

३. प्रादेशिक ग्रामीण बँकेची प्रगती तपासणे.

४. प्रादेशिक ग्रामीण बँकेच्या समस्या अभ्यासणे.

## ५.१ प्रास्ताविक

शेती व्यवसायाच्या विकासासाठी स्वातंत्र्योत्तर काळात अनेक योजना राबविल्या गेल्या. शेती वित्तपुरवठ्याची गरज भागविण्यासाठी अनेक मार्गांनी प्रयत्न केले. त्यापैकी एक मार्ग म्हणजे रिझर्व्ह बँकेमार्फत होणाऱ्या सहकारी पतपुरवठ्याची यंत्रणा अमलात आणली गेली. परंतु दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून शेतीच्या आधुनिकीकरणाचा वेग वाढू लागला व त्याचबरोबर निर्माण होणाऱ्या पतपुरवठ्याच्या गरजा पूर्ण करण्यामध्ये सरकारी क्षेत्राला अपयश आले. पुन्हा १९६१ पासून शेती उत्पादन वाढीचे प्रयत्न वेगाने सुरू झाले आणि व्यापारी बँका कार्य करू लागल्या. परंतु शेती क्षेत्राची, वित्तपुरवठ्याची गरज पूर्णपणे त्या बँका भागवू शकल्या नाहीत. पुढे अग्रणी बँक योजना १९६९ पासून सुरू करण्यात आली. व्यापारी बँकांनी नेमून दिलेल्या क्षेत्राला कर्जपुरवठा करावा. हा त्यामागील उद्देश होता. परंतु

munotes.in

शेतकरी अल्पभूधारक, ग्रामीण कारागीर, कमकुवत वर्ग यांना फारसा फायदा झाला नाही. म्हणून सर्व ग्रामीण पतपुरवठ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी १९६९ च्या बँकिंग आयोगाने ग्रामीण भागाच्या बँकांची साखळी केली. त्यासाठी तीन मार्ग सुचविले. प्राथमिक सहकारी बँकेचे ग्रामीण बँकेत रूपांतर करण्यात आले, व्यापारी बँकांच्या उपशाखा ग्रामीण बँका म्हणून स्थापन करण्यात याव्या. व्यापारी बँकांनीच विशेष प्रकारच्या ग्रामीण बँका म्हणून निर्मिती करावी. याचा सातत्याने विचार करून ग्रामीण भागात प्राथमिक संस्था नव्याने सुरू होणाऱ्या क्षेत्रीय ग्रामीण बँका असा आकृतिबंध अमलात आणण्याचे ठरले.




https://marathivishwakosh.org

प्रादेशिक ग्रामीण बँकेची स्थापना भारताच्या सहाव्या पंचवार्षिक योजनेत सर्वप्रथम मांडण्यात आली. सहाव्या पंचवार्षिक योजनेचा महत्त्वाचा उद्देश म्हणजे ग्रामीण विभागाचा जास्तीत जास्त विकास साधणे, दारिद्र्याचे निर्मूलन करणे, बेकारीचे प्रमाण कमी करणे, तसेच सुरक्षितता व उत्पादकता वाढविणे, असे अनेक उद्देश सहाव्या पंचवार्षिक योजनेत होते. ग्रामीण बँका सुरू करण्याचे कार्य व्यापारी बँकांवर सोपविण्यात आले. १९७२ मध्ये बँकिंग कमिशन नियुक्त करण्यात आले. या समितीने ग्रामीण बँकांची स्थापना करणे अत्यंत आवश्यक आहे, अशी शिफारस केली. त्यासाठी सखोल अभ्यास करण्यासाठी १ जुलै १९७५ साली एम. नरसिंह यांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यासगट नियुक्त करण्यात आला. या गटाने ३० जुलै १९७५ रोजी प्रादेशिक ग्रामीण बँकांविषयी सविस्तर आढावा शासनाला सादर केला. शासनाने तो स्वीकारून २६ सप्टेंबर १९७६ मध्ये केंद्र सरकारकडून प्रादेशिक ग्रामीण बँकांची स्थापना करण्यात आली. ग्रामीण भागातील जनता शहरी विभागाकडे धावू लागल्याने विविध समस्या उद्भवू लागल्या. ग्रामीण विभागात शेतीबरोबर विविध कारागीर, अल्पभूधारक शेतमजूर अशा अनेक व्यावसायिक वर्गाला भांडवलाअभावी स्वतःच्या व्यवसायात प्रगती साधता येत नाही. प्राथमिक पतपुरवठा संस्था तारणाशिवाय कर्ज देण्यास तयार नसतात. पण त्यांच्याकडे कौशल्य व शारीरिक कष्ट असतील अशांना भांडवलांची नितांत आवश्यकता असते. ती पुरविण्याची जबाबदारी प्रादेशिक ग्रामीण बँकांनी घेतली आहे.

## ५.२ प्रादेशिक ग्रामीण बँकेचे उद्देश

प्रादेशिक ग्रामीण बँकेचा मुख्य उद्देश असा होता, की लहान व सीमांत शेतकऱ्यांना शेतमजूर व लहान कारागीर, लहान उद्योगांना पतपुरवठा व इतर सोयी उपलब्ध करून देणे. ग्रामीण क्षेत्रात शेती, व्यापार, उद्योग आणि दळणवळण इत्यादी उत्पादक कार्यक्रमांचा विकास व्हावा म्हणून २ ऑक्टोबर १९७५ मध्ये पहिली ५ क्षेत्रीय बँकेची स्थापना झाली. उत्तर प्रदेशात मोरादाबाद, गोरखपूर, हरियाणातील भिवानी, राजस्थानात जयपूर व पश्चिम बंगालमध्ये माल्डा येथे स्थापन करण्यात आल्या. सिंडिकेट बँक, भारतीय स्टेट बँक, पंजाब नॅशनल बँक, युनायटेट कमर्शियल बँक व युनायटेट बँक या बँकांनी त्यांना पुरस्कृत केले होते. कारण भारत सरकारने त्या नवीन आर्थिक कार्यक्रमामध्ये त्यांचा पाठपुरवठा करण्याचे ठरविले होते.

**प्रादेशिक ग्रामीण बँकेचे उद्देश :**

**१) ग्रामीण भागातील कर्जबाजारीपणा कमी करणे :**

ग्रामीण भागातील लोकांना मोठ्या प्रमाणात असंस्थात्मक मार्गाने कर्ज घ्यावे लागले त्यावर व्याज अधिक प्रमाणात असल्याने गरिबांची पिळवणूक होते. काही वेळा कर्जबाजारी झालेले शेतकरी आत्महत्या करतात. म्हणून ग्रामीण प्रादेशिक बँका ग्रामीण क्षेत्रातील कर्जबाजारीपणा कमी करणे हा उद्देश साध्य करण्याचा प्रयत्न करते.

**२) शेतकरी, शेतमजूर, लहान उद्योगांना पतपुरवठा :**

भारतातील ग्रामीण भागातील लहान व सीमांत शेतकरी, शेतमजूर, तसेच ग्रामीण भागातील कृषी विकास करण्यासाठी पतपुरवठा करणे.

**३) ठेवीतून विकासात्मक कार्य करणे :**

विस्तार कार्यक्रम व विकास प्रकल्प राबविण्यासाठी ग्रामीण क्षेत्रातून ठेवी जमा करून त्या तेथेच विकासासाठी खर्च करणे.

**४) सर्वांगीण विकास :**

ग्रामीण भागातील फक्त एकाच विभागाचा विकास करणे एवढ्याच पुरते मर्यादित न राहता ग्रामीण भागातील संपूर्ण क्षेत्राचा विकास करणे हे प्रादेशिक ग्रामीण बँकांचे उद्देश आहेत.

**५) सावकारी पद्धत नष्ट :**

ग्रामीण भागात कर्ज देणारा सावकार हा महत्त्वाचा घटक असतो. कर्ज देणे हा त्याचा मुख्य व्यवसाय असतो. तो घेतलेल्या कर्जावर अधिक प्रमाणात व्याज आकारत असतो. कर्जदार पिढ्यान् पिढ्या हे कर्ज फेडत असतो. काही वेळा संपूर्ण जमीन विकली जाते, परंतु कर्जाची परतफेड होत नाही. अशा वेळी शेतकरी आत्महत्या करतो. म्हणून ही पद्धत नष्ट करणे आवश्यक आहे.

**६) उत्पादक कार्यक्रमाचा विकास :**

ग्रामीण भागातील शेती, व्यापार उद्योग, दळणवळण इत्यादींचा विकास करणे, ग्रामीण क्षेत्रातील आर्थिक आणि सामाजिक परिवर्तन घडवून आणणे, तसेच उत्पादकाची उत्पादकता वाढवणे. त्याला आर्थिक मदत, प्रशिक्षक देणे व त्यांचा विकास घडून आणणे.

**७) शाखा विस्तार करणे :**

ग्रामीण बँका, व्यापारी बँकांसारखे बँकिंग जाळे सुरू करणे. तसेच ठेवी स्वीकारणे, बँकिंग सेवा उपलब्ध करून देणे म्हणजे ग्रामीण क्षेत्रात बँकांच्या शाखेचा विस्तार घडवून आणणे.

**८) विविध संस्थांना पतपुरवठा :**

शेती विकासासाठी असलेल्या सहकारी संस्था, शेतमाल प्रक्रिया, शेती-माल साठवण संस्था, विपणन संस्था इत्यादींना पतपुरवठा मंजूर करून त्यांचा विकास करणे हे महत्त्वाचे उद्देश प्रादेशिक ग्रामीण बँकेचे आहेत.

**९) शेतीवर आधारित व पूरक व्यवसायाला चालना :**

ग्रामीण भागातील शेती हा महत्त्वाचा व्यवसाय आहे. शेती ही हंगामी स्वरूपाची असल्यामुळे इतर काळात व्यवसाय किंवा उपजीविकेचे साधन म्हणून शेतीवर आधारित किंवा पूरक व्यवसाय करण्यासाठी प्रादेशिक बँका मदत करते.

**१०) आर्थिक विकास करणे :**

ग्रामीण क्षेत्रातील दुर्बल आर्थिकदृष्ट्या कमकुवत लोकांसाठी, त्यांच्या उन्नतीकरिता खास पतपुरवठा करण्याची योजना करणे, तसेच व्यावसायिक उद्दिष्टे आणि सामाजिक कर्तव्ये यांचा योग्य प्रकारे समन्वय साधण्याचा प्रयत्न करणे हेदेखील प्रादेशिक ग्रामीण बँकांचे उद्देश आहेत.

## ५.३ प्रादेशिक ग्रामीण बँकेचे स्वरूप

मध्यवर्ती बँकिंग समितीसारख्या तज्ज्ञ मंडळींचे मत आहे, की शेतकऱ्यांच्या दीर्घकालीन कर्जाच्या गरजा, सुरक्षितपणे व यशस्वीपणे भू-विकास बँका करू शकते. शेतकऱ्यांच्या दीर्घकालीन वित्तीय गरजा अनेक तर्हेच्या असतात. त्या वित्तीय गरजा पूर्ण करण्यासाठी प्रादेशिक ग्रामीण बँक कार्यरत केलेली असते. ग्रामीण भागाचा विकास, आर्थिक उत्पन्न, सामाजिक दर्जा उंचावणे. हे त्यांचे उद्देश आहेत. प्रादेशिक ग्रामीण बँकेचे स्वरूप पुढीलप्रमाणे-

**१) मर्यादित क्षेत्र :**

प्रादेशिक ग्रामीण बँका या ग्रामीण भागातच मर्यादित असतात. एका राज्यात किंवा काही जिल्हे मिळून एका प्रादेशिक ग्रामीण बँकेची स्थापना केलेली असते. त्यांच्यावर एकत्र अशी मध्यवर्ती प्रादेशिक बँक असते. त्यांना अधिसूचित क्षेत्रातच कार्य करावे लागते.

munotes.in

**२) सीमांत शेतकरी, कारागीर, मजूर यांना प्रत्यक्ष पतपुरवठा करणे :**

ग्रामीण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात शेतकरी, कारागीर, शेतमजूर हा वर्ग अस्तित्वात असतो. म्हणून त्यांचा विकास करण्यासाठी ग्रामीण पातळीवर ही बँक स्थापन केली गेली. प्रादेशिक ग्रामीण बँका या विकासाला चालना देण्यासाठी आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्यासाठी ग्रामीण भागात पतपुरवठा करतात.

**३) व्याजदर कमी :**

प्रादेशिक ग्रामीण बँकेचे व्याजदर संबंधित राज्यातील प्राथमिक सहकारी संस्थांच्या व्याजदरापेक्षा अधिक असते असे नाही कारण ग्रामीण भागातील कर्ज हे शेती विकासासाठी व त्यांच्या पूरक व्यवसायासाठी होत असतात आणि कर्ज दीर्घकालीन असल्यामुळे व्याजदर कमी असल्यास परतफेड करण्यासाठी अधिक त्रास होत नाही.

**४) आर्थिक मदत उपलब्ध :**

पुरस्कर्ती व रिझर्व्ह बँक या सवलतीच्या दराने प्रादेशिक ग्रामीण बँकांना अनेक आर्थिक मदत उपलब्ध करून देते आणि ग्रामीण भागाचा विकास घडून यावा यासाठी प्रादेशिक ग्रामीण बँकांना नेहमी सहकार्य करत असते.

**प्रादेशिक ग्रामीण बँकेचे भांडवल :**

व्यापारी बँक ही प्रादेशिक ग्रामीण बँकेचे भागभांडवल खरेदी करते. कर्मचाऱ्यांची निवड आणि त्यांचे प्रशिक्षण यामध्ये व्यापारी बँकेकडून मदत केली जाते. ग्रामीण बँकेचे अधिकृत भांडवल रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया व संलग्न बँकेच्या साहाय्याने कमी-जास्त करता येते. विशेषतः अधिकृत भांडवलाची रक्कम २५ लाखांपर्यंत कमी करता येईल किंवा वाढविता येईल. तसेच प्रत्येक प्राथमिक बँकेचे वसुली भांडवल २५ लाख असले पहिजे. त्यापैकी ५०% केंद्र शासनाकडून, १५% संबंधित राज्य शासनाकडून, ३२% संघटित बँकेकडून वसूल केले पाहिजे. रिझर्व्ह बँक केंद्र सरकार संबंधित व्यापारी बँक यांच्या सल्ल्याने विक्रीस काढल्यास भागभांडवलांची मर्यादा वाढविता येते.

## ५.४ प्रादेशिक ग्रामीण बँकेची कार्ये

सन १९४९ च्या बँकिंग नियमन कायद्याचा भाग ५ (ब) नुसार क्षेत्रीय ग्रामीण बँकांना पुढील कार्ये करावी लागतात.

१) ग्रामीण भागातील लहान व सीमांत, शेतकरी, शेतमजूर यांना वैयक्तिक अगर त्यांच्या गटास कर्ज आणि अग्रिमे देणे यामध्ये शेती बाजार, समित्या, प्राथमिक पतपुरवठा संस्था अगर शेतकरी सेवा संस्था यांचा समावेश होतो. ही कर्जे शेती करण्यासाठी वा शेती व्यवसायासाठी दिली जातात.

२) कार्यक्षेत्रातील कारागीर, लहान उद्योजक, लहान प्रमाणातील व्यापार, दळणवळण, इत्यादी व्यवसायातील लोकांना कर्ज व अग्रिमे दिली जातात. ते व्यवसाय उत्पादक असावेत.

३) अनुसूचित जाती व जमातीच्या गरजा पाहून त्यानुसार खास पतपुरवठ्याच्या योजना आखणे, स्वयंरोजगार व त्यांच्या विकासासाठी प्रयत्न करणे.

४) कार्यक्षेत्रातील दुर्बल व आर्थिकदृष्ट्या कमकुवत लोकांसाठी, त्यांच्या आर्थिक उन्नतीकरिता खास पतपुरवठ्याच्या योजना आखणे. त्यांचा आर्थिक विकास साधणे.

५) ग्रामीण बँका, व्यापारी बँकांसारखी बँकिंग कार्यही करू शकतात. ठेवी स्वीकारणे, इतर सेवा उपलब्ध करून देणे.

६) ग्रामीण क्षेत्रातील बचत गोळा करून त्याच क्षेत्राच्या विकासासाठी उपयोग करणे.

## ५.५ प्रादेशिक ग्रामीण बँकांची प्रगती

**१) ग्रामीण बँकांचा व शाखांचा विस्तार :-**

३० जून, १९७९ मध्ये क्षेत्रीय ग्रामीण बँकांची संख्या ५६ होती व कार्यालयाची संख्या १९९० होती. सध्या १९६ बँका १४,५०० शाखांसह कार्यरत आहेत. सर्वाधिक शाखा ३००० उत्तर प्रदेशात आहेत. ९० टक्के शाखा बँकांच्या सोयी नव्हत्या. तेथे उघडल्या गेल्या आहेत. ९२ टक्के शाखा ग्रामीण भागात आहेत. २३ राज्यांत या बँका कार्यरत आहेत.

**२) कार्यक्षेत्र व पुरस्कृत बँकांच्या संख्येत वाढ :-**

१९७९ मध्ये क्षेत्रीय ग्रामीण बँकांचे कार्यक्षेत्र २३ राज्ये होती. जिल्ह्यांची संख्या १०२ होती. सध्या ती ४३६ जिल्ह्यांत कार्यरत आहे.

**३) कर्जपुरवठा :-**

विभागीय ग्रामीण बँकांनी कर्जपुरवठ्यात चांगले कार्य केले आहे. सन १९८४ अखेर क्षेत्रीय बँकांनी सर्व प्रकारच्या कर्जपुरवठा १०४८.३ कोटी रुपयांचा केला होता. तो २००१ मध्ये साधारणतः १५,५७९ कोटी रुपये व २००१-०२ मध्ये १८५७० कोटी रुपयांवर गेला आहे. साधारणतः ९५... कर्जपुरवठा समाजातील दुर्बल व्यक्तींना करण्यात आला आहे.

**४) ठेवीमध्ये वाढ :-**

डिसेंबर, १९७५ मध्ये ग्रामीण बँकांकडे फक्त २० लाख रुपयांच्या ठेवी होत्या. नंतर त्या १४,२०० कोटी रुपये झाल्या. त्या २००१-०२ मध्ये ४३,२२० कोटी रुपये होत्या. यापैकी १३ टक्के ठेवी बँकांनी स्वतः प्रयत्नांनी जमविल्या आहेत.

**५) नफ्यात वाढ :-**

अलीकडे विभागीय ग्रामीण बँकांच्या कार्यक्षमतेत वाढ होत आहे. सन २०००-०१ मध्ये १७० विभागीय बँकांना ७९० कोटी रुपये नफा झाला, तर सन २००१-०२ मध्ये १६७ बँकांना ८३८ कोटी रुपये नफा झाला. १९६ बँकांना निव्वळ नफा ६०८ कोटी रुपये झाला.

**६) एकात्मिक ग्रामीण विकास योजनेखाली कर्ज :-**

ग्रामीण भागात या बँकांनी संस्थात्मक कर्जपुरवठा केल्याने सावकारांचे पूरक म्हणून कार्य केले. २० कलमी कार्यक्रमात महत्त्वाची भूमिका पार पाडली. मागास जाती-जमातीच्या

munotes.in

आर्थिक विकासात योग्य कार्य दुर्बल घटकांना कमी व्याजाने पतपुरवठा केला. शारीरिकदृष्ट्या अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयव, चाकाची खुर्ची इत्यादी विकत घेण्यास कमाल २५०० रुपयांचे कर्ज देते.

**७) लहान व्यक्तींच्या बँका :-**

या बँकांनी लहान व्यक्तीच्या बँका म्हणून आपली प्रतिमा उजळली आहे. सीमांत व लहान शेतकरी शेतमजूर, कारागीर यांना उत्पादक कार्यासाठी पतपुरवठा केला आहे. ग्रामीण भारताचा विकास करण्यात ती यशस्वी झाली.

## ५.६ प्रादेशिक ग्रामीण बँकेच्या समस्या

**१) संघटनात्मक समस्या :-**

ग्रामीण बँकांना संघटनात्मक समस्याला तोंड द्यावे लागते. भांडवल उभारताना अनेक अडचणी येतात. पुरस्कृत बँका व राज्य सरकारचे योग्य साहाय्य मिळत नाही. प्रादेशिक बँकेना संकुचित क्षेत्रात कार्य करावे लागते. अनियोजित व सरकारच्या दबावाने अतिविस्तारामुळे संघटनात्मक समस्या निर्माण होतात.

**२) कर्मचारी समस्या :-**

या बँकांच्या कर्मचाऱ्यांना पुरेसे व योग्य प्रशिक्षण मिळत नाही त्यामुळे तज्ज्ञ व कुशल कर्मचारी प्राप्त होत नाहीत. पुरस्कृत बँकेकडील अधिकारी हा कामाशी समरस नसतो. उदासीन वृत्ती असते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात समस्या निर्माण होते.



https://maharashtratimes.com

**३) वसुलीची समस्या :-**

दोषपूर्ण कर्जाचे धोरण. कमकुवत देखरेखीचे धोरण, वसुलीसंबंधी उदासीनता, विकासासाठी कर्जाचा संबंध, जोडण्यातील अपयश, राजकीय हस्तक्षेप इत्यादी अनेक कारणांनी कर्जवसुलीची गंभीर समस्या बनली आहे. पण हळूहळू नपोयात वाढ होत आहे. सन २००१-०२ मध्ये १९६ पैकी २९ बँकांना फक्त ९२.०५ कोटी रुपये तोटा झाला होता.

**४) बँकांना प्रचंड नुकसान :-**

दुर्बल घटकांना जरी कमी व्याजाने कर्ज दिले तरी ते वसूल होत नाही. फायदा कमी आणि सेवेचा खर्च वाढतो. यामुळे बँकेचे नुकसान होते. शाखेच्या विस्ताराचा खर्च वाढतो. परंतु

नफा मिळत नाही. म्हणून अनेक ठिकाणी आर्थिक परिस्थिती बँकेसाठी अयोग्य असते. बँका ह्या तोट्यात जातात.

**५) व्यवस्थापकीय समस्या :-**

पुरस्कर्त्या बँका व्यवस्थापक प्रतिनिधी नियुक्त करतात. नवीन वातावरणात असे कर्मचारी स्वतंत्र निर्णय घेऊ शकत नाहीत. संचालकाच्या बैठका नियमित होत नाहीत. बँकेच्या कामात एकवाक्यता नसते. अनेक मध्यस्थांचे नियंत्रण असल्याने व्यवस्थापकीय कार्य कुशलतेने करण्यात अडचणी येतात.

**६) असमान विकास :-**

भारतातील सर्व राज्यांत बँकांचा समान विकास झालेला नाही. काही राज्यांत अधिक, तर काही राज्यांत नगण्य आहे. त्यामुळे बँकांचा विकास हा असमान झालेला आढळतो.

**७) मंद प्रगती :-**

या बँकांची प्रगती ही अत्यंत मंद गतीने होते. इतर बँकांच्या प्रगतीशी तुलना करताना ती खूपच मंद गतीने होते. कारण त्यांच्या कार्यावर अनेक नियंत्रण असतात. फक्त अग्रक्रम असलेल्या क्षेत्रालाच पतपुरवठा होतो.

**८) समन्वयाचा अभाव :-**

पुरस्कृत बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँका यांच्यामध्ये समन्वयाचा अभाव असतो. उदा- शाखा विस्तार, धोरण ठरविणे इत्यादी महत्त्वाच्या कारणाने त्यांची प्रगती मंदावली आहे.

**९) इतर समस्या :-**

भांडवलाचा अपुरा पुरवठा, कर्ज वसुलीचा दर अत्यंत कमी, बँका ठेवी गोळा करण्यात अपयशी, गुंतवणूक करण्यात मर्यादित क्षेत्र, निर्णय प्रक्रिया, वेळखाऊ इत्यादी कारणांमुळे प्रादेशिक ग्रामीण बँकेच्या विकासात अडचणी येतात.

परिणामतः अशा अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते आणि विकासात्मक कार्य मंदगतीने चालते.

## ५.७ स्वाध्याय

१) प्रादेशिक ग्रामीण बँकांची उद्दिष्टे आणि स्वरूप स्पष्ट करा.

२) प्रादेशिक ग्रामीण बँकांच्या कार्याचा आढावा घ्या.

३) प्रादेशिक ग्रामीण बँकांची प्रगती सांगून त्यांच्या समस्यांचा आढावा घ्या.

❖❖❖❖

munotes.in

# ६

# सहकारी वित्तपुरवठा संस्था

**घटक रचना :**

६.१ पाठाची उद्दिष्टे

६.२ प्रस्तावना

६.३ संकल्पना

६.४ सहकारी वित्तपुरवठ्याची रचना

६.५ सहकारी वित्तपुरवठ्याची गरज

६.६ प्राथ. सह. वित्तपुरवठा संस्था

६.७ जिल्हा सह. बँक

६.८ राज्य सह. बँक

६.९ सहकारी वित्तपुरवठ्याचे यश-अपयश

६.१० स्वाध्याय

## ६.१ पाठाची उद्दिष्टे

१) सहकारी वित्तपुरवठा ही संकल्पना अभ्यासणे.

२) ग्रामीण भागातील सहकारी वित्तपुरवठ्याच्या गरजेचा अभ्यास करणे.

३) ग्रामीण भागामध्ये सहकारी वित्तपुरवठ्याच्या होणाऱ्या फायद्याचा अभ्यास करणे.

४) सहकारी वित्तपुरवठ्याच्या रचनेचा अभ्यास करणे.

५) प्राथ. सहकारी वित्तपुरवठा संस्थेचा अभ्यास करणे.

६) जिल्हा सहकारी वित्तपुरवठा संस्थेचा अभ्यास करणे.

७) राज्य सहकारी बँकेचा अभ्यास करणे.

८) भू-विकास सह बँकेचा अभ्यास करणे.

९) सहकारी वित्तपुरवठ्याच्या यश-अपयशाचा अभ्यास करणे.

munotes.in

## ६.२ प्रस्तावना

भारत देश खेड्यांचा बनलेला आहे. जोपर्यंत ह्या खेड्यांचा विकास होत नाही तोपर्यंत आपल्या देशाचा विकास होणार नाही. ह्या ग्रामीण भागाचा विकास प्रामुख्याने शेती, शेतीपूरक व्यवसाय, ग्रामीण उद्योग, ग्रामीण प्रक्रिया उद्योग ह्यावरच अवलंबून आहे. म्हणूनच ह्या ग्रामीण भागाच्या विकासासाठी ग्रामीण वित्तपुरवठ्याची गरज आहे. ग्रामीण भागातील शेती व उद्योगांसमोर अनेक समस्या आहेत या अनेक समस्यांपैकी अपुरा भांडवल पुरवठा ही एक प्रमुख समस्या आहे. कारण शेतकरी व या उद्योजक यांना शेती व उद्योगातून मिळणारे उत्पादन अगदीच अपुरे असल्याने त्यांना त्याच्या व्यवसायासाठी भांडवल उभारणी करणे शक्य होत नाही. व्यापारी बँका शेती व ग्रामीण उद्योगासाठी कर्जपुरवठा करण्यास नाखूष दिसून येतात, तर सावकारी कर्ज हे शेतकरी व ग्रामीण उद्योजकांची पिळवणूक करणारे असते. अशा वेळी शेती व ग्रामीण उद्योगांस कर्जपुरवठ्याची स्वतंत्र व्यवस्था असणे गरजेचे होते. ग्रामीण भागातील ही कर्जाची गरज लक्षात घेऊन १९०४ च्या सहकारी कायद्याने ग्रामीण भागात सहकारी पतपुरवठा सुरू करण्याचे ठरविण्यात आले.



शेतकरी व ग्रामीण उद्योजक यांना त्यांच्या व्यवसायासाठी भांडवलपुरवठ्याची गरज भागविणे व ग्रामीण भागातील ह्या वर्गाला बचतीची सवय लावणे हे प्रमुख हेतू लक्षात घेऊन सहकारी पतपुरवठ्याची रचना करण्यात आली. ग्रामीण भागामध्ये प्रामुख्याने अल्प, मध्यम आणि दीर्घ मुदत कर्जपुरवठ्याची गरज असते. त्यामुळे सहकारी पतपुरवठ्याची विभागणी करताना अल्प आणि मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा करणाऱ्या संख्या आणि दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा करणाऱ्या संख्या अशी केलेली पाहावयास मिळते.

## ६.३ संकल्पना

भारत देशाचा विचार करता ग्रामीण भाग व शहरी भाग अशा पद्धतीने आपण विकासाचा विचार करणे गरजेचे झाले आहे. ग्रामीण भागाचा विचार करता ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था ही आज मागास असलेली पाहावयास मिळते. या अर्थव्यवस्थेचा पाया म्हणजे शेती व ग्रामीण लघुउद्योग, व्यवसाय होय. तर शहरी भागाचा विचार करताना औद्योगिकीकरण आय.टी., इ. अर्थव्यवस्था विचार होताना पाहावयास मिळतो.

ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विचार करता स्वातंत्र्यपूर्व काळात ही अर्थव्यवस्था मागास होती. इंग्रज भारतात आले त्यांनी आपल्या देशातून जेवढे पिळून नेता येईल तेवढे नेले. इथल्या जमीन व्यवस्थेवर ताबा मिळवून ग्रामीण अर्थव्यवस्था खिळखिळी झाली.

स्वातंत्र्यपूर्वकाळामध्ये ग्रामीण भागात राहणारा वर्ग व त्यातील शेती व ग्रामीण लघुउद्योगावर जगणारा बहुतांश वर्ग होता. ह्या वर्गातील बराच वर्ग दारिद्र्य व गरिबीत दिवस जगणारा होता. ह्या वर्गाचा विकास होण्यासाठी त्यांना प्रमुख गरज होती ती म्हणजे शेती व ग्रामीण उद्योगाच्या विकासासाठी वित्तपुरवठ्याची. मात्र त्या वेळी कोणतीही बँक व्यवस्था शेती व ग्रामीण उद्योगांना कर्जपुरवठा करण्यास तयार नव्हती. कारण शेती हा हातभट्टीचा व्यवहार समजला जात होता.

अशा वेळी सावकार व तत्सम बिगर संस्थात्मक घटक हे शेतकऱ्याचे आधार होते. हे घटक शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करत होते. त्याचबरोबर व्याजदर व इतर विविध कारणांनी शेतकऱ्यांची लूटही करत होते. मात्र शेतकऱ्याला दुसरा पर्याय नव्हता.

याच कालावधीत शासनकर्त्यांना लक्षात आले की, आपल्या देशातील शेतकरी म्हणजेच शेती जोपर्यंत विकसित होत नाही तोपर्यंत ग्रामीण भागाचा विकास होणार नाही. यासाठी 'सहकार' हेच प्रभावी माध्यम ठरू शकेल. आपण जोपर्यंत सहकाराचा अवलंब करणार नाही तोपर्यंत शेतकऱ्यांचा विकास होणार नाही. यातूनच शेतकरी व ग्रामीण उद्योजक व कारागीर ह्या घटकांनी सहकारी तत्त्वावर एकत्र येऊन आपल्याला लागणाऱ्या कर्जाची व्यवस्था त्यांनी स्वत: करावी, यासाठी शासनाने या सहकारी तत्त्वाला सहकार्य करावे व यातूनच शेतकरी ग्रामीण उद्योजक, कारागीर यांच्या वित्तपुरवठा व तत्सम गरजा पूर्ण केल्या जाव्यात. त्यानुसार सरकारने सन १९०४ साली सहकारी पतपुरवठा संस्था कायदा पास केला. त्यानंतर १९१४ च्या मॅक्लगन समितीने राज्य सहकारी बँकेसारख्या शिखर बँकांची गरज राज्याराज्यातून असल्याचे सांगून त्यांची स्थापना करण्यासंदर्भात शिफारस केली होती. भारतीय राज्य घटनेत 'सहकार' हा विषय राज्यांच्या अखत्यारीत येत असल्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात प्रत्येक राज्य सरकारने सहकारी संस्थाविषयक कायदा संमत करून तो अमलात आणला. महाराष्ट्र सरकारने १९६० साली सहकारी संस्थाविषयक कायदा संमत केला व त्यानुसार जिल्हा सहकारी बँक व राज्य सहकारी बँक अस्तित्वात आली.

सहकाराच्या पायावर उभ्या राहणाऱ्या या सहकारी पतपुरवठ्याला सहकारी वित्तपुरवठ्याची त्रिस्तरीय रचना असे संबोधिले जाते. खऱ्या अर्थाने आज शेतकऱ्याला व ग्रामीण उद्योजकांना व कारागिरांना लागणारी वित्तपुरवठ्याची गरज भागविण्याचे काम सहकारी वित्तपुरवठा करताना पाहावयास मिळत आहे. यामध्ये काही उणिवा आहेत त्या उणिवांवर उपाययोजना योग्य पद्धतीने झाल्यावर खरोखरच ग्रामीण भागाच्या विकासाला मोठ्या प्रमाणात चालना मिळेल.

शेतकरी सभासदांनी एकत्र येऊन आपल्या शेतीविषयक व ग्रामीण उद्योग, व्यवसाय विकासासाठी सहकारी तत्त्वावरील वित्तपुरवठा करणारी अल्प व मध्यम मुदतीसाठी स्थापन केलेली प्राथमिक सह. वित्तपुरवठा संख्या, त्याचबरोबर जिल्हा सहकारी बँक व राज्य सहकारी बँक या त्रिस्तरीय रचनेला तसेच भूविकास बँक की जी दीर्घ मुदत कर्जपुरवठा करते ह्या रचनेला सहकारी वित्तपुरवठा म्हणता येईल.

सहकारी वित्तपुरवठा संस्था पूर्णपणे सहकारी तत्त्वांवर काम करते. येथे समान गरजा असणारे घटक एकत्र येतात. या ठिकाणी समानतेच्या तत्त्वाचा वापर केला जातो. येथील सभासदत्व त्या व्यक्तीच्या इच्छेनुसार दिले जाते. जात, धर्म, काळा-गोरा असा कोणताही मतभेद या ठिकाणी नसतो. या ठिकाणी त्या सदस्यांची गरज विचारात घेतली जाते. याचबरोबर स्वावलंबनाचे तत्त्व म्हणजे स्वत:चा विकास स्वत: करावा त्यासाठी संस्था व संस्थेतील सभासद हे तिचे घटक असतात. संस्था चालविण्यासाठी नियामक मंडळ असते, त्याला अधिकार देऊन त्या संस्थांचे व्यवस्थापन चालविले जाते. थोडक्यात सहकारी वित्तपुरवठा ही शेतकऱ्यांनी स्वत:च्या विकासासाठी निर्माण केलेली व्यवस्था आहे, त्याला शासनाने मदत देऊन शेतकऱ्यांच्या विकासाला वाव निर्माण करून दिला आहे.


## ६.४ सहकारी वित्तपुरवठ्याची रचना

प्राथमिक सहकारी संस्था, मध्यवर्ती सहकारी बँक आणि राज्य सहकारी बँक या तिन्ही प्रकारच्या संस्था प्रामुख्याने शेतकऱ्यांना शेती विकासाकरिता अल्प, मध्यम मुदतीचे कर्ज उपलब्ध करून देण्याच्या कार्याकरिता स्थापन झालेल्या आहेत. तर दीर्घ मुदत कर्जपुरवठा भूविकास सहकारी बँक या संस्थेमार्फत केला जातो.


यामुळेच शेतकऱ्यांना शेतीकरिता दिल्या जाणाऱ्या कर्जाचे विभाजन दोन प्रकारे केलेले पाहावयास मिळते.

अ) अल्प व मध्यम मुदतीचे कर्ज ब) दीर्घ मुदतीचे कर्ज. या दोन्ही प्रकारचा कर्जपुरवठा सहकारी क्षेत्रात पुढील साखळीत होतो.

सहकारी कर्जपुरवठा रचना




munotes.in




भारतात शेतकऱ्यांना सहकारी संस्थांमार्फत म्हणजेच बँकांमार्फत पतपुरवठा करण्यासाठी पिरॅमिडसारखी तीन स्तरांवर एक साखळीच निर्माण झाली आहे. म्हणजेच सहकारी पतपुरवठा संस्थांची रचना संघीय स्वरूपाची आहे. पिरॅमिडच्या पायाशी ग्रामीण सहकारी संस्था आहेत. त्यांचे कार्यक्षेत्र एक किंवा अनेक खेडी असतात. त्या खेड्यातील शेतकरी लाभार्थी हे तिचे सभासद असतात. मध्यभागी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक असते, तिचे कार्यक्षेत्र जिल्ह्यापुरते मर्यादित असते. राज्य पातळीवर राज्य सहकारी बँक रिझर्व्ह बँकेशी संबंधित आहे. राज्यातील सहकारी रचनेतील सर्वोच्च सहकारी संस्था म्हणून राज्य सहकारी बँक काम करते. राज्य सहकारी बँकेला शिखर बँक असेही म्हणतात. राज्यस्तरीय सहकारी बँक ही दोन पद्धतीने स्थापन होतात. त्यामध्ये काही राज्य सहकारी बँका ह्या शुद्ध राज्य सहकारी बँका म्हणून कार्य करतात. तर काही राज्य सहकारी बँकांनी आपल्या शाखा राज्यभरामध्ये सुरू केलेल्या आहेत.

दीर्घ मुदत कर्जपुरवठ्याचा विचार करता भू-विकास बँक हा कर्जपुरवठा करते. ह्या बँकांची रचना प्रामुख्याने दोन पद्धतीने होते. १) संघ पद्धतीची रचना २) स्वतंत्र पद्धतीची रचना व या दोन्ही पद्धतीचे मिश्र स्वरूप म्हणजेच तिसरा प्रकार ३) संमिश्र पद्धती होय. संघ पद्धतीमध्ये जिल्हा कार्यक्षेत्रात शेतकरी भूविकास बँक स्थापन करतात व त्यांची संघ संस्था राज्य पातळीवर स्थापन होते. तर स्वतंत्र पद्धतीमध्ये राज्य पातळीवर एक भूविकास बँक स्थापन केली जाते व तिच्या शाखा जिल्हा किंवा तालुकानिहाय स्थापन होतात तर संमिश्र पद्धतीमध्ये वरील दोन्ही पद्धतीचे मिश्रण असलेले पाहावयास मिळतात.

## ६.५ सहकारी वित्तपुरवठ्याची गरज

सहकारी वित्तपुरवठ्याची गरज लक्षात घेता शेतकऱ्याची आर्थिक दुरवस्था संपुष्टात आणून शेतकऱ्यांना रास्त व्याजाच्या दराने कर्जपुरवठा उपलब्ध करून देण्याच्या हेतून सरकारे १९०४ रोजी सहकारी संस्थाबद्दलचा पहिला कायदा केला त्यावेळी व आजही शेतकऱ्याचे शेती व ग्रामीण व्यवसायासंबंधीच्या अनेक समस्या असलेल्या पाहावयास मिळतात. ह्या समस्या दूर करण्यासाठी सहकारी वित्तपुरवठ्याची गरज आहे. त्याचे विश्लेषण खालीलप्रमाणे.

**१) ग्रामीण भागातील शेतकऱ्याची पैशाची गरज :**

ग्रामीण भागामध्ये शेतकऱ्याला शेतीसाठी विविध गोष्टींची गरज असते. बि-बियाणे, खत, जीवनावश्यक गोष्टी, शेतीमधील बांधबंदिस्ती, सपाटीकरण, सिंचन व्यवस्था, अवजारे तसेच शेतीसाठी क्षम इत्यादी अनेक गोष्टींसाठी पैशाची गरज असते ही पैशाची गरज

भागविणारी शेतकऱ्याची बँक म्हणून स्वतंत्र बँक १९०४ पूर्वी नव्हती त्यामुळेच स्वतंत्र शेतकऱ्याची बँक म्हणून तिची गरज निर्माण झालेली पाहावयास मिळते.

**२) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक :**

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांमध्ये आजही आर्थिकदृष्ट्या असणारे घटक मोठ्या प्रमाणात आहेत अशा घटकांना इतर बँक शेतीसाठी कर्ज नाकारतात अशा वेळी खऱ्या अर्थाने ह्या दुर्बल घटकांना पतपुरवठा करणारी बँक ही सहकारी बँक असते.

**३) सावकारी पिळवणुकीतून शेतकऱ्याची सुटका होण्यासाठी सावकारी नियंत्रण कायदा :**

अस्तित्वात येण्यापूर्वी सावकाराकडून शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात पिळवणूक होत होती. मात्र त्यानंतर सावकारी नियंत्रण कायदा येऊनही शेतकऱ्याची पिळवणूक काही प्रमाणात का असेना होताना पाहावयास मिळते. ह्या सावकारी पाशातून शेतकऱ्याची सुटका होण्यासाठी सहकारी वित्तपुरवठा कारणीभूत ठरत आहे.

**४) शेती विकास :**

आपला देश शेतीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. आपल्या देशातील शेतीचा विकास जोपर्यंत घडत नाही तोपर्यंत देशाची प्रगतीही घडणार नाही. ह्या शेतीविकासामधील मुख्य समस्या म्हणजे शेतीसाठी पैसा. शेती विकासासाठी विविध सुविधा उभ्या करण्यासाठी शेतकऱ्यांना पैसा लागतो. त्याचबरोबर शेतीपूरक शेती जोड व शेती प्रक्रिया व्यवसाय उभे करण्यासाठी व चालविण्यासाठी पैशाची गरज लागते ही पैशाची गरज खऱ्या अर्थाने सहकारी पतपुरवठाच भागवू शकतो.

**५) शेतकऱ्याचा आर्थिक, सामाजिक दर्जा उंचाविणे :**

भारतीय शेतकरी आर्थिकदृष्ट्या दुर्बल आहे. त्या दुर्बल घटकाचा आर्थिक व सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी त्या शेतकऱ्याचा उत्पन्नाचा मार्ग प्रभावी करणे गरजेचे आहे. ह्यासाठी शेतकऱ्यांना पतपुरवठा करणे व त्या शेतकऱ्यांचा दर्जा उंचावण्यासाठी मदत करण्याचे कार्य सहकारी पतपुरवठा करतो.

**६) बचतीची सवय लावणे :**

भारतीय शेतकरी जेव्हा शेतीविकासासाठी एका बाजूला कर्ज काढतो त्यावेळी दुसऱ्या बाजूला त्याला बचतीची सवय लावणेसुद्धा महत्त्वाचे असते, कारण सहकारी पतपुरवठा म्हणजे काही शेतकरी स्वत:ला इच्छेने जेव्हा एकत्र ठेवून संस्था स्थापन करतात. त्या संस्थेमध्ये आपल्याला जमेल तेवढी सातत्याने बचत करतात त्यावेळी खऱ्या अर्थाने पैसा बँकेत जमा होतो व त्यातूनच कर्जपुरवठा केला जातो. ह्यासाठी खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांना बचतीची सवय सहकारी संस्था लावतात.

munotes.in

**७) शेतीजोड व प्रक्रिया व्यवसायासाठी पैशाची गरज :**

भारतामध्ये शेतीबरोबरच शेतीपूरक, जोड व प्रक्रिया व्यवसायाला मोठा वाव आहे. ही पैशाची अडचण दूर करण्याचे काम सहकारी पतपुरवठा संस्था करताना पाहावयास मिळते.

**८) देशाची ग्रामीण अर्थव्यवस्था विकसित होण्यासाठी :**

देशाच्या अर्थव्यवस्थेचा विचार करता भारतातील ग्रामीण अर्थव्यवस्था ही शेती व शेतीवर आधारित उद्योगावर अवलंबून आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था विकसित होण्यासाठी शेतीला वित्तपुरवठा होणे गरजेचे आहे. सहकारी बँका ही ग्रामीण अर्थव्यवस्था विकसित करण्यासाठीच शेतीला वित्तपुरवठा करत असलेल्या पाहावयास मिळतात.

**९) शेती वित्तपुरवठ्याची पर्यायी कमकुवत व्यवस्था :**

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही १९७०पर्यंत खऱ्या अर्थाने शेतीला वित्तपुरवठा करणारी पर्यायी व्यवस्था विकसित झालेली नव्हती. त्यामुळे सहकारी वित्तपुरवठा हाच खरा शेती विकासाला आधार होता. आजही विचार करता सहकारी वित्तपुरवठ्याव्यतिरिक्त इतर व्यवस्थेच्या माध्यमातून सहजतेने शेती व्यवस्थेला वित्तपुरवठा होताना पाहावयास मिळत नाही आणि ज्या शेतकरी वर्गाला हा वित्तपुरवठा होतो तो वर्ग हा मोठा शेतकरी किंवा व्यापारी शेती करणारा वर्ग असलेला दिसून येतो.

**आपली प्रगती तपासा :**

१. सहकारी वित्तपुरवठ्याची गरज सांगा.

## ६.६ प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था

शेतकऱ्यांना 'सहकारी' पद्धतीमार्फत कर्जपुरवठा केल्या जाणाऱ्या पद्धतीत प्राथमिक सहकारी संस्थेला सर्वात महत्त्वाचे पायाभूत स्थान आहे. संपूर्ण सहकारी पत किंवा कर्जरचना पद्धत या पायावर आधारलेली आहे. प्राथमिक सहकारी संख्या प्रामुख्याने सहकारी पत रचनेत तळाशी असल्याने प्राथमिक सहकारी संस्थांना पत रचनेचा पाया म्हटले आहे.




https://www.saamana.com

आपल्या देशातील सहकारी चळवळीची सुरुवात प्राथमिक शेतकी सहकारी पतसंस्थेच्या स्थापनेने १९०४ मध्ये झाली. ग्रामीण पातळीवर एका खेड्यापुरती मर्यादित अल्प व मध्यम मुदतीच्या कर्जाची गरज भागविण्यासाठी या संस्थांची स्थापना आपल्या देशात करण्यात आली. या संस्थांचे सभासदत्व ऐच्छिक असते. यांचा कारभार लोकशाही पद्धतीने चालतो. या संस्थांची उद्दिष्टे प्रामुख्याने सभासदांमध्ये बचत प्रवृत्ती वाढीस लावणे, काटकसरीची प्रवृत्ती वाढीस लावणे, सुलभ व्याजदराने व परतफेडीच्या अटीवर सभासदांना कर्जपुरवठा करणे, यातूनच परस्पर मदत करणे ही होती. थोडक्यात अधिक चांगली शेती, अधिक चांगला व्यवसाय व अधिक चांगले जीवनमान हे ग्रामीण सहकारी पतसंस्थांचे उद्दिष्ट होते.

मार्च १९५९ पासून प्राथमिक सहकारी पतसंस्थांचे रूपांतर सेवा सहकारी संस्थांमध्ये करण्यात आले. १९५९ पर्यंत प्राथ. सहकारी पतसंस्थांचे कार्य पतपुरवठ्यापुरते मर्यादित होते. राष्ट्रीय सहकारी विकास परिषद व अखिल भारतीय ग्रामीण पतपाहणी समितीच्या शिफारशीप्रमाणे संपूर्ण ग्रामीण अर्थरचनेची पुनर्रचना करण्याचे कार्य या सेवा संस्थांनी करावे. ग्रामीण जीवनव्यापी अशी ही संख्या व्हावी. शेतीपतपुरवठ्याबरोबर दुग्धव्यवसाय, पूरक हस्तव्यवसाय अशा प्रकारे शेतकऱ्यांच्या विविध आर्थिक गरजा भागविणारी, शेती उत्पादनवाढीसाठी मदत करणारी, शेतमाल विपणनाची शेतपतपुरवठ्याशी सांगड घालणारी अशी संस्था म्हणून तिने पुढे कार्य करावे असा हेतू होता.

यानुसार दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी हा बदल करण्यात आला. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या वर्षातच देशात ३३,१९० सेवा सहकारी संस्थेची स्थापना करण्यात आली.

**१. कार्यक्षेत्र :**

सर्वसाधारणपणे एका सहकारी संस्थेत त्या भागातील आजूबाजूच्या तीन ते चार मैलांच्या परिसरातील व्यक्ती सभासद बनू शकतात. म्हणजेच सध्याच्या सरकारी धोरणाप्रमाणे प्रत्येक लहान लहान खेड्यात प्राथमिक संस्था नाहीत. परंतु प्रत्येक सहकारी संस्था जवळपासच्या तीन ते चार मैलांतील शेतकऱ्याच्या गरजा पूर्ण करू शकते. त्याचा परिणाम प्रत्येक प्राथमिक सहकारी संस्था अर्थश्रम बनू शकते. त्यासाठी प्रत्येक किमान ६०० ग्रामीण कुटुंबामागे किंवा तीन हजार लोकवस्ती मागे एक प्राथमिक सहकारी संस्था असावी जेणेकरून ती सहकारी संस्था आपला खर्च आपल्या उत्पन्नात भागवू शकेल ही सरकारी भूमिका आहे.

**२) उद्देश / कार्ये :**

१) सभासदांची कर्जाची परतफेड करण्याची शक्ती विचारात घेऊन सभासदांना उपभोगासाठी व उत्पादन कार्यासाठी कर्जपुरवठा करणे.

२) शेतकरी सभासदांना उत्पादनवाढीसाठी खते, बियाणे, जंतुनाशके, अवजारे, इ. साठी योग्य प्रमाणावर कर्जपुरवठा करणे.

३) प्राथमिक सहकारी पतपुरवठा ही संस्था ही बहुविध कार्यकारी सहकारी सेवा संस्था असावी. शेतीपतपुरवठ्याबरोबर दुग्धव्यवसाय, पूरकव्यवसाय, हस्तव्यवसाय इ. स्वरूपात ग्रामीण आर्थिक पुनर्रचनेचे कार्य ह्या संस्थेने करावे.

४) ग्रामीण भागातील बचती व ठेवी गोळा करणे.

५) सभासदांना लागणाऱ्या दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंची विक्री करणे.

६) सभासदांचे उत्पादित पीक साठवून ठेवणे, त्याची स्वत: किंवा स्वत:च्या वतीने खरेदी-विक्री करणे.

७) कर्जाचे वाटप करणे, कर्जाच्या वापरावर व कर्जवसुलीवर लक्ष पुरविणे.

**३) व्यवस्थापन :**

प्राथमिक संस्थेचे सभासद हे सहकारी संस्थेचे खरे मालक असतात. संस्थेच्या कार्यक्षेत्रातील किमान १० व्यक्ती एकत्र येऊन प्राथमिक सहकारी संस्था स्थापन करू शकतात. त्यांना संस्थेच्या कारभारविषयक, धोरणविषयक व व्यवसाय व्यवस्थापनाविषयक अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार आहे. हा निर्णय ते फक्त सभासदांच्या सभेत घेऊ शकतात. कायद्यातील तरतुदीनुसार सभासदांची सभा प्रत्येक प्राथमिक सहकारी संस्थेला वर्षातून एकदा तरी घ्यावी लागते. मात्र दैनंदिन संस्थेच्या व्यवहार नियंत्रण ठेवण्यासाठी व महत्त्वाच्या प्रश्नांवर निर्णय घेण्यासाठी सभासद कार्यकारी समितीची निवड करतात.

**४) भांडवल उभारणी :**

सहकारी संस्थेच्या सभासदांना सभासद होण्यासाठी किमान एक तरी भाग खरेदी करावा लागतो. सर्वसाधारणपणे जास्तीत जास्त व्यक्तींनी सभासद होण्याकरिता सहकारी भागांची किंमत फारच कमी ठेवलेली असते. तसेच फक्त सभासदांना कर्ज दिले जाते. हे कर्ज बऱ्याच वेळा भागांच्या प्रमाणात असते.

भारतातील ग्रामीण भागातील सर्वसामान्य शेतकऱ्यांची परिस्थिती विचारात घेऊन सन १९५२ च्या गोरवाला समितीने व १९६०च्या मेहता समितीने असे सुचविले की, प्राथमिक सहकारी संस्थांना आर्थिक दृढता लाभावी म्हणून राज्य सरकारने या संस्थांना काही प्रमाणात भाग खरेदी करून भांडवल पुरवावे. सरकारने ही शिफारस मान्य केली. त्याप्रमाणे राज्य सरकार जिल्हा बँकेला पतपुरवठा करून जिल्हा बँकेमार्फत प्राथमिक सहकारी संस्थेचे काही भाग खरेदी केले जातात. या व्यतिरिक्त प्रत्येक प्राथमिक सहकारी संस्थेने आपल्या नफ्यातील २५ टक्के भाग प्रत्येक वर्षी राखीव निधीत जमा करावा अशी सक्ती आहे व सभासदांना दिला जाणारा लाभांश ९ टक्के पेक्षा जास्त दिला जाऊ नये, अशी अपेक्षा आहे.

**५) कर्जपुरवठा :**

प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था ही सभासदांना उपयोग व उत्पादन या दोन्ही कारणांसाठी कर्जाची उपलब्धता करून देते. उपभोग कर्जामध्ये दुष्काळी, परिस्थिती,

लग्नकार्य, आजारपण इ. बाबीचा विचार होतो. तर उत्पादक कर्ज हे शेती व व्यवसाय विकासासाठी दिले जाते. यामध्ये अल्पमुदत कर्ज हे बी-बियाणे, खते, जमिनीची मशागत, अवजारे इ. साठी १ ते ५ वर्ष मुदतीच्या कालावधीसाठी दिली जातात. तर मध्यम मुदत कर्जे ही जनावरांची खरेदी मोठी अवजारे, सिंचन व्यवस्था, विहीर बांधबंदिस्ती, पंप, सपाटीकरण इ. कारणांसाठी ३ ते ५ वर्षे मुदतीसाठी दिली जातात. या सर्वांसाठी शेतकऱ्याची परतफेडीची कुवत विचारात घेऊनच कर्जपुरवठा केला जातो.

**६) पीक कर्ज तारण :**

प्राथमिक सहकारी संस्था आपल्या शेतकरी सभासदांना शेती उत्पादनासाठी व अधिक धान्य उत्पादन वाढीला प्रोत्साहन मिळावे म्हणून पीक कर्ज देतात. पीक कर्ज योजनेप्रमाणे सभासदांनी त्यावर्षी उत्पादन घेतलेल्या पिकाच्या तारणावर दिले जाते. पूर्वी अल्प मुदतीचे कर्ज शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीच्या तारणावर दिले जात असे. परंतु संभाव्य पीक योजनेप्रमाणे कर्जाची रक्कम पिकाचे उत्पादन किंवा जमिनीचे क्षेत्र विचारात घेऊन दिली जाते.

**७) सहकारी संस्थांची प्रगती :**

सन १९५०-५१ साली प्राथमिक सहकारी संस्थांची संख्या १.०५ लक्ष इतकी होती. परंतु त्यानंतर शेती उत्पादनाला मदत करण्याकरिता सरकारने प्रत्येक खेड्यातून एक प्राथमिक सहकारी संस्था स्थापन केली जावी या बाबत प्रोत्साहन दिले त्याचा परिणाम १९६०-६१ मध्ये जवळजवळ २.१२ लक्ष प्राथमिक सहकारी संस्था एवढी संख्या वाढली.

**८) भारतातील प्राथमिक सहकारी संस्थांचे मूल्यमापन :**

भारतातील प्राथमिक सहकारी संस्था प्रामुख्याने शेतकऱ्यांना अल्प व्याजाच्या दरात, परंतु पुरेशा प्रमाणात कर्जपुरवठा करावा या उद्देशाने स्थापन झाल्या. प्राथमिक सहकारी संस्थांनी आपल्या कार्यात कितपत प्रगती केली आहे त्याचे मूल्यमापन करणे या ठिकाणी उपयुक्त ठरते.

**अ) प्राथमिक सहकारी संस्थांतील दोष :**

**१) कमकुवत आर्थिक परिस्थिती :**

आपल्या देशातील बहुसंख्य प्राथमिक सहकारी संस्थांची परिस्थिती कमकुवत असते. शेतकरी गरीब असल्याने भागभांडवलाची फारशी विक्री होत नाही. आर्थिक कमकुवत परिस्थितीमुळे ठेवीदेखील कमी प्रमाणात प्राप्त होतात. अशा संस्थांचे व्यवहार यामुळे मर्यादित राहतात. साहजिकच त्यांना मिळणारा नफा हादेखील कमी असतो. त्यामुळे जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून प्राप्त होणारे कर्जही अतिशय कमी मिळते. परिणामी ह्या संस्थांना आपली विविध कार्ये परिणामकारकरीत्या पार पाडता येत नाहीत.

**२) निष्क्रिय प्राथमिक सहकारी संस्थांची संख्या अधिक :**

आपल्या देशात प्राथ. सह. संस्थांची वाढ होत असताना मोठ्या प्रमाणात संख्यात्मक दृष्टीने झाली. त्यामुळे गुणात्मकतेचा अभाव असणाऱ्या सहकारी संस्था अतिशय कमी प्रमाणात

आहेत. संख्यात्मक दृष्टीने वाढलेल्या सहकारी संस्था कोणत्याही प्रकारचे कार्य करताना पाहावयास मिळत नाहीत. त्यामुळे त्या शेतकरी सभासदांचे मोठे नुकसान होत असून सहकारी चळवळीला बाधा पोहोचत आहे.

**३) अकार्यक्षम व्यवस्थापन :**

शेतकरी सभासदांमधून निवडून आलेल्या व्यवस्थापन संचालक मंडळाला संस्थेचा कारभार पाहावा लागतो. मात्र या संचालक मंडळातील सदस्यांना अनुभव नसतो. तसेच संस्थेची प्रशासकीय जबाबदारी असलेल्या सचिवालाही पुरेसे प्रशिक्षण नसते. त्यामुळे कर्जवाटप, वसुली, थकबाकी इ. बाबत अकार्यक्षमता वाढत जाते.

**४) कर्जविषयक दोष :**

प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थेमध्ये कर्ज मिळवण्यासाठी अतिशय विलंबाची प्रक्रिया असल्यामुळे सदस्यांना कर्ज उशिरा मिळते. त्याचबरोबर वाटप केलेले कर्जाबाबत थकबाकी मोठी आहे. कारण दिलेल्या कारणांसाठीच कर्जवापर केले जाते आहे की नाही याबाबत पाठपुरावा केला जात नाही. म्हणजेच दिलेल्या कर्जावर देखरेख नाही. परिणामी बरेचसे कर्ज हे अनुत्पादक कारणासाठी वापरले जाते. बऱ्याच वेळा अशा कर्जाची परतफेड होत नाही.

**५) पतपुरवठा व शेतमाल विक्री यात समन्वय नाही :**

सहकारी पतपुरवठा व सहकारी खरेदी-विक्री संघ यांनी समन्वयाने कार्य करावे की जेणेकरून पतपुरवठ्याबाबतची थकबाकी राहणार नाही. मात्र या दोहोंमध्ये समन्वय दिसून येत नाहीच, तसेच शेतकरी वर्गसुद्धा या व्यवस्थेच्या माध्यमातून आपला माल न विकता व्यापाऱ्यांना विकतात.

**६) मोठ्या शेतकऱ्यांचे वर्चस्व :**

सहकारी पतपुरवठा संस्थावर संचालक म्हणून मोठ्या शेतकरी वर्गाचा वरचष्मा आहे, त्यामुळे त्यांच्या फायद्याचे ठरू शकतील असे निर्णय / धोरणे आखली जातात. आपल्या जवळच्या व्यक्तींना कर्ज देणे, दुसऱ्या व्यक्तीच्या नावावर आपण कर्ज उठविणे, अशा प्रकारची गैरप्रवृत्ती मोठ्या प्रमाणात वाढत आहे.

**७) असमतोल विकास :**

देशातील काही राज्यांमध्ये सहकारी पतपुरवठा संस्थांचा विकास चांगला झालेला दिसून येतो. महाराष्ट्र, गुजरात, पंजाब, हरियाना, तामिळनाडू या राज्यांत या संस्थांचा प्रचार-प्रसार वेगाने होत आहे. त्यामानाने इतर राज्यांतील प्रगती समाधानकारक दिसून येत नाही.

**८) अल्पभूधारकांकडे दुर्लक्ष :**

आपल्या देशात बहुसंख्य शेतकरी अल्पभूधारक आहेत. अल्पभूधारक शेतकऱ्यांना मिळणारा पतपुरवठा हा एकूण कर्जपुरवठ्याच्या अतिशय कमी प्रमाणात आहे. खऱ्या अर्थाने

munotes.in

ह्याच घटकाला म्हणजेच आर्थिकदृष्ट्या कमकुवत असणाऱ्या घटकाला पतपुरवठ्याची गरज आहे. मात्र ह्या घटकापर्यंत ती पोहोचताना पाहावयाला मिळत नाही.

**ब) प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थेतील दोष दूर होण्यासाठी उपाययोजना:**

**१) प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थांची पुनर्रचना :**

भारतातील सहकारी चळवळीत ज्या संस्था कमकुवत आहेत ज्याचे कार्य पूर्णपणे बंद आहे अशा संस्थांचे पुनर्रचना करण्याचे कार्य हाती घेणे गरजेचे आहे. आर्थिकदृष्ट्या अकार्यक्षम संस्था सक्षम सहकारी संस्थांमध्ये विलीन करणे गरजेचे आहे.

**२) ठेवी गोळा करण्यावर भर द्यावा :**

सहकारी पतपुरवठा संस्थांना खऱ्या अर्थाने ग्रामीण बचत गोळा करण्यामागे अपयश आलेले आहे. यासाठी भाग भांडवलावर समाधान न मानता सभासद व इतरांकडून मोठ्या प्रमाणात ठेवी स्वीकाराव्यात असे झाल्यास सहकारी संस्थांची आर्थिक स्थिती मजबूत होईल.

**३) पतपुरवठ्याची शेतमाल विक्रीशी सांगड :**

सहकारी पतपुरवठ्याची शेतमाल विक्रीशी परिणामकारक सांगड घालण्यात आलेली नाही. त्यामुळे थकबाकी वाढती आहे. त्यासाठी ही सांगड घातली जावी. यासाठी शेतकऱ्याच्या मनात सहकारी विक्री व्यवस्थेबद्दल विश्वास निर्माण करू देणे गरजेचे आहे. तरच खऱ्या अर्थाने ही सांगड घातली जाईल.

**४) परिणामकारक नियंत्रण व हिशोब तपासणी :**

संस्थेने केलेल्या कर्जाचा उपयोग उत्पादक कार्यासाठीच होतो किंवा नाही याची देखरेख होणे गरजेचे आहे. हिशोब तपासणीसाठी देखील पर्यवेक्षक असणे गरजेचे आहे. हिशोब तपासणी काटेकोर झाल्यास गैरव्यवहारास आळा बसेल.

थकबाकीच्या समस्येचा साकल्याने विचार करून थकबाकी कमी करण्यासाठी नवनवीन उपाय शोधून काढणे गरजेचे आहे. पूर्वीची कर्जे वसुली झाल्याशिवाय नवीन कर्जे न देणे, सहकारी विपणनाशी सांगड घालणे गरजेचे आहे. थकबाकीचे हे प्रमाण कमी झाल्यास सहकारी चळवळीला चालना मिळेल.

**५) कार्यक्षम व्यवस्थापन :**

संचालक मंडळाला बळी न पडता आपले व्यवहार चोख कसे राहतील याचा विचार करणारे कार्यक्षम व्यवस्थापन असणे गरजेचे आहे. यासाठी सचिवाला पुरेसे अधिकार असणे गरजेचे आहे, तसेच सचिव पातळीपासून ते अंतिम घटकापर्यंत सर्वांना योग्य असे प्रशिक्षण देणे गरजेचे असते. सहकाराबद्दल लोकांच्या मनात आदर व विश्वास निर्माण करणे हे व्यवस्थापनाचे कार्य आहे. त्यांनी ते चोख पार पाडणे गरजेचे आहे.

munotes.in

**६) जिल्हा सहकारी बँकेने निर्बंध कमी करावेत :**

जिल्हा सहकारी बँकेचे अधिकारी हे बऱ्याच वेळा हुकूमशाही वागतात. नको त्या पत्रव्यवहाराबाबत व बाबींबाबत आग्रही असतात. त्यामुळे प्राथमिक सहकारी संस्थेच्या व्यवस्थापनावर कामाचे सातत्याने दडपण येते. यासाठी हे निर्बंध कमी करून ह्या संस्थांना मोकळेपणाने काम करण्यासाठीचे वातावरण निर्माण होणे गरजेचे आहे.

**७) सहकारी शिक्षणाचा प्रसार :**

देशभरामध्ये सहकाराबाबत प्रशिक्षण देणारी किंवा शिक्षण देणारी व्यवस्था अत्यंत अपुरी आहे. यासाठी सहकार क्षेत्रातील चळवळी व कार्यासंबंधी प्रशिक्षणासाठी प्रत्येक जिल्ह्यात स्वतंत्र व्यवस्था असणे गरजेचे आहे. तरच हे कर्मचारी स्वत:च्या जबाबदारीवर चांगले निर्णय घेऊ शकतील व चांगले गुणवंत लोक या क्षेत्राकडे वळतील.

## ६.७ जिल्हा सहकारी बँक

सहकारी पतपुरवठ्याच्या त्रिस्तरीय रचनेत जिल्हा पातळीवर कार्य करणाऱ्या मध्यवर्ती सहकारी बँकांना अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. त्या राज्य सहकारी बँक व ग्रामीण भागातील प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था यातील दुवा म्हणून कार्य करतात. त्यामुळे विशिष्ट जिल्ह्यातील ग्रामीण भाग व शहरी भाग एकत्र जोडले जातात. ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करण्यात या बँकांचा महत्त्वाचा वाटा आहे. राज्य पातळीवरील राज्य सहकारी बँकेकडून पैसा घेऊन तो प्राथमिक सहकारी संस्थांना पुरविण्याचे कार्य अभिकर्ता म्हणून करतात. गाव पातळीवरील प्राथमिक पतपुरवठा संस्था प्रत्यक्ष सभासदांना कर्जपुरवठा करतात. पहिली मध्यवर्ती बँक प्राथमिक पतपुरवठा संस्था म्हणून उत्तर प्रदेशास १९०६ मध्ये स्थापन झाली. राजस्थानमधील अजमीर येथे इ.स. १९१० मध्ये सहकारी तत्त्वावर स्थापन झालेली मध्यवर्ती बँक ही खऱ्या अर्थाने पहिली बँक होय.




https://aplamarathi.com

**१) व्याख्या :**

जिल्हा पातळीवरील शेती व्यवसायाला अल्प व मध्यम मुदतीचा भांडवल पुरवठा उपलब्ध करून देणारी सहकारी बँक म्हणजे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक होय. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म्हणजे राज्य सहकारी बँक व ग्रामीण पातळीवरील प्राथमिक पतपुरवठा संस्था यामध्ये दुवा साधणारी बँक होय.

munotes.in

**२) उद्दिष्टे :**

- जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही जिल्ह्यातील शेती पतपुरवठा संस्थांची संघसंस्था असते. त्यानुसार तिचे उद्देश पुढीलप्रमाणे आहेत.
- जिल्ह्यातील प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थांना भांडवल पुरवठा करणे, बँकिंग क्षेत्रातील सर्व व्यवहार करणे.
- जिल्ह्यातील सहकारी क्षेत्रात कार्य करणाऱ्या निरनिराळ्या संस्थांचे संतुलन केंद्र म्हणून कार्य करणे.
- ठेवी स्वीकारणे, ठेवीदारांचा विश्वस्त म्हणून कार्य करणे.
- जिल्ह्यांतील प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थांना आवश्यक असणारा पैसा राज्य सहकारी बँकेकडून उपलब्ध करून देणे व त्यातून सभासदांना लागणारा शेतीसाठीचा अल्प व मध्यम कर्जपुरवठा सुलभ व्याजदराने योग्य वेळी उपलब्ध करून देणे.
- जिल्ह्यातील ग्रामीण कारागीर आणि बलुतेदार यांनी स्थापन केलेल्या संस्थांना ग्रामोद्योगाचे प्रगतीसाठी अर्थसाहाय्य करणे
- जिल्ह्यातील प्राथमिक सहकारी संस्थांवर देखरेख ठेवणे, त्यांच्या कार्यावर नियंत्रण ठेवणे, मार्गदर्शन करणे, त्यांच्या भांडवलात समतोल राखणे.
- पीक कर्ज अथवा शेतमालाच्या तारणावर कर्जपुरवठा करणे.
- प्राथमिक संस्थांना सेवक वर्ग पुरविणे, त्यांना प्रशिक्षण देणे, हिशेबाचे परीक्षण करणे.
- सहकार क्षेत्र व नाणेबाजार यातील दुवा म्हणून कार्य करणे.
- शहरी भागातून बँकांमधून जमा झालेल्या ठेवींचा ओघ ग्रामीण भागातील कर्जपुरवठ्याकडे वळविणे.
- शेतमालाची खरेदी-विक्री आणि प्रक्रिया करणाऱ्या संस्थांना कर्ज उपलब्ध करून देणे, तसेच गोदाम व्यवस्था, वाहतूक आणि कच्च्या मालाचे रूपांतर पक्क्या मालात करणाऱ्या व्यवसायांना मदत करणे.
- जिल्ह्यातील सहकारी चळवळीचे नेतृत्व करणे.
- काटकसर, स्वावलंबन व परस्पर मदत या तत्त्वांचा अवलंब करून सहकारी चळवळीला मजबुती आणण्यासाठी बचतीची सवय ग्रामीण भागात वाढीला लावणे.
- ग्रामीण भागात शाखा उघडून तेथील जनतेला बँकिंगविषयक सेवा उपलब्ध करून देणे.
- प्राथमिक सहकारी संस्थांचा शिलकी निधी सुरक्षित ठिकाणी गुंतविण्यास संधी उपलब्ध करून देणे.

**३) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे कार्यक्षेत्र :**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे कार्यक्षेत्र जिल्ह्यापुरते मर्यादित असते. काही मध्यवर्ती सहकारी बँकांचे कार्यक्षेत्र विशिष्ट तालुक्यापुरते मर्यादित असते. मात्र आता रिझर्व्ह बँकेने

munotes.in

ठरवून दिलेल्या धोरणामुळे प्रत्येक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे कार्यक्षेत्र जिल्ह्यापुरते मर्यादित करण्यात आले.

**४) सभासदत्व :**

जिल्ह्यातील सर्व प्राथमिक सहकारी बँका / संस्था जिल्हा सहकारी बँकांच्या सभासद असतात. त्याचप्रमाणे इतर प्रकारच्या सहकारी संस्था उदा. औद्योगिक सहकारी संस्था, खरेदी-विक्री सहकारी संस्था, नागरी बँका, सहकारी शेती संस्था, ग्राहक सहकारी संस्था, यांसारख्या विविध प्रकारच्या सहकारी संस्था त्या जिल्हा सहकारी बँकेच्या सभासद होऊ शकतात.

पूर्वीच्या काळी खाजगी व्यक्तींनादेखील सहकारी जिल्हा बँकेचे व्यक्तिगत सभासद होता येत होते. अशा प्रकारच्या मिश्र सहकारी संस्थासुद्धा पूर्वी अस्तित्वात होत्या. मात्र सध्याच्या सहकार व रिझर्व्ह बँकेच्या धोरणानुसार कोणत्याही वैयक्तिक व्यक्तीला सहकारी बँकेचे सभासदत्व दिले जाणार नाही, मात्र पूर्वी दिलेले सभासदत्व रद्दही होणार नाही.

**५) भांडवल :**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला भांडवल उभारणी मोठ्या प्रमाणात करावी लागते. कारण तिच्यावर असलेली जबाबदारीही मोठी आहे. ती खालील मार्गांनी केली जाते.

**i) भागांची विक्री :** मध्यवर्ती सहकारी बँकेशी संलग्न असणाऱ्या सहकारी संस्था आणि व्यक्ती यांना बँकेचे भाग विकत घेता येतात. भागांची दर्शनी किंमत ५० रुपयांपासून १०० रुपयांपर्यंत असते. सहकारी संस्थांना त्याच्या उपविधीतील तरतुदींनुसार मध्यवर्ती बँकांकडील कर्जाच्या ठरावीक प्रमाणात भाग खरेदी करावे लागतात. रिझर्व्ह बँकेच्या अलीकडील तरतुदीनुसार या संस्थांना त्यांच्या कर्जाच्या १० टक्के रक्कम भाग भांडवल म्हणून गुंतवावी लागते.

**ii) ठेवी :** मध्यवर्ती सहकारी बँका आपल्या जिल्ह्यातील शाखांमार्फत ठेवी स्वीकारण्याचे काम करतात. सहकारी संस्था, सभासद, व्यक्ती बिगर सभासद यांच्याकडून या ठेवी स्वीकारल्या जातात. प्राथमिक सहकारी संस्थांना पुरेसा कर्जपुरवठा करता यावा यासाठी मध्यवर्ती बँकांनी ग्रामीण, तसेच नागरी भागात मोठ्या प्रमाणात ठेवी गोळा कराव्यात अशी शिफारस सर्व बँकिंग समित्यांना केली आहे.

**iii) राखीव निधी :** मध्यवर्ती सहकारी बँका तीन प्रकारचे स्वत:चे निधी उभारतात. १) वैधानिक राखीव निधी २) बुडीत कर्ज निधी ३) इतर निधी. मध्यवर्ती बँका त्यांना मिळणाऱ्या नफ्याचे वाटप सभासदांत करण्यापूर्वी काही रक्कम अशा राखीव निधीत जमा करतात.

**iv) कर्जे :** मध्यवर्ती बँक ही राज्य सहकारी बँक, रिझर्व्ह बँक, व्यापारी बँका, अर्थपुरवठा महामंडळे, नाबार्ड इत्यादींकडून कर्ज मिळविते. प्रसंगी राज्य सरकारकडूनही कर्जे घेतली जातात. शिखर बँकांकडून या बँकाना मोठ्या प्रमाणात

कर्जपुरवठा होतो. मध्यवर्ती बँकांच्या स्वत:च्या भांडवलाच्या १० टक्के ते १५ टक्के कर्जपुरवठा या बँका करतात.

**६) व्यवस्थापन :**

मध्यवर्ती सहकारी बँकेचे व्यवस्थापन लोकशाही पद्धतीने चालते. सर्वसाधारण सभासदांची सभा (General Body) ही सर्वोच्च सत्ता होय. यामध्ये बँकेच्या सर्व संस्था आणि काही व्यक्ती सभासद असतात. बँकेच्या सर्व बाबींना या सभेची मान्यता घ्यावी लागते. बँकेचे धोरण ठरविण्याचे सर्व अधिकार या सभेकडे असतात. संस्थेच्या व्यवस्थानासाठी सभासदांमधून संचालक मंडळाची निवड केली जाते. बँकेच्या उपविधीनुसार संचालकांची संख्या १५ ते ३० च्या दरम्यान असते. त्यात शेती पतसंस्थांचे प्रतिनिधी अधिक असतात. त्याशिवाय अर्बन बँका, दूध उत्पादक संस्था, विपणन संस्था, औद्योगिक संस्था, राज्य सहकारी बँक, भू-विकास बँक, जिल्हा परिषद इ. चे प्रतिनिधी या संचालक मंडळात असतात. एक जागा मागासवर्गीय प्रतिनिधीसाठी असते. एक संचालक स्वीकृत असतो. तर एका संचालकाची नियुक्ती राज्य शासनाकडून केली जाते. संचालक मंडळ आपल्यातून एका संचालकाची अध्यक्ष म्हणून आणि एक संचालकाची उपाध्यक्ष म्हणून निवड करते. दैनंदिन कामकाजासाठी हे संचालक मंडळ निर्णय घेते.

**७) प्रशासकीय संघटन :**

प्रत्येक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत सर्वोच्चपदी महाव्यवस्थापक असतो व त्याला मदत करण्यासाठी २-३ साहाय्यक व्यवस्थापन नेमले जातात. मध्यवर्ती बँकेत साधारणत: १) कृषी पतपुरवठा २) बिगर कृषी पतपुरवठा ३) विकास तपासणी ४) हिशेब ५) लेखा परीक्षण ६) प्रशासन ७) चिटणीस इ. सात विभाग असून प्रत्येक विभागासाठी एक मुख्य कार्यकारी अधिकारी असतो. तालुक्याच्या शाखांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विभागीय अधिकारी नेमले जातात. सोयीनुसार इतर अधिकारी व कर्मचारी वर्ग नेमला जातो. या पगारी नोकरांकडून बँकेचे दैनंदिन व्यवहार पूर्ण केले जातात.

**८) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची कार्ये -**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची कार्ये पुढीलप्रमाणे आहेत.

**१) सभासद संस्थांना कर्जपुरवठा :**

जिल्ह्यातील प्राथमिक सहकारी संस्था या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सभासद असतात. प्राथमिक सहकारी संस्था ही प्रत्यक्ष शेतकरी सभासदांना कर्जपुरवठा करण्याचे कार्य करतात. परंतु ह्या प्राथमिक संस्थांची भांडवली बाजू मजबूत नसल्याने त्यांना जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून कर्ज घ्यावे लागते. सर्व सभासद संस्थांना अशा प्रकारे अल्प व मध्यम मुदत कर्जपुरवठा व बँकिंगच्या सर्व सुविधा पुरविल्या जातात.

munotes.in

**२) जिल्ह्यातील पतपुरवठा संस्थांबरोबरच जिल्हा बँक :**

इतर सहकारी संस्थांना म्हणजेच खरेदी-विक्री संस्था, ग्राहक सहकारी संस्था, सूत गिरण्या, तेल गिरण्या इ. संस्थांना कर्जपुरवठा करते. वरील संस्थांकडून ठेवी आपल्या बँकेत गोळा करते. त्यातून गरजू संस्थांना कर्जपुरवठा करता येतो.

**३) प्राथमिक सहकारी संस्थांच्या कार्यावर देखरेख ठेवणे :**

जिल्हा बँक जिल्ह्यातील सर्व प्राथमिक सहकारी संस्थांच्या कार्यावर देखरेख ठेवते. संस्थांच्या व्यवहारांवर कर्जवाटपावर निरीक्षण ठेवते. त्यांना मार्गदर्शन करते व त्यांच्या कार्यावर नियंत्रण ठेवते.

**४) ग्रामीण भागात बँकिंगचा प्रसार :**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका जिल्ह्यातील ग्रामीण भागात आपल्या शाखा उघडून ग्रामीण जनतेला बँकिंगच्या सोयी सवलती उपलब्ध करून देतात. यातून ग्रामीण जनतेला बँकिंगच्या सवयी लावण्याचे कार्य या बँका करतात.

**५) ठेवी स्वीकारणे :**

मध्यवर्ती सहकारी बँका ग्रामीण भागातील शेतकऱ्यांकडून, जनतेकडून आणि संस्थांकडून ठेवी गोळा करतात. शहरी भागातील लोकांच्या ठेवी आकर्षित करण्यासाठी विविध प्रकारच्या योजना आखल्या जातात. ग्रामीण विभागातील बचत गतिशील करण्याचे महत्त्वाचे कार्य या बँका पार पाडतात.

**६) जिल्ह्यातील सहकारी चळवळीचे नेतृत्व करणे :**

मध्यवर्ती सहकारी बँक ही जिल्ह्यात सहकारी संस्थांच्या स्थापनेत पुढाकार घेते. शिवाय सहकारी चळवळीचे जिल्हा पातळीवर नेतृत्व करते. जिल्ह्यातील सहकारी चळवळीला गती देणे, या चळवळीस योग्य वळण लावून ती निकोप ठेवणे, चळवळीचा समतोल राखणे व तिच्यावर योग्य नियंत्रण ठेवणे अशी बहुविध कार्ये तिला पार पाडावी लागतात.

**७) सहकारी संस्थांची बँक म्हणून कार्ये करणे :**

जिल्ह्यातील सर्व सहकारी संस्थांची बँक म्हणून ही बँक कार्य करते. जिल्ह्यातील सर्व सहकारी संस्थांना जिल्हा मध्यवर्ती बँकेत खाती उघडावी लागतात. राज्य सरकारी बँकेकडून उपलब्ध झालेला कर्जपुरवठा या बँकेमार्फत प्राथमिक सह संस्थांना उपलब्ध होतो. या संस्थांच्या वतीने रकमा भागविणे, त्यांच्या रकमा स्वीकारणे, धनादेशाची वसुली करणे, अधिकर्ष सवलत देणे, पैशाचे स्थानांतर करणे इत्यादी कार्ये केली जातात.

**८) राज्य सरकारी बँक म्हणून कार्य करणे :**

ही बँक जिल्हा पातळीवर राज्य सरकारची बँक म्हणून कार्य करते. या बँकेत जिल्हा परिषद, पंचायत समित्या, सहकार खाते, शैक्षणिक संस्था इत्यादींची खाती सक्तीने उघडावी लागतात. सरकारी अनुदान प्राप्त संस्थांची खाती या बँकेत असल्याने तेथील कर्मचाऱ्यांचा

पगार या बँकेमार्फत केला जातो. सरकारचे आर्थिक व्यवहार ट्रेझरीमार्फत होत असले तरी काही बाबतीत मध्यवर्ती बँक ही राज्य सरकारची बँकर म्हणून कार्य करते.

**९) तारणावर कर्जपुरवठा :**

शेतमालाच्या तारणावर खरेदी-विक्री सहकारी संस्था व औद्योगिक संस्थांना ही बँक कर्ज देते. प्राथमिक संस्थांना व व्यक्तींना सोन्या-चांदीच्या दागिन्यांच्या तारणावर ही बँक कर्जपुरवठा करते.

**१०) ग्राहक सेवा :**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत सहकारी संस्थांशिवाय सामान्य व्यक्तींना आपली खाती उघडता येतात. या बँका आपल्या ग्राहकांना बँकिंगच्या सर्व सेवा उपलब्ध करुन देतात. उदा. ठेवी स्विकारणे, कर्ज देणे, याचबरोबर विजेची बिले भरणे, विमा हप्ता भरणे, ग्राहकांसाठी शेअर्स व रोख्यांची खरेदी-विक्री करणे, सुरक्षित खणांची सोय पुरविणे, त्यांच्या रकमांचे स्थानांतर करणे, चेक ड्रापांट इ. रक्कम जमा करणे अशा स्वरूपाच्या ग्राहक सेवा पुरविल्या जातात.

**११) आर्थिक परिस्थितीचा अभ्यास :**

जिल्ह्यातील आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करून तो राज्य सहकारी बँकेला कळविला जातो. त्यामुळे सहकारी धोरणांची अंमलबजावणी या बँकेकडून होते.

**९) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कार्यातील दोष / उणिवा :**

आपल्या देशामध्ये जिल्हा सहकारी बँकांची वाढ मोठ्या संख्येने झालेली असली तरी यामध्ये गुणात्मकतेचे प्रमाण फारच कमी आहे. त्यामुळे त्यांच्या कार्यात पुढील दोष दिसून येतात.

**१) दोषयुक्त कर्जव्यवहार :**

बऱ्याच ठिकाणी जिल्हा बँका या राज्य सहकारी बँका व रिझर्व्ह बँक यांनी ठरवून दिलेल्या सुरक्षिततेच्या तत्त्वाचे पालन करीत नाहीत. त्यामुळे त्यांची अनेक कर्जे बुडण्याची भीती असते. मध्यवर्ती बँकांनी मोठ्या कर्जाची रक्कम काही व्यक्तिगत कर्ज म्हणून दिली आहेत. त्यामुळे खऱ्या उद्देशाने प्राथमिक सहकारी संख्यांना योग्य प्रमाणात त्या कर्ज पुरवू शकल्या नाहीत.

**२) कर्जवाटपात असमतोल :**

अनेक ठिकाणी जिल्हा बँका काही भागातील संस्थांना अधिक कर्जपुरवठा करतात, तर काही भागांतील संस्थांना कमी कर्जपुरवठा करतात. त्यामुळे सहकारी चळवळीत असमतोल निर्माण होतो. प्रादेशिक विषमता निर्माण होते.

**३) नियोजनाचा अभाव :**

कोणत्या क्षेत्राला किती कर्जपुरवठा करावा, त्या क्षेत्रातील आर्थिक गरज किती आहे. प्रत्येक तालुक्यासाठी किती कर्ज द्यावे या बाबतच्या नियोजनाचा अभाव आढळतो. सहकारी संस्थेची कुवत, परतफेडीची क्षमता, प्रगतीची वाटचाल, संचालक मंडळाचा प्रामाणिकपणा व कार्यपद्धती इत्यादींबाबत चौकशी न करता कर्ज व्यवहार केल्याने कर्ज बुडण्याचा धोका असतो.

**४) भांडवलाची कमतरता :**

अनेक मध्यवर्ती बँकांकडे पुरेसे भांडवल असत नाही. त्यामुळे त्यांना कर्ज पुरवठ्याचे कार्य कार्यक्षमरीत्या करता येत नाहीत. आपल्या जिल्ह्यातील पतसंस्थांची गरज भागविता येत नाही. स्वत:ची साधनसामग्री उभारण्यात त्या अयशस्वी झाल्या आहेत.

**५) ठेवींकडे दुर्लक्ष :**

व्यापारी बँकांप्रमाणे ठेवी गोळा करण्यात या बँका फारशा यशस्वी झालेल्या नाहीत. व्यक्तिगत ठेवीकडे फार दुर्लक्ष होते. या बाबतीत बँकांची उदासीनता दिसून येते.

**६) जमिनीचे मूल्यमापन करण्याची चुकीची पद्धती :**

बऱ्याच वेळा जमिनीच्या तारणावर मध्यम मुदतीचे कर्ज दिले जाते. अशा प्रकारचे कर्ज कमी असले तरी त्याच जमिनीच्या तारणावर अन्य संस्थांकडून कर्ज घेता येत नाही. प्रत्यक्षात दिलेले कर्ज अपुरे असते.

**७) पक्षपातीपणा व राजकारण :**

या बँकांकडून कर्ज मंजूर करताना पक्षपाती धोरण अवलंबिले जाते. कारण जिल्हा सहकारी बँक ही राजकीय पक्षाचे अड्डे बनले आहेत. त्यामुळे पात्र व गरजू व्यक्ती ही अट न राहता पक्षांची किंवा पक्षातील लोकांची शिफारस ही अट दिसून येते. त्यामुळे नको त्या अपात्र व्यक्तींनासुद्धा कर्ज दिले जाते.

**८) कर्जमंजुरीस विलंब :**

सभासद प्राथमिक पतपुरवठा संस्थेकडे कर्जाची मागणी करणारे अर्ज करतात. प्राथमिक संस्था मध्यवर्ती सहकारी बँकेकडे ते अर्ज पाठविते. पीक कर्जाच्या अर्जांची छाननी करून शिफारस करण्यास विलंब होतो. पगारी नोकर या विलंबास कारणीभूत ठरतात. कर्ज प्रकरणे निकालात काढण्याऐवजी त्या बाबत उदासीनता दिसून येते.

**९) अकार्यक्षम व्यवस्थापन :**

इतर व्यापारी बँकांच्या तुलनेने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे व्यवस्थापन अकार्यक्षम आढळते. अप्रशिक्षित कर्मचारी वर्ग, नोकरभरतीत वशिलेबाजी, अपुरे ज्ञान व अनुभव, शिस्तीचा अभाव, राजकीय दडपण इत्यादींमुळे या बँकांचे व्यवस्थापन अकार्यक्षम आढळते.

**१०) संचालक मंडळाची दोषपूर्ण रचना :**

वर्षानुवर्षे या बँकांचे संचालक मंडळ तेच असते. नवीन व्यक्तींना संचालक मंडळावर काम करण्याची संधी मिळत नाही. सहकार क्षेत्राचा अभ्यास, बँकिंगचे ज्ञान, प्रामाणिकपणा, व्यवहार तत्परता अशा व्यक्तींना या संचालक मंडळात स्थान असत नाही. त्यामुळे सहकारी चळवळीचे नुकसान होते.

**११) सहकारी चळवळीकडे दुर्लक्ष :**

राज्य सहकारी बँक व प्राथमिक सहकारी पतपुरवठा संख्या यांना जोडणारा दुवा म्हणून या बँका काम करत असल्या तरी जिल्ह्यातील श्रमिक सहकारी संस्था, दूध उत्पादक संस्था यांसारख्या अनेक इतर सहकारी संस्थांकडे जिल्हा बँका आस्थेने लक्ष देत नाहीत. त्यामुळे ग्रामीण भागातील सहकारी चळवळीतून आमूलाग्र बदल घडवून आणणाऱ्या संस्थांना आपल्या व्यवहारासाठी अन्य बँकांचे सहकार्य घ्यावे लागते.

**१२) राखीव निधीचा अयोग्य वापर :**

या बँकांकडून राखीव निधीचा वापर कार्यकारी भांडवलासाठी केला जात असल्यामुळे अडचणीच्या वेळी बँक धोक्यात येते.

**१३) कर्जपुरवठा व नियंत्रण यात फारकत :**

प्राथमिक सहकारी पतसंस्थेला कर्जपुरवठा करणे, तिच्या कार्यावर देखरेख ठेवून नियंत्रण करणे अशी कार्ये करावी लागत असल्याने त्यांच्याकडून बँकिंगविषयक मुख्य कार्याकडे दुर्लक्ष होते.

**१४) थकबाकी :**

देशातील सर्व जिल्ह्यांतील या बँकांचे थकबाकीचे प्रमाण सातत्याने वाढते आहे. सदोष कार्यपद्धती, नियोजनाचा अभाव, स्थानिक राजकीय दडपण, व्यक्तिगत कर्जपुरवठा, अपात्र व्यक्तींना कर्जपुरवठा इत्यादी कारणांमुळे कर्जवसुलीत अडथळे निर्माण होतात. बँकांची थकबाकी वाढत जाते. नाबार्ड व राज्य सहकारी यांची थकबाकीची वसुली विचारात घेऊनच नवीन कर्ज देत असतात. प्रत्येक वर्षी वाढती थकबाकी लक्षात घेऊन जिल्हा बँकांना मिळणारी कर्जाची रक्कमही कमी कमी होत जाते. परिणामी प्राथमिक संस्थांना योग्य तो कर्जपुरवठ्यास जिल्हा बँका असमर्थ ठरतात.

**दोष दूर करण्यासाठी उपाय :**

**१) भांडवलात वाढ :**

भांडवलाच्या बाबतीत स्वयंपूर्ण होणाऱ्या दृष्टीने या बँकांनी भाग व कर्जरोखे विक्रीस काढून भांडवलात वाढ करावी. सभासदांकडून आणि संस्थांकडून अधिक ठेवी जमा करून कार्यकारी भांडवलात वाढ करावी.

munotes.in

**२) ठेव योजना :**

व्यापारी बँकांप्रमाणे मध्यवर्ती सहकारी बँकांनी नावीन्यपूर्ण अशा ठेव योजना सुरू कराव्यात. ठेवीदारांना, सभासदांना आणि एकूण ग्राहकांना तत्पर सेवा पुरवून आकर्षित करावे. त्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न आवश्यक आहेत.

**३) समतोल कर्जवाटप :**

जिल्ह्यातील सर्व भागांचा व सर्व संस्थांचा समतोल विकास होईल असे कर्ज वाटपाचे धोरण अवलंबिले पाहिजे. कर्जपुरवठा वेळेवर होईल याकडे अधिक लक्ष दिले पाहिजे. तसेच प्राथमिक संस्थांची कार्यक्षमता विचारात घेऊन त्यांना योग्य प्रमाणात कर्जपुरवठा झाला पाहिजे.

**४) नियोजनाची आवश्यकता :**

जिल्ह्यातील पतसंस्थांची व त्यांच्या गरजांची पाहणी करून पतपुरवठ्याचे योग्य नियोजन केले पाहिजे. त्यामुळे प्राथमिक संस्था आपल्या सभासदांची गरज वेळेवर पूर्ण करू शकतील. पतपुरवठ्याचे योग्य नियोजन झाल्यास पतपुरवठ्याच्या कामात शिस्तबद्धता येईल.

**५) दुर्बल जिल्हा मध्यवर्ती बँकांचे पुनर्वसन :**

दुर्बल, कमकुवत व आजारी मध्यवर्ती बँकांचे योग्य त्या पातळीवर पुनर्वसन करावे. या बँकांनी पुरेशी रोख रक्कम जवळ ठेवावी, असे प्रयत्न राज्य सहकारी बँकेकडून व्हावेत.

**६) प्रशिक्षण :**

या बँकांत कुशल व तज्ज्ञ अधिकारी वर्ग नेमावा. नोकरवर्गाला योग्य ते प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करावी. बँकेने आपले संचालक व कार्यकारी अधिकारी यांनाही व्यवस्थापकीय व तांत्रिक प्रशिक्षण देण्याची सोय करावी. त्यामुळे बँकेची कार्यक्षमता वाढण्यास मदत होईल.

**७) विनाविलंब निर्णय :**

बँकेने कर्ज प्रकरणे विनाविलंब निकालात काढली पाहिजेत. त्यासाठी ठराविक मुदत निश्चित करण्यात यावी. तसेच मंजूर केलेल्या कर्जाचे त्वरित वाटप व्हावे.

**८) कर्ज वसुलीवर भर :**

सुगीच्या हंगामानंतर योग्य वेळी कर्जवसुली होईल याकडे बँकेने लक्ष द्यावे. प्राथमिक सहकारी संस्था, खरेदी-विक्री संस्था व प्रक्रिया संस्था यामध्ये योग्य समन्वय साधल्यास थकबाकीचे प्रमाण कमी करता येईल. परंतु त्या दृष्टीने प्रयत्न होणे गरजेचे आहे.

munotes.in

### ९) तपासणी व नियंत्रण :

प्राथमिक सहकारी संस्थांची तपासणी करून कर्जवाटप केल्यास व कर्जाच्या वाटपावर योग्य नियंत्रण घातल्यास कर्जाचा उपयोग उत्पादक कार्यासाठी होईल आणि थकबाकीचे प्रमाण घटेल.

### १०) बिगर राजकीय कार्य :

जिल्हा बँका राजकीय पक्षांचे अड्डे आहेत. ह्या विधानात बदल करणे हे त्या त्या राजकीय पक्षांनीच याचा अभ्यास करून जिल्हा बँक ही सहकारी चळवळीचा अड्डा बनली पाहिजे. त्याचप्रमाणे राजकीय पक्ष बाजूला ठेवून बँकिंग सहकारी क्षेत्र पवित्रच ठेवले पाहिजे. या ठिकाणी योग्यतेनुसार कार्य घडले तरच सहकारी चळवळ फुलेल.

### आपली प्रगती तपासा :

१. प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थांतील दोष सांगा.

२. जिल्हा सहकारी बँकेची उद्दिष्टे सांगा.

## ६.८ राज्य सहकारी बँका

### १. प्रास्ताविक :

राज्य सहकारी बँकांना शिखर सहकारी बँका असेही म्हणतात. भारतातील सहकाराची संरचना संघीय पद्धतीची असून राज्य, जिल्हा व गाव पातळीवर, त्रिस्तरीय पद्धतीवर आधारलेली आहे. राज्य पातळीवरील शिखर संस्था जिल्हा पातळीवरील संस्थावर नियंत्रण व देखरेख ठेवीत असते. तर जिल्हा पातळीवरील संस्था गाव पातळीवरील संस्थांच्या बाबतीत हेच काम करीत असतात. सहकारी पतपुरवठ्याच्या बाबतीत राज्य सहकारी बँक ही राज्य पातळीवरील सर्वोच्च संस्था समजली जाते. सहकारी संस्थांच्या पिरॅमिडसारख्या रचनेत शिरभागी ती काम करीत असल्यामुळे तिला शिखर बँक असेही म्हटले जाते. सरकारी, रिझर्व्ह बँक, मध्यवर्ती सहकारी बँका आणि प्राथमिक सहकारी बँका व ग्रामीण सहकारी पतपुरवठा संस्था यांना जोडणारा दुवा म्हणून राज्य सहकारी बँकेकडे पाहिले जाते. देशभर पसरलेल्या प्राथमिक सहकारी बँका व देशातील भांडवली बाजार यांच्यात दुवा साधण्याचे महत्त्वाचे कार्य ही बँक करीत असते. हंगामी स्वरूपाचे किंवा तात्कालिक अधिक प्रमाणात जवळ असलेले भांडवल एका क्षेत्राकडून दुसऱ्या गरजू क्षेत्राकडे वळविण्याचे कार्य करून उपलब्ध भांडवलाचा जास्तीतजास्त उत्पादक रीतीने वा◌ापर करण्याचे व समतोल विकास साधण्याचे कामही ती करीत असते.

### २) राज्य सहकारी बँकेची आवश्यकता :

भारतातील सहकारी चळवळीच्या प्रारंभिक टप्प्यातच राज्य सहकारी बँकेची आवश्यकता भासू लागली होती. १९१४ च्या मॅक्लगन समितीने अशा शिखर बँकांची गरज सांगून त्यांच्या स्थापनेसंबंधात शिफारस केल्या होत्या. राज्यातील निरनिराळ्या सहकारी संस्थांच्या कामात सुसूत्रता व समन्वय आणण्यासाठी व मध्यवर्ती सहकारी बँकांच्या

munotes.in

कामावर योग्य ते नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य सहकारी बँकेची गरज आहे असा निष्कर्ष या समितीने काढलेला होता. अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समितीनेही असाच निष्कर्ष काढला होता. त्यानुसार भारतात अनेक राज्यांतून राज्य सहकारी बँका स्थापन करण्यात आल्या. स्वातंत्र्योत्तर काळात व बँका सहकारी चळवळीच्या विकासास चांगला हातभार लावीत आहेत.

**राज्य सहकारी बँकांचे उद्दिष्टे :**

श्री जे.पी. नियोगी यांच्या मते. "भांडवलाचे एकत्रीकरण करून निरनिराळ्या क्षेत्रांमध्ये आवश्यकतेप्रमाणे निधी खेळवून तेथील मागासलेपणा दूर करून विकासाला चालना देणे व संपूर्ण राज्यातील सहकारी क्षेत्राचा समतोल विकास घडवून आणणे या उद्देशाने राज्य सहकारी बँक आपले काम करीत असते." यावरून राज्य सहकारी बँकेच्या उद्दिष्टांचे सविस्तर स्पष्टीकरण आपणास पुढीलप्रमाणे देता येईल.

**१) सहकारी चळवळीचे नेतृत्व करणे :**

सहकारी चळवळीचा मुख्य उद्देश आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना सहकारी माध्यमातून आर्थिक साहाय्य उपलब्ध करणे व त्याद्वारे त्यांचा आर्थिक विकास साधणे हा असतो. राज्य सहकारी बँक ही राज्य पातळीवरील सहकारी चळवळीतील शिखर बँक असल्यामुळे या उद्देशाची सफलता ही तिची जबाबदारी असते. राज्यातील सहकारी चळवळीला आर्थिक साहाय्य उपलब्ध करणे, तिला मार्गदर्शन करून तिच्या विकासाची दिशा ठरविणे, तिच्यावर नियंत्रण ठेवणे ही कामे तिला करावी लागत असल्यामुळे सरकारी चळवळीच्या नेतृत्वाची धुरा तिला स्वीकारावी लागते. राज्य सरकारी मध्यवर्ती सहकारी बँका, सहकारी संस्था, कारखाने इत्यादींना धोरणात्मक नेतृत्व देणे हा तिचा प्रमुख उद्देश बनतो.

**२) सहकार धोरणात समन्वय साधणे :**

राज्याच्या सहकारी चळवळीतील शिखर संस्था या नात्याने काम करीत असताना अशा बँकेला राज्यातील विविध क्षेत्रांतील उदा. ग्रामीण, नागरी, कृषी, औद्योगिक वगैरे क्षेत्रातील आर्थिक धोरणात विशेषत: कर्जपुरवठ्याच्या धोरणास योग्य तो समन्वय साधावा लागतो. सहकारी चळवळीतील अर्थपुरवठ्यावर प्रभावी नियंत्रण ठेवले हा तिच्या कामाचा महत्त्वाचा भाग असतो.

**३) मध्यवर्ती सहकारी बँकांच्या कार्यात समन्वय साधणे :**

जिल्हा पातळीवरील मध्यवर्ती सहकारी बँकांच्या कामात सुसूत्रता आणून त्यांच्यात आर्थिक संतुलन निर्माण करणे हाही राज्य सहकारी बँकेचा प्रमुख उद्देश आहे. दुर्बल मध्यवर्ती सहकारी बँकांना सक्षम करणे, त्यासाठी त्यांना आर्थिक साहाय्य देणे व त्यांच्यातील असमतेची दुरी कमी करून त्यांचा समान विकास साधणे, त्यासाठी आर्थिक साधनांची फेरजुळणी करणे, मध्यवर्ती बँकांच्या कारभारावर नियंत्रण व देखरेख ठेवून त्यांना सर्व प्रकारचे मार्गदर्शन करणे ही राज्य सहकारी बँकेची जबाबदारी असते.

**४) राज्याला साहाय्य :**

राज्य सरकारला आपले पतपुरवठा धोरण ठरविताना सहकारी चळवळीतील पतपुरवठाविषयक धोरण ठरविण्यासाठी राज्य सहकारी बँक सल्ला देऊ शकते. सहकारी चळवळीतील संघ संस्था या नात्याने त्या तज्ज्ञ अनुभवाचा लाभ राज्य सरकारला आपले पतविषयक धोरण ठरविताना होत असतो.

**५) वित्तीय संतुलन साधने :**

मध्यवर्ती सहकारी बँकांच्या कार्यात संतुलन साधून प्राथमिक सहकारी पतसंस्थांचा नाणे व भांडवल बाजारांशी तसेच रिझर्व्ह बँकेशी अप्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करणे हा राज्य सहकारी बँकेचा उद्देश असतो. राज्यातील सर्व स्तरांतील वित्तीय संस्थांचा, विकसित होणाऱ्या नाणेबाजारांशी व अप्रत्यक्षरीत्या रिझर्व्ह बँकेशी संबंध जोडून आर्थिक विकासाला योग्य प्रकारे चालना देणे हा तिच्या कार्यातील एक महत्त्वाचा भाग आहे. सहकारी क्षेत्रातील भांडवलाचा ओघ आवश्यक त्या क्षेत्राकडे वळवून अशा भांडवलाचा उपयोग आर्थिक विकासासाठी करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो.

**४) कार्यक्षेत्र :**

प्रत्येक राज्यासाठी एक राज्य सहकारी बँक अल्प व मध्यम मुदतीचा कर्ज पुरवठा करण्यासाठी स्थापन झालेली असते. १९८०-९० या दशकापर्यंत देशात २८ राज्य सहकारी बँका अस्तित्वात होत्या. त्यांनी आपल्या शाखाही सुरू केल्या आहेत. परंतु काही राज्यात उदा. मध्य प्रदेश, पंजाब, आंध्र इ. प्रदेशांतून एकापेक्षा जास्त राज्य सहकारी बँका असल्याचे दिसून येते.

**५) सभासदत्व :**

सर्वसाधारणपणे सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका राज्य सहकारी बँकेचे सभासद असतात. त्याचप्रमाणे राज्य पातळीवर कार्य करणाऱ्या इतर प्रकारच्या सहकारी संस्थादेखील राज्य सहकारी बँकेचे सभासद असतात. आताच्या विचारसरणीप्रमाणे कोणत्याही व्यक्तीला राज्य सहकारी बँकेचे सभासद होता येत नाही. परंतु जुन्याकाळी किंवा फार पूर्वीपासून काही व्यक्ती राज्य सहकारी बँकेच्या सभासद होत्या. त्या व्यक्तींचे सभासदत्व रद्द केले नाही. परंतु त्यांची संख्या मात्र अल्प होती.

**६) व्यवस्थापन :**

राज्य सहकारी बँकेचे व्यवस्थापन राज्य सहकारी बँकेच्या सभासदांनी निवडलेल्या संचालक मंडळाकडे असते. संचालक मंडळ राज्य सहकारी बँकेचा कारभार पाहते. धोरण ठरविते. राज्य सहकारी बँकेच्या संचालक मंडळावर सरकारला किमान ३ किंवा एकूण संचालकांच्या १/३ इतके संचालक नियुक्त करता येतात.

**७) भांडवल उभारणी :**

राज्य सहकारी बँकांना लागणारे भांडवल साधारणत: पुढील मार्गांनी उभे केले जाते.

**१) भागांची विक्री :**

भांडवल उभारणीसाठी राज्य सहकारी बँका भाग विक्रीस काढतात. सर्वसाधारणपणे व्यक्तींना हे भाग विकत घेता येत नाहीत. राज्यातील सहकारी संस्थांना हे भाग विकत घेता येतात. बँकेच्या अधिकृत भांडवलाचे भाग राज्य सहकारी बँकांच्या सभासद बँका, राज्य पातळीवरील इतर सर्वोच्च संघ आणि राज्य सरकार यांच्याकडून खरेदी केली जाऊन बँकेला भांडवल पुरवले जाते.

**२) कर्जरोख्यांची विक्री :**

भांडवलाच्या आवश्यकतेनुसार राज्य सहकारी बँका कर्ज रोखे विक्रीस काढू शकतात. असे कर्जरोखे सामान्यपणे राज्य सरकार व मध्यवर्ती सहकारी बँकांकडून खरेदी केले जातात.

**३) ठेवी :**

सभासद बँका म्हणजे मध्यवर्ती सहकारी बँका व इतर सहकारी संस्थांच्या ठेवी राज्य सहकारी बँकात जमा असतात. त्यांचाही उपयोग भांडवल म्हणून होत असतो.

**४) कर्जे :**

राज्य सहकारी बँकांकडून किंवा इतर व्यापारी बँकांकडून कर्ज मिळवून भांडवल जमा केले जाते. राज्य सरकारकडूनही आवश्यक वाटल्यास कर्ज घेतले जाते. रिझर्व्ह बँकेकडून सवलतीच्या दराने कर्ज मिळवून किंवा स्टेट बँक, अर्थपुरवठा महामंडळ इत्यादी संस्थाकडून कर्ज घेऊनही भांडवल उभे केले जाते. जागतिक बँकेकडूनही कर्ज मिळविले जाते.

**५) राखीव निधी :**

बँका आपल्या नफ्याचा काही भाग राखीव निधीमध्ये जमा करीत असतात. नंतर अशा राखीव निधीचा भांडवल म्हणून उपयोग करता येतो.

वरील सर्व विवेचनाबरोबरच राज्य सहकारी बँकांच्या भागभांडवल उभारणीत राज्य सरकारांचा वाटा फार मोठा असतो.

**८) राज्य सहकारी बँकांची प्रमुख कार्ये :**

राज्य सहकारी बँकांची उद्दिष्टे पाहतानाच त्यांच्या कार्याची रूपरेषा आपणास दिसून येते. कारण उद्दिष्टांतूनच संस्थेची कामे होत असतात. त्यानुसार राज्य सहकारी बँकांची कार्ये पुढीलप्रमाणे आहेत.

**१) सहकारी बँकांची बँक म्हणून काम करणे :**

राज्य सहकारी बँक मध्यवर्ती सहकारी बँकांची बँक म्हणून काम करते. व्यक्ती आणि रिझर्व्ह बँकेकडून कर्ज घेऊन तो पैसा मध्यवर्ती सहकारी बँकांना व इतर प्रकारच्या सहकारी संस्थांना कर्जरूपाने देते. ठेवरूपाने जमा झालेला पैसा आणि रिझर्व्ह बँक व स्टेट बँककडून कर्जरूपाने मिळविलेला पैसा कर्ज देण्यासाठी तिच्याकडून वापरला जातो. मध्यवर्ती

सहकारी बँकांना अल्प व मध्य मुदतीची कर्जे राज्य सहकारी बँकेकडून दिली जातात. त्यानंतर मध्यवर्ती बँक प्राथमिक सहकारी पतसंस्थांना व प्राथमिक सह संस्था आपल्या सभासद शेतकऱ्यांना देतात.

**२) पैशाचा पर्याप्त वापर करणे :**

राज्य सहकारी बँक ज्या जिल्हा बँकांकडे पैसा शिल्लक आहे. त्यांच्याकडून तो कर्जाऊ घेते व ज्या जिल्हा बँकांना पैशाची गरज आहे त्यांना कर्जाऊ देते. यामुळे देशातील भांडवलाचा पर्याप्त वापर राज्य सहकारी बँक करते.

**३) दुवा म्हणून काम करणे :**

राज्यातील सहकारी बँका, देशाचा नाणेबाजार व रिझर्व्ह बँक यांना जोडणारा दुवा म्हणजे राज्य सहकारी बँक होय. या द्वारे ती राज्यातील सहकारी संस्थांशी आर्थिक हितसंबंध प्रस्थापित करीत असते.

**४) बँकिंग सेवा पुरविणे :**

राज्यातील मध्यवर्ती सहकारी बँकांना व इतर सहकारी संस्थांना बँकिंग सेवा पुरविण्याचे महत्त्वाचे कार्य या बँकेला करावे लागते. रकमांचे स्थानांतर करणे, कोणत्याही सहकारी संस्थेच्या सभासदाने बँकेमार्फत विक्रीस आणलेल्या मालाच्या तारणावर कर्जाऊ रक्कम देणे किंवा त्याला ओव्हर ड्रापोंट देणे, जंगल मालाच्या तारणावर कर्जाऊ रक्कम देणे, सरकारने स्वीकृत केलेल्या संस्थांचे कर्जरोखे विकत घेणे किंवा विक्रीसाठी एजंट म्हणून काम करणे, राज्यातील सहकारी संस्थांची यंत्रसामग्री, अवजारे खते किंवा केंद्र सरकारने आयातीचे परवाने दिले असतील तर वस्तूंच्या खरेदीसाठी व आयातीसाठी पतपत्र किंवा हमीपत्र देणे, नोंदणी अधिकाऱ्यांच्या परवानगीने राज्य सरकार, स्थानिक संस्था किंवा राज्यातील इतर बँका यांचा एजंट म्हणून काम करणे.

**५) नेतृत्व करणे :**

जिल्हा सहकारी बँका आणि इतर क्षेत्रांतील सर्वोच्च सहकारी संघटनावर देखरेख ठेवीत असताना राज्य सहकारी बँक त्यांचा मित्र, मार्गदर्शक व तत्त्वज्ञ म्हणून कार्य करावे लागते, त्यामुळे नेतृत्वाची धुरा ही साहजिकच तिलाच सांभाळावी लागते. सहकारी चळवळीच्या विकासासाठी विविध योजना आखल्याचे व त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य सरकारला मदत करीत असते. मध्यवर्ती सहकारी बँकांची तांत्रिक व व्यवस्थापकीय सल्ला देणे, त्यांचे आर्थिक व्यवहार, भांडवल, साठवणूक, खरेदी-विक्री इत्यादींबाबतचे प्रश्न सोडविण्यात त्यांना मदत करणे, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर सहकारी बँकांचे प्रतिनिधित्व करणे, राज्यातील सहकारी चळवळीचे निकोप व जलद गतीने विकास साधणे इत्यादी कामे करून ती राज्यातील सहकारी चळवळीचेही नेतृत्व करीत असते.

**९) राज्य सहकारी बँकेच्या समस्या व मर्यादा :**

राज्य सहकारी बँकेपुढील समस्या व बँकेच्या मर्यादा याबाबत पुढीलप्रमाणे मांडणी करता येईल.

**१) अपुऱ्या ठेवी :**

काही राज्य सहकारी बँका पुरेशा प्रमाणावर ठेवी गोळा करण्यात अपयशी ठरल्या आहेत. सभासद बँका, सहकारी संस्था व ज्या राज्यात व्यक्तिगत ठेवी स्वीकारल्या जातात, तेथील व्यक्ती सभासद यांच्या कडून त्या पुरेशा प्रमाणावर ठेवी आकृष्ट करू शकत नाहीत. साहजिकच अपुऱ्या भांडवलामुळे त्यांची आर्थिक स्थिती भक्कम होऊ शकत नाही.

**२) अपुरी देखरेख व्यवस्था :**

राज्य सहकारी बँकांनी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांवर सतत देखरेख करावी व त्यांना व्यवहाराबाबत मार्गदर्शन करावे अशी अपेक्षा आहे. परंतु राज्य सहकारी बँकांकडे योग्य तो व योग्य तेवढा प्रशिक्षित नोकरवर्ग उपलब्ध नाही. म्हणून मध्यवर्ती सहकारी बँकांवर पुरेसे नियंत्रण ठेवण्यात राज्य सहकारी बँका अपयशी ठरल्या आहेत.

**३) हिशेबातील वर्गवारी :**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी काही बाबतीत कर्जफेड न होता त्यांची परतफेड झाल्याचे व त्याच व्यक्तींना परत नवीन कर्ज दिल्याची नोंद केलेली आहे व केली जात आहे. प्रत्यक्ष कर्जफेड न होता केवळ एका खात्यावरून दुसऱ्या खात्यावर आकडे फिरवून जे व्यवहार दाखविले जातात. त्यावर राज्य सहकारी बँकेने पूर्णपणे नियंत्रण ठेवलेले दिसून येत नाही.

**४) सदोष कर्जव्यवहार :**

राज्य सहकारी बँकांनी आपली कर्जपद्धत आखली आहे. रिझर्व्ह बँकेच्या सूचना विचारात न घेता काही कर्ज काही व्यक्तींना दिली गेली. अनावश्यकपणे काही सहकारी संस्थांनी भांडवल खरेदी केले. तर प्राथमिक सहकारी संस्थांना स्वत: राज्य सहकारी बँकेने कर्जाऊ रक्कम दिली.

**५) वाढती थकबाकी :**

राज्य सहकारी बँकांची थकबाकी हा चिंतेचा प्रश्न आहे. कारण थकबाकीचे प्रमाण वाढले नसते तरी थकबाकी ही कायमस्वरूपी आहे. या थकबाकीमुळे एकूण थकबाकीमध्ये वाढ होत आहे. या थकबाकीच्या वसूलीसाठी राज्यसरकार फारसे प्रयत्न करतांना पहावयास मिळत नाही.

**६) कार्यपद्धती दोष :**

राज्य सहकारी बँका मध्यवर्ती सहकारी बँकेला दिलेल्या कर्जाच्या वापरावर, वसुलीवर पूर्ण नियंत्रण ठेवू शकल्या नाहीत. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची कार्यक्षमता मर्यादित आहे. त्यांच्या कर्जव्यवहारात दोष आहेत हे माहीत असूनसुद्धा जिल्हा मध्यवर्ती बँकांना कर्जे दिली गेली.

**७) राजकीय हस्तक्षेप :**

राज्य सहकारी बँकेवर पक्षीय राजकारणाचा प्राभाव मोठा आहे. त्यामुळे आपल्या पक्षातील व्यक्तींना / कार्यकर्त्यांना / नेतृत्वांना विविध सहकारी संस्थांसाठी कर्ज देणे, त्यांची वसुली न करणे, ते उद्योग आजारी दाखविणे इ. अनेक राजकीय हस्तक्षेप होत असतात. त्याचा परिणाम एकूणच राज्य सहकारी बँकेवर होताना पाहावयास मिळतो.

**१०) उपाययोजना :**

**१) शाखा विस्तार :**

जर मध्यवर्ती सहकारी बँक प्राथमिक सहकारी संस्थांना योग्य प्रमाणात कर्ज पुरविण्यास निष्क्रिय आढळली, तर त्या ठिकाणी राज्य सहकारी बँकेने शाखा उघडून ते कार्य हाती घ्यावे. मध्यवर्ती सहकारी बँका स्थापन झाल्यावर त्यांच्याकडे नंतर ते कार्य सोपवावे.

**२) सभासदत्व :**

कोणत्याही व्यक्तीला वैयक्तिक पातळीवर सहकारी बँकांचे सदस्यत्व देऊ नये. असलेले सभासदत्व रद्द करावे.

**३) सेवक वर्ग :**

राज्य सहकारी बँकेत प्रशिक्षित सेवक वर्ग नेमला जावा व असलेल्या सेवकांना योग्य ते प्रशिक्षण द्यावे.

**४) शिक्षा :**

जे सभासद आपल्या हिशेबाच्या व्यवहाराबाबत तपासणी किंवा देखरेखीसंबंधी योग्य ती माहिती पुरवीत नाहीत, त्यांच्या प्रशासकीय सवलती राज्य सहकारी बँकेने काढून घ्याव्यात.

**५) देखरेख कार्य :**

राज्य सहकारी बँकेने आपल्या शाखांवर, आपल्या कार्यपद्धतीवर आणि कार्याबाबत कडक देखरेख करून सुधारणा करावी.

**६) इतर उपाय :**

राजकीय हस्तक्षेप कमी करून खऱ्या अर्थाने सहकारी चळवळ विकसित करण्यासाठी राज्यकर्त्यांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. कर्जरचनेची सतत सुधारणा करून, धोरण आखून त्याची अंमलबजावणी करावी. थकबाकी कमी करण्यासाठी योजनाबद्ध कार्यक्रम आखावा व आपल्या सेवकांची कार्यक्षमता वाढवावी.

**आपली प्रगती तपासा**

१) राज्य सहकारी बँकेची उद्दिष्टे सांगा.

munotes.in

## ६.९ सहकारी वित्तपुरवठ्याचे यशापयश

**सहकार चळवळीचे मूल्यमापन :**

भारतातील सहकारी चळवळ १९०४ मध्ये सुरू झाली व आज तिला जवळजवळ ८८ वर्षे पूर्ण झाली आहेत. ही चळवळ प्रामुख्याने शेतकऱ्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी, ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास घडवून आणण्यासाठी सुरू केली गेली होती. ग्रामीण अर्थव्यवस्थेचे स्वरूप बदलण्यासाठी, सामाजिक, आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी सहकाराशिवाय पर्याय नाही असे अनेक समित्यांनी सांगितले होते व आहे. निकोलसनपासून आजपर्यंत नेमलेल्या विविध समित्यांनी, अभ्यासगटांनी सहकारी चळवळीच्या चांगल्या परिणामांविषयी विश्वास व्यक्त केलेला आहे.

भारतातील सहकारी चळवळ जरी या शतकाच्या प्रारंभी म्हणजे १९०४ साली सुरू झाली असली तरी स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत सहकारी चळवळीने भारतात खऱ्या अर्थाने विकास केला नव्हता. कारण मुख्यत: ही सहकारी चळवळ शेतकऱ्यांना केल्या जाणाऱ्या कर्जपुरवठ्याच्या कार्यापुरतीच मर्यादित होती. बऱ्याचशा संस्था भांडवलाअभावी, ठेवीअभावी आर्थिकदृष्ट्या कमजोर होत्या. त्या पुरेशा प्रमाणावर सभासदांच्या कर्जपुरवठ्याच्या सर्वच गरजा पूर्ण करू शकत नव्हत्या. म्हणून स्वातंत्र्यपूर्वीच्या काळात सहकारी संस्थांचा विकास खऱ्या अर्थाने झालेला नव्हता.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र सहकारी चळवळीकडे सरकारने योग्य ते लक्ष पुरविले. सहकारी चळवळीचा विकास देशातील सर्व भागांतून होण्याकरिता खास प्रयत्न केले. विविध प्रकारच्या संस्था स्थापन करण्याकरिता उत्तेजन दिले गेले. नियोजनकाळातील सहकारी प्रगतीचा अभ्यास केला म्हणजे आपल्या भारतातील एकूण सहकारी चळवळीचे मूल्यमापन केले असे होईल. कारण मूल्यमापनाचा अभ्यास करणे म्हणजे प्रगतीचा, त्यापासून मिळालेल्या फायद्यांचा व त्यात असणाऱ्या दोषांचा अभ्यास करणे असा होतो. या दृष्टीने नियोजनकाळातील सहकाराची प्रगती व भारतातील सहकारी चळवळीचे मूल्यमापन या दोन्हींचा अर्थ एकच लागतो. त्या दोन्हींचा अभ्यास म्हणजे एकाच नाण्याच्या दोन बाजू ठरतात. अशा मूल्यमापनाने भारतात सहकारने बजावलेल्या महत्त्वपूर्ण कामगिरीची कल्पना येईल.

**भारतातील सहकारी चळवळीपासून झालेले फायदे :**

भारतातील सहकारी चळवळीपासून मिळालेल्या फायद्यांचा अभ्यास पुढीलप्रमाणे करता येईल.

अ) आर्थिक फायदे ब) सामाजिक व नैतिक फायदे क) शैक्षणिक फायदे ड) राजकीय फायदे.

**अ) आर्थिक फायदे :**

**१) स्वस्त दराने कर्जपुरवठा :**

सहकारी चळवळ सुरू होण्यापूर्वी शेतकऱ्यांना कर्जासाठी सावकारांवर अवलंबून राहावे लागत असे. सावकारांचा व्याजाचा दर जास्त होता. त्यामुळे सावकाराच्या पाशातून शेतकऱ्यांची सुटका करण्यासाठी सहकारी संस्था स्थापन करून त्यामार्फत शेतकऱ्यांना स्वस्त दराने कर्जपुरवठा केलेला आहे.

**२) सावकारी पाशातून मुक्तता :**

स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी भारतातील शेतकरी सावकारी पाशात अडकलेला होता. या सावकारी पाशातून शेतकऱ्यांना मुक्त करण्याच्या कार्यात सहकारी संस्थांनी महत्त्वाचे कार्य केले आहे.

**३) कर्जाचा योग्य उपयोग :**

पूर्वी शेतकरी सावकाराकडून कर्ज घेत असत, परंतु सावकारांकडून घेतलेल्या कर्जाचा वापर लग्न, मुंज, अंत्यविधी यांसारख्या धार्मिक पण अनुत्पादक कारणांकरिता केला जात असे. पण सहकारी संस्थांनी मात्र हे कर्ज उत्पादक कारणासाठीच वापरले जावे यावर भर दिला जातो. सहकारी संस्था केवळ उत्पादक कारणासाठीच कर्ज पुरविण्यावर भर देत.

**४) आधुनिक शेती तंत्राचा वापर :**

स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत भारतीय शेतीचे एक वैशिष्ट्य म्हणजे भारतीय शेती परंपरागत पद्धतीने व जुन्या अवनाशांच्या साहाय्याने केली जात होती. ट्रॅक्टरसारखी आधुनिक शेतीयंत्रे, सुधारित बी-बियाणे, रासायनिक खते यांचा वापर शेतीत क्वचितच केला जात असे त्याचा परिणाम शेतीतून होणारे उत्पादन कमी असे.

**५) शेतीमालास योग्य किंमत :**

शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य किंमत मिळवून देण्याच्या कार्यात सहकारी संस्थांनी फार महत्त्वाचे कार्य केले आहे. तालुका पातळीवर सर्व शेतकरी एकत्र येऊन शेतमाल सहकारी खरेदी-विक्री संस्था स्थापन करीत. या सहकारी संस्थेला ते आपला माल विकत. सहकारी संस्था मालाचा साठा करून योग्य किंमत आल्यावर विकत. सहकारी संस्थेचा काही फायदा शेतकऱ्यांना दिला जात असे.

**६) ग्रामीण भागातील उद्योजक :**

ग्रामीण भागाचा विकास घडवून आणण्यासाठी औद्योगिक विकासासाठी सहकारी संस्थेने छोटे छोटे उद्योगधंदे स्थापले. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांना रोजगार तर मिळालाच, परंतु फार मोठ्या प्रमाणावर औद्योगिकीकरणाचा पाया घातला गेला. ग्रामीण जनतेचे उत्पन्न वाढले गेले त्यामुळे ग्रामीण भागात एक नवा उद्योजकांचा वर्ग सहकारी संस्थांतून स्थापन झाला.

munotes.in

**७) औद्योगिक कारागिरांना विक्रीविषयक सोयी :**

आर्थिकदृष्ट्या दुबळ्या कारागिरांचा विकास घडवून आणण्यासाठी औद्योगिक सहकारी संस्थांनी महत्त्वाचे कार्य केले आहे. विणकर, चांभार, कलाकुसरीच्या वस्तू बनविणारे कारागीर, कुंभार, कातडी कमाविणारे व कातड्याच्या वस्तू बनविणारे कारागीर इत्यादी.

**८) जीवनावश्यक वस्तूंचे वाटप :**

सहकारी संस्थांची स्थापना होण्यापूर्वी सर्वसामान्य व्यापारी ग्राहकांकडून जास्त किंमत घेऊन नफा मिळवीत होते. व्यापाऱ्यामुळे ग्राहकांची पिळवणूक होत होती. त्यांची सुटका होण्यासाठी सहकारी संस्थांची स्थापना मोठ्या प्रमाणावर केली गेली. ग्राहक सहकारी संस्थांनी टंचाईच्या काळात वस्तूंच्या वाटपाबाबत अत्यंत महत्त्वाचे कार्य केले आहे.

**९) बचत व काटकसरीला उत्तेजन :**

बचत करणे व अपव्यय टाळणे हे सहकाराचे तत्त्व सहकारी संस्थेने मान्य करून ग्रामीण भागातील लोकांच्या बचतीला विशेष उत्तेजन दिलेले आहे. तसेच सभासदांना कर्ज देत असताना काटकसरीचे महत्त्व पटवून दिले आहे.

**१०) बँकविषयक सवयीत वाढ :**

ग्रामीण जनतेला बँकांची सवय लागावी, त्यांनी अधिकाधिक प्रमाणात बचत करावी यासाठी सहकारी संस्थांनी प्रयत्न केले आहेत. सहकारी बँकांनी अत्यंत लहान खेड्यात आपल्या शाखा उघडल्या आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांना बँकांमार्फत व्यवहार करण्याची सवय लागली आहे व त्यांनी आपल्या जवळची ठेव बँकेत ठेवावी व चेकने मोठ्या रकमेचे व्यवहार करावेत यासाठी सहकारी बँका प्रयत्न करीत आहेत.

**ब) सामाजिक व नैतिक फायदे :**

१) सहकारी चळवळीमुळे लोकांना एकात्मता, बंधुभाव, सामूहिक जीवन जगण्याची पद्धत, स्वावलंबन इत्यादी गोष्टींचे महत्त्व समजते. त्याद्वारे स्वत:च्या राहणीमानाचा दर्जा उंचावण्यास मदत झाली आहे.

२) सहकारी चळवळीने ज्या क्षेत्रात यशस्वी रीतीने कार्य केले आहे. त्या ठिकाणच्या काही वाईट प्रकारांना आळा बसल्याचे दिसून येते. त्याऐवजी स्वावलंबन व परस्पर सहकार्यामुळे आपले जीवन समृद्ध होते. हे सहकारी चळवळीद्वारा लोकांना समजून आले म्हणून लोकांनी या तत्त्वांचा अवलंब केला.

३) सर्वांनी मिळून एखादे काम केल्यास ते लवकर होते, तसेच त्यांचा फायदा सर्वांना मिळतो हे ओळखून सहकारी चळवळीत भाग घेतल्यामुळे सामाजिक उद्दिष्टे चांगल्या रीतीने पार पाडता येतात. ही गोष्ट शेतकऱ्यांच्या ध्यानी आली व ते सहकारी संस्थेचे सभासद झाले. त्यातूनच स्वत:चे कार्य जबाबदारीने, प्रामाणिकपणे व मेहनतीने पार पाडण्याची भावना सहकारी संस्थांद्वारा सभासदांना निर्माण झाली.

munotes.in

४) सहकारी संस्थेत सभासदांनी भाग घेतल्यामुळे ते एकत्रित काम करतात. त्यामुळे त्यांची एकमेकांतील भांडणे कमी होण्यास मदत झाली आहे. कारण सहकारी चळवळ ही जनतेची, जनतेसाठी व जनतेने चालवली असल्यामुळे ती आपलीच आहेत हे प्रत्येक सभासदास कळल्यामुळे सभासद जातपात, लिंगभेद, प्रांतभेद विसरून एकत्र येतात, एकत्रित कार्य करतात. याबाबतीत सहकारी नियोजन समितीने असे सांगितले आहे की, अनेक खेड्यांत सामाजिक व आर्थिक हितसंघर्ष कमी करण्यासाठी सहकारी चळवळीचा फार मोठा उपयोग झाला आहे.

**क) शैक्षणिक फायदे :**

१) सहकारी संस्था सभासदांना व्यापार पद्धतीतील हिशेबाची सर्वांगीण माहिती पुरवितात. त्यामुळे सभासद अधिक नफा मिळवू शकतो. अधिक नफा मिळाल्याने सभासद सुशिक्षित होण्याचा प्रयत्न करतात.

२) काही सहकारी संस्थांनी सर्वसाधारण व तांत्रिक शिक्षण देण्यासाठी प्रशिक्षण केंद्र उघडली आहेत.

याबाबत डॉ. डर्लिंगने असे मत प्रतिपादन केले आहे की, प्राथमिक सहकारी संस्था म्हणजे ग्रामीण अर्थव्यवहाराचे संघटन आणि नियमन करण्याचे शिक्षण देणाऱ्या प्राथमिक शाळाच आहेत.

**ड) राजकीय फायदे :**

१) सहकारी संस्था या लोकशाहीच्या तत्त्वावर आधारलेल्या असल्यामुळे लोकशाही संस्था कशा प्रकारे चालवाव्यात यांचे शिक्षण सभासदांना मिळते. त्यामुळे लोकशाही बळकट करण्यास हातभार लावला जातो.

२) सरकारने लोकशाहीत आर्थिक नियोजनाचे धोरण स्वीकारले आहे. लोकांनी आर्थिक नियोजनाच्या प्रक्रियेत भाग घ्यावा म्हणून वापरली आहे. त्यामुळे शेतकरी आर्थिक नियोजनात अप्रत्यक्षपणे सहभागी होतात.

३) सहकारी संस्थांमधून स्थानिक नेतृत्व निर्माण होण्यास मदत होते. भारताच्या विकास कार्यक्रमात जबाबदारी स्वीकारणारा वर्ग ग्रामीण भागात निर्माण होण्यास मदत होते.

याप्रमाणे सहकारी चळवळीने आर्थिक, सामाजिक, नैतिक व राजकीय क्षेत्रांत प्रगती केली आहे. या सर्वांमुळे ग्रामीण समाजाचा सर्वांगीण विकास घडून येण्यास हातभार लागलेला आहे.

**भारतातील सहकारी चळवळीत दिसून आलेले दोष किंवा उणिवा -**

भारतातील सहकारी चळवळीचे मूल्यमापन करीत असताना त्यांच्या फायद्यांचा विचार केला, पण ज्याप्रमाणे सहकारी चळवळीपासून विविध प्रकारचे फायदे मिळाले आहेत, त्याप्रमाणे भारतीय सहकारी चळवळीत दोषही दिसून येतात. त्यांचा अभ्यास पुढीलप्रमाणे करता येईल.

munotes.in

**१) अर्थक्षम नसलेल्या संस्था :**

अर्थक्षम नसलेल्या संस्था म्हणजे ज्या संस्था आपल्या उत्पन्नातून स्वत:चा खर्च भागवू शकत नाहीत अशा संस्था. भारतात अशा अर्थक्षम नसलेल्या संस्थांचे प्रमाण सर्वात जास्त आहे. सहकारी संस्थांत प्राथमिक संस्था या अधिक प्रमाणावर अर्थक्षम नसलेल्या संस्था आहेत.

**२) निष्क्रिय संस्था :**

सहकारी संस्थांतील दुसरे महत्त्वाचे क्षेत्र म्हणजे निष्क्रिय संस्था होय. भारताच्या एकूण सहकारी संस्थापैकी जवळजवळ २५ टक्के सहकारी संस्था या निष्क्रिय अथवा मृत आहेत.

**३) असमान वाढ :**

सहकारी चळवळीची प्रगती व सतत वाढता कर्जपुरवठा व संस्थांच्या आणि सभासदांच्या संस्थेत झालेली वाढ यामुळे जरी सहकारी संस्था भरीव दिसत असल्या तरी देशाच्या विविध राज्यांत व एकाच राज्यामध्येही सहकारी संस्थांचा विकास झालेला दिसून येतो.

**४) स्वावलंबनाचा अभाव :**

सहकारी चळवळीच्या अनेक उद्दिष्टांपैकी एक महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणजे सभासदांमध्ये काटकसर व बचत करण्याच्या सवयीला उत्तेजन देणे. परंतु आजही सहकारी चळवळ हे उद्दिष्ट साध्य करू शकलेली नाही.

**५) बाह्य मदतीवर अवलंबित :**

सहकारी चळवळ ही जनतेची चळवळ आहे त्यामुळे ती जनतेतून निर्माण होणे आवश्यक आहे. परंतु आज सहकारी चळवळीस जवळजवळ ८८ वर्षे पूर्ण होऊनही सहकारी चळवळ जनतेतून अधिक प्रमाणावर लोकांकडून पैसा गोळा करू शकलेली नाही, त्यामुळे तिला सरकारच्या मदतीवर अवलंबून राहावे लागत आहे.

**६) थकबाकीचे वाढते प्रमाण :**

सध्याच्या काळात सहकारी संस्थांच्या विकासावर अधिक भर दिलेला आहे. परंतु अर्थक्षम व निष्क्रिय संस्थांच्या पुनर्रचनेकडे अधिक लक्ष दिलेले नाही. त्यामुळे सभासदांना दिलेली कर्जे वेळेवर परत आलेली नाहीत.

**७) हितसंबंध गटांचे वर्चस्व :**

भारतातील सरकारी चळवळीचे नेतृत्व फार मोठ्या प्रमाणावर राजकीय आणि आर्थिकदृष्ट्या शक्तिशाली असलेल्या स्वार्थी गटातील लोकांकडे आहे. तसेच सहकारी चळवळीतील बरेचसे नेतृत्व सामान्यपणे सावकार, जमीनदार, राजकीय पुढारी, व्यापारी यांच्याकडे आहे.

munotes.in

**८) अकार्यक्षम व्यवस्थापन :**

सहकारी संस्थेचे व्यवस्थापन बहुतांशी अकार्यक्षम व अयोग्य व्यक्तींच्या हाती गेल्याने सहकारी संस्थांचा अधिक विकास झालेला नाही. प्रशिक्षित व अयोग्य व्यक्तींच्या अभावामुळे व्यवस्थापनात बरेच दोष निर्माण झाले आहेत.

**९) इष्टांक गाठण्याची धडपड आणि घाईघाईने केलेला विकास :**

सहकाराचा अधिकाधिक विकास घडवून आणण्यासाठी अशा निष्ठावंत नेतृत्वाची आवश्यकता आहे की ज्यांना सहकाराचे ज्ञान आहे, त्याची तत्त्वे माहीत आहेत, ज्यांना सहकारी चळवळीविषयी आस्था वाटते, तेच सहकारी चळवळीचा विकास घडवून आणू शकतील, परंतु भारतात नि:स्वार्थी, निष्ठावंत, प्रामाणिक नेते कमी असल्याने सहकारी चळवळीचा विकास घडून आलेला नाही.

**१०) निष्ठावंत नेतृत्वाचा विकास :**

सहकारी चळवळीचा विकास घडवून आणण्यासाठी अशा निष्ठावंत नेतृत्वाची आवश्यकता आहे की, ज्यांना सहकारी ज्ञान आहे, त्यांची तत्त्वे माहीत आहेत, ज्यांना सहकारी चळवळीविषयी आस्था वाटते, तेच सहकारी चळवळीचा विकास घडवून आणू शकतील. परंतु भारतात नि:स्वार्थी, निष्ठावंत प्रामाणिक नेते कमी असल्याने सहकारी चळवळीचा विकास घडवून आलेला नाही. भारतीय सहकारी चळवळीचे नेतृत्व स्वार्थी व ढोंगी लोकांच्या हाती गेल्याने त्यांनी स्वत:च्या भरभराटीसाठी सहकारी चळवळीचा फायदा करून घेतलेला आहे.

**११) पोषक वातावरणाचा अभाव :**

भारतीय सहकारी चळवळीला सामाजिक व आर्थिक वातावरण पोषक नाही. अजूनही ग्रामीण भागात सहकारी संस्था स्थापन झाल्या असल्या तरी सावकारांचे वर्चस्व कमी झालेले नाही तर काही ठिकाणी सहकारी चळवळीचे व्यवस्थापक व सावकार हे दोघे मिळून लोकांची फसवणूक करतात.

**१२) देखरेख, तपासणी व ऑडिटची अपुरी व्यवस्था :**

सहकारी संस्थांची तपासणी वेळोवेळी केली असती व त्यांच्यावर देखरेख ठेवली असती तर सहकारी चळवळीतील निर्माण झालेल्या दोषांचा विचार करता आला असता व सहकारी चळवळ यशस्वी करता आली असती. परंतु आजही सहकारी संस्थांच्या भांडवलाचा उपयोग कोणत्या पद्धतीने केला जात आहे ? ऑडिटवर्ग हा बऱ्याच वेळा प्रशिक्षितही नसतो. अशा या प्रभावी देखरेख व तपासणीच्या अभावामुळे व ऑडिटच्या अपुऱ्या व्यवस्थेमुळे सहकारी चळवळ यशस्वी होऊ शकली नाही व यातूनच वाढती थकबाकी, खोटे कर्ज, देण्याघेण्याचे व्यवहार, पैशाचा दुरुपयोग, वसुलीमधील दिरंगाई इत्यादी दोष निर्माण झाले आहेत.

**१३) सहकारी संस्थांच्या स्थापनेमागील प्रेरणा :**

सहकारी चळवळ ही जनतेसाठी राबविली जाते. त्यामुळे तिचा उगम जनतेतून होणे आवश्यक आहे. प्रथम सुरुवातीस जरी सहकारी चळवळीने सरकारची मदत घेतली असली तरी आजसुद्धा सहकारी चळवळ सरकारवर अवलंबून आहे.

**१४) सदोष कर्जवाटपाचे धोरण आणि पद्धती :**

जी कर्जे सभासदांना दिली जातात त्यांचे वाटपही सदोष प्रकारचे आढळून येते. ज्यांना कर्जाची अत्यंत आवश्यकता आहे त्यांना अधिक कर्ज मिळालेले नाही. जे कर्ज दिले जाते. त्यांचा मंजुरीमध्ये व प्रत्यक्ष वाटपामध्ये बराच काळ गेल्याने त्या कर्जाचा उपयोग अनुत्पादक कामांसाठी केला जातो.

**१५) सहकारी तत्त्वाबाबत अज्ञान :**

सहकारी चळवळ यशस्वी होण्यासाठी प्रत्येक सभासदांस सहकाराच्या मूलभूत तत्त्वांची माहिती असणे आवश्यक आहे. प्रामाणिकपणा, शुद्ध व्यवहार, परस्पर विश्वासावर सहकारी संस्था चालविल्या जातात. परंतु याच गोष्टी सभासदांच्यात दिसून येत नाहीत. सहकारी तत्त्वाबाबतीत ते अज्ञानी आहेत. अनेक सभासद सभेला हजर राहत नाहीत. सभासद अधिकाऱ्यांवर देखरेख ठेवण्यास तयार होत नाहीत, तसेच काही सभासदांचा सहकारी संस्थांकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्वार्थी हेतू असतो. त्यामुळे सहकारी चळवळ प्रभावी होत नाही.

**१६) धोरणातील विसंगती व अर्धवट अंमलबजावणी :**

सहकारी चळवळ यशस्वी न होण्याचे आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे सरकारी धोरणातील आढळणारी विसंगती व धोरणाची अर्धवट अंमलबजावणी होय. सरकारने सहकारी संस्थेत सहभागी व्हावे किंवा न व्हावे, मोठ्या आकाराच्या संस्था स्थापन करणे आवश्यक आहे किंवा नाही या बाबतीत अनेक विचारप्रवाह आढळून येतात, वेगवेगळी मते मांडली जातात.

**सहकारी चळवळीच्या विकासासाठी उपाययोजना :**

**१) सहकारी संस्थांच्या एकत्रीकरणाची पुनर्रचनेची आवश्यकता :**

सहकारी चळवळीचा विकास घडवून आणावयाचा असेल तर सहकारी संस्थांची उभारणी भक्कम पायावर करणे आवश्यक आहे. नवीन संस्था स्थापण्याऐवजी अस्तित्वात असलेल्या संस्था सुदृढ करण्याचा प्रयत्न करणे. ज्या संस्था अर्थक्षम करण्याचा प्रयत्न करणे, ज्या संस्था अर्थक्षम नाहीत त्या संस्था अर्थक्षम करण्याचा प्रयत्न करणे, ज्या संस्था दुर्बल, निष्क्रिय आहेत त्या सहकारी संस्थांचे एकत्रीकरण करणे अथवा पुनर्रचना करणे अशा स्वरूपाचा पुनर्रचना वास्तववादी कार्यक्रम ठेवावा.

**२) स्वार्थी गटांचे उच्चाटन :**

सहकारी चळवळीचा विकास घडवून आणावयाचा असेल तर सर्वांत प्रथम स्वार्थी गटांचे उच्चाटन करणे आवश्यक आहे, असे मत प्रतिपादन केले गेले.

**३) निष्ठावंत नेतृत्वाची आवश्यकता व कार्यक्षम व्यवस्थापन :**

सहकारी चळवळीचा योग्य रीतीने घडवून आणावयाचा असेल, तर निष्ठावंत नेतृत्वाची आवश्यकता आहे. नेता नि:स्वार्थी असेल, प्रामाणिक असेल, कार्यक्षमपणे काम करणारा असेल तर सहकारी चळवळीचा विकास होण्यास अधिक हातभार लागेल.

**४) थकबाकीची वसुली :**

सहकारी संस्थेची वार्षिक क्षमता भक्कम असल्यास तिचा अधिक वापर सभासदांसाठी करता येतो. परंतु सध्या भारतात सहकारी संस्थांपुढे वाढत्या थकबाकीचा महत्त्वाचा प्रश्न उभा राहिलेला आहे.

**५) प्रभावी देखरेख व हिशेब तपासणी :**

सहकारी संस्थेचा कारभार अधिक कार्यक्षमपणे चालण्यालाही प्रभावी देखरेख व हिशेब तपासणीची आवश्यकता आहे त्यामुळे सहकारी संस्थावर योग्य देखरेख होईल नियोजित सहकारी संस्थांचा विस्तार होईल. प्रभावशाली हिशेब तपासणीमुळे आर्थिक क्षमता कमी होणार नाही.

**६) लहान शेतकऱ्यांना अधिक चांगली सेवा उपलब्ध करून देणे :**

सहकारी संस्था स्थापण्याचे महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणजे लहान शेतकरी व दुर्बल घटकांचा विकास घडवून त्यांना अधिकाधिक सेवा उपलब्ध करून द्याव्यात हे होते. यासाठी सहकारी संस्थांनी एकूण कार्यपद्धतीत असा बदल करावा की ज्यामुळे दुर्बल घटकांचा विकास अधिक होईल.

**७) सहकारी संस्थांच्या धोरणात व कार्यपद्धतीत योग्य बदल करण्यात यावा :**

सहकारी संस्थांतील सभासदांना अधिक चांगली सेवा उपलब्ध करून देण्यासाठी सहकारी संस्थांनी त्यांच्या धोरणात व कार्यपद्धतीत बदल करावा, म्हणजे ज्या वेळी सभासदाला कर्जाची आवश्यकता आहे, त्या वेळी त्यास ते कर्ज ताबडतोब व कमी त्रासात दिले जाते.

**८) बचत व निधीवर भर :**

सहकारी संस्थांनी आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत. सहकारी संस्थांचा व्याप वाढल्यावर त्यांना अधिक प्रमाणावर भांडवलाची गरज भासते. हे भांडवल त्यांनी सभासदांकडून आकर्षक व्याजाच्या दराने ठेवीच्या स्वरूपात गोळा करावे.

munotes.in

**९) सहकाराचे प्रशिक्षण आणि शिक्षण :**

सहकारी चळवळीचा अधिक विकास घडवून आणण्यासाठी सहकारी चळवळीत सर्व सभासदांना सहकाराची तत्त्वे व व्यवहार यांचे प्रशिक्षण देण्याची गरज आहे.

**१०) सहकारी चळवळीविषयक धोरण आणि त्यांची अंमलबजावणी यामध्ये सातत्य असावे** :

आर्थिक नियोजनाचा विकास घडवून आणण्यासाठी सहकारी चळवळ हे एक प्रभावी साधन आहे. सहकारी चळवळीने जी धोरणे आखली आहेत त्याला अनुसरून त्यांची अंमलबजावणी करावी व त्यात पहिल्या धोरणाचा पुरेसा अनुभव आल्याशिवाय बदल करू नये. तसेच एखादे धोरण अर्धवट सोडू नये असे केल्यास सहकारी चळवळीची उद्दिष्टे पूर्ण करता येणार नाहीत.

## ६.१० स्वाध्याय

१) सहकारी वित्तपुरवठा ही संकल्पना स्पष्ट करून त्याची रचना स्पष्ट करा.

२) सहकारी वित्तपुरवठ्याची गरज स्पष्ट करा.

३) सहकारी वित्तपुरवठ्याची त्रि-स्तरीय रचनेची थोडक्यात माहिती द्या.

४) प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थेची माहिती सांगा.

५) जिल्हा सहकारी बँकेची माहिती द्या.

६) राज्य सहकारी बँकेची माहिती द्या.

७) भू विकास बँकेची रचना स्पष्ट करा.

८) भारतातील सहकारी चळवळीचे मूल्यमापन करा.

**संदर्भः**


१) कृषी अर्थशास्त्र – डॉ. विजय कविमंडल, श्री मंगेश प्रकाशन नागपूर दुसरी आवृत्ती - १९९६.

२) सहकार प्राचार्य मोहन सराफ व प्रा. ना. मा. आचार्य, मेहता पब्लिकेशन हाऊस पुणे - ३० तृतीय आवृत्ती १९९२.

३) भारतीय अर्थव्यवस्था - कै. डॉ. स.श्री. मु. देसाई, डॉ. सौ. निर्मल भालेराव, निराली प्रकाशन, आवृत्ती सातवी फेब्रुवारी २००८

४) Indian Economy – Rudder Datt, K.P.M. Sundhram S. Chand & Company Ltd. New Delhi, Edition 2001.

५) भारतीय अर्थव्यवस्था डॉ. वसुधा पुरोहित, विद्या बुक्स पब्लिकेशन्स औरंगाबाद, आवृत्ती जून २००८

६) भारतीय अर्थव्यवस्था - प्रा एन.एल. चव्हाण, प्रशांत पब्लिकेशन जळगाव, आवृत्ती २००९.

७) सामान्य क्षमता चाचणी - महाराष्ट्र लोकसेवा आयोग राज्यसेवा पूर्वपरीक्षा - डॉ. आनंद पाटील, स्टडी सर्कल पब्लिकेशन मुंबई - दादर आवृत्ती - २००४.

❖❖❖❖

munotes.in

# ७

# स्वयंसहाय्यता बचत गट आणि सूक्ष्म वित्तपुरवठा
# (SELF HELP GROUP AND MICRO FINANCE)

**घटक रचना :**


७.० पाठाचे उद्देश

७.१ प्रस्तावना

७.२ पार्श्वभूमी

७.३ बचत गट संकल्पना आणि वैशिष्ट्ये

७.४ बचत गटांची गरज

७.५ बचत गटाचे उद्देश

७.६ बचत गटाची नियमावली

७.७ बचत गट निर्मिती स्वरूप

७.८ बचत गटाचे व्यवस्थापन

७.९ बचत गटाच्या उत्पादित मालाची विक्री व्यवस्था

७.१० बचत गटांची प्रगती

७.११ सारांश

७.१२ स्वाध्याय


## ७.० पाठाचे उद्देश

१) बचत गट चळवळ संकल्पना समजून घेणे.

२) बचत गट निर्मिती स्वरूप अभ्यासणे.

३) बचत गटांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करणे.

४) बचत गटांतून गरिबांच्या उन्नतीत चालना मिळते का?

५) बचत गटांच्या निर्मितीमुळे निर्माण होणारे सामाजिक बदल अभ्यासणे.

६) माहिती सक्षमीकरण आणि दुर्बलांच्या विकासाकरिता बचत गट प्रभावी ठरू शकतात का याचा अभ्यास करणे.



munotes.in

## ७.१ प्रस्तावना

भारतात ग्रामीण भागापर्यंत वित्तीय संस्थांचे जाळे पसरले आहे. परंतु या सार्वजनिक अथवा सहकारी किंवा खाजगी वित्तीय संस्था गरिबांना अर्थसाहाय्य देण्यासाठी उत्सुक नसतात. गरिबांच्या कर्जविषयक गरजा सामाजिक, आर्थिक परिस्थितीतून निर्माण झालेल्या असतात. या गरजा तातडीच्या आणि वारंवार अशा स्वरूपाच्या असतात. अशा परिस्थितीत गरिबांना कर्जविषयक गरजा भागविणे महत्त्वाची असते. १९७२ च्या दशकात बांगलादेशात प्रा. महम्मद युनूस यांनी गरिबांना बचतीची सवय लावून त्यांचे छोटेछोटे गट तयार केले. हे छोटे गट एकमेकांच्या आर्थिक अडचणीत अल्प व्याजदराने त्वरित कर्जाची व्यवस्था करू लागले. या गटाची दिवसेंन्दिवस वाढ होत गेली. लाखो स्वयंसाहाय्यता गट बांगलादेशात निर्माण झाले. यातून बांगलादेशात बचत गटांची बँक बांगलादेश ग्रामीण बँक उभी राहिली. बांगलादेशातील गरीब महिला तलाकपीडित महिला, गरीब शेतकरी आणि मजूर कुटुंबांना याचा मोठा लाभ झाला.




https://www.dipinfo.in

भारतात खऱ्या अर्थाने गरिबांच्या विकासाच्या नियोजनाची सुरुवात चौथ्या पंचवार्षिक योजनेनंतर सुरू झाली. लघुशेतकरी विकास संस्था (SFDA) सीमांत शेतकरी आणि शेतमजूर विकास कार्यक्रम (MFALA)... या कार्यक्रमाच्या माध्यमातून गरिबांचा विकास करण्याचा प्रयत्न झाला. पुढे २ ऑक्टोबर १९८० साली एकात्मिक ग्रामीण विकासाची कार्यक्रम (IRDP)... आणि ग्रामीण युवकालाही स्वयंरोजगार प्रशिक्षण कार्यक्रम सुरू झाला. १९९९ पर्यंत हा कार्यक्रम सुरू राहील परंतु दारिद्र्य निर्मूलनात फारसा फरक पडला नाही.

शेवटी एप्रिल १९९९ साली भारताच्या शासनाने स्वर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजना सुरू केली (SJGSY). या योजनेचा एक महत्त्वाचा भाग म्हणून बचत गटाच्या (SHG)... माध्यमातून ग्रामीण भागातील विशेषतः गरीब आणि महिलांच्या विकासाचा प्रयत्न सुरू झाला. यातून संपूर्ण देशात बचत गटाच्या माध्यमातून गरिबांच्या विकासाच्या नियोजनाला सुरुवात झाली.

munotes.in

## ७.२ पार्श्वभूमी

१९७० च्या दशकात भारत आणि बांगलादेशामध्ये गरीब कष्टकरी महिलांना सामूहिक जबाबदारीतून कर्ज देण्याचे प्रयोग सुरू झाले. या प्रयत्नांना फार चांगले यश यायला लागल्यामुळे आशिया खंडातील काही देश आफ्रिका खंडातील आणि अमेरिकेतील बहुतेक अविकसित देशांनी या प्रयोगाची सुरुवात आपल्या देशांमध्ये केली.

आपल्या विकसनशील देशात ग्रामीण आणि शहरी भागात राहणार्या कष्टकरी कुटुंबांची संख्या मोठी आहे. यातील बहुसंख्य कुटुंबे दारिद्र्यरेषेच्या आसपास घुटमळत असतात. त्यांना त्यांच्या व्यवसायासाठी खेळत्या भांडवलाची गरज असते. व्यवसाय वाढविण्याकरिता साधने, जागा आणि पैशाची गरज असते. घरगुती अडचणी, आजारपण याकरिता पैसे लागतात. हे पैसे त्यांच्या तुटपुंज्या उत्पन्नातून बाजूला काढणे किंवा साठवणे शक्य नसते. कर्ज मागण्याकरिता बँकांकडे अथवा पतसंस्थाकडे तर परतफेडीची क्षमता सिद्ध करणे शक्य नसते. अशा व्यक्तींना कर्जासाठी सावकाराचाच आधार असतो. सावकाराकडून जास्त व्याजदराने पैसे घ्यावे लागतात.

या समस्येवरही उत्तरे शोधण्याचा प्रयत्न ग्रामीण भागात झालेला आहे. देशात भिशी चिटफंड हे जवळजवळ शतकभर अस्तित्वात आहेत. यामध्ये दहा-पंधरा व्यक्ती एकत्र येतात. सर्वांना झेपणारी ठराविक रक्कम दरमहा गटातील एका व्यक्तीकडे जमा करतात व दरमहा एकंदर जमा रकमेतून गटातील एका व्यक्तीची आर्थिक अडचण सोडवितात.

बचत गट हे पारंपरिक प्रकाराचे नवे रूप आहे. भिशीमध्ये आर्थिक अडचण भागवणे एवढाच मर्यादित दृष्टिकोन ठेवला जातो, त्याऐवजी बचत गटामध्ये आर्थिक विकासाबरोबरीने सर्वांगीण विकास हे उद्दिष्ट समोर असते.

भारतात 'बचतगट' या प्रकाराच्या जननी या महिलांच्या विकासामध्ये काम करणाऱ्याकिंवा त्यावरील अन्यायाविरुद्ध लढणार्या सेवाभावी संख्या-संघटना आहेत. यामध्ये अहमदाबाद येथील 'सेवा' मुंबईतील अन्नपूर्णा महिला मंडळ, तामिळनाडूमधील 'वर्किंग विमेंस फोरम' या संस्थांनी फार भरीव कार्य केले आहे. त्यांच्या कर्मातून एक निष्कर्ष सिद्ध झाला. गरीब महिला विश्वासाचा पाया असतात, कुठल्याही तारणाशिवाय त्यांच्या एकत्रित विश्वासार्हतेवर अवलंबून कर्ज दिले तर त्या ते चोखपणे फेडतात शिवाय त्या त्यांच्या तुटपुंज्या उत्पन्नातूनही चांगल्या प्रकारे बचत करू शकतात. बांगलादेशात याच कालावधीत सुरू झालेल्या ग्रामीण बँकेने हे सिद्ध केले आहे.

या सर्व अनुभवाच्या आधारे १९८० च्या दशकात 'नाबार्ड' ने (National Bank for Agriculture & Rural Development) स्वयंसाहाय्यता गटाचे मॉडेल पुढे आणले. या माध्यमातून देशात आणि राज्यात ग्रामीण भागातील महिलांमध्ये मोठ्या प्रमाणात बचतीची उभारणी व कर्जाचे वाटप झाले.

आपल्या देशात ग्रामीण महिलांमध्ये बचतीची जुनी परंपरा आहे. साधारणतः आदिवासी भागात अलीकडेपर्यंत सामूहिक फंड पद्धती अस्तित्वात होत्या. या फंडपद्धती धान्य आणि पैसा या दोन्ही स्वरूपात कार्यरत होत्या. अमरावती जिल्ह्यात १९४७ साली एक गट सुरू

झाला. या गटाने २५ पैसे बचत करायला सुरुवात केली. १९९६ साली माहिती मिळाली तेव्हा त्यात सुनाही आलेल्या होत्या.

## ७.३ बचत संकल्पना आणि वैशिष्टये

बचत गटांची संकल्पना निर्माण करताना या चळवळीच्या विकासासाठी १९९९ साली केंद्र सरकारने स्वर्ण जयंती ग्रामस्वरोजगार योजना सुरू केली. या योजनेच्या इतर घटकांबरोबर बचत गट निर्मिती हा या योजनेचा महत्त्वाचा भाग मानण्यात आला. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (IRDP), ग्रामीण भूमिहीन शेतमजूर, रोजगार हमी योजना, डवाक्रा या योजना बंद करून ही व्यापक योजना सुरू करण्यात आली. या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील कुटुंबांची दारिद्र्यरेषेच्या निकषानुसार यादी करून जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत गरीब कुटुंबातील सदस्यांचे बचत गट सुरू करण्याचे धोरण ठरविण्यात आले. त्यानुसार जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा ग्रामपंचायत आणि पंचायत समितीच्या सहकार्याने बचत गटांची निर्मिती करते.

बचत गट संकल्पना केवळ गरिबांसाठीच नाही, तर दारिद्र्यरेषेच्या वरच्या नागरिकांसाठीही आहे. किमान १० ते कमाल २० महिला, पुरुष-महिला किंवा पुरुष एकत्र येऊन बचत गट स्थापन करू शकतात या बचत गटांचे स्वरूप दोन प्रकारचे असते.

**१) दारिद्र्यरेषेच्या खालील बचतगट (BPL) :**

या प्रकारात दारिद्र्यरेषेच्या खालील कुटुंबातील स्त्री-पुरुष एकत्र येऊन बचत गट स्थापन करतात. त्यांनी सहा महिने व्यवस्थित बचत करण्याची प्रक्रिया सुरू ठेवून नियमानुसार कारभार केल्यास सहा महिन्यांनंतर बँकेकडून अंतर्गत कर्जव्यवहारासाठी त्यांना रु. २५००० खेळते भांडवल मिळते. यात रु. १०,००० अनुदान असते. अशा प्रकारे पुढे त्यांनी आपला कारभार योग्य पद्धतीने करावा अशी अपेक्षा असते.

या गटाचे आर्थिक व्यवस्थापन व्यवस्थित सुरू राहिल्यास एक वर्षानंतर स्वतंत्र व्यवसायाचे मोफत प्रशिक्षण देऊन व्यवसाय सुरू करण्यासाठी अनुदानावर अर्थसाहाय्य उपलब्ध करून दिले जाते. राष्ट्रीयीकृत बँक आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व ग्रामीण बँकांकडे ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे. बचत गटाच्या उत्पादित मालाच्या विक्रीसाठी DRDA मार्फत प्रदर्शने भरवली जातात. या माध्यमातून बचत गटांच्या उत्पादित मालाला बाजारपेठ उपलब्ध करून दिली जाते.

**२) दारिद्र्यरेषेच्या वरील बचतगट (Above Poverty Line) :**

या प्रकारचा बचत गट दारिद्र्यरेषेच्या वरील महिला अथवा पुरुष किंवा महिला-पुरुष एकत्र येऊन सुरू करू शकतात. या गटांचे संयोजन NABARD आणि राष्ट्रीयीकृत बँकांमार्फत आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमार्फत केले जाते. या गटांना अनुदान मिळत नाही. परंतु बचतीच्या प्रमाणात अल्पव्याजदराने अर्थसाहाय्य होऊ शकते.

दोन्ही प्रकारचे बचतगट सुरू करून, त्यांची कार्यपद्धती योग्य पद्धतीने चालू राहण्यासाठी, बँकांसोबतच आणि DRDA बरोबर नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था (NGO) सहकार्य करतात.

बचतगट निर्मिती आणि विविध प्रकारची प्रशिक्षणे यात NGO सहभाग महत्त्वाचा राहतो. याशिवाय महिला आर्थिक विकास महामंडळ (भाविम) बचतगट निर्मिती आणि महिला सक्षमीकरणामध्ये सक्रिय पुढाकार घेते.

आर्थिक पातळी समान असलेल्या ग्रामीण भागातील गरीब महिला-पुरुषांचे हे गट असतात. समूहाच्या निर्णयानुसार हे गट नियमित बचत करतात. जमा झालेल्या निधीतून सभासदांना अंतर्गत कर्जव्यवहार करतात. सभासदांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. त्याचप्रमाणे सामाजिक आणि आर्थिक विकासाचे प्रश्न चर्चा करून आणि योग्य अशा सहभागात्मक निर्णयाद्वारे सोडविले जातात.

बचत गट स्थापन करण्यासाठी स्वयंइच्छेने अथवा स्वयंस्फूर्तीने कमीत कमी १० व जास्तीत जास्त २० सभासद एकत्र येऊन बचत गट स्थापन करू शकतात. दुर्बल-गरीब महिला आणि पुरुषांना आपल्या आर्थिक-सामाजिक प्रगतीसाठी बचत गट प्रभावी मार्ग ठरू शकतो.

**स्वयंसाहाय्यता गटाची वैशिष्ट्ये -**

१) स्वयंसाहाय्यता गटातील सदस्य हे दारिद्र्यरेषेखालील असतात त्यांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी गटाचा फायदा त्यांना होतो.

२) स्वयंसाहाय्यता गटासाठी कमीत कमी १० आणि जास्तीत जास्त २० ही सदस्य मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. एका कुटुंबातील केवळ एकाच सदस्याला बचत गटाचे सभासद होता येईल. हे सभासद केवळ एकाच गावातले असले पाहिजेत.

३) बचत गटाचे सदस्यत्व होण्यासाठी स्वयंप्रेरणा महत्त्वाची मानण्यात आली आहे. कोणालाही बचत गटाचा सभासद होण्यासाठी सक्ती केली जात नाही.

४) बचत गटांचा कारभार लोकशाही पद्धतीने चालतो. बचत गटाच्या संयोजनासाठी अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, खजिनदार पदावर आळीपाळीने प्रत्येक सभासदाला काम करण्याची संधी मिळते. गटामध्ये सर्व प्रकारच्या शिस्तीला महत्त्वाचे स्थान दिले जाते.

५) बचत गटाच्या प्रत्येक सदस्याला एकमताने ठरविलेली बचतीची रक्कम गटप्रमुखांकडे जमा करावी लागते. यातून गटाचा सामूहिक निधी निर्माण होतो. या निधीत सर्व सभासदांचा समान सहभाग असतो.

६) गटातील सदस्यांना सावकारी कर्जातून मुक्त करणे हा महत्त्वाचा उद्देश आहे. कर्जावरील व्याजदर दरमहा २ ते ३%असतो.

७) गटातील सभासद त्यांच्या बचतीद्वारा स्वयंभांडवल निर्माण करून त्याद्वारा बँकेकडून सभासदांना व्यक्तिगत आणि सामूहिक कर्ज उपलब्ध करून दिले जाते.

८) गटांची प्रत्येक महिन्याला किमान एक सभा घेणे आवश्यक असते. सर्व सभासदांची उपस्थिती अत्यावश्यक असते. सर्व सभासदांच्या सोयीचा विचार करून सभेची वेळ

आणि स्थळ निश्चित केले जाते. पूर्वसंमतीने एखाद्या सभासदाला सभेस गैरहजर राहता येते. सातत्याने अथवा पूर्वपरवानगी न देता सभासद सभेस गैरहजर राहिल्यास त्याला विशिष्ट दंड भरावा लागतो. हा दंड सर्वसंमतीने ठरविला जातो.

९) गटाच्या सर्व बाबीसंबंधीचे निर्णय सभेत घेतले जातात. हे सर्व निर्णय एकमताने होतात. घेतलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीस सर्व सभासद जबाबदार असतात.

१०) सर्व सभासदांच्या संमतीने बँकेच्या मार्गदर्शन तत्त्वानुसार अंतर्गत नियमावली तयार केली जाते. त्यामधील नियमांचे सर्व सभासद काटेकोरपणे पालन करतात.

११) स्वयंसाहाय्यता बचत गट सहकाराचे दुसरे रूप आहे. या गटांचे सर्व व्यवहार परस्पर सहकार्याने आणि लोकशाहीच्या तत्त्वाने चालतात. सभासद अडीअडचणीत एकमेकांना सहकार्य करण्यास सदैव तत्पर असतात.

## ७.४ बचत गटाची गरज

ग्रामीण भागातील राहणार्या कुटुंबापैकी ४०% कुटुंबे दारिद्र्यरेषेखाली आहेत. ही गरीब कुटुंबे आपल्याकडे असलेल्या जमिनीच्या छोट्या तुकड्यावर अथवा मजुरी करून आपला उदरनिर्वाह चालवतात.

साहजिकच हे लोक सातत्याने गरिबीचे जिणे जगत असतात. या नागरिकांची स्थिती सुधारण्यासाठी बचत गटांची गरज आहे. ही गरज पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**१) बचतीच्या सवयीकरिता :**

बऱ्याच वेळा गरीब कुटुंबांचे उत्पन्न जीवनावश्यक गरजांवरच खर्च होते. या कुटुंबांना आजची काळजी असते. त्यामुळे ही कुटुंबे उद्याचा विचार करत नाहीत. हा विचार त्याच्यात रुजवण्यासाठी बचत गटाचा उपयोग होऊ शकतो. अनावश्यक खर्चाला बाजूला सारून या मंडळींना बचतीची सवय लावता येईल.

**२) आर्थिक उन्नती साधण्यासाठी :**

गरिबांची आर्थिक उन्नती साधण्यासाठी बचत गट प्रभावी ठरू शकतात. अनेक दुर्बल लोक एकत्र आल्यास त्यांची एकमेकांच्या सहकार्याने आर्थिक उन्नती शक्य आहे. त्याचबरोबर शासनाच्या विविध योजनांचा लाभ एकत्रितपणे घेता येणे शक्य होते.

**३) महिलांना आत्मसन्मान देण्यासाठी :**

ग्रामीण गरीब महिलांना स्वतःचे उत्पन्नाचे हक्काचे साधन नाही. बचत गटाच्या माध्यमातून त्यांचे हक्काचे उत्पन्नाचे साधन उपलब्ध होते. महिलांचे अभेद संघटन तयार झाल्यामुळे त्यांना आत्मसन्मान मिळण्याची संधी उपलब्ध झाली. अन्यायाचे आणि अत्याचाराचे प्रमाणही कमी करता येईल.

**४) भांडवलाच्या पूर्ततेकरिता :**

गरिबांना बँका अथवा वित्तीय संस्था वैयक्तिक पातळीवर अर्थसाहाय्य देत नाहीत. बचतगटामुळे व्यवसायासाठी भांडवलाची उपलब्धता सुलभ होऊ शकते.

**५) व्यावसायिक प्रशिक्षण :**

गरिबांना आणि सर्वसामान्य कुटुंबातील महिलांना वैयक्तिक पातळीवर व्यावसायिक प्रशिक्षण घेणे शक्य होत नाही. गटाच्या माध्यमातून आणि शासनाच्या योजनेतून खास गटासाठी म्हणून या प्रशिक्षणाचा लाभ घेता येणे शक्य होते.

**६) आर्थिक विषमता कमी करण्यासाठी :**

सामाजिक पातळीवरील आर्थिक विषमता कमी करण्यासाठी बचत गटाचा चांगला उपयोग होऊ शकतो. बचत गटाच्या माध्यमातून आर्थिक उत्पन्न वाढविण्याची संधी उपलब्ध असल्यामुळे आर्थिक विषमता कमी करण्यासाठी बचतगट उपयोगी ठरू शकतील.

**७) सावकारी पाशातून गरिबांची सोडवणूक :**

सावकार ग्रामीण भागातील गरिबांना भरमसाठ व्याजदराने कर्ज देतात. त्यामुळे गरिबांचे आर्थिक नुकसान होते. या परिस्थितीत त्यांना बचत गटामार्फत अल्प व्याजदरावर कर्जाची उपपलब्धता होऊ शकते. सावकारांच्या आर्थिक फसवणुकीतून गरीब नागरिकांची सोडवणूक करण्यासाठी बचतगट खूपच उपयुक्त ठरू शकतात.

**आपली प्रगती तपासा :**

१) बचत गटांची वैशिष्ट्ये सांगून गरज सविस्तर स्पष्ट करा.

२) सांगा - बचत गटाची पार्श्वभूमी.

## ७.५ बचत गटाचे उद्देश

स्वयंसाहाय्यता बचत गटाचा मूळ उद्देश सभासदांना बचतीची सवय लावून त्याची आर्थिक क्रयशक्ती वाढविणे हा आहे. या अनुषंगाने बचत गटाचे उद्देश पुढीलप्रमाणे आहेत.

१) दैनंदिन व्यवसायाचे तंत्रज्ञान आणि आर्थिकता याचा मेळ घालून उत्पादकता वाढ करणे.

२) व्यवसायातील हिशोबीपणा, व्यावहारिक कुशलता वाढीस लागावी यासाठी सदस्यांना मार्गदर्शन करणे.

३) अर्थसाहाय्य योजना/पतपुरवठा याच्या योग्य विनियोजनातून गाव पातळीवर उद्योग व्यवसायास चालना देणे, कारागिरी कुशलतेस वाव देणे.

४) बचत गटातून मिळालेले उत्पन्न, मिळकत यामध्ये काटकसरीची सवय लावणे.

munotes.in

५) स्वयंसाहाय्यता करून सांघिक शक्ती गट संघटन अधिक बळकट करणे. सामाजिक आर्थिक दर्जा उंचावणे.

६) बचतगट सभासदांना सावकाराकडून घेतलेले कर्ज परत करण्यासाठी आर्थिक साहाय्य करणे.

७) ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी सूक्ष्म वित्त संस्था स्थापन करणे.

८) महिलांचे बचतगट स्थापन करून ग्रामीण विकासात महिलांना सहभागी करून घेणे.

९) बचत गटाचे बचत केलेल्या रकमेचा आर्थिक समस्या सोडविण्यासाठी वापर करणे. सभासदांचे उत्पन्न वाढविणे, त्यांना बचतीची सवय लावणे.

१०) स्थानिक सामाजिक समस्या गटाच्या माध्यमातून सोडविण्याचा प्रयत्न करणे. सामाजिक समस्यांच्या सोडवणुकीत संघशक्तीचे महत्त्व अधिक बळकट करणे.

**आपली प्रगती तपासा :**

१) बचत गटांचे उद्देश लिहा.

## ७.६ बचत गटाची नियमावली

स्वयंसाहाय्यता बचत गटासाठी स्वतंत्र नियमावली तयार करण्यात आली आहे. या नियमावलीनुसार बचत गटाचे काम चालते. ही नियमावली पुढीलप्रमाणे आहे.

१) स्वयंसाहाय्यता बचत गटाचे सदस्य एकाच वाडीत राहणारे असावेत. या सदस्यांचे अथवा त्यांच्या (कुटुंबप्रमुखाचे नाव ग्रामपंचायतीच्या दारिद्र्यरेषेच्या नोंदवहीत समाविष्ट असावे.)

२) बचत गटाचे सदस्यत्व महिला आणि पुरुष या दोघांनाही होता येईल.

३) प्रत्येक सभासदाने नियोजित ठरल्याप्रमाणे ठराविक वर्गणी आणि मासिक बचत जमा केली पाहिजे.

४) गटासाठी अध्यक्ष, सचिव आणि खजिनदार यांची निवड सर्व सहमतीने करावी.

५) गटाच्या मासिक सभेत सर्व सभासदांनी उपस्थित राहणे बंधनकारक आहे.

६) गट स्थापन करून त्याचे नियमानुसार संयोजन करणे महत्त्वाचे आहे. गट स्थापन झाल्यापासून सहा महिन्यांनंतर बँकेकडून खेळते भांडवल उपलब्ध होऊ शकेल.

७) बचत गटांनी सभासदांना कर्जपुरवठा करताना योग्य ती पद्धती ठरवायला हवी. कर्ज देण्याचा निर्णय मासिक सभेत घ्यावा किंवा आवश्यक परिस्थितीत तातडीच्या सभेस घ्यावा.

८) जमा होणारी बचत प्रथम बँकेत सेव्हिंग खात्यावर जमा करावी. त्यानंतरच आर्थिक व्यवहार करावेत.

९) सतत एकाच व्यक्तीला कर्ज देऊ नये. गटातील सदस्यांनाच कर्ज द्यावे.

१०) कर्जपुरवठा करताना व्याजदर सर्व सभासदांना मान्य असावा.

११) कर्ज देतेवेळी दोन सदस्यांचा जामीन घ्यावा.

१२) कर्जाची परतफेड व्याजासह नियोजित तारखेला करावी.

१३) नियमानुसार मासिक सभा इतिवृत्त वही, हिशोबाच्या वह्या, कर्ज देवघेव, रजिस्टर अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. ही जबाबदारी प्रामुख्याने अध्यक्ष, सचिव आणि खजिनदारांची आहे.

१४) गटाच्या नियमात बदल करण्याचे अधिकार कार्यकारी मंडळाला आहेत.

१५) सभासद सातत्याने पूर्वपरवानगी न देता सभेस गैरहजर राहिल्यास त्याला विशिष्ट रकमेचा दंड करण्यात येतो.

## ७.७ बचत गट - निर्मिती स्वरूप

कोणत्याही कार्याला प्रेरणेची गरज असते जशी बांगलादेशात डॉ. महम्मद युनूस यांनी प्रेरणा देऊन स्वयं-साहाय्यता बचत गटांची चळवळ सुरू केली. त्याप्रमाणे बचत गट निर्मितीसाठी प्रेरणा देण्याचे कार्य स्वयंसेवी संस्था, ग्रामपंचायतींचे ग्रामसेवक, भाविमच्या (महिला आर्थिक विकास मंडळ) संयोगिनी, तसेच सहकारी बँकांचे प्रतिनिधी, राष्ट्रीयीकृत बँकांचे प्रतिनिधी करतात. महिलांच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या काही महिला कार्यकर्त्याही बचत गट स्थापन करण्यात प्रेरणास्त्रोत म्हणून भूमिका बजावतात.

अशा प्रकारे महिलांना, महिला पुरुषांना एकत्र करून गटाची स्थापना केली जाते. गट स्थापन करण्यापूर्वी महिलांना बचतीचे आणि काटकसरीचे महत्त्व पटवून सांगितले जाते. बचत गटातून कशा प्रकारे आर्थिक आणि सामाजिक उन्नती करता येते याविषयी सहभागी महिलावर्गाला माहिती सांगितली जाते.

**अ) गट स्थापना / निर्मिती प्रक्रिया :-**

**१) गट स्थापना करणे :-**

एकाच गावातील, वाडीवस्तीमधील, एकाच प्रभागातील, एकाच आर्थिक परिस्थितीतील १० ते २० व्यक्ती एकत्र करून गटाची स्थापना केली जाते. यात समविचारी आणि समान स्थिती असणाऱ्या माहिला आणि पुरुषांचे बचत गट निर्माण केले जातात.

**२) गटाला नाव देणे :-**

स्वयंसाहाय्यता बचत गटाची स्थापना केल्यानंतर त्या गटाला विशिष्ट नाव दिले जाते. सदर नावानुसारच बचत गटाचे व्यवहार चालतात.

**३) गटाच्या पदाधिकार्यांची निवड :-**

बचत गट स्थापन झाल्यानंतर गटाचे संपूर्ण कामकाज लोकशाहीच्या तत्त्वानुसार चालते. बचत गटामध्ये संयोजनासाठी पदे निर्माण करावी लागतात. सर्वसाधारणपणे अध्यक्ष, सचिव आणि खजिनदार अशी तीन पदे सर्वसंमतीने निवडली जातात. आवश्यकतेनुसार काही गटामध्ये उपाध्यक्षही निवडला जातो. काही गटामध्ये सचिव आणि खजिनदार एकच व्यक्ती असते. काही गटात संघटिका व सहसंघटिका ही पदे निर्माण करण्यात येतात.

पदाधिकारी निवडताना लिहिता-वाचता येणार्या आणि हिशोब सांभाळू शकणाऱ्या सभासदांची या पदांवर निवड केली जाते. ही निवड विशिष्ट मुदतीकरिता असते.

**४) गटाचे बँकेत खाते उघडणे :-**

स्वयंसाहाय्यता बचत गटाला जे नाव सर्वसंमतीने दिले जाते त्याच नावाने कोणत्याही राष्ट्रीयीकृत किंवा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत खाते उघडले जाते. खाते उघडण्यासाठी बँकेत नियमाप्रमाणे काही रक्कम जमा करावी लागते. आर्थिक व्यवहार करण्यासाठी गटाच्या नावाचा आणि पदाधिकार्यांच्या नावाचे शिक्के तयार करून घ्यावे लागतात. अशा प्रकारे बँकेत खाते उघडले जाते आणि बचत गटाच्या कामाला सुरुवात होते.

**ब) बचत गटाच्या स्थापनेनंतरची कार्यपद्धती :-**

गटाची स्थापना झाल्यानंतर आणि आर्थिक व्यवहार करण्यासाठी रीतसर बँकेत खाते उघडल्यानंतर बचत गटाच्या कामकाजाला खऱ्या अर्थाने सुरुवात होते.

**१) मासिक सभा :-**

बचत गटांची प्रत्येक महिन्याला मासिक सभा होते. गटाची संघरिका, सहसंघरिका अथवा सचिव मासिक सभेची तारीख, वेळ कळविणे. सर्व सभासदांच्या सोयिस्कर वेळेनुसार सभा आयोजित केली जाते. शक्यतो सभेची वेळ संध्याकाळी ठेवली जाते, कारण गटामधील महिला सदस्या दिवसभर कामाला जातात. सभेची सुरुवात परिवर्तनाच्या गीताने, प्रार्थनेने अथवा ओवी म्हणून केली जाते. सभेत मागील सभेचे इतिवृत्त वाचन करून कायम केले जाते.

**२) सभासद उपस्थिती :-**

मासिक सभेत सर्व सभासदांची उपस्थिती अनिवार्य असते. एखादा सभासद गंभीर अडचणीत असल्यास पूर्वकल्पना देऊन सभेस अनुपस्थित राहू शकतो. अन्यथा दंड भरावा लागतो.

**३) बचत जमा करणे :-**

सर्व सदस्य उपस्थित झाल्यानंतर सभेच्या सुरुवातीस निश्चित केलेली बचत रक्कम जमा करून घेतली जाते. ज्या सदस्यांची बचत आली नसेल त्या सदस्याला दंड आकारला जातो.

**४) गटांतर्गत कर्जवाटप व वसुली :-**

गटाच्या मासिक सभेत बचत जमा झाल्यानंतर व दिलेल्या कर्जाची मुद्दल आणि व्याज जमा केल्यानंतर सर्वानुमते कर्ज वाटपाचा निर्णय घेतला जातो. ज्या सभासदाने कर्जाची मागणी केली आहे त्याने रीतसर अर्ज गटाच्या सदस्यांपैकी दोन जामिनांच्या सह्यासह अर्ज स्वीकृत झाल्यानंतर कर्ज वितरण केले जाते. दिलेल्या मुदतीत कर्जाची परतफेड करणे सदस्यांवर बंधनकारक असते.

**५) नोंदी :-**

स्वयंसाहाय्यता गटाच्या सभेच्या इतिवृत्तापासून ते आर्थिक व्यवहाराच्या नोंदी सभेतच केल्या जातात. या नोंदी करण्याची जबाबदारी सचिवाची असते. विविध प्रकारच्या नोंदीसाठी

१) रोखकीर्द (कॅशबुक), २) खतावणी (सदस्य बचत), ३) सदस्य कर्ज खतावणी, ४) सदस्य पासबुक, ५) सभेचे इतिवृत्त बुक इत्यादी दप्तर वापरावे लागते.

**६) समस्यांवर चर्चा व निर्णय घेणे :-**

सभेमध्ये सर्व आर्थिक व्यवहार झाल्यानंतर सामाजिक व इतर प्रश्नांवर चर्चा केली जाते. समाजबदलाच्या माहितीला सक्षमीकरणार्या विषयांसंबंधी चर्चा केली जाते. या चर्चेमध्ये गटाचे संपूर्ण महिनाभराच्या कामकाजाचे नियोजन केले जाते. तसेच ठराव, शैक्षणिक प्रश्न, व्यक्तिगत प्रश्न इत्यादी, त्या चर्चा करून मार्ग काढला जातो. सभासदांना यामुळे मानसिक आधार मिळतो.

**७) सभेची सांगता :-**

सभेचे कामकाज संपल्यानंतर सर्व तपशील पुन्हा सांगितला जातो. सचिव किंवा अध्यक्ष सर्वांचे आभार मानून सभेची सांगता करतात. सभेत जमा झालेली रक्कम दुसऱ्या दिवशी बँकेत जमा केली जाते.

**क) स्वयंसाहाय्यता समूहाचे मूल्यांकन :**

स्वयंसाहाय्यता समूह व्यवस्थित रीतीने कार्यरत आहे किंवा नाही हे जाणून घेण्यासाठी समूहाचे तीन स्तरांवर मूल्यांकन केले जाते. गटाचे बँकेत खाते उघडल्यानंतर सहा महिन्यांनी ही मूल्यांकन प्रक्रिया पार पाडली जाते.

**१) निरंतन प्रक्रिया :-** म्हणजे गटाचा कारभार निरंतन सुरू आहे का? गटाच्या कामकाजाचे सातत्य यात पाहिले जाते.

**२) सहभागी प्रक्रिया :-** गटातील सर्व सभासदांची गटामधील सहभागाची प्रक्रिया कशी आहे. एकमेकांचे विचार-आचार व्यवस्थित जुळतात की नाहीत. गटाचे एकंदर सयोजन कसे आहे यासंबंधी परीक्षण केले जाते.

**३) प्रवाही प्रक्रिया :-** बचत गटाची जमा होणारी बचत, त्या बचतीमधून अंतर्गत कर्ज व्यवहार सातत्याने सुरू आहे का की, बचत केवळ बँकेतच जमा करून ठेवली आहे याचे मूल्यांकन केले जाते.

गटाच्या मूल्यांकनाला गुण दिले जातात. गुणानुसार श्रेणी ठरविली जाते. या श्रेणीनुसार बँका गटांना वित्तीय साहाय्य करतात. मूल्यांकनामध्ये गटातील उणिवा शोधून त्या दूर करण्याचा प्रयत्न केला जातो.

बचत गटांचे मूल्यांकन करण्यासाठी तालुका पातळीवर समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीत गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, बँक शाखाधिकारी आणि स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी असतात. या समितीतील प्रतिनिधी ठरविण्याचा अधिकार जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा आणि जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापकांना असतो.

बचत गटाचे जरी तीन स्तरांवर मूल्यांकन केले जात असले तरी यातील सहभागी मूल्यांकन हा स्तर महत्त्वाचा मानला जातो. यामध्ये दोन स्तरांवर मूल्यांकन होते.

**अ) मासिक देखरेख :-**

यात पुढील बाबीसंबंधी मूल्यांकन केले जाते- बैठकीची पूर्वतयारी, निश्चित वेळ, वार, बैठक, बचत सातत्य, उपस्थिती, अंतर्गत कर्जवाटप व वसुली, सभेतील सहभाग, सभेत होणारी सामूहिक चर्चा व मूल्यमापन आणि निर्णय, रोख शिल्लक, सामाजिक उपक्रम, कर्जाचा विनियोग, समूहातील सदस्यांचा शैक्षणिक स्तर, विमा, गटाच्या कामाची पद्धती, गटाच्या नियमाबाबत अंमलबजावणी आणि जागरुकता आणि सरकारी कार्यक्रम व योजनासंबंधी माहिती या मुद्यांचे मूल्यांकन केले जाते.

**ब) वार्षिक देखरेख :**

बचत गटांचे वार्षिक मूल्यमापन करताना पुढील मुद्यांचा विचार केला जातो.

जबाबदारीतील बदल, सामूहिक निधी, कर्जवाटपातून गरजापूर्ती, उत्पन्नात वाढ, रोजगार निर्मिती, वित्तसंस्थांचे आर्थिक साहाय्य, विमा, प्रशिक्षण, गटागटातून कर्जव्यवहार, ऑडिट, नवीन गट निर्मिती, महिलांच्या सक्षमीकरणास साहाय्य, कर्जफेड, सामाजिक उपक्रम, हिशोबनीस नेमणूक, गटांचे संघ सदस्यत्व व वार्षिक गटांच्या मूल्यांकनात श्रेणी दिली जाते. 'अ', 'ब', 'क' अशी श्रेणी देऊन, गटाचा कारभार उत्तम, साधारण आणि चिंताजनक अशा तीन भागांत विभागला जातो. गटाच्या वर्गीकरणानुसार गटाला बँकेचे वित्तसाहाय्य मिळते.

**ड) स्वयंसहाय्यता समूहांची बँकेशी संलग्नता :**

स्वयंसाहाय्यता गटाचे खाते बँकेत उघडून गटाचे मूल्यांकन केल्यानंतर गटांची संलग्नता बँकांकडून होते. बँकेकडून बचतगटांना कर्जपुरवठा केला जातो. जिल्हा अग्रणी बँक विभागवार बँकांना बचतगटांना अर्थसाहाय्य करण्याची जबाबदारी देतात. स्वयंसाहाय्यता गट स्वर्णजयंती ग्रामस्थ रोजगार योजनेखालील असेल तर प्रथम खेळते भांडवल रु. २५००० गटात एका वर्षाच्या मुदतीकरिता मिळते. यात रु. १५००० अनुदान असते. रु.

१०००० कर्ज म्हणून दिले जातात. खेळत्या भांडवलासाठी दिलेल्या रकमेतून अंतर्गत कर्ज व्यवहार करून वर्षभरात कर्ज परतफेड करावी लागते.

एका वर्षानंतर गटांचे मूल्यांकन करून गुणानुक्रमे प्रथम श्रेणी मिळविण्याचा बचत गटाला स्वर्णजयंती ग्रामस्थ रोजगार योजनेअंतर्गत ५०% अनुदानावर अर्थसाहाय्य केले जाते. दारिद्र्य रेषेखालील बचत गटांना ५०% अनुदानाचा लाभ मिळतो. दारिद्र्यरेषेच्या वरील गटांना बचत रकमेच्या प्रमाणात कर्ज वितरण केले जाते. या गटांना व्याजाच्या रकमेत सूट दिली जाते. बचत गटांना दिल्या जाणार्या कर्जाला जामिनाची गरज असते. संपूर्ण गटाचे सदस्य दिलेल्या कर्जास जबाबदार असतात. या कर्जासाठी तारणाची गरज नसते. बँक निश्चित करेल त्याप्रमाणे हप्ते भरावे लागतात. स्वयंसाहाय्यता समूहाचे कर्ज उत्तम रीतीने परतफेड होते.

**इ) बचत गटांसाठी व्यवसाय प्रशिक्षण :**

स्वयंसाहाय्यता बचत गटाची स्थापना होऊन एक वर्षभर गटाचा कारभार उत्तम चालला आणि सदर बचत गट गुणानुक्रमे वरच्या श्रेणीत आला तर अशा बचत गटांना मागणीनुसार पंधरा दिवस ते एक महिना कालावधीचे व्यवसाय प्रशिक्षण दिले जाते. हे प्रशिक्षण पूर्णतः मोफत दिले जाते. शिवाय प्रशिक्षणार्थी महिलांना प्रतिदिन प्रवासखर्च आणि भत्ता दिला जातो. व्यवसायाचा कर्ज प्रस्ताव दिला जातो. या व्यवसायासाठी ५०% किंवा सव्वालाख यापेक्षा जी रक्कम कमी असेल इतके अनुदान मिळते. कर्ज प्रस्तावाच्या प्रमाणात मिळू शकते.

स्वयंसाहाय्यता गटांना उद्योगाचे प्रशिक्षण देऊन त्यांची उद्योजकीय मानसिकता विकसित करणे हा यामागचा उद्देश आहे. यातून ग्रामीण भागातील गरीब कुटुंबातील महिला वर्गाला हक्काचे उत्पन्नाचे साधन मिळवून देण्याचा प्रयत्न आहे.

**ड) बचत गटांचे फेडरेशन :**


स्वयंसाहाय्यता गटांना उद्योगाचे प्रशिक्षण देऊन त्यांची उद्योजकीय मानसिकता विकसित करणे हा यामागचा उद्देश आहे. यातून ग्रामीण भागातील गरीब कुटुंबातील महिला वर्गाला हक्काचे उत्पन्नाचे साधन मिळवून देण्याचा प्रयत्न आहे.

स्वयंसाहाय्यता समूहाच्या निर्मितीनंतर यांचा संघ अथवा फेडरेशन करावे अशी अपेक्षा असते. भौगोलिक क्षेत्राच्या माध्यमातून गटांची विभागणी करून बचतगटांचा संघ केला जातो. सर्व संघाचे एकत्रीकरण करून बचत गटांचा महासंघ केला जातो. यामुळे गटांमध्ये समन्वय राहून गटांची संघशक्ती वाढते. गटांच्या संघटिका आणि सहसंघटिका या संघाच्या सदस्य असतात. या सहा संघाची नोंदणी  सामाजिक न्याय कायद्यानुसार केली जाते. अशा प्रकारे बचत गटांच्या निर्मितीची प्रक्रिया पार पाडली जाते.



https://mpcnews.in

## ७.८ बचत गटाचे व्यवस्थापन




munotes.in

वरीलप्रमाणे स्वयंसाहाय्यता बचत गटाचे व्यवस्थापन चालते. गावपातळीवर संघटिका आणि सहसंघटिकांबरोबरच ग्रामसेवकाची भूमिका महत्त्वाची असते. विशेषतः BPLबचत गट स्थापन करण्यासाठी ग्रामसेवकाला महत्त्वाची भूमिका बजावावी लागते. बचत गटाचे पुढील सोपस्कारसुद्धा ग्रामसेवकच पार पाडतात. बचत गटाच्या स्थापनेपासूनची तयारी आणि अर्थसाहाय्य मिळवून देणे आणि व्यवसाय सुरू करणे यासाठी ग्रामसेवकाला महत्त्वाची भूमिका पार पाडावी लागते.

महिला आर्थिक विकास मंडळ (माविम) आणि स्वयंसेवी संस्थांचे बचत गट सक्षमीकरणामध्ये महत्त्वाची भूमिका असते. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा आणि जिल्हा प्रबंधक NABARD बचत गटांच्या प्रगतीचा सातत्याने आढावा घेतात.

## ७.९ बचत गटांच्या उत्पादित मालाची विक्री व्यवस्था

१५ ऑगस्ट १९९९ साली भारताचे माजी पंतप्रधान मा. अटलबिहारी वाजपेयी यांनी स्वर्णजयंती ग्रामस्थ रोजगार योजना देशात सुरू करून देशात बचत गटांची चळवळ भविष्यात उभी राहील. बचत गटाचे सभासद हे स्वरोजगारी असतील. त्यांच्या माध्यमातून ग्रामीण भागात व्यवसायांची चळवळ सुरू होईल व दारिद्र्य कमी करण्यासाठी हा प्रभावी पर्याय ठरू शकेल असे सूतोवाच केले होते. त्यानंतर आपल्या देशात लाखो बचत गट सुरू झाले. यातील काही बचतगटांनी व्यवसायाचा मार्ग अवलंबिला. धाडस, चिकाटी आणि मेहनतीने विविध व्यवसाय उभे करण्याचा प्रयत्न केला आहे. छोट्या-छोट्या व्यवसायापासून ते चित्रपट निर्मिती व्यवसायापर्यंतची मजल मारली आहे.

बचत गटांना कौशल्यवृद्धीचे प्रशिक्षण देऊन त्यांचे छोटे छोटे व्यवसाय उभे राहात आहेत. यातून बचत गटाच्या सभासद महिलांना त्यांचे हक्काचे उत्पन्न मिळाले आहे. बचत गटांच्या उत्पादित मालाच्या विक्रीचे स्वरूप पुढीलप्रमाणे असावे.

**१) स्थानिक बाजार :**

बचत गट आपल्या उत्पादित मालाची विक्री स्थानिक बाजारात करू शकतात यात आठवडा बाजार, पंचक्रोशीचा बाजार अथवा स्थानिक जत्रांचा समावेश असेल. तसेच विविध बचत गट आपला माल गोळा करून व त्याबरोबर गावात विक्री स्टॉल सुरू करू शकतील. यातून एक ते दोन महिलांना कायम रोजगार मिळेल. मिळणारा फायदा सर्वांना वाटून घेता येईल.

**२) साखळी मार्केटिंग पद्धती :**

बचत गटांच्या उत्पादित मालाच्या विक्रीसाठी साखळी मार्केटिंग पद्धतीचा उपयोग चांगला होऊ शकतो. किमान वीस बचत गट प्रथमस्तरावर यासाठी एकत्र येऊन त्यांनी आपल्या मालाच्या उत्पादनाचे स्वरूप ठरवावे. अशा प्रकारे वीस प्रकारचा उत्पादित माल तयार होईल. प्रत्येक बचत गटाने विक्रीसाठी एकमेकांकडून कमिशनवर माल घ्यावा. अशा प्रकारे आपोआप मालाच्या विक्रीची व्यवस्था होईल. यातून बचतगटांचे फेडरेशनही उभे राहील.

या प्रक्रियेसाठी बचत गटांच्या उत्पादनामध्ये सातत्य ठेवणे, दर्जा उत्तम ठेवणे महत्त्वाचे असते. अशा स्वरूपाचा प्रयोग कोल्हापूर जिल्ह्यात 'स्वयसिंद्धा' प्रकल्पाच्या माध्यमातून कांचनताई परुळेकर यांनी उभा केला आहे.

**३) तालुका बाजार :**

तालुक्यात बचत गटांच्या मालाच्या विक्रीसाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत गाळे बांधण्यात आले आहेत. या गाळ्यांच्या माध्यमातून बचत गट आपला माल विक्री करू शकतात. तालुक्यातील मागणीचा सर्वे करून अशा स्वरूपाची केंद्रे निर्माण करणे शक्य आहे.

**४) जिल्हास्तरीय प्रदर्शन :**

बचत गटांना वैयक्तिक पातळीवर मालाची विक्री करणे अनेक वेळा शक्य होत नाही. त्यांच्या मालाच्या विक्रीसाठीची त्यांना सवय व्हावी यासाठी प्रत्येक जिल्हा स्तरावर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या मार्फत प्रतिवर्षी जिल्हास्तरीय बचत गट उत्पादनांच्या विक्रीचे प्रदर्शन आयोजित केले जाते. यावेळी बचत गटांना विक्रीसाठी बक्षिसेही दिली जातात. याशिवाय महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत अशा स्वरूपाची तालुका आणि जिल्हास्तरीय प्रदर्शने आयोजित केली जातात.

**५) राज्य पातळीवरील प्रदर्शने :**

**महात्तक्ष्मिसरस** आणि भिथडी यात्रा तसेच NABARD नाबार्डच्या माध्यमातून बचत गटांच्या उत्पादित मालाला बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी प्रदर्शने भरवली जातात. या माध्यमातून असंख्य बचत गट चांगली कमाई करतात.

राज्यस्तराबरोबरच विभागीय स्तर प्रदर्शने भरवली जातात. महाराष्ट्र राज्यात 'भिथडी यात्रा' गेल्या तीन-चार वर्षांपासून प्रसिद्धीस आली आहे.

**६) केंद्र पातळीवरील प्रदर्शने :**

केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास विभागाच्या वतीने अशा स्वरूपाच्या देशपातळीवरील प्रदर्शनांचे आयोजन प्रतिवर्षी नवी दिल्लीत केले जाते. देशातील प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हा ग्रामीण विकास अंबणांच्या माध्यमातून बचत गटांचा उत्पादित माल विक्रीसाठी पाठविला जातो. यामुळे बचतगटांच्या महिला सदस्यांमध्ये धाडस निर्माण होण्यास मदत होत आहे.

अशा प्रकारे बचत गटांच्या उत्पादित मालाच्या विक्रीचे स्वरूप आहे. कोकण भागातील बचत गट मुंबईत होणाऱ्या मालवणी जत्रोत्सवाचा उपयोग करताना आढळतात, तसेच स्थानिक जनतेचाही मालाच्या विक्रीसाठी उपयोग करतात.

**आपली प्रगती तपासा:**

१. बचत गटांनी उत्पादित केलेल्या उत्पादनांच्या विक्रीचे स्वरूप लिहा.

## ७.१० बचत गटांची प्रगती

संपूर्ण देशात बचत गटांची प्रगती दिवसेंदिवस वाढत आहे. देशात बचत गटांची संख्या दशलक्षांच्या संख्येत गेली आहे. महाराष्ट्र राज्यात दोन लाख बचत गट आहेत. त्यापैकी १,६१,७८२ महिला बचत गट आहेत. या महिला बचत गटांपैकी ४३२५४ महिला बचत गटांनी आर्थिक उपक्रम सुरू केले आहेत. महाराष्ट्रात ४ टक्के व्याजदराने ७२२ कोटी रुपये अनुदान आणि १२८.२ कोटी रुपयांचे कर्ज वितरण करण्यात आले आहे.

बचत गटांनी दारिद्र्य आणि असहाय परिस्थिती असलेल्या लोकांच्या जीवनात क्रांतिकारक बदल घडवून आणला आहे. पुरुषप्रधान संस्कृतीत अडकलेल्या महिला स्वतःचे अस्तित्व

मिळविण्यासाठी बाहेर पडत आहेत. जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत नेत्रदीपक कामगिरी बचत गटांनी केली आहे.

१९९७-९८ साली महाराष्ट्रात बचत गटांची संख्या १४,३१७ इतकी होती. बँक कर्ज ५१.७७ कोटी आणि पुनर्वित्त २१३९ कोटी रुपये इतके देण्यात आले होते. २००५-०६ साली भारतात २२,३९००० इतके बचत गट, बँक कर्ज ११,३९८ कोटी रुपये आणि पुनर्वित्त ४,१५४ कोटी इतके देण्यात आले होते. स्वयंसाहाय्यता गटाच्या माध्यमातून लाभान्वित होणाऱ्या कुटुंबाची संख्या ३२,९०,००० इतकी होती. अशा प्रकारे बचत गटाच्या संख्येत सातत्याने वाढ होत आहे.

ग्रामीण भागातील गरीब महिला आर्थिक, सामाजिकदृष्ट्या सक्षम होण्याचा निर्धार करत आहेत. निरक्षर, दारिद्र्य, व्यसनाधीनता, रूढी-परंपरा, पुरुषी वर्चस्व, कौटुंबिक आणि सामाजिक अत्याचार यांच्या विळख्यात पडलेल्या असहाय अबला यांच्या जीवनाला बचत गट या शब्दाने नवी पहाट उगवली आहे. स्वतःमधील जिद्द, क्षमता, कोणतेही कष्ट करण्याची तयारी, तसेच उपलब्ध साधनांचा योग्य वापर करून महिलांनी आपल्या कुटुंबांना निराशेच्या गर्तेतून दूर आणून स्थैर्य मिळविण्याचा प्रामाणिक प्रयत्न सुरू केला आहे.

## ७.११ सारांश

१९९९ साली स्वर्ण जयंती ग्रामस्थ रोजगार (SJGSY योजनेच्या माध्यमातून बचत गटांच्या निर्मितीला सुरुवात झाली. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमाची १९ वर्षे अंमलबजावणी करूनही दारिद्र्य कमी होईना यासाठी हा प्रयोग स्वीकारण्यात आला.

बचत गटाचा इतिहास भारताला नवीन नाही. अमरावती जिल्ह्यात तेथील महिलांनी १९४७ साली एक बचत गट सुरू केला होता. या बचत गटात महिला २५ पैसे बचत केली जात होती. देशात याच कालावधीच्या आसपासची असंख्य उदाहरणे आहेत.

१९७० च्या दशकात बांगलादेशातील अर्थशास्त्राचे प्राध्यापक महम्मद युनूस यांनी बचत गटाच्या चळवळीला व्यापक रूप दिले. त्यांनी गरीब नागरिकांचे छोटे छोटे गट करून त्यांना लहान रकमेची बचत करायला लावली. यातून बांगलादेश नॅशनल ग्रामीण बँकेची निर्मिती झाली. जागतिक पातळीवर बचत गट चळवळ सुरू झाली.

देशात दारिद्र्यरेषेच्या खालील BPL आणि दारिद्र्यरेषेच्या वरील BPL अशा दोन स्वरूपात बचत गट स्थापन केले जातात. दारिद्र्यरेषेच्या खालील बचत गटांना शासन खेळत्या भांडवलासाठी आणि व्यवसाय सुरू करण्यासाठी अनुदान आणि मोफत व्यवसाय प्रशिक्षण देते.

कमीत कमी दहा आणि जास्तीत जास्त वीस महिला, महिला-पुरुष आणि पुरुष असे बचत गट सुरू करता येतात. बचत गटांची स्वतंत्र वैशिष्ट्ये आहेत. ग्रामीण विकासासाठी बचत गटांची निर्मिती आवश्यक आहे. कारण यातून दारिद्र्य निर्मूलन दूर होईलच, पण त्या बरोबर आर्थिक विषमता कमी होण्यास मदत होणार असून ग्रामीण आरोग्यात वाढ होणार आहे.

बचत गटांना स्वतंत्र उद्देश आणि नियमावली करण्यात आली आहे. बचत गटांच्या उत्पादित मालाच्या विक्रीसाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत प्रदर्शने आयोजित केली जातात. तसेच बचत गटांच्या फेडरेशनचीही निर्मिती करण्यात आली आहे. बचत गटांच्या संयोजनासाठी स्वतंत्र व्यवस्थापन तयार करण्यात आले आहे.

बचत गटांची प्रगती दिवसेंन्दिवस वाढत आहे. महाराष्ट्र राज्यात दोन लाख बचत गट आहेत. तर देशात ६९.५३ लाख इतके बचत गट निर्माण झाले आहेत. बचत गटांची चळवळ दिवसेंन्दिवस वाढतच आहे. या माध्यमातून ग्रामीण विकासाला निश्चित स्वरूपाची चालना मिळणार आहे.

## ७.१२ स्वाध्याय

१) बचत गट संकल्पना आणि वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) ग्रामीण विकासासाठी बचत गटाची गरज विशद करा.

३) बचत गटाचे उद्देश आणि नियमावली सविस्तर लिहा

४) टिपा लिहा

   १) स्वयंसाहाय्यता समूहांची बँकेशी संलग्नता

   २) बचत गटांचे व्यवस्थापन

   ३) बचत गटांच्या उत्पादित मालाच्या विक्री व्यवस्थचे स्वरूप लिहा.

**संदर्भ सूची-**

१) योजना मासिक मे, २००९ VOL - XXXVI.X

२) योजना मासिक ऑगस्ट, २००८ VOL - XXXNo. I

३) योजना मासिक जून, २०१० VOL - XXX No.IX

प्रकाशन विभाग, माहिती आणि प्रसारण मंत्रालय, भारत सरकार

❖❖❖❖

munotes.in

८

# स्वयंसहाय्यता बचत गट, बँका आणि स्वयंसेवी संस्था यांचे सहसंबंध

**घटक रचना :**

८.१ पाठाचे उद्देश

८.२ प्रस्तावना

८.३ संकल्पना

८.४ बचत गटांच्या सदस्यांच्या सूक्ष्म वित्तपुरवठ्याच्या गरजा

८.५ बचत गट आणि बँक सहसंबंध

८.६ सूक्ष्म वित्तपुरवठा आणि गरिबांचा विकास

८.८ सूक्ष्म वित्तपुरवठ्याच्या समस्या

८. ९ सूक्ष्म वित्तपुरवठा अधिक प्रभावी करण्यासाठी उपाय

८.१० स्वयंसेवी संस्था व बचत गट

८.११ सारांश

८.१२ स्वाध्याय

## ८.० पाठाचे उद्देश

१) सूक्ष्म वित्तपुरवठा संकल्पना समजावून घेणे

२) सूक्ष्म वित्तपुरवठ्यामुळे गरिबी निर्मूलनासाठी झालेल्या लाभाचा अभ्यास करणे.

३) बचत गटांच्या बँक सहसंबंधाचा अभ्यास करणे.

४) सूक्ष्म वित्तपुरवठ्याचा एकंदर ग्रामीण विकासावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.

५) स्वयंसेवी संस्थांची NGO बचत गट चळवळीच्या सक्षमीकरणासाठीची भूमिका अभ्यासणे.

## ८.१ प्रस्तावना

ग्रामीण भागातील गरीब लोकांना वित्तीय संख्या अर्थसाहाय्य देत नाहीत. त्यांना बँकांच्या दारावरही उभे केले जात नाही. कारण त्यांची आर्थिक पत नसते. बँकेकडून घेतलेले कर्ज परत करण्याची त्यांची आर्थिक कुवत नसते असे वित्तीय संस्थांचे मत होते. वित्तीय संस्था मोठ्या उद्योजकांना, नोकरदारांना मागणीनुसार जेवढे हवे तेवढे कर्ज देतात, पण एखाद्या

munotes.in

गरिबाने, गरीब कारागिराने आपल्या कलेच्या विकासातून व्यवसाय विकसित करण्यासाठी कर्ज मागण्याचा प्रयत्न केल्यास त्याला वित्तीयसंस्था प्रतिसाद देत नाहीत. ही वस्तुस्थिती विचारात घेऊन गरीब स्त्री-पुरुषांना अर्थकारणाच्या मुख्य प्रवाहात सामील करून घेणे आणि त्यांची सावकारी पाशातून मुक्तता करून त्यांना रोजगाराची संधी मिळवून देण्यासाठी बांगलादेशात डॉ. महम्मद युनूस यांनी ग्रामीण बँकेचा प्रयोग करायचे ठरविले. बचत करण्याइतके उत्पन्न नसणे ही बांगलादेशाच्या संबंधित नागरिकांची स्थिती असतानाही त्यांनी हे धाडस केले. १९८३ साली 'बांगलादेश नॅशनल ग्रामीण बँक' अस्तित्वात आली. या बँकेची झपाट्याने वाढ झाली. सरकारने आपले स्वतःचे भांडवल म्हणून सुरुवातीला ४०% रक्कम गुंतवली. नंतर ती २५% वर आणली. बांगलादेशातल्या गरीब नागरिकांनी आपली गुंतवणूक ७५% वर गेली.

अशा प्रकारे दुर्बल घटकांना हक्काने त्यांच्या छोट्या छोट्या व्यवसायासाठी अर्थसाहाय्य करणारा ग्रामीण बँकेचा प्रयोग यशस्वी झाला. या बँकेची जागतिक स्तरावर नोंद घेण्यात आली.

या बँकेने सुरुवातीला अर्धा एकर उपजाऊ जमीन असणार्यांना कर्ज दिले. त्यात महिलांचे प्रमाण लक्षणीय होते. एकूण कर्जापैकी ९८% कर्जाची परतफेड झाली. अशा प्रकारे सूक्ष्म वित्तपुरवठ्याचा प्रयोग बांगलादेशात यशस्वी झाला.

भारतात स्वर्ण जयंती ग्रामस्थ रोजगार योजनेच्या माध्यमातून राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (NABARD) ने सूक्ष्म वित्तपुरवठा योजना राबविण्यास सुरुवात केली. त्यासाठी सहकारी बँका आणि राष्ट्रीयीकृत बँकांना पुनर्वित्त (Retinamec) करण्यासही सुरुवात केली.

## ८.२ संकल्पना

ग्रामीण भागात राहणारा छोटा शेतकरी, सीमांत शेतकरी, ग्रामीण कारागीर, भूमिहीन शेतमजूर यांना शेतीच्या कामासाठी, कारागिरांना आपल्या व्यवसायात सुधारणा करण्यासाठी आणि भूमिहीन शेतमजुरांना छोटासा व्यवसाय सुरू करून आपला चरितार्थ चालविण्यासाठी लहान रकमेच्या कर्जाची गरज लागते. ही गरज भागली तर त्यांच्या आर्थिकतेवर त्याचा सकारात्मक परिणाम दिसू लागतो. अशा स्वरूपाच्या गरजा भागविण्यासाठी जे कर्ज घेतले जाते त्या कर्जाला सूक्ष्म वित्त असे म्हटले जाते.

उदा. गरीब भूमिहीन शेतमजूर आहे. त्याला भाजीपाला विकण्याचा व्यवसाय करण्यासाठी रु. १०००/- कर्जाची गरज आहे. हे कर्ज तो सदर व्यवसाय करून महिनाभरात परत करणार असतो अथवा एखादा मूर्तिकार आहे त्याला मूर्ती घडविण्यासाठी रु. २०००/- कर्जाची गरज आहे. या रकमेतून तो मूर्ती करेल त्याची विक्री करून कर्ज अल्पकाळात व्याजासहित परत करून आपला व्यवसाय हळूहळू वाढ करेल, अशा प्रकारे सूक्ष्म वित्तपुरवठ्यातून गरिबांना उभे राहण्यास मदत होऊ शकते.

सूक्ष्म वित्तपुरवठ्याची मागणी दोन स्तरांवर होऊ शकते.

**१) वैयक्तिक स्तर (Individual Level) :**

यामध्ये वर स्पष्ट केल्या प्रमाणे एक व्यक्ती व्यवसायासाठी अल्प भांडवलाची मागणी करू शकते. ही गरज बचत गट आणि बँक या दोहोंकडून पूर्ण होऊ शकते.

**२) गट स्तर (Claster Level or Group Level) :**

बऱ्याच ठिकाणी गावामध्ये कारागिरांच्या वस्त्या असतात. या कारागिरांना आपला व्यवसाय वाढवायचा असतो. त्यासाठी ते आपला गट अथवा समूह स्थापन करतात आणि समूहासाठी कर्जाची मागणी करतात. यातून त्या मालाच्या खरेदी व्यवहारात मोठ्या प्रमाणात सूट मिळते. त्यांच्या व्यवसायाच्या वृद्धीसाठी ही बाब आवश्यक असते.

उदा. रायगड जिल्ह्यातील 'पेण'च्या गणपतीच्या मूर्ती जगप्रसिद्ध आहेत. येथील कारागिरांनी एकत्र येऊन गणपती तयार करण्यासाठी लागणारे प्लॅस्टर ऑफ पॅरिस, माती, रंग एकत्रित खरेदी करतात. त्यामुळे त्यांनी माल मोठ्या प्रमाणात खरेदी केल्यामुळे स्वस्तात मिळतो. अशा प्रकारे गटाच्या स्तरावर कर्जाची मागणी होते. ही मागणी बँकेकडे अथवा बचत गटाकडेसुद्धा होऊ शकते. सिझन संपताच कर्ज परतफेड होते. सावकाराकडून कर्ज घेतल्यास महिन्याला शेकडा १० ते १२ रुपये द्यावे लागतात तर बचत गटाचा व्याजाचा दर २ ते ३ रुपये असतो. अशा प्रकारे छोट्या गटांना या अर्थसाहाय्याचा उपयोग होतो.

सूक्ष्म वित्तपुरवठ्याच्या माध्यमातून ग्रामीण भागातील गरिबांना बँक व्यवहाराची सवय लावण्याचा प्रयत्नही केला जातो.

## ८.३ बचत गटाच्या सदस्यांच्या सूक्ष्म वित्तपुरवठ्याच्या गरजा

ग्रामीण भागातील नागरिकांना सातत्याने आकस्मिक गरजा उद्भवत असतात. या गरजा भागविण्यासाठी त्यांना अल्प अर्थसाहाय्याची आवश्यकता भासते. या गरजा पुढीलप्रमाणे आहेत.

**१) सदस्याच्या वैयक्तिक गरजेसाठी :**

व्यक्तीला अनेक स्वरूपाच्या वैयक्तिक गरजा असतात. उदा. घरातील अथवा नातेवाईकाचे लग्न किंवा कुळातील अथवा नातेवाईकांच्या मुलाचा बारसा आणि अशा स्वरूपाच्या प्रसंगात अचानक काही रकमेची आवश्यकता भासते.

**२) मुलामुलींच्या शैक्षणिक गरजा भागविण्यासाठी :**

शाळा सुरू होताना मुलांना वह्या, पुस्तके इतर शैक्षणिक साहित्य, शाळेची फी इत्यादीसाठी कर्जाची गरज भासते.

**३) शेती अवजारे बियाणे खरेदी :**

पावसाळा सुरू झाल्यानंतर बी-बियाणे खरेदी करण्यासाठी व खतासाठी आणि अवजार खरेदी अथवा दुरुस्तीसाठी छोट्या कर्जाची गरज लागते.

munotes.in

**४) आकस्मिक येणारे आजारपण :**

बऱ्याच वेळी एखाद्या कुटुंबात आकस्मिक आजारपण येते. यावेळी घरात पैसा नसेल तर ही अडचण भागविण्याचे सहकार्य बचत गटामार्फत केले जाते. असंख्य बचत गटांनी आपल्या सदस्यांना आजारपणात अर्थसाहाय्य देऊन आजारपणातून बाहेर काढले आहे.

**५) छोट्या व्यवसायाकरिता :**

एखाद्या गरीब व्यक्तीला भाजीपाला विक्रीचा व्यवसाय सुरू करायचा आहे किंवा छोट्या-छोट्या वस्तू विक्रीचा व्यवसाय करायचा आहे. अशा व्यवसायासाठी ५०० ते १००० रुपयांच्या कर्जाची गरज लागते. ही गरज भागविण्याचे कार्य बचत गट करू शकतात. यातून असंख्य गरीब उभे राहिले आहेत.

**६) सणवार साजरे करण्याकरिता :**

ग्रामीण भागात सणांना जास्त महत्त्व दिले जाते. सण साजरे करण्यामध्ये नागरिकांना आनंद मिळतो. गरीब नागरिकांना सणवारासाठी सावकाराकडून जादा व्याजाने कर्ज घेण्यापेक्षा बचत गटाचा उपयोग होतो. सण साजरे करता येतात.

**७) शैक्षणिक सहल क्षेत्र भेट :**

कधी कधी शैक्षणिक सहलींचे आणि क्षेत्र भेटीचे (field visit) आयोजन केले जाते. या संधीचा लाभ घेऊन ग्रामीण भागातील नागरिकांचे वैचारिक परिवर्तन करणे शक्य होते. त्यातून त्यांची मानसिक बैठक तयार होते. हा त्यांच्या उन्नतींचा मार्ग आहे. यासाठी घेतलेले कर्ज ही भविष्याची गुंतवणूकच असते.

**८) अपघात आणि अचानक आलेल्या संकटाकरिता :**

अनेक वेळा अचानक अनैसर्गिक संकटे येतात. अपघात घडतात त्यामुळे पैशाची गरज भासते. एखाद्या व्यक्तीचा अपघात झाल्यास त्या व्यक्तीला औषधोपचार करण्यासाठी अर्थसाहाय्याची गरज भासते. अचानक आलेले संकट असते. कधी-कधी वादळामुळे घराचे, शेतीचे नुकसान होते. जनावरे रोगाच्या साथीमध्ये दगावतात. इत्यादी.

वरील कारणांसाठी ग्रामीण भागातील नागरिकांना अर्थसाहाय्याची गरज सातत्याने जाणवत असते.

**आपली प्रगती तपासा**

१) सूक्ष्म वित्तपुरवठ्याची संकल्पना स्पष्ट करून बचत गटांच्या सदस्यांच्या कर्जविषयक गरजा सांगा.



munotes.in

## ८.४ सूक्ष्म वित्तपुरवठा-बचत गट आणि बँक सहसंबंध

सूक्ष्म वित्तपुरवठ्यामध्ये बँकांची भूमिका महत्त्वाची आहे. यामध्ये राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (NABARD) ची भूमिका प्राधान्यक्रमाने महत्त्वाची आहे. नाबार्डने याकरिता प्रभावी पुढाकार घेतलेला आहे. बचत गटांना सूक्ष्म वित्तपुरवठा करून ग्रामीण भागातील गरीब, गरजू शेतकरी आणि कष्टकरी जनतेला दारिद्र्य रेषेच्या वर आणणे हे सूक्ष्म वित्तपुरवठ्याचे नाबार्डचे प्रमुख्य ध्येय आहे.

नाबार्डने याकरिता चिरस्थायी शेती, ग्रामीण रोजगार संधी, प्रभावी वित्तपुरवठा, संबंधित सेवा, संस्थात्मक विकास आणि इतर नवनवीन गोष्टींमध्ये ग्रामीण जनतेला सहभागी करून दारिद्र्यमुक्त जीवन जगण्यासाठी साहाय्य करण्याचे धोरण जाहीर करून या धोरणानुसार देशातील वित्तसंस्थांना सहकार्य करण्यासाठी स्वतः अर्थसाहाय्य देण्याचे धोरण ठरवून त्यानुसार कृषी करण्याचा प्रयत्न सुरू ठेवला आहे. या प्रयत्नांना यशही बर्यापैकी मिळत आहे.



https://play.google.com

नाबार्डने १९९२ साली २२५ बचत गटांना या योजनेत समाविष्ट करून ४८.५ लाख रुपये अर्थसाहाय्य करून या कार्यक्रमाला सुरुवात केली. आज यात ९७ कोटी कुटुंबे सहभागी केली आहेत.

२००६-०७ च्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या निकषानुसार या योजनेत नाबार्डच्या अंतर्गत व्यापारी बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका आणि सहकारी बँकाचाही समावेश करण्यात आला. याकरिता नाबार्डने बचत गट बँक लिंकेज (सहसंबंध) मॉडेल असे या मॉडेलचे स्वरूप होते. या मॉडेलमध्ये संपूर्ण देशातील २७ सार्वजनिक क्षेत्रातील बँका, १९ खाजगी क्षेत्रातील बँका, ८१ प्रादेशिक ग्रामीण बँका आणि ३१८ सहकारी बँकांना सहभागी करून घेण्यात आले. तसेच लघु औद्योगिक एक बँक सहभागी झाली.

नाबार्डने बचत गट बँक सहसंबंध प्रस्थापित करताना प्रथम बचत गटाच्या प्रशिक्षण क्षमता बांधणीचा उपक्रम सुरू केला आणि त्यानंतर बचत गट बँक सहसंबंध कार्यक्रम हाती घेण्यात आला. या योजनेचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | एकूण बँकाशी संहसंबंध प्रस्थापित केलेले बचत गट | ६९.५३ लाख |
| २) | यापैकी महिला बचत गट | ५३.१० लाख |
| ३) | यापैकी स्वर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजनेचे बचत गट | १६.९४ लाख |

**बँकांकडे कर्जप्रस्ताव केलेले बचत गट**

**२००९-१०**

| बचत गट | संख्या (रु. लाख) |
|---|---|
| कर्ज प्रस्ताव केलेले बचत गट | १५.८७ |
| कर्ज प्रस्ताव केलेले महिला बचत गट | १२.९४ |
| स्वर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजनेचे बचत गट | ०२.६७ |

**३१ मार्च २०१०**

| | |
|---|---|
| कर्ज मिळालेले बचत गट | ४८.५१ |
| यापैकी महिला बचत गट | ३८.९८ |
| यापैकी स्वर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजना बचत गट | १२.४५ |
| बचत गटांशी जोडलेली कुटुंबे | ९७ दशलक्ष |

**बचत गटांनी केलेली बचत**

| | |
|---|---|
| बचत गटांनी बँकेत केलेली बचत | रु. ६१९८.७१ कोटी |
| महिला बचत गटांनी केलेली बचत | रु. ४४९८.६६ कोटी |
| स्वर्णजयंती ग्रामस्थ रोजगार योजनेच्या बचत गटांनी केलेली बचत | रु. २३९२.६२ कोटी |

**३१ मार्च २०१०**

**कर्ज प्रस्तावांकरिता केलेले कर्जवितरण**

| | |
|---|---|
| एकूण कर्ज वितरण | रु. ६१९८.७१ कोटी |
| महिला बचत गटांच्या एकूण बचतपैकी | रु. ४४९८.६६ कोटी |
| स्वर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजनेच्या बचत गटांपैकी | रु. १२९२.६२ कोटी |

**२००९-१० एकूण कर्ज वितरण**

| | |
|---|---|
| एकूण बचत गटांना केलेले कर्ज वितरण | रु. १४५५३.३० कोटी |
| महिला बचत गटांना कर्जपुरवठा | रु. १२४२९.३७ कोटी |
| स्वर्णजयंती ग्रामस्थ रोजगार योजनेचे बचत गट | रु. २१९८.०० कोटी |
| प्रत्येक सभासदाला झालेला वैयक्तिक कर्जपुरवठा | रु. ४१२८ |

munotes.in

खेळत्या भांडवलासाठी ३१ मार्च २०१० पर्यंत नाबार्डने केलेले आर्थिक साहाय्य ५५.४९ कोटी रुपये. नाबार्डने सर्व बँकांना बचत गटांना कर्ज वितरण करण्यासाठी पुनर्वित्त उपलब्ध करून दिले. ३१ मार्च २०१० यावर्षापर्यंत रु. १२८६१.६५ कोटी रक्कम उपलब्ध करून दिली. सातत्याने या रकमेत वाढ होत आहे. बचत गटांना पुनर्वित्त (Retinanec) करण्यासाठी नाबार्डने सन १८६० साली नोंदणीकृत केलेल्या स्वयंसेवी संस्थांनाही या उपक्रमात सहभागी करून घेतले.

अशा प्रकारे नाबार्डने बचत गटाच्या चळवळीत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. आज बचत गटाची चळवळ घरोघरी कुटुंबा-कुटुंबात पोहोचवण्याचे काम नाबार्डने केले आहे. भारतातील सूक्ष्म वित्तपुरवठ्याच्या कार्याचा आढावा घेता एकूण देशात जे बचत गट सुरू झाले त्यापैकी ९६% बचत गट महिलांचे प्रमाण १७% इतके आहे बचत गटाच्या सदस्यांपैकी ९०% सभासद दोन एकरपेक्षा कमी क्षेत्र असलेले आहेत. ४०% बचत गट ग्रामीण बँकांना जोडलेले आहेत. ३०% बचतगट व्यापारी बँकांना जोडले आहेत आणि ३०% बचत गट सहकारी बँकांना जोडले आहेत.

**महाराष्ट्र राज्य :**

महाराष्ट्र राज्यात सद्यस्थितीत दोन लाखांपेक्षा अधिक बचत गट आहेत यापैकी १०६७ लाख महिला बचत गट आहेत. ५३४६५ बचत गटांनी बँकांचे अर्थ साहाय्य घेऊन अन्न प्रक्रिया उत्पादने आणि घरगुती वस्तूंच्या उत्पादनांचे उद्योग सुरू केले आहेत. महाराष्ट्र सरकारने दारिद्र्यरेषेच्या वरील गटांना ४ टक्के व्याजदराने कर्ज देण्याचा उपक्रम सुरू केला आहे. याचा लाभ असंख्य बचत गट घेत आहेत.

**आपली प्रगती तपासा**

१) सूक्ष्म वित्तपुरवठ्यातील नाबार्डची भूमिका स्पष्ट करा.

२) सूक्ष्म वित्तपुरवठ्यातील बँकांची भूमिका लिहा.

## ८.५ सूक्ष्म वित्तपुरवठा आणि गरिबांचा विकास

मूलतः बँका या गरिबांना अर्थपुरवठा करायला तयार नसतात. कारण त्यांची आर्थिक पत नसते. त्यांच्याकडे तारण ठेवायला काही नसते. शिवाय त्यांचे दारिद्र्याच्या समस्येतून बाहेर काढणेही गरजेचे असते याचा विचार करून बांगलादेशाचे अर्थतज्ज्ञ डॉ. महम्मद युनूस यानी गरिबांच्या आर्थिकतेचा मार्ग मोकळा केला. त्यांच्या प्रयोगाने जगाला गरिबालाही पत असते याची जाणीव झाली. सूक्ष्म वित्तपुरवठ्याच्या माध्यमातून ग्रामीण गरिबांना होणाऱ्या लाभाचा विचार पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**१) बचतीची सवय :**

गरीब लोकांना आजची काळजी असते. त्यांच्या जीवनात उद्याचा विचार नसतो. जो दिवस येईल तो आपला म्हणून जगण्याचा त्यांचा कल असतो. मिळणारी मजुरी पूर्णपणे खर्च करण्याकडे त्यांचा कल असतो. सूक्ष्म वित्तपुरवठ्याच्या संकल्पनेत आपल्या मिळकतीचा कमीतकमी भाग तरी बाजूला काढावा या विचारांना चालना मिळते. त्यांच्या मनात

बचतीच्या प्रवृत्तीविषयी जागरूकता करता येते. यातून हळूहळू या मंडळींना बचतीची सवय लागते.

**२) आर्थिक अडचणी सोडविण्यास मार्ग मिळतो :**

गरिबांच्या जीवनात आर्थिक अडचणी कायम उभ्या असतात. प्राप्त परिस्थितीत ते मानून मार्ग काढू शकत नाहीत कारण त्यांच्याकडे शिल्लक नसते. अशा परिस्थितीत आपल्याच बचतीतून त्यांना आर्थिक अडचण सोडविण्यासाठी साहाय्य घेता येते. हे आर्थिक साहाय्य त्यांना विनाविलंब मिळते.



https://www.loksatta.com

**३) व्यवसाय सुरू करण्यासाठी आर्थिक मदत :**

गरिबांना आपली प्रगती व्हावी असे वाटते ते एखादा छोटा व्यवसाय करण्याचा प्रयत्न करतात पण बँका अथवा इतर व्यक्ती त्यांना जे अल्प भांडवल लागते ते देतीलच असे नाही. अशा परिस्थितीत सूक्ष्म वित्तपुरवठ्याचा मार्ग त्यांना प्रगतीची वाट दाखविण्यास साहाय्य करतो.

उदा. एखाद्या मजुराला भाजीपाला अथवा मासेविक्रिचा व्यवसाय करायचा असेल तर त्याला रु.५०० किंवा रु. १००० ची गरज भासते. सूक्ष्म वित्तपुरवठ्याचा अशा प्रसंगात त्यांना उपयोग होतो. सदर व्यक्ती ही रक्कम खेळते भांडवल म्हणून वापर करून महिना-दोन महिन्यांत परत करते. मिळालेल्या फायद्याच्या रकमेतून आपल्या व्यवसायाची पुढील वाटचाल करू शकते. अशी असंख्य उदाहरणे आहेत.

**४) गरिबांच्या जीवनावश्यक गरजा पूर्ण होण्यासाठी साहाय्य :**

माणसाला सुरुवातीच्या काळात अन्न, वस्त्र आणि निवारा या जीवनावश्यक गरजा होत्या. आता आरोग्य आणि शिक्षण या गरजांचाही समावेश जीवनावश्यक गरजांमध्ये होऊ लागला आहे. आर्थिक व्यवसाय यशस्वी झाला की, गरजांच्या पूर्ततेच्या दृष्टीने मानव सकारात्मक विचार करू लागतो. त्याला या माध्यमातून खात्रीचे उत्पन्नाचे साधन मिळते. जीवनावश्यक गरजा बऱ्यापैकी पूर्ण होण्यास मदत होते.

munotes.in

**५) राहणीमानात बदल :**

आर्थिक उत्पन्नाचा खात्रीचा मार्ग उपलब्ध झाला की, मानव आपल्या राहणीमानाकडे गांभीर्याने लक्ष द्यायला लागतो. यामध्ये निवार्याची पुरेशी पूर्तता, घरात आवश्यक असणार्या वस्तू, वैद्यकीय स्वच्छता, टापटीपपणा गोष्टींकडे गांभीर्याने लक्ष द्यायला लागतो. गरिबांच्या राहणीमानात सुधारणा होते.

**६) महिलांच्या दर्जात सुधारणा :**

धर्मरूढीने महिलांना अस्तित्व असूनही अस्तित्व नाकारले. कारण त्यांना त्यांच्या हक्काचे उत्पन्नाचे साधन नव्हते. सूक्ष्म वित्तपुरवठ्याच्या माध्यमातून महिला वर्गाला त्यांच्या स्वतःच्या हक्काचे उत्पन्नाचे साधन मिळाले. त्यामुळे कुटुंबात त्यांचे स्वअस्तित्व निर्माण होण्यास चालना मिळत आहे. महिलांना स्वतःच्या उत्पन्नामुळे आपल्या हक्काचे काहीतरी मिळते याचे समाधान वाटते. त्यांची कुटुंबातील पत वाढली. पुरुषांनीही तिच्या अस्तित्वाला दाद द्यायला सुरुवात केली आहे. आपल्यावरील होणार्या अन्यायाला प्रतिकारासाठी ती सिद्ध झाली आहे.

**७) आरोग्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलतो :**

असे म्हटले जाते की, भारतात होणारे मृत्यू हे अन्न कमी मिळते म्हणून होत नाहीत तर जे अन्न मिळते ते पुरेसे सकस नसते. केवळ भूक मारण्यासाठी भारतातील गरीब जनता मिळेल ते अन्न खाऊन जगत असते. यातून त्यांच्या शरीराला पुरेसे पोषक अन्न मिळत नाही. यामुळे असंख्य संचारी आजारांना सामोरे जावे लागते.

उत्पन्न वाढल्यानंतर मानवाचा आरोग्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक होतो. तो आरोग्याची काळजी घ्यायला लागतो. अधिक सकस अन्न घेण्याचा प्रयत्न करतो. महिला वर्गाला पुरेसे अन्न मिळण्यास मदत होते. अशा प्रकारे गरिबांचा आरोग्याकडे बघण्याचा कल बदलतो. आजारी पडल्यानंतर जलद औषधोपचार घेण्याची प्रवृत्ती वाढते. त्यामुळे असाध्य आजारापासून दूर राहण्यास मदत होते.

**८) सामाजिक विकासास चालना मिळते :**

गरिबांना समाजात प्रतिष्ठा का नाही? तर त्यांना आर्थिक अस्तित्व नाही. समाज बदलासाठी आर्थिकता बदलणे महत्त्वाचे आहे. सूक्ष्म वित्तपुरवठ्याच्या माध्यमातून आणि कष्ट करून आपले आर्थिक अस्तित्व सिद्ध करण्याचा प्रयत्न केल्यास समाजात त्यांचे स्थान निर्माण व्हायला चालना मिळेल. समाजातील रूढी, परंपरा, अंधश्रद्धा यामुळे जो गरिबांना सन्मान मिळत नव्हता तो मिळवून देण्यासाठी मदत होऊ शकेल. अस्पृश्यतेलाही शिथिलता आणता येईल. अशा प्रकारे सूक्ष्म वित्तपुरवठा अथवा बचत गटांच्या माध्यमातून सामाजिक विकासाला चालना देणे शक्य होईल.

## ८.६ सूक्ष्म वित्तपुरवठ्याच्या समस्या

सूक्ष्म वित्तपुरवठ्याची संकल्पना खूप चांगली असली तरी या संकल्पनेत अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. भारत देशात कोणतीही समाज विकासाची संकल्पना राबवायची म्हटली की, त्यात असंख्य अडथळे येतात हा आपल्या देशाचा जुना इतिहास आहे. पण बदलाची प्रक्रिया स्वीकारली गेली की ती चांगली गती घेते हाही देशाचा इतिहास आहे. सूक्ष्म वित्तपुरवठ्याच्या समस्या पुढीलप्रमाणे आहेत.

### १) अनुदानासाठी कर्ज :

बचत गटांना शासनाची अनुदान देण्याची भूमिका प्रामाणिक आहे. परंतु दारिद्र्यरेषेखालील (SGSY-BPL SHG) बचत गटांना व्यवसाय करण्यासाठी कर्ज देताना ५०% किंवा १.२५ लाख यापेक्षा जी रक्कम कमी असेल इतके अनुदान दिले जाते. अधिकारी वर्ग बचतगटांना अनुदानाचे आमिष दाखवून योजनेचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो. यामुळे आर्थिक विकासाचे उद्दिष्ट बाजूला राहते. आपल्याला अनुदानासाठी कर्ज घ्यायचे आहे ही भावना अलीकडे बचतगटांच्या सदस्यांमध्ये वाढीस लागू लागली आहे. त्यामुळे बचतगट निर्मितीचे आणि गरिबांच्या प्रगतीचे मूळ उद्दिष्ट बाजूला पडते की काय अशी स्थिती निर्माण झाली आहे.

लोकांचा अनुदानासाठी कर्ज घेण्याकडे कल वाढायला लागला आहे. त्यामुळे उद्योग-व्यवसाय सुरू करण्याचे गांभीर्य राहिलेले दिसत नाही.

### २) कर्जाचा उत्पादक कामासाठी विनियोग कमी :

प्राधान्यक्रमाने आर्थिक प्रगती साधावयाची असेल तर कर्जाचा उत्पादक कामासाठीच उपयोग व्हायला हवा. परंतु तसे होताना दिसत नाही. कर्ज घेताना पूर्ण अनुदानाची रक्कम मिळेल एवढा प्रस्ताव तयार करायचा आणि कर्ज मंजुरीनंतर अनुदानाची रक्कम आपापसात वाटून घेण्याचा कल वाढायला लागला आहे. यामुळे कर्जाच्या रकमेचा विनियोग अनुत्पादक कामासाठी होऊ लागला आहे.

### ३) थकबाकीचे प्रमाण वाढू लागले आहे :

बचत गट निर्मितीचा मूळ उद्देश बचत गटांनी वर्षातील किमान आठ ते दहा महिने व्यवसाय करावा. त्यासाठी अर्थसाहाय्य दिले जाते. परंतु बहुसंख्य बचतगट काही काळ व्यवसाय करतात. काही भागांत गावातील सण समारंभ, जत्रा यामध्येच काही खाण्याच्या वस्तू तयार करून विक्री करण्याचा प्रयत्न केला जातो. यामुळे कर्जाची परतफेड सातत्याने होत नाही. त्यामुळे कर्ज परतफेडीची समस्या वाढू लागली आहे.

### ४) बँकांची नकारात्मक भूमिका :

विशेषतः दारिद्र्यरेषेच्या बचतगटांनी बँकांकडे कर्जप्रस्ताव सादर केल्यानंतर कर्ज प्रस्तावाइतकी रक्कम देण्यास विशेषतः व्यापारी बँकांचे काही व्यवस्थापक नाखूश असतात. केवळ सरकारच्या दबावामुळे नाईलाजास्तव कर्ज मंजूर करतात. काही वेळा केवळ अनुदानाची रक्कम बचतगटांना अदा केली जाते. बँकांची भूमिका सकारात्मक नाही.



munotes.in

नाबार्डने या कामासाठी त्यांच्या जिल्हा प्रबंधकांकडे जबाबदारी दिली आहे. जिल्हा प्रबंधक बँक व्यवस्थापकांचे सातत्याने प्रशिक्षण आणि प्रबोधन करण्याचा प्रयत्न करतात. परंतु तरीही त्यांच्या दृष्टिकोनात सकारात्मक बदल झालेला दिसत नाही.

पुरेसे भांडवल उपलब्ध न झाल्यामुळे बचत गट आपला व्यवसाय सक्षमपणे उभा करू शकत नाहीत. सातत्याने या अनुभवाला दारिद्र्यरेषेच्या खालील बचतगटांना सामोरे जावे लागत आहे. कोकण विभागात हा अनुभव प्राधान्यक्रमाने येत आहे.

**५) व्याजाचे प्रमाण जास्त :**

बचत गटांच्या व्याजाचा कालावधी एक महिना गृहीत धरून ठरविला जातो. महिन्याला २ ते ४ टक्के व्याज आकारले जाते. बँकांचे व्याज १० ते १२% दरसालसाठी आकारले जाते. दरसाल दर शेकडा विचार करता बचत गटाच्या कर्जाचे व्याज २४, ३६ किंवा ४८% इतके होते. त्यामुळे व्याजाचे प्रमाण जास्त आहे असे जाणवते.

**६) व्यवसाय पूर्ण काळ चालवले जात नाहीत :**

बचत गट व्यवसाय पूर्ण काळ चालवत नाहीत. हंगाम अथवा जत्रा किंवा (DRDA) ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत करविल्या जाणार्या प्रदर्शनासाठीच उत्पादन केले जाते. यामुळे त्यांना वर्षभर उत्पन्नाचे साधन मिळत नाही. व्यवसाय पूर्णकाळ चालविण्याची बचत गटाच्या सदस्यांची मानसिकता नाही.

**७) मालाचा दर्जा आणि आकर्षक पॅकिंगचा अभाव :**

बचत गटांच्या मालाचा दर्जा, रंग, चव एकसारखी नसते. तसेच मालाचे पॅकिंग आकर्षक नसते यामुळे मालाला बाजारपेठ पुरेशी मिळत नाही. तयार केलेला माल जास्त काळ पडून राहतो व खराब होण्याची शक्यता अधिक असते. साहजिकच उत्पादनासाठी घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीवर याचा विपरीत परिणाम होतो.

वरील समस्या जरी असल्या तरी या सुरुवातीच्या काळातील समस्या आहेत. आर्थिकतेच्या सर्वच प्रकल्पांच्या चळवळीत अशा स्वरूपाच्या समस्यांचा जागतिक पातळीवरील अनुभव आहे. परंतु समस्या उद्भवल्या म्हणून प्रकल्प सोडून देणे योग्य नाही. समस्यांमधून मार्गक्रमण करत प्रकल्प सुरू ठेवल्यास भविष्यात यश गाठता येते हासुद्धा अनुभव आहे. म्हणून सूक्ष्म वित्तपुरवठ्यातील या समस्या कमी करून ही संकल्पना अधिक प्रभावीपणे पुढे नेण्यासाठी परिणामकारक उपायांची अंमलबजावणी करावीच लागेल.

## ८.७ सूक्ष्म वित्तपुरवठा अधिक प्रभावी करण्यासाठी उपाय

सूक्ष्म वित्तपुरवठा अधिक प्रभावी करण्यासाठी पुढील उपाययोजना करता येईल.

**१) अनुदानासाठी कर्ज ही संकल्पना बदलणे :**

आर्थिकदृष्ट्या दुर्बलांची आर्थिक सुधारणा करताना त्यांना अनुदान देऊन उभे करणे गैर नाही. परंतु मानवी प्रवृत्तीप्रमाणे फुकटाची किंमत बर्याच वेळा मानवाला उमजत नाही.

त्याचा तो गैरफायदा घेतो. अनुदानाचा विनियोग अनुत्पादक खर्चासाठी करतो. हा आजपर्यंतचा अनुभव आहे. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमाचे अपयश अनुदानातच लपले आहे असे लिहिल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

अनुदान देताना अगोदर गरिबांची मानसिक तयारी करावी. त्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी ही आर्थिक मदत आहे ही भूमिका त्यांच्यात ठसवण्याचा प्रयत्न करायला हवा. अनुदानाचा वापर उत्पादक कामासाठीच केला जावा. अशा स्वरूपाचा विचार प्रज्वलीत करण्याचा प्रयत्न व्हावा.

याकरिता सामाजिक कार्यकर्ते आणि समाजसेवी संस्था (NGO) याचे सहकार्य घ्यावे. प्रसिद्धी माध्यमांमध्ये सातत्याने प्रसिद्धी देण्यात यावी. अनुदानाचा योग्य वापर करण्याचा प्रयत्न व्हावा.

**२) कर्ज परतफेडीवर प्रभावी नियंत्रण :**

बचत गटांना कर्ज दिल्यानंतर त्यांच्या व्यवसायावर बँका आणि संबंधितांनी लक्ष केंद्रित करायला हवे. व्यवसाय सुरू राहील, त्याची सातत्याने वाढ होत राहील याकरिता बचत गटांना सातत्याने प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. माल विक्रीतून येणार्या रकमेचा भरणा बँक खात्यावर व्हायला हवा. असे झाल्यास कर्जाची परतफेड योग्यरीतीने होईल. बँकांसमोर कर्ज परतफेडीची समस्या राहणार नाही याकरिता ऊध् चे सहकार्यसुद्धा महत्त्वाचे ठरू शकेल.

**३) व्यवसाय जास्त काळ चालवावेत :**

बचत गटांनी कर्ज घेऊन सुरू केलेला व्यवसाय जास्त काळ चालवायला हवा. उत्पादनाचे व्यवस्थापन, विक्रीचे व्यवस्थापन नीट व्हायला हवे. त्यासाठी सातत्याने व्यावसायिक दृष्टिकोन वाढीच्या शिबिरांना बचत गटाच्या प्रमुखांनी हजर राहायला हवे. आपला व्यवसाय जास्त काळ कसा चालू राहील याची दक्षता घ्यायला हवी.

**४) कर्जाचा उत्पादक कामासाठीच उपयोग करावा :**

बँकेने ज्या व्यवसायासाठी कर्ज उचलले आहे तो उत्पादनाचा व्यवसाय त्यातून सुरू करायला हवा. कोणत्याही परिस्थितीत कर्जाचा वापर अनुत्पादक कामासाठी होता कामा नये. यासाठी बचत गटाचे प्रमुख खंबीर असायला हवेत. ज्यातून उत्पन्न मिळण्यासाठी कर्ज घेतले आहे. त्यातून उत्पन्न मिळविण्याचाच व्यवसाय करायला हवा. असे झाल्यास कर्जाच्या परतफेडीची समस्याच शिल्लक राहणार नाही.

**५) बँकांची मानसिकता बदलते :**

कर्ज वितरण करताना बँकांनी जरूर व्यावसायिक दृष्टिकोन ठेवावा. परंतु बचत गटांना व्यवसायासाठी कर्ज देताना नकारघंटा धरू नये. कर्जाचा जेवढा प्रस्ताव आहे तेवढा प्रस्ताव मंजूर करावा. जेणेकरून बचत गटांना नियोजित व्यवसाय पूर्ण क्षमतेने सुरू करता येईल आणि त्यातून पुरेसा व्यवसाय विकसित करता येईल. यासाठी बँकांच्या नकारघंटा लावणार्या व्यवस्थापकांचे मानसिक परिवर्तन करण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत.

NABARD याकरिता पुनर्वित्त देते. NABARD ने यासाठी पुढाकार घेऊन बँकांची असहकार्याची वृत्ती कमी करायला हवी असे झाले तरच कर्ज परतफेडीची समस्या कमी करता येणे शक्य होईल.

**६) साखळी मार्केटिंग पद्धतीचा विकास :**

बचत गटांनी आपल्या उत्पादनांच्या विक्रीसाठी साखळी मार्केटिंग पद्धतीचा विकास करावा. याप्रमाणे कोल्हापूर जिल्ह्यात कांचनताईर् परुळेकर यांनी महिला बचत गटांच्या उत्पादनासाठी साखळी मार्केटिंग पद्धती राबविली यातून महिला बचत गटांच्या उत्पादित मालाच्या विक्रीसाठी चांगली सोय झाली.

वरील सूचनांचा गांभीर्याने विचार आणि कृती झाल्यास सूक्ष्म वित्तपुरवठा संकल्पना अधिक यशस्वी करता येईल.

**आपली प्रगती तपासा**

१) सूक्ष्म वित्तपुरवठ्यातील गरिबांच्या विकासाची भूमिका स्पष्ट करा.

२) सूक्ष्म वित्तपुरवठ्याच्या समस्या सांगून त्यावर उपाय सुचवा.

## ८.८ स्वयंसेवी संस्था व बचत गट

केंद्र सरकारने दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना आर्थिक सक्षमता देण्यासाठी १९९९ साली स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना सुरू केली. या योजनेअंतर्गत बचत गट स्थापन करणे आणि त्यांचे योग्य संयोजन करण्याची जबाबदारी महिला आर्थिक विकास महामंडळ आणि स्वयंसेवी संस्थांकडे सोपविली BPLआणि APL दोन्ही बचतगटांचे संयोजन आणि सक्षमीकरण करण्याचे कार्य वरील दोन संस्थेमार्फत करण्यात येते. स्वयंसेवी संस्था बचत गट चळवळीत पुढील भूमिका बजावतात.

**१) बचत गटांची स्थापना :**

बचत गटांच्या स्थापनेसाठी ग्रामीण भागातील लोकांची मानसिकता तयार करणे. बचत गट स्थापनेसाठी सदस्य गोळा करणे. प्रत्यक्ष बचत गटाची स्थापना करून देणे. बचत गटांची ग्रामपंचायत पंचायत समिती आणि जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडे नोंद करणे इत्या. जबाबदाऱ्या पार पाडतात.

**२) बचत गटांच्या वारंवार बैठका घेणे :**

ग्रामीण भागातील महिलांची मानसिकता तयार करणे कठीण काम असते. त्यासाठी त्यांच्या गटाशी सातत्याने संपर्क ठेवावा लागतो. सातत्याने महत्त्व पटवून सांगावे लागते. याकरिता वारंवार बचत गटांच्या बैठका आयोजित केल्या जातात. बैठकांमध्ये मानसिकता तयार करण्याचा, तसेच गटांची कार्यपद्धती सदस्यांच्यात उतरवण्याचा प्रयत्न करतात. दर महिन्याला सभासदांची बैठक आयोजित केली जाते. या बैठकीत विविध विषयांवर चर्चा घडवून आणली जाते.

munotes.in

**३) आवश्यक कागदपत्राबाबत माहिती देणे :**

बचत गटाच्या स्थापनेनंतर त्याचे पहिले मूल्यांकन सहा महिन्यांनी होते. या मूल्यांकनासाठी आवश्यक कागदपत्रे तयार करून घेण्याचे काम NGO करतात. उदा. मूल्यांकनासाठी १) मासिक बैठक इतिवृत्त वही २) हिशोबाच्या वह्या ३) बँक पासबुक ४) आवक-जावक फाईल ५) दिलेल्या कर्जाचे अर्ज इत्या. कागदपत्रे अद्ययावत ठेवण्यासाठी सहकार्य करतात.

**४) बँकेत खाते उघडण्यासाठी सहकार्य :**

बचत गटाच्या महिलांना बँकेचे व्यवहार समजून देऊन नियोजित बँकेत बचत गटाच्या नावाने खाते उघडून देण्याचे सहकार्य करतात. यासाठी लागणारी कागदपत्रे सदस्यांकडून तयार करून घेतात.

**५) बचत गटाला मूल्यांकनासाठी सिद्ध करणे :**

बचत गट मूल्यांकनासाठी सिद्ध होण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता गटाचा कारभार उत्तम प्रकारे चालू ठेवण्यासाठी सहकार्य. मूल्यांकनानंतर मिळणारे खेळते भांडवल योग्य पद्धतीने अंतर्गत कर्ज व्यवहार करून घेऊन बँकेत वेळेत परतफेड करण्याचे काम करतात. पुढे दुसर्या मूल्यांकनासाठी सिद्ध करण्याचे कार्य NGO करतात.

**६) बचत गटाला प्रशिक्षण :**

दुसऱ्या मूल्यांकनाबरोबर बचत गटाच्या सदस्यांनी निवडलेल्या व्यवसायाचे कौशल्यवृद्धी प्रशिक्षण देण्यासाठी स्वयंसेवी संस्था प्रयत्न करतात. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक परिपूर्ण बँक प्रस्ताव तयार करण्यासाठी सहकार्य करतात.

**७) उत्पादित मालाच्या विक्रीसाठी सहकार्य :**

बचत गटांनी कर्ज उपलब्ध झाल्यानंतर सर्व सदस्य मिळून एकच व्यवसाय निवडावा अशी अपेक्षा असते. निवडलेल्या व्यवसायातून जे उत्पादन तयार होईल त्याचा दर्जा, पॅकिंग, मार्केटिंग सर्व्हे आदीसंबंधी सहकार्य आणि उत्पादित मालाच्या विक्रीसाठी मार्गदर्शन करतात. स्वयंसेवी संस्था प्रभावी असेल तर बचत गट सक्षमपणे उत्पादन आणि वितरणाचे कार्य करू शकतात. यातून गरिबांना आर्थिक सक्षमतेचा मार्ग मिळतो.

महाराष्ट्र राज्यात असंख्य स्वयंसेवी संस्थांनी बचत गटांना सक्षम बनविण्याच्या दृष्टीने सक्षमपणे कार्य केले आहे. महाराष्ट्रात बचत गट चित्रपट निर्मितीच्या क्षेत्रापर्यंत जाऊन पोहोचले आहेत.

## ८.९ सारांश

सूक्ष्म वित्तपुरवठ्याची बचत गटांच्या चळवळीतील भूमिका महत्त्वाची आहे. सूक्ष्म वित्तपुरवठा वैयक्तिकस्तर आणि गटस्तरावर करता येतो. सूक्ष्म वित्तपुरवठ्याची गरज बचत गटाच्या माध्यमातून पूर्ण करता येते. गरिबांना सावकाराच्या कर्जापासून मुक्त करता येते. त्याच्या अचानक येणार्या अडचणींना सूक्ष्म वित्तपुरवठ्याचा खूपच चांगला उपयोग होतो.

राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (NABARD) ने सूक्ष्म वित्तपुरवठ्याच्या वितरणासाठी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. देशातील २७ सार्वजनिक क्षेत्रांतील बँका, १९ खाजगी बँका आणि ८१ प्रादेशिक ग्रामीण बँकांबरोबर ३१८ सहकारी बँकांना या चळवळीत सहभागी करून घेऊन सर्व बँकांना पुनर्वित्त पुरवठ्याची जबाबदारी घेतली.

देशात बँकांशी सहसंबंध प्रस्तावित केलेल्या बचत गटांची संख्या ६९.५३ लाख इतकी आहे. यापैकी महिला बचतगट ५३.१० लाख इतके आहेत. SGSY चे बचतगट १६.९४ लाख इतके आहेत. या बचत गटांना नाबार्डच्या पुनर्वित्तामधून ६१६८.७१ कोटी इतके अर्थसाहाय्य करण्यात आले.

महाराष्ट्र राज्यात दोन लाखांपेक्षा अधिक बचतगट स्थापन झाले आहेत. त्यापैकी १.६७ लाख महिला बचत गट आहेत.

सूक्ष्म वित्तपुरवठ्यामुळे ग्रामीण भागातील गरिबांना याचा चांगला लाभ झाला आहे. यामुळे गरिबांना अत्यल्प काळात आणि अचानक अडचणीच्या काळात कर्जाची सोय झाली. त्यांच्या राहणीमानावर आणि आर्थिकतेवर सकारात्मक परिणाम झाला आहे. महिलांच्या दर्जात सुधारणा होण्यास चालना मिळत आहे.

सूक्ष्म वित्तपुरवठ्याच्या प्रक्रियेस काही अडचणी आहेत. या अडचणींना प्रभावी उत्तर शोधण्याचा प्रयत्न करायला हवा.

बचत गटांच्या चळवळीस स्वयंसेवी संस्थांची भूमिका महत्त्वाची आहे. बचत गट स्थापन करण्यापासून गटांची भूमिका महत्त्वाची आहे. या चळवळीच्या बळकटीकरणासाठी स्वयंसेवी संस्था प्रभावी भूमिका बजावू शकतात. संपूर्ण देशभरात आणि महाराष्ट्र राज्यात ही बाब सिद्ध झाली आहे. कोल्हापूर जिल्ह्यात स्वयसिंद्ध प्रकल्पाचे उदाहरण बोलके आहे. पुणे जिल्ह्यात NGO नी प्रभावी कामगिरी बजावली आहे.

अशा प्रकारे सूक्ष्म वित्तपुरवठा, बचत गटांचे बँकेशी प्रस्तावित होणारे सहसंबंध आणि एकंदर बचत गटांच्या चळवळीत स्वयंसेवी संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

munotes.in

## ८.१० स्वाध्याय

१) सूक्ष्म वित्तपुरवठा संकल्पना सविस्तर स्पष्ट करा व बचत गटाच्या सदस्यांच्या सूक्ष्म वित्तपुरवठ्याच्या गरजा लिहा.

२) सूक्ष्म वित्तपुरवठा - बचत गट व बँक सहसंबंध विशद करा.

३) सूक्ष्म वित्तपुरवठ्याच्या माध्यमातून गरिबांचा विकास कसा साध्य करता येईल. चर्चा करा.

४) सूक्ष्म वित्तपुरवठ्याच्या समस्या सांगा आणि या समस्या कमी करण्यासाठी प्रभावी उपाय सुचवा.

५) सूक्ष्म वित्तपुरवठा अधिक प्रभावी करण्यासाठी उपाय सुचवा.

६) स्वयंसेवी संस्था आणि बचत गट सहसंबंध स्पष्ट करा.

❖❖❖❖

munotes.in

# ९

# ग्रामीण विकासातील स्वयंसहाय्यता बचत गटाचे महत्त्व

**घटक रचना :**


९.० पाठाचे उद्देश

९.१ प्रस्तावना

९.२ ग्रामीण विकासात स्वयंसाहाय्यता गटाचे महत्त्व

९.३ स्वयंसाहाय्यता बचत गटांचे गरिबांच्या दृष्टीने महत्त्व

९.४ बचत गट आणि महिला सबलीकरण.

९.५ स्वयंसाहाय्यता बचत गटासमोरील आव्हाने

९.६ सारांश

९.७ स्वाध्याय


## ९.० पाठाचे उद्देश

१) ग्रामीण विकासातील स्वयंसाहाय्यता बचत गटांचे महत्त्व अभ्यासणे.
२) गरिबांच्या विकासातील बचत गटांची भूमिका तपासणे.
३) बचत गटाच्या माध्यमातून महिलांना अस्तित्व देता येईल का?
४) स्वयंसाहाय्यता बचत गट चळवळीसमोरील आव्हानांची माहिती घेणे व या आव्हानांना प्रभावीपणे सामोरे जाण्यासाठी उपाययोजनांची तपासणी करणे.

## ९.१ प्रस्तावना

ग्रामीण विकासाचा विचार करताना बचत गटाच्या चळवळीचा प्राधान्यक्रमाने विचार करण्याची गरज निर्माण होऊ लागली आहे. आज ग्रामीण विकासाच्या प्रत्येक प्रक्रियेत बचत गटांचा सहभाग आवश्यक मानण्यात येऊ लागला आहे.

ग्रामीण विकासात बचत गट सकारात्मक भूमिका बजावत आहेत. ग्रामीण भागात पायाभूत सुविधा, आर्थिक सक्षमीकरण अशा बाबीत बचत गट चळवळ सक्रिय होऊ लागली आहे. पंचायत राजच्या प्रक्रियेत बचत गटांचा सहभाग वाढायला लागला आहे. ग्रामसभांना उपस्थितीसाठी बचत गट जवळचे वाटू लागले आहेत.

ग्रामीण गरिबांच्या विकासातही बचत गट चळवळ सकारात्मक बदल घडवून आणण्याची मानसिकता विकसित करण्याच्या प्रयत्नात आहेत. एकंदर माहिती सक्षमीकरणातही बचत गटांची भूमिका प्रभावी ठरत आहे.




https://dhyeyanewschannel.com

बचत गटांसमोर अनेक सकारात्मक आणि नकारात्मक आवाहने उभी राहात आहेत. या आव्हानांना सामोरे जाण्याचे प्रयत्न बचत गट करू लागले आहेत. कोणतीही नवी प्रक्रिया निर्माण होताना अडचणी अभिप्रेत असतात. या अडचणींवर मात करणे हे सदर चळवळीचे खरे यश असते. यादृष्टीने बचत गटांचे ग्रामीण विकासातील महत्त्व स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

## ९.२ ग्रामीण विकासात स्वयंसाहाय्यता बचत गटांचे महत्त्व

१९९९ एप्रिल महिन्यात स्वर्णजयंती ग्राम ग्रामस्थ रोजगार योजनेच्या माध्यमातून बचत गटांची चळवळ सुरू झाली. गेल्या तेरा वर्षांच्या कालावधीचा आढावा घेता संपूर्ण देशभर लाखो बचतगट उभे राहिले आहेत आणि त्यांना बँकांनी दिलेला वीजपुरवठा कोटी रुपयांत आहे. बचत गटाच्या चळवळीने ग्रामीण विकासाला गती देण्याचा प्रयत्न केला आहे. ग्रामीण भागाच्या विकासात सकारात्मक बदल करण्याची कुवत बचत गटांच्या चळवळीत आहे. बचत गटांचे ग्रामीण विकासातील महत्त्व पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

### १) दारिद्र्य निर्मूलन :

गरिबीची समस्या ग्रामीण भागामध्ये जास्त आहे. देशात झालेल्या जमिनीच्या विषम वितरणाचा तो परिणाम आहे. यामुळे गरिबांना हक्काचे उत्पन्नांचे साधन नाही. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे जी जमीन छोट्या शेतकऱ्यांच्या वाट्याला आली आहे त्यात शेतीच्या उत्पादनाची हमी देता येत नाही. कारण अनियमित पाऊस, बदलणारे पर्यावरण, ग्लोबल वॉर्मिंग ही याची कारणे आहेत. शिवाय शेतीसाठी वापरली जाणारी बियाणे निकृष्ट प्रतीची आहेत.

यावर उपायांचा विचार करता बचत गटाच्या माध्यमातून छोटा व्यवसाय सुरू करून ग्रामीण जनता आर्थिक स्वावलंबनाकडे वाटचाल करू शकते. आर्थिक विकास झाला की,

munotes.in

आपोआप दारिद्र्य निर्मूलनाला चालना मिळू शकते हे चित्र आता ग्रामीण भागात दिसू लागले आहे.

ज्याप्रमाणे बांगलादेशातील गरिबांनी ग्रामीण बँकेच्या माध्यमातून आपले अस्तित्व सिद्ध करण्याचा प्रयत्न सुरू ठेवला आहे त्याप्रमाणे नाबार्डच्या माध्यमातून हे चित्र ग्रामीण भागात दिसू लागले आहे. ग्रामीण गरिबी कमी करण्यासाठीचा हा प्रभावी पर्याय आहे.

**२) ग्रामीण भागात बचतीस प्रोत्साहन :**

मूलतः गरिबांना आर्थिक क्रयशक्ती कमी असते. मिळणारी मजुरी ते आपल्या जीवनावश्यक गरजांवर खर्च करून टाकतात. भविष्याच्या गरजांचा अथवा अडचणींचा विचार त्यांच्यात नसतो. बचत गटाच्या माध्यमातून मिळणाऱ्या अल्प उत्पन्नातूनच अल्प बचत बाजूला काढण्याची त्यांना सवय लावण्याचा प्रयत्न केला जातो. महिला वर्गाला मुळातच ही सवय असते परंतु खर्चाची तोंडमिळवणी करताना अडथळे येतात. तरीही त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करण्याची प्रेरणा बचत गटाच्या माध्यमातून देण्याचा प्रयत्न केला जातो.

आकडेवारीचाच विचार करता देशात एकूण ६९.५३ लाख बचत गट आहेत. त्यातील माहिती बचत गटांची संख्या ५३.१० लाख इतकी आहे. महिला बचत गटांची संपूर्ण देशभर केलेली बचत रु. ४४९८.६६ कोटी इतकी आहे. या बचतीमध्ये ग्रामीण गरीब महिलांचे प्रमाण प्रचंड मोठे आहे. महिलांच्या बचतीच्या उपजत प्रवृत्तीत या चळवळीमुळे प्रोत्साहन मिळाले आहे. तसेच स्वर्ण जयंती ग्रामस्वरोजगार योजनेमुळे विशेषतः गरिबांना बचतीसाठी प्रोत्साहन मिळाले आहे.

**३) ग्रामीण अर्थव्यवस्थेवर सकारात्मक परिणाम :**

बचत गटांच्या निर्मितीचा जसा बांगलादेशाच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेवर परिणाम झाला त्याचप्रमाणे भारताच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेवर परिणाम झालेला दिसत आहे. बचत गटांच्या माध्यमातून ग्रामीण भागात छोट्या उद्योगांची सुरुवात व्हायला लागली आहे. शेतीच्या नवनवीन प्रयोगांचा स्वीकार होऊ लागला आहे.

बदलत्या पर्यावरणाला सामोरे जाण्यासाठी सेंद्रिय आणि सामूहिक शेतीच्या प्रयोगांना ग्रामीण भागात सुरुवात व्हायला लागली आहे. या प्रयोगामुळे ग्रामीण अर्थव्यस्थेच्या सक्षमीकरणाची सुरुवात झाली आहे.

शेतीला पाणी पुरवण्यासाठी सिंचनाच्या योजना बचत गटांच्या माध्यमातून सुरू व्हायला लागल्या आहेत. छोट्या छोट्या उद्योगातून ग्रामीण भागात आर्थिक सक्षमता निर्माण होण्यास चालना मिळू लागली आहे. बचत गटांचे उत्पादन दर्जात्मक असते. विविध स्तरांवर होणार्या प्रदर्शनात बचत गटांच्या मालाची मोठ्या प्रमाणात विक्री व्हायला लागली आहे. महाराष्ट्र शासनामार्फत भरवली जाणारी 'महालक्ष्मी सरस' सारखी प्रदर्शने पुणे जिल्ह्यात प्रतिवर्षी आयोजित केली जाणारी 'भिडथडीजमा' ही याची प्रभावी उदाहरणे आहेत.

munotes.in

**४) ग्रामीण सामाजिक बदलास चालना :**

सद्यस्थितीत ग्रामीण भागाच्या समाजव्यवस्थेचा आढावा घेता, बचत गटाच्या चळवळीत सर्वच समाजाचे दुर्बल घटक एकत्र यायला लागले आहेत. त्यामुळे उच्च-नीचतेची भावना कमी व्हायला लागली आहे. बचत गटांसाठी आयोजित केल्या जाणार्या प्रशिक्षण शिबिरांमुळे आणि प्रबोधनाच्या कार्यक्रमामुळे ग्रामीण भागातील महिला आणि पुरुषांमध्ये परिवर्तनाची मानसिकता वाढायला चालना मिळत आहे. स्त्रियांच्या दर्जात सुधारणा आणि महिलांना स्वतंत्र अस्तित्व मिळण्यास बचत गट चळवळ प्रभावी भूमिका बजावण्याच्या मार्गाला लागली आहे.

ग्रामीण भागातील अंधश्रद्धा, रूढी परंपरा यांना विरोध करून विज्ञानावर आधारित सक्षम समाज रचना निर्माण करण्याचे ध्येय बचत गटाच्या चळवळीने समोर ठेवले आहे. तसा सकारात्मक बदल ग्रामीण भागात दिसू लागला आहे.

**५) ग्रामीण भागात पायाभूत सुविधांची निर्मिती :**

विकासाच्या प्रक्रियेत शासनपातळीवर ग्रामीण आणि विशेषतः दुर्गम भागाकडे दुर्लक्ष होते. कारण हे भाग आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेले असतात त्यामुळे या भागात पायाभूत सुविधा निर्माण होण्यास विलंब होतो. नागरिकांना तेवढी ओढही नसते.

सद्यस्थितीत हे चित्र बदलताना दिसत आहे. सरकारला दुर्गम भागातही पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या योजना आखाव्या लागल्या आहेत आणि त्या योजनाची कृतीही करावी लागत आहे.

पायाभूत सुविधांमध्ये रस्ते, वीज, पाणीपुरवठा, इतर नागरी सुविधांचा समावेश असतो. ग्रामीण भागातून आता पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी नागरिकांकडून मागणीचा जोर वाढू लागला आहे. कारण बचत गटाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांची विकासाच्या दृष्टीने मानसिकता तयार करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

**६) आर्थिक विषमतेच्या निर्मूलनासाठी प्रभावी पर्याय :**

आर्थिक विषमता ही बेकारीतून येत असते. बेकारी-दारिद्र्य-आर्थिक विषमता हे दुष्टचक्र ग्रामीण भागात सातत्याने पाहावयास मिळते. या दुष्टचक्राला भेदायचे असेल तर त्याला पर्याय रोजगारात वाढ आणि सातत्य निर्माण व्हायला हवे. ही प्रक्रिया बचत गटातून शक्य आहे. बचत गटांच्या माध्यमातून नागरिकांची पक्की व्यावसायिक मानसिकता तयार करण्याचा प्रयत्न केल्यास आर्थिक विषमता कमी करता येणे शक्य आहे.

देशातील काही गावांनी ही बाब सिद्ध करून दाखविली आहे. आर्थिक विषमतेच्या निर्मूलनासाठी भविष्यात बचत गटांची चळवळ प्रभावी भूमिका बजावण्याच्या प्रयत्नात आहे.

**७) ग्रामीण भागाचा बँकांशी संबंध प्रस्थापित होतो :**

बचत गटाच्या निर्मितीचा ग्रामीण भागाच्या दृष्टीने हा महत्त्वाचा लाभ आहे असे म्हणता येईल. बचत गट जी बचत करतात ती बँकांमध्ये सेव्हिंग खाते सुरू करून जमा करावी लगते. या बचतीच्या माध्यमातून बँकांनाही आर्थिक भांडवल उपलब्ध होते.

बचत गटांमुळे ग्रामीण नागरिकांना बँक व्यवहार करण्याची माहिती मिळते. बँकेत आपला पैसा सुरक्षित राहू शकतो याची जाणीव होते.

शासनाने अग्रणी बँकेच्या माध्यमातून ग्रामीण भागात बँकांचे जाळे पसरवण्याचा प्रयत्न सुरू ठेवला आहे. प्रादेशिक ग्रामीण बँका आणि सहकारी बँका आपल्या शाखा ग्रामीण भागात सुरू करायला लागल्या आहेत. एकंदर बचत गटांच्या माध्यमातून नागरिकांना बँकांचे आर्थिक व्यवहार करण्याचे शिक्षण मिळायला लागले आहे

**८) ग्रामीण भागातील नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यास प्रेरणा :**

ग्रामीण भागातील नागरिकांना शासनाच्या योजनाची माहिती या चळवळीमुळे व्हायला लागली आहे. बचत गटांची सातत्याने प्रशिक्षण आणि प्रबोधन शिबिरे होत असतात. या शिबिरांमधून विविध शासकीय योजनांची माहिती देण्यात येते. यामध्ये महिला विकास, बालिका विकास, मागासवर्गीयांचे कल्याण अशा असंख्य योजनांचा लाभ ग्रामीण भागातील नागरिकांना व्हायला लागला आहे.

ग्रामीण भागातील नागरिकांसाठी शासनाने सामाजिक विमा योजना सुरू केली आहे. या योजनेमुळे बचत गटाचे कर्ज घेतलेल्या एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास मिळणार्या विम्याच्या रकमेतून कर्ज फेड करता येते. शासनाच्या विविध योजनांचा लाभ ग्रामीण भागातील लोकांना घेता येतो.

**९) सावकारी पाशातून मुक्ती :**

ग्रामीण नागरिकांची आर्थिक लुबाडणूक करणारा घटक म्हणजे ग्रामीण भागातील सावकार आणि जमीनदारांचा वर्ग. ही मंडळी गोड बोलून गरिबांना कर्ज देतात, परंतु गरिबांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांची पिळवणूक करतात. सावकारांच्या कर्जाचे व्याजही जास्त असते.

बचत गटाच्या चळवळीमुळे कमीतकमी व्याजदरात नागरिकांना कर्जाची सोय उपलब्ध झाली आहे. यामुळे सावकाराचा प्रभाव कमी करता येणे शक्य झाले आहे. ग्रामीण भागातील नागरिकांचे या दृष्टीने प्रबोधन होण्याची गरज आहे.

ग्रामीण विकासात बचत गटाची चळवळ निश्चितपणे सकारात्मक भूमिका बजावू शकेल. पण याकरिता शासन समाज आणि स्वयंसेवी संस्था आणि खुद्द बचत गटाच्या सदस्यांनी यासाठी सकारात्मक दृष्टिकोन आणि बदलीच्या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेण्याची तयारी ठेवायला हवी. तरच ग्रामीण भागाचे चित्र बचत गटाच्या माध्यमातून बदलणे शक्य आहे. बचत गटाच्या चळवळीचे ग्रामीण विकासाच्या दृष्टीने महत्त्व अनन्यसाधारण आहे हे नाकारून चालणार नाही. तशी स्थिती संपूर्ण देशभर जाणवायला लागली आहे.



munotes.in

**१०) पंचायत राज सक्षमीकरण :**

७३ व्या घटना दुरुस्तीनंतर पंचायत राज सक्षमीकरणाला महत्त्व प्राप्त झाले. पंचायत राजमध्ये महिलांचा ५०% सहभाग गृहीत धरण्यात आलेला आहे. ग्रामसभांना महत्त्व प्राप्त झाले आहे. ग्रामसभेत घटनात्मक दर्जा प्राप्त झाला आहे.

बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे प्रबोधन झाल्यामुळे आज महिला वर्ग पंचायत राजच्या निवडणुकांमध्ये प्रत्यक्ष सहभागी होऊन निवडून यायला लागल्या आहेत. महिलांनी पंचायत राजमधील महत्त्वाच्या पदांवर आपले अस्तित्व सिद्ध करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

ग्रामसभांना नागरिकांची उपस्थिती कमी असते. बचत गट ग्रामसभा कोरम यशस्वी करण्याचे प्रभावी माध्यम होऊ पाहात आहे. बचत गटांचे सदस्य ग्रामसभांमध्ये विविध विषयांवर चर्चा घडवून आणण्याचा प्रयत्न करत आहेत. गावात राबविल्या जाणाऱ्या विकासाच्या योजनांवर नागरिक लक्ष ठेवायला लागले आहेत.

**आपली प्रगती तपासा -**

१. ग्रामीण विकासातील बचत गटांची भूमिका विशद करा.

## ९.३ स्वयंसाहाय्य बचत गटाचे गरिबांच्या दृष्टीने महत्त्व

स्वयंसाहाय्य बचत गटांच्या माध्यमातून गरिबांना आपल्या जीवनाच्या प्रगतीची नवी पहाट सापडली आहे. या अनुषंगाने बचत गटांचे महत्त्व पुढीलप्रमाणे आहे.

**१) बचतीच्या सवयीत वाढ :**

स्त्रियांना मुळातच बचतीची सवय आहे. बचतगटांमुळे या बचतीच्या सवयीत आणखी वाढ होण्यास मदत झाली आहे. स्त्रियांना स्वतःच्या नावे बचत करण्याची संधी मिळाली आहे. त्यामुळे त्यांची बचत प्रवृत्ती वाढत आहे.

**२) बँक व्यवहाराची सवय :**

बचत गटाच्या माध्यमातून जमा होणारी रक्कम बँकेत भरणा करावी लागते. आवश्यक तेव्हा काढावी लागते. यामुळे बँक व्यवहाराची सवय लागण्यास मदत होते. महिला निःसंकोचपणे बँक व्यवहार करायला लागल्या आहेत. चेक भरणा करणे यासारखे व्यवहार महिला आता करायला लागल्या आहेत.

**३) महिलांच्या व्यवसायात बदल :**

ग्रामीण महिला केवळ मोलमजुरीच्या व्यवसायावर गुजराण करत होत्या. आता त्यांच्या व्यवसायामध्ये बदल होत आहे. व्यवसायासाठी आर्थिक साहाय्य मिळाल्यामुळे बहुसंख्य महिलांनी स्वयंरोजगाराकडे वाटचाल सुरू केली आहे. त्यामुळे त्यांच्या आर्थिक प्राप्तीतही आमूलाग्र बदल झाले आहेत.

**४) स्त्री उद्योग जगतेत वाढ :**

बचत गटाच्या माध्यमातून स्त्रिया घरातून बाहेर पडू लागल्या आहेत. स्वतःच्या नावावर कर्ज घेऊन भांडवलाची उभारणी करण्यास पुढे सरसावल्या आहेत. बचत गटाच्या माध्यमातून उद्योगाचे आणि कौशल्यवृद्धीचे प्रशिक्षण मिळू लागल्यामुळे त्याच्यात व्यावसायिक मानसिकता अधिक दृढ व्हायलला लागली आहे. त्यामुळे स्वयंरोजगारात महिला वर्गाचा कल वाढत आहे. छोटे छोटे घरगुती व्यवसाय महिला करू लागल्या आहेत. त्यांना विक्री कलाही अवगत होत आहे.

**५) कौटुंबिक आणि आकस्मिक अडचणीच्या प्रसंगी कर्जाची उपलब्धता :**

बचत गटाच्या माध्यमातून कुटुंबात आकस्मिक प्रसंगी त्वरित कर्ज मिळण्याचे माध्यम बचत गट झाले आहेत. अडचणीच्या प्रसंगात यामुळे त्वरित अर्थसाहाय्याची सोय होते. त्यामुळे सभासदांना कर्जासाठी सावकाराकडे जाण्यापासून प्रतिबंध करता येतो. गटाचा कालावधी जसा वाढेल तशी बचत गटाकडील कर्ज देण्यासाठी आवश्यक रक्कमही वाढते. गटाकडून कौटुंबिक गरजा भागविण्यासाठीही कर्जाची उपलब्धता होते.

**६) व्यवसायासाठी बाह्य कर्जाची उपलब्धता :**

सभासदांच्या गटांना सरकारी अनुदान, बँकेमार्फत मिळणारे कर्ज किंवा स्वयंसेवी संस्थेकडून मिळणारे कर्ज हे गटातील सभासदांना विभागून दिले जाते अशा कर्जात बाह्य कर्ज मिळतात. अशा कर्जासाठी कोणत्याही प्रकारचे तारण लागत नाही. बचत गट हेच तारण मानले जाते. बचत गटांना खेळत्या भांडवलासाठी आणि व्यवसाय उभारणीसाठी बँकांमार्फत अर्थसाहाय्य उपलब्ध होते.

**७) सरकारी योजनांबद्दल माहिती :**

आजपर्यंत स्त्रीचे अस्तित्व चूल आणि मूल एवढ्यापुरते मर्यादित होते. बचत गटाच्या माध्यमातून स्त्री घरातून बाहेर आली. शासकीय कार्यालये आणि NGO च्या माध्यमातून ती अनेक कार्यक्रमात, चर्चासत्रात सहभागी व्हायला लागली यामुळे निम शासकीय योजनांची माहिती घेण्यास मदत होऊ लागली आहे. शासकीय अधिकार्यांच्या जबाबदारीचीही तिला माहिती व्हायला लागली आहे.

**८) गतिशीलतेत वाढ :**

स्त्रिया बचत गटांच्या सभासद झाल्यानंतर त्यांच्या गतिशीलतेत वाढ व्हायला लागली आहे. बचत गटाचे सदस्य झाल्यानंतर गटाच्या कामासाठी बँकेत जाणे, सरकारी कार्यालयात जाणे, महिला मेळावे, प्रशिक्षण शिबिरांना हजर राहणे, विविध स्वरूपाच्या प्रदर्शनांना भेटी देणे, इतर गटांशी चर्चा या माध्यमातून स्त्रियांना आत्मविश्वास येण्यास मदत होत आहे. तिच्या गतीक्षमतेत वाढ व्हायला लागली आहे.

**९) सामाजिक कार्यात सहभाग :**

महिला बचत गटांच्या माध्यमातून सामाजिक कार्यात सहभागी होऊ लागल्या आहेत. स्त्रियांचे विश्व विस्तारायला लागले आहे. महिला सक्षमीकरणाची प्रक्रिया महिलांच्या माध्यमातून वाढू लागली आहे. सामाजिक बदलीची प्रक्रिया महिला लवकर स्वीकारू लागल्या आहेत. समाजातील वाईट प्रवृत्तींना संघटित प्रतिकार करण्याचा प्रयत्न करू लागल्या आहेत. पंचायत राजच्या माध्यमातून गावविकासात महिलांचा सहभाग वाढायला लागला आहे.

वरीलप्रमाणे महिलांमध्ये विविध माध्यमातून बचत गट बदल घडवून आणत आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) स्वयंसाहाय्यता बचत गटांची गरिबांच्या विकासातील भूमिका स्पष्ट करा.

## ९.४ बचत गट आणि महिला सबलीकरण

महिला वर्गाच्या सक्षमीकरणासाठी बचत गटांची चळवळ उपयुक्त ठरू शकते. कारण या माध्यमातून महिला वर्गात स्वतःचे आर्थिक अस्तित्व निर्माण करता येते. आर्थिक अस्तित्वामुळे त्यांचा कौटुंबिक स्तर उंचावण्यात मदत होते यादृष्टीने महिलांच्या सक्षमीकरणासाठी बचत गटाच्या माध्यमातून प्रयत्न होत आहेत. २००१ हे महिला सक्षमीकरण वर्ष मानण्यात आले होते. महिलांच्या सबलीकरणाच्या दृष्टीने विचार करता त्यांचे सामाजिक, कौटुंबिक, शैक्षणिक, आर्थिक आणि राजकीय सबलीकरण महत्त्वाचे आहे. यादृष्टीने महिला वर्गाचे बचत गटाच्या माध्यमातून पुढीलप्रमाणे सक्षमीकरण करणे शक्य आहे.

**१) आर्थिक सबलीकरण :**

आर्थिक सबलीकरणासाठी स्त्रीला दिलेल्या कोणत्याही कामाचा दर्जा कमी न लेखता त्या कामाच्या दर्जाला अस्तित्व आहे असे मानायला हवे. तिने निवडलेल्या कामाला दर्जा देऊन या माध्यमातून तिला स्वतःच्या उत्पन्नाचे साधन निर्माण करण्याची संधी द्यायला हवी. एकटी स्त्री स्वतंत्र उद्योग सुरू करू शकत नाही. परंतु अनेक स्त्रिया एकत्र येऊन व्यवसाय वृद्धी करू शकतात. गटामार्फत त्यांना मानसिक बळ देता येते. तसेच व्यावसायिक शिक्षणही मिळू शकते. महिलांची निर्णयक्षमता, कार्यक्षमता, व्यवस्थापन कौशल्य, रोजगार निर्मिती इत्यादी गोष्टी गटाद्वारे मिळतात. त्यामुळे सबलीकरणात मदत होऊ शकते. बचत गटाच्या माध्यमातून महिला वर्गाला स्वतःचे उत्पन्न मिळते. कुटुंबातील अस्तित्वाला चालना मिळते.

**२) सामाजिक सबलीकरण :**

समाजातील चालीरीती, रूढी परंपरा या बंधनामुळे महिलांचे मोठ्या प्रमाणात खच्चीकरण होत आहे. सामाजिक रूढीच्या बंधनात स्त्रीला अबला बनविण्यात आले. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योतर काळात अनेक समाजसुधारकांनी प्रयत्न करून स्त्रीला आपले अस्तित्व शिक्षणाच्या माध्यमातून मिळवून देण्याचा प्रयत्न केला. यामुळे महिलांना आपल्या

अस्तित्वाची जाणीव व्हायला लागली. अलीकडे बचत गटाच्या माध्यमातून महिला एकत्र यायला लागल्या आहेत. गावातील चावडीवर बसून गावाच्या विकासाच्या प्रश्नांवर चर्चा करू लागल्या आहेत. गावाच्या देवळात बसून महिला सभा घेऊ लागल्या आहेत. बचत गटाच्या माध्यमातून आपले सामाजिक अस्तित्व शोधण्याचा प्रयत्न करू लागल्या आहेत. गटामुळे महिलांवर होणारा अन्याय आणि अत्याचाराला सामूहिक विरोध होऊ लागला आहे. विचारांची देवाणघेवाण होण्यास गटामुळे मदत होत आहे. महिलांच्या प्रश्नांसंबंधी बचत गटांच्या महिला आंदोलने उभारू लागल्या आहेत. विविध प्रशिक्षणे आणि प्रबोधन शिबिरांच्या माध्यमातून महिला वर्गाची वैचारिक बैठक पक्की करण्याचा प्रयत्न या माध्यमातून होऊ लागला आहे.

**३) राजकीय सबलीकरण :**

स्वयंसाहाय्यता बचत गटातून झालेल्या वैचारिक परिवर्तनातून महिला वर्ग राजकारणाच्या क्षेत्रात प्रवेश करू लागल्या आहेत. गटामध्ये संघटन, व्यवस्थापन, निर्णय प्रक्रिया आणि राजकीय डावपेच यांचे कौशल्य आत्मसात करू लागल्या आहेत. पंचायत राजमध्ये आपले राजकीय अस्तित्व सिद्ध करण्याचा प्रयत्न महिला करू लागल्या आहेत. महिला वर्गातून विकासाची दृष्टी असलेले नेतृत्व पुढे यायला लागले आहे. बचत गटाच्या चळवळीने हे सिद्ध केले आहे.

आम्ही आता अबला नाही, तर सबला आहोत. आम्हाला स्वतःचे निर्णय स्वतः घेण्याचा अधिकार आहे. हा विचार आता पुढे येऊ लागला आहे.

**४) आरोग्य सबलीकरण :**

ग्रामीण भागातील गरीब महिलांना सकस आणि पुरेसा आहार मिळत नाही. गरीब कुटुंबांत प्रथम कर्त्या पुरुषाला जेवण वाढले जाते. त्यानंतर मुलांना आणि शिल्लक राहिलेले अन्न महिलेला घ्यावे लागते. त्यातही अचानक पाहुणा आला तर त्याला ते जेवण वाढून आपण पाणी पिऊन राहते हे ग्रामीण महिलेचे आहाराचे दुष्टचक्र आहे. कारण तिला पाहुण्यासाठी जेवण तयार करणे शक्य नसते.

अशा परिस्थितीत उत्पन्न वाढले की आहार विकत घेण्याची क्रयशक्ती वाढते. पुरेसे अन्न प्रत्येक सभासदाला मिळण्यास चालना मिळते. त्याचा सकारात्मक परिणाम आरोग्यावर होतो. आरोग्य सुधारते. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे तब्येत बिघडल्यास अंगावर काढण्याची प्रवृत्ती कमी करता येते. आजारपणात वैद्यकीय उपचार घेण्याची प्रवृत्ती आपोआप वाढायला लागते. याचाही सकारात्मक परिणाम महिलांच्या आरोग्यावर पडलेला जाणवतो.

आहार पुरेसा न मिळाल्यामुळे स्त्रियांच्या शरीरातील हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी होते. याचा परिणाम गरोदरपणात स्त्रीला शारीरिक त्रासाला सामोरे जावे लागते. अशक्तपणा येऊन ॲनिमिया आजार जडतो. तिला पुरेसे अन्न मिळाल्यास ही समस्या कमी करता येणे शक्य आहे.

अलीकडे विविध स्वरूपाच्या शिबिरांमुळे स्त्रियांचा आरोग्याकडे बघण्याचा कल बदलतो आहे. स्त्रीआरोग्यासंबंधीच्या अंधश्रद्धा कमी व्हायला लागल्या आहेत. स्त्री आपल्या आरोग्याच्या बाबतीत सतर्क व्हायला लागली आहे. आरोग्याकडे सजगपणे पाहण्याचा दृष्टिकोन विकसित होऊ लागला आहे.

महिला सक्षमीकरणामध्ये समाजाचा विरोध, चारित्र्यावर ठपका, महिलांची मानसिकता, पोषक वातावरणाचा अभाव, सार्वत्रिक दारिद्र्य, शैक्षणिक भेदभाव, काम व वेतनात तफावत, तसेच कौटुंबिक समस्या, वैचारिक पात्रता, महिलांकडे पाहण्याची प्रवृत्ती, महिला वर्तणुकीबाबत साशंकता अशा विविध स्वरूपाच्या अडचणी आहेत या अडचणीतून मार्ग काढण्याचा प्रयत्न बचत गटांच्या माध्यमातून सुरू आहे. हळूहळू स्त्रियांच्या मानसिकतेत बदल होऊ लागला आहे.

**आपली प्रगती तपासा-**

१) स्वयंसाहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण शक्य आहे का? चर्चा करा.

## ९.५ स्वयंसाहाय्यता बचत गटाच्या समोरील आव्हाने

स्वयंसाहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाला गती येऊ लागली आहे. महिला वर्ग वैचारिकदृष्ट्या, सामाजिक आणि राजकीय सक्षम बनण्याचा प्रयत्न करत आहे, पण यामध्ये काही समस्या आहेत. या समस्यांपुढे बचत गटाच्या चळवळीत अडथळे येत आहेत.

**१) साक्षरतेचे प्रमाण कमी :**

ग्रामीण भागातील महिलांमधील साक्षरतेच्या प्रमाणाचा परिणाम बचत गटांवर होत आहे. साक्षरतेचे प्रमाण कमी असल्यामुळे गटाचे हिशोब लिहिणे. गटाची कामपत्रे, इतिवृत्त अद्ययावत ठेवण्यात अडचणी येत आहेत.

**२) कर्जासंबंधी कागदपत्रे :**

स्वयंसाहाय्यता गटांना बँकांकडून कर्ज मंजूर करून घेण्यासाठी विविध कागदपत्रे जमा करावी लागतात. पुरेशी कागदपत्रे नसतील तर गटांना कर्ज मिळत नाही. ही कागदपत्रे जमा करताना अनेक अडथळ्यांना सामोरे जावे लागते.

**३) कर्जाचा वापर फक्त अनुदानासाठी :**

काही बचत गट कर्ज घेतात. पण त्याचा विनियोग न करता कर्जातील अनुदान घेऊन कर्ज परतफेड करण्याची प्रवृत्ती आहे. कर्जाचा विनियोग व्यवसायासाठी केल्यास गटांना त्याचा लाभ होईल ही मानसिकता अजून तयार झालेली दिसत नाही.

**४) बँकांचा नकारात्मक दृष्टिकोन :**

काही बँकांचे व्यवस्थापक बचत गटाला कर्ज मंजूर करताना नकारात्मक दृष्टिकोन ठेवतात. बचत गट व्यवसाय सुरू करू शकणार नाही अशी त्यांची मानसिकता असते. केवळ सरकारचा आदेश पाळणे एवढेच ते आपले कर्तव्य मानतात. कर्ज मंजूर झाल्यानंतर अनुदानाचीच रक्कम गटाकडे देतात यामुळे गटांना व्यवसाय सुरू करणे आणि वाढ करणे शक्य होत नाही. बचत गटाच्या मूळ संकल्पनेलाच यामुळे बाधा पोहोचते.

**५) बचत गोळा करण्यातील अडचणी :**

प्रत्येक महिन्याला बचत गटांची बचत जमा व्हावी अशी अपेक्षा असते. परंतु काही सदस्यांच्या आर्थिक अडचणीमुळे प्रत्येक महिन्याला रक्कम जमा करणे शक्य होत नाही. त्यामुळे बचत गटाच्या आर्थिकतेवर परिणाम होऊन अंतर्गत कर्जव्यवहारात अडथळा निर्माण होऊ शकतो.

**६) मालाच्या दर्जाचा प्रश्न :**

बऱ्याच वेळा बचत गटाच्या महिला आपल्या उत्पादनाचा दर्जा, त्याची पॅकिंग या गोष्टींकडे गांभीर्याने लक्ष देत नाहीत. त्यामुळे मालाच्या दर्जावर परिणाम होतो. मालाचा दर्जा उत्तम राहिला, तर त्याची पॅकिंग आकर्षक राहत नाही याचा परिणाम मालाच्या विक्रीवर होतो.

**७) पारंपरिक व जुन्या तंत्राचा वापर :**

मालाच्या उत्पादनासाठी पारंपरिक व जुन्या तंत्राचा वापर केला जातो. नवीन तंत्र वापरण्यासाठी पुरेसे आणि आवश्यक भांडवल बँकांकडून उपलब्ध होत नाही. त्यामुळे उत्पादनाच्या प्रमाणावरही याचा परिणाम होतो. बचत गट मागणीनुसार वस्तूंचा पुरवठा करू शकत नाहीत.

**८) बँकांचे NPA चे वाढते प्रमाण :**

बँका बचत गटांना जे कर्ज देतात ते वेळेत परतफेड होताना दिसत नाही. त्यामुळे बँकांचे NPA चे प्रमाण वाढते म्हणून बँका बचत गटांना कर्ज देण्यास नाखूश असतात.

वरील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी पुढीलप्रमाणे सूचना करता येतील.

**१) महिलांमधील साक्षरतेचे प्रमाण वाढवणे :**

महिला वर्गाची निरक्षरता कमी करावी. साक्षरता वाढविण्याचा प्रयत्न व्हावा. याकरिता प्रौढ आणि निरंतन शिक्षणाचा उपयोग प्रामुख्याने करण्याचा प्रयत्न करावा.

**२) आवश्यक कागदपत्रांची मागणी :**

बँकांनी कर्ज मंजूर करताना आवश्यक कागदपत्रे सुलभ मिळतील अशी योजना तयार करावी. बचत गटांच्या महिलांना ही कागदपत्रे गोळा करता येतील अशी व्यवस्था व्हायला हवी.

**३) पुरेशा कर्जाची तरतूद :**

बचत गटांनी ज्या व्यवसायासाठी प्रस्ताव सादर केला आहे. तसेच प्रकल्प अहवालही सादर केला आहे. त्यानुसार कर्जाची उपलब्धता करावी. पुरेसे कर्ज मिळाल्यास बचत गट व्यवसाय करू शकेल व परतफेडीची समस्याही शिल्लक राहणार नाही. काही वेळा जादा कर्जाची आवश्यकता भासते तेव्हा तशा स्वरूपाची तरतूद व्हायला हवी.

**४) वर्गणी वेळेत जमा करावी :**

वर्गणी जमा करण्यास दिलेल्या वेळेतच जमा करावी. वर्गणी बाकी ठेवण्याचा प्रयत्न होऊ नये. वेळेत वर्गणी आल्यास बचत गटांना आपला कारभार योग्य पद्धतीने हाताळणे शक्य होईल.

**५) कर्ज वापरण्यावर निर्बंध :**

बऱ्याच वेळा कर्जाचा वापर इतर अनावश्यक कारणांसाठी होतो. असे न करता कर्ज ज्या कारणासाठी घेतले आहे. त्याच कारणासाठी त्याचा विनियोग व्हायला हवा. ज्या व्यवसायासाठी कर्ज घेतले आहे तो व्यवसाय सुरू व्हायला हवा व उत्तम चालायला हवा.

**६) व्यावसायिक दृष्टिकोनाचा विकास :**

बचत गटातून आर्थिक सबलीकरण होण्यासाठी महिला वर्गात व्यावसायिक मानसिकता तयार करण्याचा प्रयत्न व्हायला हवा. व्यावसायिक दृष्टिकोन विकसित केल्याशिवाय बचत गट चळवळ आर्थिक आघाडीवर यशस्वी होऊ शकणार नाही.

**७) विपणनाचे प्रशिक्षण द्यावे :**

बचत गटांच्या महिलांना विक्री कलेचे प्रशिक्षण द्यावे. मालाची विक्री करताना येणाऱ्या अडचणींचा आढावा घ्यावा. त्या अडचणी पुढील काळात सोडविण्याचा प्रयत्न व्हावा.

**८) नवीन तंत्राचा अवलंब :**

व्यवसायात नवीन आणि सुधारित तंत्राचा अवलंब करावा. नवीन तंत्र आणि यंत्रसामग्री उपलब्ध करून द्यावी. हे तंत्र वापरण्याचे विकोप प्रशिक्षण द्यावे.

**९) हंगामी वस्तूंचे आणि मागणी असणाऱ्या वस्तूंचे उत्पादन करावे :**

गटाच्या सदस्यांनी हंगामी वस्तूंचे उत्पादन करावे. स्थानिक मागणीवर आधारित वस्तूंचे उत्पादन करावे. बचत गटांच्या उत्पादित मालाच्या विक्रीसाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेने विक्री केंद्रे उभारावीत.

**१०) बचत गटांनी राजकीय पक्षांपासून दूर राहावे :**

सध्या राजकीय पक्षांमार्फत बचत गट निर्माण करण्याची स्पर्धा सुरू आहे. त्याचा वापर Vote Bank म्हणून होण्याची शक्यता आहे. याचा परिणाम बचत गटाच्या एकंदर विकासावर होणार आहे. यासाठी बचत गटांनी राजकीय पक्षांपासून दूर राहण्याचा प्रयत्न करावा.

**११) नियमित हिशोब तपासणी :**

बचत गटांनी सातत्याने बचत गटांच्या आर्थिकतेचा आढावा घेत राहणे आवश्यक आहे त्यासाठी स्वतंत्र धोरण ठरविणे आवश्यक आहे.

**१२) अपायकारक प्रवृत्तीला प्रतिबंध :**

बचत गटांतील महिलांनी आपल्या अज्ञानपणाचा उपयोग इतरांना करायला देता कामा नये. कर्जाचे वितरण सभासदांमध्येच करावे. उधारीचा व्यवहार करू नये. राजकीय पक्षांच्या पैशांच्या आमिषाला बळी पडू नये.

**१३) उद्योगाची उभारणी :**

बचत गटांनी आर्थिक सक्षमता निर्माण होईल अशाच उद्योगाची उभारणी करावी. पारंपरिक उत्पादनांपासून बाजूला होऊन आधुनिक बाजारातील मागणीचा विचार करण्याचा प्रयत्न करायला हवा. बचत गटांनी कुटीरोद्यागांवर भर द्यायला हवा.

**१४) शिधावाटप आणि रॉकेल दुकान परवाने बचत गटांना द्यावेत :**

शासनाने शिधावाटप दुकानांचे यापुढील परवाने बचत गटांना दिल्यास त्यांना हक्काचे उत्पन्नाचे साधन मिळण्यास मदत होईल. शिवाय बचत गट ही व्यवस्था उत्तम प्रकारे हाताळू शकतील. या प्रक्रियेतील काळाबाजार वगैरे व्यवहाराला यामुळे आळा घालता येईल.

## ९.६ सारांश

ग्रामीण विकासाच्या एकंदर प्रक्रियेत बचत गटांची भूमिका महत्त्वाची मानली जाऊ लागली आहे. बचत गटाचे सभासद विविध प्रबोधन आणि प्रशिक्षणाच्या कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रशिक्षित झाल्यामुळे ग्रामीण भागाच्या विकासाच्या प्रक्रियेची त्यांना जाणीव होऊ लागली आहे. ग्रामीण विकासाच्या, दारिद्र्य निर्मूलन, ग्रामीण बचत, ग्रामीण अर्थव्यवस्था, सामाजिक बदल, पायाभूत सुविधांची निर्मिती, आर्थिक विषमता निर्मूलन, ग्रामीण भागात बँकांचे जाळे, शासनाच्या विविध योजनांचा लाभ, सावकारी पाशातून गरिबांची मुक्ती आणि पंचायत राज सक्षमीकरणात या चळवळीचे अस्तित्व प्रभावीपणे जाणवू लागले आहे.

गरिबांच्या विकासात बचत गट आशेचा किरण होऊ पाहात आहेत, तसेच महिला सक्षमीकरणातही बचत गटाची चळवळ प्रभावी भूमिका बजावू शकली आहे.

बचत गट चळवळ ग्रामीण भागात जोमाने फोफावत असताना या चळवळीसमोर प्रभावी उभी राहिली आहेत. बचत गटांच्या चळवळीत कर्जाचा अनुत्पादक कारणासाठी उपयोग, बँकांचा नकारात्मक दृष्टिकोन आणि विशेषतः राजकीय पक्षांची बचत गटांकडे व्होट बँक म्हणून पाहण्याची प्रवृत्ती आणि त्याकरिता त्यांना दिले जाणारे आर्थिक आमिष या आव्हानांना बचत गटांनी प्रभावीपणे सामोरे जायला हवे, असे झाल्यास बचत गटाची चळवळ ग्रामीण विकासाला दिशा देण्यासाठी निश्चित रूपाने मार्गदर्शक ठरेल यात शंका नाही.

## ९.७ स्वाध्याय

१) ग्रामीण विकासातील बचत गटांचे महत्त्व विशद करा.

२) गरिबांच्या विकासात बचत गटाची चळवळ कोणकोणती भूमिका बजाऊ शकते याची माहिती द्या.

३) महिला सक्षमीकरणात बचत गटांची भूमिका स्पष्ट करा.

४) बचत गटांसमोरील आव्हाने स्पष्ट करा. या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी उपाय सुचवा

५) टिपा लिहा.

अ) बचत गट आणि पंचायत राज सक्षमीकरण

ब) बचत गट आणि महिला आरोग्य सक्षमीकरण

❖❖❖❖

munotes.in

# १०

# ग्रामीण वित्तपुरवठ्यातील समस्या पाठाची रचना

**घटक रचना :**

१०.१ पाठाची उद्दिष्टे

१०.२ प्रस्तावना

१०.३ ग्रामीण वित्त पुरवठ्याची संकल्पना

१०.४. ग्रामीण वित्त पुरवठ्याची तत्वे

१०.५ ग्रामीण व शेती पतपुरवठ्यासंबंधितसमस्या

१०.६ ग्रामीण गरीब व लहान शेतकऱ्यांना पतपुरवठा करण्याबाबतच्या समस्या

१०.७ ग्रामीण वशेतीला वित्तपुरवठा करताना येणाऱ्या समस्यांवर उपाय

१०.८ शेती पतपुरवठ्याच्या समस्येबाबत सरकारचे धोरण

१०.९ पोषक ग्रामीण पतपुरवठ्याची गरज

१०.१० स्वाध्याय

१०.११ संदर्भ सूची-

## १०.१ पाठाची उद्दिष्टे

१. ग्रामीण वित्तपुरवठ्यातील संकल्पनेचा अभ्यास करणे.

२. ग्रामीण वित्तपुरवठ्यातील समस्याचा अभ्यास करणे.

३. ग्रामीण व शेती पतपुरवठा समस्यांवर उपायांचाअभ्यास करणे.

४. पोषकग्रामीण पतपुरवठ्याची गरज अभ्यासणे.

## १०.२ प्रस्तावना

देश स्वातंत्र्य झाल्यावर प्रमुख व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करून त्यांना शेती व ग्रामीण उद्योग यांना काही प्रमाणात कर्जपुरवठा करण्यास भाग पाडले व हळूहळू १९७० नंतर ग्रामीण भागात संस्थात्मक वित्तपुरवठा तग धरू लागलेला दिसून येतो. तसेच सावकारावर नियंत्रण आणण्यासाठी सावकारी नियंत्रण कायदा केला गेला.



munotes.in

याशिवाय कृषी व ग्रामीण बिगर कृषी विभागाला वित्तपुरवठा करून ग्रामीण भारताचा विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने संसदेच्या विशेष कायद्याने नाबार्डची स्थापना रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया व भारत सरकारच्या मालकीने करण्यात आली, कृषी पतपुरवठयासाठी रिझर्व्ह बँकेचे कृषी पत विभाग व ग्रामिण नियोजन आणि पतकक्ष कार्यरत होते. तसेच रिझर्व्ह बँकेने १९६३ मध्ये कृषी पुनर्वित्तची स्थापना केली होती, १९७५ मध्ये रिझर्व्ह बँकेने कृषी पुनर्वित्त मंडळाचे रूपांतर कृषी पुनर्वित्त व विकास महामंडळ असे केले केले. १९७९ मध्ये अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पुनर्विलोकन समिती श्री.बी. शिवरामन यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आली होती , या शिवरामन समितीच्या शिफारशीनुसार नाबार्ड कायदा १९८१ संसदेत पास करण्यात आला ,वरील कृषी पतविभाग ,ग्रामीण नियोजन आणि पतकक्ष व कृषी पुनर्वित्त व विकास महामंडळ यांच्या एकत्रीकरणातुन १२ जुलै १९८२ मध्ये भारतात नाबार्ड (NABARD National Bank for Agriculture and Rural Development) या शिखर बँकेची स्थापना करण्यात आली .पूर्वी शेतकी व ग्रामीण पतपुरवठ्यासंबंधीची जी कामे भारतीय रिझर्व बँक करीत असे ती सर्व कामे नाबार्डकडे सोपविण्यात आली. ग्रामीण क्षेत्राचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी आवश्यक असलेला वित्तपुरवठा करणारी नाबार्ड ही एकमेव शिखर संस्था आहे.

वरील विविध प्रयत्नांना मुळे ग्रामीण वित्तपुरवठ्याचा प्रसार-प्रचार सुरू असलेला पाहावयास मिळत आहे. आज ग्रामीण वित्त पुरवल्यामुळे ग्रामीण भागात शेती व ग्रामीण उद्योगाचा विकास होत आहे.पर्यायाने ग्रामीण भागाचाही विकास होत आहे.मात्र अजूनही वाढत्या लोकसंख्येमुळे सातत्याने ग्रामीण विकासासाठी अधिक प्रयत्नांनची गरज आहे.

## १०.३ ग्रामीण वित्त पुरवठ्याची संकल्पना

ग्रामीण भागातील शेती, शेतीजोड व पूरक व्यवसाय, ग्रामीण लघुउद्योग, कारागिरांचे व्यवसाय इत्यादींच्या विकासासाठी होणारा संस्थात्मक व बिगर संस्थात्मक वित्तपुरवठा म्हणजे ग्रामीण वित्तपुरवठा होय. ग्रामीण वित्तपुरवठ्याचा प्रमुख उद्देश म्हणजे ग्रामीण भागाचा विकास म्हणजेच ग्रामीण भागातील राहणाऱ्या घटकांचा विकास होय. ग्रामीण भागाच्या अर्थव्यवस्थेचा विचार करता ग्रामीण भागातील शेतकरी, कारागीर हे येथील शेती व ग्रामीण व्यवसायावर अवलंबून होते. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास व्हावयाचा असेल तर ग्रामीण भागातील शेती व ग्रामीण उद्योग विकसित होणे गरजेचे होते.कारण ग्रामीण भागातील शेती व ग्रामीण उद्योग हे मागास होते.पारंपरिक पद्धतीने केले जात होते त्यांच्या विकासासाठी शेतकरी व व्यावसायिकांना कर्जपुरवठ्याची गरज होती. ग्रामीण वित्तपुरवठ्याची पार्श्वभूमी विचारात घेता आपल्या लक्षात येईल की, भारतात ग्रामीण वित्तपुरवठा करणारा असा संख्यात्मक घटक स्वातंत्र्यपूर्व काळात नव्हता. त्यावेळी ग्रामीण भागातील शेतकरी व ग्रामीण उद्योग यांच्या पैशाची गरज भागविण्याचे कार्य खऱ्या अर्थाने सावकार या घटकाने केलेले पाहावयास मिळते.त्याच प्रमाणे जमीनदार एकद्देशीय फंड इत्यादी बिगर संस्थात्मक घटकांनी ग्रामीण भागात कर्ज पुरवठा केलेला पहावयास मिळतो.

## १०.४ ग्रामीण वित्त पुरवठ्याची तत्वे

विकसनशील देशांच्या विकासामध्ये ग्रामीण भाग व विशेषतः शेतीच्या विकासाचे स्थान महत्वाचे आहे. त्यादृष्टीने ग्रामीण भाग व शेतीक्षेत्राला पतपुरवठ्याचा पुरवठा होत राहणे आवश्यक आहे.या भागाला जो पतपुरवठा होतो त्यापासून पूर्ण फायदे मिळवणे आवश्यक आहे, नाहीतर विकासाचा वेग कमी होईल.यादृष्टीने कृषीपतपुरवठ्याची काही तत्वे सांगितली जातात.

**(१) अटीची समानता :**

शेतीला कर्ज देतांना कर्जासोबत ज्या अटी लागू केल्या जातात त्या अवाजवी नसाव्यात. पत संस्था शेतीशिवाय व्यापार, उद्योग किंवा इतर क्षेत्रांना ज्या अटी लागू करीत असतील त्या तुलनेत कृषी पतपुरवठ्याच्या अटी प्रतिकूल नसाव्यात. जेथे शेतीचे क्षेत्रे हे प्राधान्य क्षेत्र मानले. गेले आहे तेथे इतर क्षेत्रापेक्षा शेतीला सवलत द्यायला हवी.जसे व्याजाचा दर कमी ठेवणे, परतफेडीच्या अटी लवचिक ठेवणे वगैरे.

**(२) योग्य हमी :**

कर्ज देताना योग्य हमी घेऊन ते सुरक्षित केलेले असावे. हमी वस्तुरुपातच असावी असे नाही.पण अशी सुरक्षितता असल्याशिवाय कर्जाचा उपयोग योग्य कामासाठीच होईल याची खात्री निर्माण होत नाही.शेतकऱ्याला अनुत्पादक कर्ज आवश्यक असते हे जरी खरे असले तरी कर्जाच्या जास्त भाग अनुत्पादक उपयोगात खर्च होणे योग्य नाही.त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी हमीची आवश्यकता असते.

**(३) परतफेड क्षमतेचा आधार:**

कर्ज देतांना तारण घेणे हे अधिकोषीय (बँकेच्या) सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य आहे. पण गरीब शेतकऱ्याजवळ बँकेला मान्य होईल असे तारण असण्याची शक्यता कमी असते.त्यामुळे वस्तुरूप तारणावर अवाजवी भर देण्यापेक्षा, कर्ज दिल्यानंतर उत्पादनात सुधारण होऊन परतफेडीची क्षमता कितपत निर्माण होऊ शकते याचा विचार व्हायल हवा.

**(४) कार्यक्षम व्यवस्थापन:**

दिलेल्या कर्जाचे व्यवस्थापन कार्यक्षमते होते आहे किंवा नाही हे पाहण्याची जबाबदारी पतपुरवठा रचनेची असते. अर्थात याकडे लक्ष देतेवेळी शेतकऱ्याचे हित आणि गरजा या गोष्टींकडे पुरेसे लक्ष दिले जावे.

**(५) कर्जाची विविधता:**

शेतकऱ्याची कर्जाची गरज वेगवेगळी चालू कामासाठी अल्पमुदतीचे तर इतर काम व कायम सुधारणांसाठी मध्यम व दीर्घ मुदतीचे कर्ज आवश्यक असते. पतपुरवठ्याची व्यवस्था अशी असावी ज्यामुळे शेतकऱ्याला जे काम असेल त्याची गरज पूर्ण होऊ शकेल. या दृष्टीने मुदतीची विविधता असायला हवी.अगर वेगवेगळ्या मुदती कर्जाच्या असाव्यात.

**(६) पुरेशी रक्कम:**

शेतकऱ्याच्या कामाचे स्वरूप जसे वेगवेगळे असते त्यानुसार कर्जाच्या रकमेची मात्रा बदलते. ही गरज पूर्ण होऊ शकेल अशी रक्कम असायला उदा. पीक कर्जाची रक्कम कमी असू शकते, पण शेतीत. विहिर खोदण्यासारख्या कायम सुधारणेसाठी जास्त रक्कम लागेल. म्हणून कामाचे स्वरुप पाहून त्यासाठी आवश्यक इतकी रक्कम जर दिली तर कर्जाचा खरा उपयोग होईल.

**(७) त्वरित उपलब्धता:**

दिले जाणारे कर्ज जर कमी अवधीत मिळाले, त्यासाठी शेतकऱ्यांना फारसा त्रास घ्यावा लागला नाही तर पतपुरवठा संस्थेवरील विश्वास वाढेल. अन्यथा ज्या ठिकाणाहून लवकर कर्ज मिळते. मग सावकाराप्रमाणे व्याजाचा दर जास्त असला तरी, तेच कर्ज घेतले जाईल.

**(८) लवचिकता:**

परतपुरवठा रचनेमध्ये लवचिकता असायला हवी. म्हणजे हंगामाच्या काळात कर्जाची गरज जास्त असताना पतपुरवठ्याचा विस्तार सहजपणे व्हायला हवा.


**(९) परतफेडीच्या योग्य अटी:**

उद्योगांमध्ये होणारे उत्पादन हे बरेचसे आखवी वेळापत्रकाप्रमाणे होऊ शकते, परंतु शेतीच्या उत्पादनामध्ये अशी निश्चितता नसते. त्यामुळे ज्या कामासाठी कर्ज दिले ते पूर्ण झाले की, उत्पादनात नैसर्गिक अडचणी आल्या का यासारख्या प्रश्नांचा सहानुभूतीने विचार परतफेडीच्या अटींची फेररचना करायला हवी.त्यामुळे शेतकऱ्यावर अनावश्यक ताण न पडता कर्जाची परतफेड होऊ शकेल.

वरील तत्त्वांचे पालन बऱ्याच वेळा होत नाही असे दिसते.भारतामधील वित्तीय संस्था पतपुरवठ्याच्या ठरवी अटींना चिकटून राहात असल्यामुळे ग्रामीण भागात सावकारांचा प्रभाव जास्त होता.व्यापारी बँकांच्या धोरणात शेतीच्या वेगळ्या स्वरुपाचा विचार नव्हता, उलट सुरक्षिततेच्या नियमांचे पालन, शेती व उद्योगांमध्ये सारख्याच पद्धतीने केले जात असे.त्यामुळे एकूण ग्रामीण कर्जात त्यांचा हिस्सा अत्यल्प होता.'सामाजिक अधिकोषण' (Social Banking) ही कल्पना प्रत्यक्षात येण्यासाठी शेवटी सरकारला प्रमुख व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करावे लागले.यावरून स्पष्ट होते की कृषी पतपुरवठ्याच्या - तत्त्वांचे पालन केवळ तत्त्वे म्हणून न करता परिस्थितीची गरज ओळखून, त्यामध्ये योग्य समायोजन करून करायला हवे.असे झाले तरच कृषी पतपुरवठा व्यवस्थेने राष्ट्रीय विकासातील आपली भूमिका खऱ्या अर्थाने पार पाडली असे म्हणता येईल.

munotes.in

## १०.५ ग्रामीण व शेती पतपुरवठ्या संबंधितसमस्या:



https://www.iasexpress.net

ग्रामीण भागाचा विकास साध्य करावयाचा असेल तर प्रथम शेतीचा विकास करणे गरजेचे आहे.कारण देशातील सुमारे 80% जनता ही शेती व्यवसायावर अवलंबून आहे.नैसर्गिक संकटामुळे कायमच शेतकऱ्यांचे नुकसान होते.म्हणून हे नुकसान भरून काढण्यासाठी शेतकरी कर्जाचा अवलंब करतो.मात्र हे कर्ज सावकार व जमीनदार यांच्याकडून घेतल्यास शेतकरी, व्यावसायिक कायमच कर्जबाजारी होतो.म्हणूनच ही व्यवस्था बदलायची असेल तर शेतीला सहकारी संस्था, बँका यांच्यामार्फत वेळोवेळी कर्ज पुरवठा होणे गरजेचे आहे.परंतु हा पतपुरवठा करताना येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी उपाययोजना राबविणे हे देखील गरजेचे आहे.

### १. योग्य तारणाचा अभाव:

ग्रामीण भागातील शेतकरी हे अल्प भूधारक, सीमांत शेतकरी किंवा भूमीही असल्याने अशांना शेती व्यवसायात कर्जाची आवश्यकता असल्यास सहकारी संस्था किंवा बँकांकडून कर्ज दिले जात नाही.त्यामुळे योग्य तारणाअभावी शेतकऱ्यांना पतपुरवठ्याचा लाभ मिळत नाही.

### २. ग्रामीण भागात बँकांच्या सेवा सुविधा उपलब्ध नाही:

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना अल्प, मध्यम व दीर्घ मुदतीच्या कर्जाची आवश्यकता असते. मात्र अनेक खेडेगावात आजही बँकेच्या सेवासुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याने त्याचा परिणाम शेती याच्यावर होतो.

### ३. बँकांची उदासीनता:

अनेक बँका या मोठे शेतकरी, मोठे व्यापारी यांनाच कर्ज देण्यासाठी उत्सुक असतात. मात्र अल्प, अतिअल्प भूधारक, भूमिहीन व सीमांत शेतकऱ्यांना कर्ज देताना त्यांच्या उदासीनतेमुळे अनेकांना रोजगाराच्या शोधात स्थलांतर करावे लागते.

munotes.in

**४. बँकांची थकबाकी:**

सहकारी संस्था किंवा बँकेमार्फत करण्यात येणाऱ्या थकबाकीमुळे ती अतिशय गंभीर समस्या समजली जाते. सदोष कार्यपद्धतीत नियोजनाचा अभाव, अल्पमुदत कर्ज दीर्घ कालावधीत परतफेड, घेतलेल्या कर्जाची परतफेड वेळेत केली जात नाही.यामुळे बँकांच्या थकबाकीचा प्रश्न निर्माण होतो.

**५. गरजू व्यक्तींकडे दुर्लक्ष:**

ग्रामीण भागात शेतीसाठी अल्प, अति अत्यल्प, सीमांत शेतकरी यांना जास्तीत जास्त कर्जाचा पुरवठा करून त्यांची गरज पूर्ण करणे गरजेचे आहे. परंतु अधिकतर कर्ज हे मध्यम व मोठ्या शेतकऱ्यांनी घेतलेले दिसून येते.

**६. कर्ज उपलब्धतेत दिरंगाई:**

ग्रामीण भागातील अनेक शेतकरी शेती करण्यासाठी सहकारी बँकांवर अवलंबून असतात. परंतु शेतकऱ्यांना वेळेवर कर्जाचा पुरवठा उपलब्ध करून दिला जात नाही. कालांतराने मंजूर झालेले कर्ज अनुत्पादक कारणांसाठी वापरले जाते.

**७. कोरडवाहू शेती:**

शेती व्यवसाय हा पूर्णपणे निसर्गावर अवलंबून आहे. महाराष्ट्र तसेच देशात निम्म्याहुन जास्त जमीन ही कोरडवाहू स्वरूपाची आहे.यामुळे शेती उत्पादनाला मर्यादा येतात कौटुंबिक गरजा पूर्ण करण्यासाठी बऱ्याचदा कर्ज घ्यावे लागते.पुढे घेतलेल्या कर्जाची परतफेड केली जात नाही.

**८. उद्योगधंद्यांचा अभाव:**

शेती किंवा शेतीवर आधारित व्यवसाय करताना शेतकरी, व्यावसायिक यांना भांडवलासाठी कर्जाची आवश्यकता असते. परंतु ग्रामीण भागात पुरेशा प्रमाणात बँका नसल्याने किंवा किचकट प्रक्रियेमुळे त्यांना व्यवसाय सुरू करताना अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

**९. अज्ञानी व अशिक्षित शेतकरी:**

शेतीसाठी कर्ज घेताना बँका किंवा सहकारी संस्थेत विविध प्रकारच्या लेखी प्रक्रिया क्रिया प्रक्रिया कराव्या लागतात. या किचकट बाबी पूर्ण न करू शकणारे शेतकरी कर्जाच्या फांद्यात पडणे पसंत करीत नाही.

**१०. ग्रामीण सावकारांचे वर्चस्व:**

ग्रामीण भागात शेतीला कर्जाची आवश्यकता असल्यास अनेक शेतकरी सावकाराचा मार्ग सहज सोपा असल्याने तिथे कोणत्याही कागदपत्राची पूर्तता करावी लागत नाही. याकरिता शेतकरी पतपुरवठासाठी सावकारावर अवलंबून राहतात. वरील प्रमाणे शेतीला वित्त पुरवठ्याच्या समस्या स्पष्ट करता येतात.

## १०.६ ग्रामीण गरीब व लहान शेतकऱ्यांना पतपुरवठा करण्याबाबतच्या समस्या

### १) स्वस्त, त्वरित व पुरेसा वित्तपुरवठा आवश्यक:

शेतकऱ्याला परवडेल असा कर्जाचा व्याजाचा दर हवा. अन्नधान्याचे उत्पादन भारतात फारसे किफायतशीर होत नाही.भारतीय शेतीची कमी उत्पादकता हे त्याचे कारण आहे.म्हणून शेतीला कमीत कमी व्याजदरात कर्ज पुरवठा झाला पाहिजे.पण प्रत्यक्षात तसा होत नाही.कर्जपुरवठा करणाऱ्या संस्था अपुरेपणा, तारण देण्याजोग्या मालमत्तेचा अभाव इ. कारणांनी शेतीचा स्वस्त, जलद कर्जपुरवठा होत नाही.अद्यापही ग्रामीण भागात कर्ज पुरवठ्याबाबत सावकारांचे वर्चस्व आहे.

### २) अल्पभूधाकर व भूमीहिन शेतमजुरांची दारूण अवस्था:

अल्प जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांना भूविकास बँकेकडून कर्जे मिळत नाहीत. एकूण धारण क्षेत्रांपैकी ५० टक्के धारण क्षेत्रे एक हेक्टरपेक्षाही कमी आहेत. ४ हेक्टरपर्यंत जमीन धारण क्षेत्रांचा विचार करता ८५ टक्के जमीन धारण क्षेत्रे अल्प जमीन धारण क्षेत्रे ठरतात. अशा अल्प भूधारकांच्या कर्जपुरवठ्याच्या गरजा पूर्ण काम करायच्या हा महत्वाचा प्रश्न आहे. शिवाय शेतमजूरांना शेतातील हंगाम बदलानुसार घर खर्चासाठी कर्ज हवे असते ती गरज कशी पूर्ण करायची ही एक समस्या आहे.

### (३) शेतीव्यवसायाची अनिश्चितता:

शेती व्यवसाय मान्सूनवर अवलंबून आहे व मान्सून अनिश्चित असतो. त्यामुळे विशिष्ट वर्षी किती कर्जाची गरज लागेल याचा निश्चित अंदाज करता येत नाही.उद्योग क्षेत्रात जसे उत्पादन वस्तूच्या किंमती नफा यांच्या अंदाजाने नियोजन करता येते तसे शेती क्षेत्राच नसते.

शेती व्यवसायाच्या वैचित्र्यपूर्ण स्वरुपामुळे उद्योगांपेक्षा वेगळ्या अशा अनेक समस्या या व्यवसायात दिसून येतात. अर्थात शेतीला कर्जपुरवठा करण्याच्या बाबतीतसुद्धा या समस्यांचा प्रभाव पडलेला दिसतो. पतपुरवठा करताना या वेगळेपणाचा आणि समस्यांचा विचार न केल्यास शेतीची कर्जाची गरज व्यवस्थितपणे पूर्ण होऊ शकणार नाही.परंतु पतपुरवठ्याची प्रस्थापित रचना शेतीच्या वेगळेपणाची पुरेशी दखल घेत नसल्याने काही अडचणी उद्भवतात.

## १०.७ ग्रामीण व शेतीला वित्तपुरवठा करताना येणाऱ्या समस्यांवर उपाय

### १. ग्रामीण भागात बँकांच्या सेवासुविधा उपलब्ध करणे:

ग्रामीण भागात मोठे शेतकरी, व्यावसायीक यांना सहज कर्ज उपलब्ध करून दिले जाते. मात्र जे शेतकरी अल्प भूधारक, सिमांत शेतकरी, अत्यल्प भूधारण आहेत त्यांना अनेकदा वेळेवर कर्ज उपलब्ध न झाल्याने त्याचा परिणाम शेती व्यवसायावर होतो. म्हणूनच शासनाने मोठ्या शेतकल्यांबरोबरच लहान शेतकरी व्यावसायीकांना अल्प व मध्यम

munotes.in

स्वरुपाचा कर्ज पुरवठा ग्रामीण भागाला मिळावा यासाठी जास्तीत जास्त बँकांच्या शाखा सुरु करणे गरजेचे आहे.

**२. तारणा अभावी कर्ज पुरवण्याची सुवीधा करणे:**

ग्रामीण भागात अल्प भूधारण, सिमान्त शेतकरी किंवा भूमीहीन शेतकच्यांचे प्रमाण अधीक असल्याने अनेकदा अशा शेतकऱ्यांना कर्जाची आवश्यकता असते. परंतु त्यांचाकडे तारण ठेवण्याजोगे काही नसल्याने बँकांकडून वित्तपुरवठा होऊ शकत नाही.याकरीता शासनाने शेतकऱ्यांना तारणा अभावी कर्ज पुरवठा करण्याची सुवीधा उपलब्ध केल्यास ग्रामीण भागाच्या विकासाला हातभार लागेल.

**३. त्वरीत कर्ज योजना:**

अनेक बँका या मोठे शेतकरी व व्यापारी यांना कर्ज देण्यास उत्सुक असतात. मात्र छोट्या शेतकऱ्यांना कर्ज देण्यास टाळाटाळ करतात. म्हणूनच शासनाने छोट्या शेतकऱ्यांसाठी त्वरित कर्ज योजना सुरू करून छोट्या शेतकऱ्यांना कर्जाची सुवीधा करणे गरजेचे आहे.

**४. वस्तू स्वरुपात कर्जाचे वाटप:**

अनेकदा शेतकरी उत्पादक कारणासाठी कर्ज घेतात मात्र त्याचा वापर अनुत्पादक कारणांसाठी केला जातो. शेतकरी कर्जाची वेळेवर परतफेड करू शकत नाही.म्हणून बँकांनी कर्ज हे वस्तूसाठी पाहीजे, असल्यास रक्कम न देता वस्तूरूपात कर्जाचे वाटप करावा.

**५. गरजूंना प्रथम प्राधान्य:**

ग्रामीण भागात छोटे शेतकऱ्यांना अल्प व मध्यम स्वरूपात कर्जाची आवश्यकता असते. मात्र त्यांच्याकडे कायम दुर्लक्ष केले जाते. ग्रामीण भागात सर्वात जास्त छोट्या शेतकऱ्यांचे प्रमाण असल्यामुळे त्यांच्यावर ग्रामीण भागाचा विकास अवलंबून आहे हे लक्षात घेता बँकांनी प्रथम छोट्या शेतकऱ्यांची गरज लक्षात घेऊन त्यांना प्राधान्य देणे गरजेचे आहे. यासाठी शासनाने बँकांवर निर्बंध घालणे गरजेचे आहे.

**६. कृषी विभागाने फळबाग योजनेला प्राधान्य द्यावे:**

महाराष्ट्रात तसेच देशाच्या निम्म्याहून जास्त भागात कोरडवाहू स्वरूपाची जमीन आहे. यामुळे शेतीवर अनेकदा मर्यादा येतात. यामुळे कौटुंबिक गरजा पूर्ण करण्यासाठी बऱ्याचदा शेतकऱ्यांना कर्ज घ्यावे लागते.परंतु पुढे घेतलेल्या कर्जाची परतफेड केली जात नाही.यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडतो.यादृष्टीने शासनाने कोरडवाहू शेती असणाऱ्या शेतकऱ्यांना फळबाग योजनेसाठी प्राधान्य दिले पाहिजे.तसेच फळांची रोपे अनुदान तत्वावर देणे गरजेचे आहे.

**७. बँकेची प्रक्रिया सोपी व सरळ असावी:**

अनेक शेतकरी शेतीसाठी कर्ज देताना बँका किंवा सहकारी संस्थेत विविध प्रकारच्या लेखी क्रिया प्रक्रिया कराव्या लागतात. या किचकट बावी पूर्ण करू न शकणारे शेतकरी कर्जाच्या

फंदात पडणे पसंत करीत नाहीत. यादृष्टीने अशा शेतकऱ्यांनी बँकेकडून कर्ज घ्यावे यासाठी बँकांची प्रक्रिया सोपी व सरळ असणे गरजेचे आहे.

**८. जोडधंदाला प्राधान्य देणे:**

जे शेतकरी केवळ हंगामी स्वरूपाची शेती करतात ते शेतकरी पावसाच्या पाण्यावर अवलंबून असतात. यामुळे अशी शेती शेतीवरील जुगार आहे. तसेच अनेक शेतकरी खरीप हंगाम जमतात रोजगाराच्या शोधात स्थलांतर करतात हे थांबण्यासाठी स्थानिक भागातील लोकांना स्थानिक भागात रोजगाराचे साधन उपलब्ध होणे गरजेचे आहे. यासाठी शेतकऱ्यांनी शेतीबरोबरच कुक्कुटपालन, दुग्ध व्यवसाय किंवा इतर जोड व्यवसाय करावे यासाठी त्यांना जोड धंद्याला प्राधान्य देण्यासाठी अर्थसाह्य केल्यास स्थलांतराला आळा बसेल. वरील प्रमाणे शेतीला पतपुरवठा करताना येणाऱ्या समस्यांवर उपाययोजना करता येणे शक्य आहे.

## १०.८ शेती पतपुरवठ्याच्या समस्येबाबत सरकारचे धोरण

सरकारच्या भारतीय रिझर्व्ह बँकेने सुरुवातीपासून शेतीपतपुरवठ्याबाबत स्वतंत्र विभाग स्थापन केला.या विभागाद्वारे राज्य सहकारी बँका व भूविकास बँका यांच्यामार्फत शेतीला मध्यम मुदतीचा व दीर्घ मुदतीचा पतपुरवठा केला जातो.

रिझर्व्ह बँकेने शेती पुनर्वित्त पुरवठा विकास महामंडळ (Agricultrual Refinance Development Corporation) स्थापन करून मुदत कर्जाची गरज असणाऱ्या शेती विकास कार्यक्रमांसाठी बँकांना या संस्थेमार्फत पुनर्वित्त पुरवठा सुरु केला. बँकांच्या पतपुरवठ्याचा विस्तार शेतीकडून ग्रामीण क्षेत्रापर्यत झाला. ग्रामीण विकास कार्यक्रमाच्या निर्मितीसाठी आणि त्याच्या कार्यवाहीसाठी शिखर पातळीवर पतपुरवठा संस्थांना आधार व मार्गदर्शन देण्यासाठी सरकारने अधिक विशाल पायावरची संघटना स्थापन करण्याचे ठरविले म्हणून एका बाजूने रिझर्व्ह बँकेची कार्ये व दुसऱ्या बाजूने शेती विकास महामंडळाची पुनर्वित्त पुरवठ्याची कार्ये हाती घेण्यासाठी शेती व ग्रामीण विकासाची राष्ट्रीय बँक (National Bank for Agricultural and Rural Development) स्थापन करण्यात आली. १९८२ जुलैच्या संसद कायद्याने शेती व ग्रामीण विकासाची राष्ट्रीय बँक (Nabard) स्थापन करण्यात आली. या बँकेने शेती पुनर्वित्तपुरवठा व विकास महामंडळाची कार्ये व रिझर्व्ह बँकेची पुनर्वित्तपुरवठाची कार्ये सहकारी बँका व प्रादेशिक ग्रामीण बँका यांच्या संबंधात हाती घेतली. संपूर्ण ग्रामीण पतपुरवठ्याची जबाबदारी या बँकेवर आहे.भारत सरकारच्या विनंतीवरून रिझर्व्ह बँकेने शेती पतपुरवठा पुनरावलोकन समिती (Agricultrual Credit Review Committee) ए. एम.खुसरौ यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केली.

या समितीने ग्रामीण वित्तीय पद्धतीच्या महत्त्वाच्या समस्या विचारात घेऊन १९८९ ऑगस्टला आपला अहवाल सादर केला.या समितीने केलेली महत्त्वाची निरीक्षणे व महत्त्वाच्या शिफारसी केल्या.

१) प्रादेशिक ग्रामीण बँकांची वित्तीय परिस्थिती ढासळली आहे. इष्ट गटांना पतपुरवठा करण्याची बँकांची क्षमता घटली आहे.या बँकांना भविष्यात ग्रामीण पतव्यवस्थेत स्थान राहिलेले नाही.

२) शेती क्षेत्राला कर्जाचे व्याजदर फक्त दोन प्रकारचे असावेत, सीमांत शेतकऱ्यांना ११.५ टक्के व्याजदर असावा व उरलेल्या शेतकऱ्यांना जास्तीत जास्त १५.५ टक्के व्याजदर असावा.

३) सहकारी पतव्यवस्थेकरता संतुलन करणारे केंद्र म्हणून National Coopertive Bank of India या संस्थेची स्थापना करावी.

४) बिहार, ओरिसा व पं.बंगाल या पूर्वेकडील राज्यात व ईशान्य राज्यात शेती पत पुरवठा फार कमी होतो.म्हणून पूर्वेकडच्या प्रत्येक राज्यासाठी व ईशान्य राज्यासाठी शेती व ग्रामीण मूलभूत सुविधा विकास महामंडळ (Agricultural and Rurual Infrastructure Development Corporation) स्थापन करावे.

५) भारत सरकारने १९८५ च्या खरीप हंगामापासून सर्व समावेशक पिक विमा योजना (Comprehensive Insurance Scheme) सुरु केली.ही योजना प्रत्येक शेतकऱ्यास १० हजार रु.रक्कमेचा विमा उतरविणारी होती.विमा योजनेचा पिक कर्जाच्या रक्कमेशी संबंध नव्हता.व एकूण विम्याची रक्कम वाटप केलेल्या पिक कर्जाच्या १०० टक्के होती. शेती पतपुरवठा पुनरावलोकन समितीच्या मते, सध्याची पिक योजना सदोष आहे.हे काम कायद्याने निर्माण झालेल्या पिक विमा महामंडळाकडून (Statutory Crop.Insurance Corportion) केले जावे व संकल्पित योजनेचा अभ्यास करण्याकरता या समितीने असे सचुविले की विमा तज्ज्ञ, शेती अर्थतज्ज्ञ यांचा समावेश असणारी तज्ज्ञ समिती स्थापन करावी.

६) कर्ज वसुलीसाठी समाईक असा कायद्याचा आकृतीबंध तयार करावा.(Common Legal Frame Work) व त्यास सहकारी संस्था व व्यापारी संस्था यांचा समावेश कर्ज वसुली करता करावा.सरकारने राज्यस्तरीय न्यायाधिशाने (State level tribunals) न्यायप्रविष्ट वादाकरता स्थापन करावीत व ॲवॉर्डच्या कार्यवाहीकरता स्वतंत्र खाती स्थापन करावीत.

७) शेती पतपुरवठा समितीची स्थूलपणे दोन उद्दिष्ट होती. १) ग्रामीण क्षेत्राला पतपुरवठ्याचा ओघ सतत व्हावा म्हणून कर्ज देणारया संस्थांची वित्तीय क्षमता सुधारावी व दुसरे उद्दिष्ट म्हणजे ग्रामीण पतपुरवठा व्यवस्था जास्त सुदृढ कसवी या समितीच्या सर्व शिफारसी व सूचना अजूनही रिझर्व्ह बँक व सरकार यांच्या विचाराधीन आहेत.

## १०.९ पोषक ग्रामीण पतपुरवठ्याची गरज

पोषक ग्रामीण पतपुरवठ्याची गरज पुढील कारणांनी निर्माण होते.

१) शेतीविकास कार्यक्रमात शेती पतपुरवठा ही अत्यंत महत्त्वाची आदाने आहेत. (inputs) शेतकऱ्यांना खाजगी सावकारांकडून मिळणारी कर्जे अपुरी, अत्यंत खर्चिक व त्याचे शोषण करणारी असतात. त्यामुळे अशा सावकारी. कर्जाना पर्यायी अशी सुदृढ संस्थात्मक वित्तपुरवठा होण्याची गरज आहे.

२) शेती उत्पादनाच्या प्रमाणापेक्षा शेती कामांचे स्वरुप यावर शेती पतपुरवठा अवलंबून असणे अधिक आवश्यक आहे.शेतीच्या मशागतीच्या हेतुसाठी शेतकऱ्यास गरज असणाऱ्या पतपुरवठ्याची रक्कम एका वर्षापासून दुसऱ्या वर्षापर्यंत जवळ जवळ समानच राहते.

३) शेतीची कार्यक्षमता व उत्पादन वाढण्यासाठी श्रीमंत व गरीब अशा दोन्ही प्रकारच्या शेतकऱ्यांना संस्थात्मक पतपुरवठा पुरेसा होणे आवश्यक आहे.

४) संस्थात्मक पतपुरवठा यशस्वी होण्यासाठी सहकारी संस्था व प्रादेशिक ग्रामीण बँका चालविण्यास प्रशिक्षित, कर्तव्यनिष्ठ व बांधिलकीचा कर्मचारी वर्ग आवश्यक आहे.

५) ग्रामीण पतपुरवठा शेतीची उत्पादकता वाढविण्याच्या हेतुसाठी, आवश्यक आहे.

६) शेतकऱ्यास बीबियाणे, खते, कीटकनाशक द्रव्ये खरेदी करण्यासाठी ग्रामीण पतपुरवठा वस्तु स्वरुपात आवश्यक आहे.

७) लहान सीमांत शेतकरी भूमिहीन मजूर, वेठ बिगारीचे मजूर यांच्यासाठी उपभोगाची कर्जे ग्रामीण पतपुरवठ्यात आवश्यक आहेत.

८) शेती कर्जासाठी सामान्यपणे कमी व्याजदर व वेगवेगळ्या वर्गाच्या शेतकऱ्यांसाठी व विविध प्रकारच्या हेतुसाठी ग्रामीण पतपुरवठ्याचे वेगवेगळे व्याजदर आवश्यक आहेत.

९) लहान शेतकऱ्यांना सहकारी संस्था, व्यापारी बँका यांच्याकडून गरजपूर्ती करण्यासाठी कर्जे मिळणे अवघड आहे.त्यांना योग्य तारण देणे शक्य नसते व कर्ज परतफेडीची क्षमताही त्यांना पुरेशी नाही.परिणामी, ग्रामीण कर्जबाजारीपणा व वेठबिगार मजूरांची संख्या यातून वाढत जाते.म्हणूनच स्वस्त पतपुरवठा शेतकऱ्यांना होण्याची गरज आहे.

१०) एकात्म ग्रामीण विकासासाठी शेती, लघु उद्योग, कुटीर व ग्रामोद्योग, कारागिरी उद्योग, हस्तोद्योग व इतर आनुषंगिक आर्थिक उपक्रम यात गुंतवणूक करण्यासाठी व सर्व प्रकारच्या उत्पादनांसाठी पुनर्वित्त पुरवठा करणाऱ्या राष्ट्रीय बँकेची गरज निर्माण होते.

११) शेती व ग्रामीण विकास यात संशोधन वाढविण्यासाठी, वेगवेगळ्या भूक्षेत्राच्या गरजांना सुसंगत असे प्रकल्प व कार्यक्रम तयार करण्यासाठी ग्रामीण पतपुरवठ्याची अधिक प्रमाणात गरज निर्माण होते.

१२) लहान शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा निवारण्यासाठी व त्यंना कर्जमुक्त करण्यासाठी सरकार, व्यापारी बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका, सहकारी वित्तसंस्था या संस्थांकडून वेळेवर, पुरेसा व स्वस्त पत पुरवठ्याची गरज निर्माण होते.

## १०.१० स्वाध्याय

१. ग्रामीण वित्तपुरवठ्यातील संकल्पनेचा सांगून ग्रामीण वित्त पुरवठ्याची तत्वे सांगा.
२. ग्रामीण वित्तपुरवठ्यातील समस्या सांगून ग्रामीण व शेती पतपुरठा समस्यांवर उपाय सुचवा.
३. सुदृढ ग्रामीण पतपुरवठ्याची गरज सांगा.

## १०.११ संदर्भ सूची


- योजना मासिक मे, २००९ VOL - *XXX*VI.*X*
- योजना मासिक ऑगस्ट, २००८ VOL - *XXX*No. I
- योजना मासिक जून, २०१० VOL - *XXX* No.I*X*
- प्रकाशन विभाग, माहिती आणि प्रसारण मंत्रालय, भारत सरकार


❖❖❖❖

munotes.in

# ११

# पिक व पशू विमा

**घटक रचना :**

११.१ पाठाची उद्दिष्टे

११.२ प्रस्तावना

११.३ संकल्पना

११.४ पीक विम्याची गरज

११.५ पीक विम्याचे उद्देश

११.६ पीक विम्याचे फायदे

११.७ पीक विम्याचे महत्व

११.८ भारतातील पिक विमा योजनेची माहिती

११.९ पशु-विमा (Cattle Insurance)

११.१० पशु विम्याचे ग्रामीण भागातील महत्त्व स्पष्ट करा.

११.११ सारांश

११.१२ स्वाध्याय

११.१३ संदर्भ सूची

## ११.१ पाठाची उद्दिष्टे

१) ग्रामीण वित्तपुरवठ्यात पीक विमा संकल्पनेचा अभ्यास करणे.

२) ग्रामीण व शेती वित्तपुरवठ्यात पीक-पशु विम्याची गरज अभ्यासणे.

३) पिक विम्याच्या महत्वांचा अभ्यास करणे.

## ११.२ प्रस्तावना

व्यवसायात अनिश्चितता जेवढी जास्त असते तेवढी जोखीम वाढते.औद्योगिक उत्पादनामध्ये जोखीम असली तरी बऱ्याच जोखमींचा विमा काढण्याची पद्धत रुळली आहे.परंतु शेतींच्या पादनात अनिश्चितता आणि जोखीम अतिशय जास्त असल्यामुळे या क्षेत्रात विमा काढण्याची पद्धत अंमलात येण्यास बराच काळ लागला. कोरडा दुष्काळ,

ओला दुष्काळ, पूर, कीड इत्यादी संकटे शेतीमधील उत्पादनाला सतत प्रभावित करतात. ही सर्व संकटे नैसर्गिक असल्यामुळे बाबतीत खवरदारी घेणे शक्य होत नाही. परिणामतः शेती करणारा देवाधीन अस परिस्थितीतून सोडविण्यासाठी विम्याची खरी गरज त्याला आहे.

आपला देश पशुधनाच्या संख्येत जगात आघाडीवर आहे.महाराष्ट्रातही बऱ्यापैकी पशुधन आहे.राज्यात देशी गायींची संख्या सर्वाधिक असून त्यांची उत्पादकता खूपच कमी आहे.८० टक्केपेक्षा जास्त गायी हे अल्प-अत्यल्प भूधारक पाळतात. विदर्भ, मराठवाड्यात देशी गायींचा सांभाळ आजही पारंपरिक पद्धतीने केला जातो.या पशुधनाचे अपघाती निधन होण्याचे प्रमाणही बरेच आहे.

पशुधनाला विमाकवच मिळालेतर प्रतिकूल परिस्थितीतही पशुधन सांभाळण्याची प्रवृत्ती शेतकऱ्यांमध्ये वाढेल, जे अत्यंत आवश्यक आहे. राज्यात कोणतेही पीक आर्थिकदृष्ट्या किफायतशीर ठरत नाही, तेव्हा शाश्वत कृषी पद्धती विकसित करून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी पशुधन मोलाचा हातभार लावू शकते.




https://krushiyojana.com

## ११.३ संकल्पना

" विमा म्हणजे विमा कंपनी आणि विमेदार यांच्यातला एक करार असतो, ज्यानुसार विशिष्ट दुर्घटनाघडून विमेदाराचं आर्थिक नुकसान झाल्यास विमा कंपनी विमेदाराला नुकसान भरपाई देते."

"विमा हा जोखीम व्यवस्थापनाचा एक प्रकार आहे ज्यामध्ये विमा उतरवलेली संस्था एखाद्या लहान आर्थिक नुकसान भरपाईच्या बदल्यात संभाव्य नुकसानीची किंमत दुसऱ्या घटकाला हस्तांतरित करते."

## ११.४ पीक विम्याची गरज

(१) शेती ही ज्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे तेथे शेतीच्या दुरावस्थेचा संपूर्ण अर्थव्यवस् प्रतिकूल परिणाम होतो.त्यामुळे अर्थव्यवस्थेच्या हितासाठी शेती क्षेत्राला मदत करणे आवश्यक ठरते.पीक विमा हा या मदतीचा महत्त्वाचा भाग आहे.

(२) निसर्गावरील अवलंबित्वामुळे शेती हंगामाच्या पाच वर्षांपैकी साधारणतः तीन को असमाधानकारक असतात. बहुसंख्य अशा शेतकऱ्यांना त्यांच्या छोट्या धारणक्षेत्रावर एखाद्या वर्षी जा नफा मिळाला तर तो फार जास्त नसतो, परंतु तीन वर्षे होणारे नुकसान मात्र जबरदस्त असते. त्यामुळे विम्याच्या रूपाने त्यांना मदत मिळण्याची गरज निर्माण होते.

(२) शेती व्यवसायात नुकसान होण्याची भीती इतकी असते की त्यामुळे नवीन प्रयोग करू पाहण्यास, पिकांमध्ये बदल करण्यास शेतकरी सहसा तयार होत नाहीत. त्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती साधारण असते. जर विम्याच्या रूपाने त्यांना मदतीचे आश्वासन किंवा हमी मिळाली तर ते निरनिराळे नवीन प्रयोग व तंत्र आत्मसात करून विकासाला हातभार लावू शकतील.

(३) शेतीच्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे रासायनिक खते, सुधारित बियाणे, कीटकनाशके, अवजारे इत्यादींचा खर्च बराच वाढला आहे, पण त्या तुलनेत शेतीचे निसर्गावरील अवलंबित्व फारसे कमी झालेले नाही. जर इतका खर्च करूनही केवळ एका पावसामुळे, कीड पडल्यामुळे किंवा अन्य नैसर्गिक कारणांमुळे उत्पादन घटत असेल तर शेतकरी या धक्क्यातून लवकर सावरू शकत नाही.त्यासाठीच पिकांच्या विम्याची गरज आहे.चौथ्या योजनेने म्हटल्यानुसार, नैसर्गिक आपत्तींमुळे येणारी विपन्नावस्था दूर करण्याचा एक महत्त्वाचा मार्ग म्हणजे पीक विमा हाच आहे.

## ११.५ पीक विम्याचे उद्देश

(१) दुष्काळ, पूर इत्यादी नैसर्गिक संकटांमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानाची शेतकऱ्यांना भरपाई करून देणे.

(२) एखाद्या वर्षी पीक बुडाले तरी पुढील वर्षी शेतकऱ्याला कर्ज मिळण्यास अडचण येऊ नये म्हणून त्याची प्रत्यय- पात्रता टिकविण्याचा प्रयत्न करणे.

(३) अन्नधान्ये, डाळी, तेलबिया यांच्या उत्पादनाला आधार आणि प्रोत्साहन देणे.

## ११.६ पीक विम्याचे फायदे

(१) नैसर्गिक आपत्तींविरुद्ध शेतकऱ्यांना काही प्रमाणात हमी मिळते.त्यामुळे पिकांचे नुकसान झाले तरी शेतकऱ्याला विपन्नावस्थेला तोंड द्यावे लागत नाही.

(२) नैसर्गिक आपत्ती येत-जात असल्या तरी त्या एकाचवेळी व सर्व प्रदेशांमध्ये सारख्याच तीव्रतेने येतील असे नाही. पीक विम्याच्या योजनेत निरनिराळ्या भागातील शेतकरी सहभागी झालेले असतात. त्यामुळे एका विशिष्ट प्रदेशातील शेतकऱ्यांना आपत्तींमुळे जे पिकांचे नुकसान सहन करावे लागते ते अनेकांमध्ये विभाजित होते.

(३) जी वर्षे शेती उत्पादनाच्या दृष्टीने चांगली असतात त्या वर्षी विम्याच्या हप्त्यांची जमा होणारी रक्कम पुढे वाईट वर्षामध्ये शेतकऱ्यांनाच मदत देण्यासाठी वापरणे शक्य होते.

(४) नैसर्गिक अनिश्चततेमुळे जो शेतकरी वर्ग नवीन प्रयोग करण्यास घाबरतो त्याला विम्याचे संरक्षण मिळाल्यामुळे प्रयोग करण्याबद्दल विश्वास वाढू शकतो.त्यामुळे शेतीच्या उत्पादनात सुधारणा होऊन वाढ होऊ शकते.

(५) शेतकऱ्याच्या दारिद्र्याचे व ऋणग्रस्ततेचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे शेतीचे निसर्गावरील अवलंबित्व आणि उत्पादनातील जोखीम हे आहे.या जोखमीचा विमा काढल्यामुळे ऋणग्रस्तता व दारिद्र्य कमी होण्याला मदत होते.

## ११.७ पीक विम्याचे महत्व:

### १. पीकांना काही प्रमाणात हमी:

नैसर्गिक आपत्ती विरुध्द शेतकऱ्यांना काही प्रमाणात हमी मिळते.त्यामुळे पिकाचे नुकसान झाले तरी शेतकऱ्याला संकटाला तोंड द्यावे लागत नाही.

### २. नुकसान अनेकांमध्ये विभागलेले:

नैसर्गिक आपत्ती येत जात असल्या तरी एकाच वेळी व सर्व प्रदेशामध्ये सारख्याच तीव्रतेने येतील असे नाही. पीक विमा योजनेत निरनिराळ्या भागातील शेतकरी सहभागी झालेले असतात. त्यामुळे एका विशिष्ट प्रदेशातील शेतकऱ्यांना आपत्तीमुळे जे पिकाचे नुकसान सहन करावे लागते ते अनेकांमध्ये विभागले जाते.

### ३. विम्याची रक्कम शिल्लक राहील्याने जास्त पीक घेण्याचा प्रयत्न:

ज्या वर्षी पीक चांगले येते व नुकसान होत नाही त्या वर्षाची विम्याची रक्कम शिल्लक राहील्याने जास्तीत जास्त पीक घेण्याचा प्रयत्न करतो.

### ४. शेतीत नवीन प्रयोग करताना उत्साह:

जो शेतकरी नवीन प्रयोग करतो त्याला संरक्षण मिळत असल्यामुळे त्याचा उत्साह वाढून जास्तीत जास्त पीक घेण्याचा प्रयत्न करतो.

### ५. कर्जाची भीती नाही:

पिकाचा विमा घेतल्यामुळे कर्ज व दारिद्र्याची भीती राहत नाही.भारतामध्ये पीक विमा लागू करण्याची सूचना स्वातंत्र्यपूर्व काळापासून करण्यात येत होती.डॉ.नायडू समिती सरैय्या समितीने तसेच प्रियोळकर समितीनेदेखील पीक विम्याची आग्रही भूमिका मांडली होती.

### ६. काही प्रमाणात आत्महत्तेला आळा:

शेतात पिकांवर येणारे रोग, किड, विदयुत्पाताने लागणारी आग, वारा, वादळ, गारपीट, धूर, भूकंप, दुष्काळ आदी उद्भवलेल्या नैसर्गीक आपत्तीमुळे घेतलेले पीक वाया जाते. यामुळे शेतकऱ्याने घेतलेल्या कर्जाची परतफेड होऊ शकत नाही. तसेच कर्ज घेऊन केलेल्या शेतील अचानक उद्भवलेल्या परिस्थितीमुळे शेतकऱ्याला कर्जबाजारी होऊन आत्महत्येला प्रवृत्त होतात. म्हणून पीक वीमा काही अंशी आत्महत्येला आळा घालेले.

munotes.in

### ७. ग्रामीण भागाच्या विकासाला गती:

पीक वीमा योजनेकडे पूर्वी नुकसीनाला घाबरेला शेतकरी पीक विमामुळे अचानक उद्भवणाऱ्या परिस्पतीला न भीता नवे-नवे तंत्रज्ञान विकसीत करून ग्रामीण भागाच्या विकासाला गती प्राप्त होते.

### ८. आर्थिक स्थिती उंचावण्यास सहाय्य:

नैसर्गिक परिस्थितीमुळे झालेल्या नुकसानीवर शेतकऱ्याला नुकसानभरपाई मिळत असल्याने शेतकऱ्याला त्याच्या पीकांना कायमच सुरक्षीतता मिळत असल्याने नैसर्गीक आपत्तीतही शेतकऱ्याला त्याच्या पीकांची व नुकसानीची हमी मिळत असल्याने त्याची आर्थिक स्थिती उंचवण्यास सहाय्य मिळते. वरील प्रमाण ग्रामीण विकासात पीक वीमा योजनेचे महत्व स्पष्ट करता येते.

## ११.८ भारतातील पिक विमा योजनेची माहिती

भारतातील शेती निसर्गाच्या लहरींवर अवलंबून आहे. त्यामुळे बरेचदा भारतातील शेतकऱ्याला दुष्काळी परिस्थितीला तोंड द्यावे लागते त्यामुळे या क्षेत्रात विमा काढण्याची पध्दत अमलात आणली पाहिजे अशी खूप वर्षापासूनची मागणी होती. या मागणीला अमलात यायला बराच कालावधी लागला कोरडा दुष्काळ, ओला दुष्काळ, पूर, पिकावर कीड इत्यादी नैसर्गिक सकटे शेतीमधील उत्पादनावर विपरीत परिणाम करतात. ही सर्व संकटे नैसर्गिक असल्यामुळे प्रत्येक यायतील खबरदारी घेणे शक्य होत नाही. परिणामत: शेती करणारा हतबल होतो. यातून मार्ग काढण्यासाठी पीक विमा योजना राबविली पाहिजे.पीक विमा योजनेची गरज पुढील नमूद केल्याप्रमाणे पटवून देता येईल.

अ) देशातील अर्थव्यवस्थेच्या हितासाठी शेती क्षेत्राला मदत करणे आवश्यक आहे. कारण शेती हे महत्वाचे व मोठे उत्पादनाचे क्षेत्र आहे.हे क्षेत्र सरक्षित असले म्हणजे आपोआपच देशातील आर्थिक स्थैर्य टिकवता येईल.

ब) शेती व्यवसायात नुकसान होण्याची भीती असते त्यामुळे नवीन प्रयोग करून पाहण्यास, पिकामध्ये बदल करण्यास शेतकरी सहसा तयार होत नाहीत. पिकाची हमी विम्याच्या रुपात घेण्यात आली व मदतीचे आश्वासन मिळाले तर शेतीमध्ये नवीन प्रयोग व तंत्र आत्मसात करून विकासाला हातभार लावू शकतील.

भारतामध्ये पीक-विमा लागू करण्याची सूचना स्वातंत्र्यपूर्व काळापासून करण्यात येत आहे.अमेरिकेत जसा संघीय पीक विम्याचा उपयोग केला जातो त्या आधारावर भारतात पीक व पशु-विमा सुरू करावा असे डॉ.नायडू समितीने मद्रास प्रांतातील अभ्यासात सुचविले होते.सरैय्या समिती, प्रियोळकर समिती व इतर काही संस्थांनीही पीक विम्याचे आग्रही प्रतिपादन केले होते. भारताच्या केंद्र सरकारनेही काही योजना तयार करून राज्यांना पाठविल्या होत्या, आर्थिक कारणांमुळे या योजना प्रत्यक्षात येऊ शकल्या नाहीत. १९६९ मध्ये पंजाबच्या काही भागात गहू, हरबरा, कापूस आणि कम या पिकांसाठी विम्याचा प्रयोग करण्यात आला. वरीलपैकी कोणतीही दोन पिके घेणाऱ्या सर्व कास्तकारांना विमा अनिवार्य करण्यात आला होता.परंतु या प्रयोगाला फारसे यश मिळू शकले नाही.

भारतासारख्या मोठ्या आणि अनेक छोटी-छोटी धारणक्षेत्रे असणाऱ्या देशात वैयक्तिक आधारावर पीक विम्याची योजना लागू करणे कठीण असल्याची जाणीव यावेळी झाली, व म्हणून क्षेत्राधारित किंवा गट आधारावर विमा काढण्याची कल्पना पुढे आली. १९७९ पासून राज्य सरकारांच्या सहयोगाने क्षेत्राधारित विमा योजना लागू करण्याचे काम जनरल इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (GIC) ही संस्था करते आहे.या योजनेचा संबंध निरनिराळ्या संस्थांनी दिलेल्या पीक-कर्जाशी (Crop loan) जोडण्यात आला आहे.जर एका समान भौगोलिक क्षेत्रात पिकांचे उत्पादन हमी दिलेल्या पातळीच्या खाली झाले तर त्या भागातील शेतकऱ्यांना विम्याचा लाभ मिळतो.ही योजना १२ राज्य सरकारांनी स्वीकारली होती.

**प्रधानमंत्री पीक विमा योजना**

केंद्र सरकारने १३ जानेवारी २०१६ रोजी ' प्रधानमंत्री पीक विमा योजनेस केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली.

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी संपूर्ण राज्यामध्ये एकच विमा कंपनी असणार असून इतर खाजगी विमा कंपन्या 'ॲग्रिकल्चर इंशुरन्स कंपनी ऑफ इंडिया' (Agricultural Insurance Company of India) शी संलग्न करण्यात येणार आहेत. हा विमा केवळ 'उत्पन्नातील घट' एवढ्या पुरताच मर्यादित नसून पीक काढणी नंतर पिकाचे झालेले नुकसान, तसेच चक्रीवादळे, भूस्खलन, बिगर मोसमी पाऊस इ. स्थानिक पातळी वरील आपत्तींपासूनच्या संरक्षणासाठीही हा विमा उपलब्ध करण्यात येणार आहे. पिकांच्या नुकसानीची स्थिती जाणून घेऊन विम्याच्या रकमेवर हक्क सांगण्याची प्रक्रिया जलद व्हावी यासाठी सुदूर संवेदन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. ही विमा योजना सर्व शेतकऱ्यांसाठी खुली आहे, मात्र कोणावरही बंधनकारक नाही.

कार्यक्षेत्र - योजना राज्यांनी निकष पूर्ण करून राबवयाची असली तरी , तरी पंत प्रधानांच्या 'एक राष्ट्र - एक योजना ' या उद्देशानेती सबंध देशात राबविण्याचे लक्ष ठेवण्यात आले आहे

- **उद्देश**

१) नैसर्गिक आपत्ती, कीटक आणि रोगराई यामुळे पिकांना नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण व आर्थिक आधार देणे.

२) नवीन व आधुनिक शेती पद्धतीचा स्वीकार करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित करणे.

३) शेतीमध्ये टिकून राहण्यासाठी शेतकऱ्यांचे उत्पन्न स्थिर करणे.

४) कृषी क्षेत्राला पत पुरवठा करत राहणे , ज्यामुळे अन्न सुरक्षा लाभेल , पीक पद्धतीत बदल होईल, कृषी क्षेत्रात स्पर्धात्मकता येऊन कृषी तंत्राची वाढ होईल.

- **वैशिष्टये**

१) अत्यंत कमी प्रिमियम (विम्याची संरक्षित रक्कम)

२) या योजने अंतर्गत भरणा करण्यात येणारा प्रिमियम दर शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी अत्यंत कमी ठेवण्यात आला आहे.

३) या अंतर्गत सुमारे ९० टक्क्यांपेक्षा जास्त भार शासनाकडून उचलला जाईल.

४) अन्नधान्य, डाळी, तेलबिया आदी पिकांसाठी प्रत्येक हंगामावरील एकच दर असेल. यापूर्वीची एकाच हंगामासाठी जिल्हावार आणि पीकवार दरातील भिन्नता आणि तफावत आता दूर केली आहे.

५) पूर्ण विमा संरक्षण मिळेल व दावा केलेली रक्कम पूर्ण मिळेल. (कमी होणार नाही.)

- विमा लाभ मिळण्यास पात्र परिस्थिती

१) शेतात पाणी साठणे, पूर येणे अशा आपत्तींना स्थानिक संकट मानण्यात येईल. प्रभावित शेतकऱ्यांचे सर्वेक्षण करून भरपाई किंवा दावा रक्कम दिली जाईल.

२) पीक काढण्याच्या दिवसापर्यंत जर पीक शेतातच असेल आणि त्या दरम्यान आपत्ती, वादळ, अवकाळी पाऊस आल्यास शेतकऱ्यांना दावा रक्कम मिळेल.

- अपवाद

मानवनिर्मित आपत्ती उदा. आग लागणे, चोरी होणे यांचा या योजनेत अंतर्भाव नाही.

## ११.९ पशु-विमा (Cattle Insurance)

भारतासारख्या देशात शेतींच्या क्षेत्रात पशूंचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.धारणक्षेत्रांच्या छोट्या आकारामुळे तेथे यांत्रिकीकरणाचा अवलंब जास्त प्रमाणात करता येत नाही.भांडवलाची कमतरता ही अडचण सुद्धा त्यामागे आहे. त्यामुळे शेतीची बरीचशी कामे मानवी श्रम आणि पशूंची मेहनत या आधारे केली जातात. शेत नांगरण्यापासून तयार माल बाजारात नेण्यापर्यंतच्या कार्यात बैलांचा सहभाग फार मोठा असतो. हीच गोष्ट गायींची आहे. शेतकऱ्याला जोडधंदा करण्याच्या दृष्टीने, शेतीसाठी खताचा व बैलाचा पुरवठा करण्याच्या दृष्टीने गायी महत्त्वाच्या ठरतात. दुध उत्पादनामध्ये गाईप्रमाणेच म्हशींसुद्धा महत्त्वाच्या आहेत. या प्राण्यांची शेतीमध्ये होणारी मदत इतकी मोलाची आहे की भारतीय समाजात अनेक सणांच्या निमित्ताने या प्राण्यांची पूजा केली जाते.

भारतीय कृषि अर्थव्यवस्थेत पशूंचे महत्त्व वादातीत असले तरी त्यांची परिस्थिती मात्र समाधानकारक नाही. जगातील पशुंच्या साधारण ११ प्रतिशत संख्या भारतात आहे, पण हे पशू पुरेसे तिन झालेले, कमी कार्यक्षम आणि निरनिराळ्या रोगांनी पीडित असलेले आढळतात. त्यामुळे मध्ये मरणाचे प्रमाण (Mortality Rate) जास्त दिसून येते. बाजारातील प्रचलित किंमती विचारात देता एक बैल, गाय किंवा म्हैस मृत्युमुखी पडणे म्हणजे शेतकऱ्याचे मोठे नुकसान होय. त्यामुळे शेतकऱ्याला मदतीचा हात देण्यासाठी पशु-विमा योजनेची नितांत आवश्यकता आहे. पश्चिम जर्मनी, कान्स इटली इत्यादी देशांमध्ये अशी योजना नियमितपणे राबविली जाते.कारण छोट्या कास्तकारांच्या शुधनाचे संरक्षण करणे आवश्यक असते. भारतामध्ये या प्रश्नाचा विचार करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या प्रियोळकर समितीने काही महत्त्वाच्या शिफारशी केल्या होत्या:

**शिफारशी**

(१) पशु विम्याची योजना प्रायोगिक आधारावर सुरू करण्यात यावी.ज्या प्रदेशात व ज्या पशुंच्या बाबतीत रोगांमुळे मरण्याचे प्रमाण जास्त आहे व त्यामुळे शेतकऱ्याचे नुकसान होते अशा निवडक क्षेत्रात योजनेची सुरुवात करावी.

(२) पशूंमध्ये ज्या रोगांचा प्रादुर्भाव जास्त दिसून येतो त्यापासून त्यांचा बचाव करण्याचे उपाय करणे, विमा लागू करतांना, अनिवार्य करायला हवे.

(३) या दृष्टीने पशु वैद्यकीय विभागाच्या सोयी पुरेशा नसल्यास इतर सोयी उपलब्ध केल्यानंतर पशुविमा सुरू करावा.

(४) ग्रामीण भागात ही योजना लागू करतांना सुरवातीला विशिष्ट वयाच्या बैलांचा समावेश यात करावा.गावात किंवा शहरात या योजने अंतर्गत दूध देणाऱ्या जनावरांचा समावेश करावा.

(५) प्रयोगिक योजना सुरू करतांना ग्रामीण भागातील एका केंद्राकडे साधारण ३०० चौरस मैलांचा परिसर सोपविण्यात यावा व प्रत्येक केंद्रात १००० ते २००० पशूंचा विमा काढावा. अशी सहा केंद्रे सुरू करावीत. त्याचप्रमाणे सहा शहरी केंद्रे सुरू करतांना प्रत्येक केंद्रांत ते शहर व आसपासच्या पाच मैलांचा प्रदेश समाविष्ट करण्यात यावा.

(६) योजना पूर्णपणे सहकारी आधारावर किंवा पशु विमा सहकारी समित्यांच्या मार्फत बविण्यात यावी.त्यासाठी सरकारने विविध स्वरूपात मदत द्यावी.ही मदत स्थापनेसाठी, भाग भांडवलासाठी, पशु वैद्यकीय साधनांसाठी वगैरे असू शकते. वरील शिफारशींवर सरकारने त्वरित अंमलबजावणी केली नाही.दुधाची जनावरे व शेतकामाची बनावरे यांच्यासाठी महाराष्ट्र आणि गुजराथ राज्यात मुंबईच्या को-ऑपरेटिव्ह इन्शुरन्स कंपनीने योजनेची सुरूवात केली होती.अलीकडील काळात व्यापारी बँकांची प्राधान्य क्षेत्राला जी मदत सुरू आहे त्यामुळे दुग्धव्यवसायाला चालना मिळाली आहे.त्यामुळे पशुविम्यालाही प्रोत्साहन मिळाले आहे.तथापि ही योजना व्यापक प्रमाणावर राबविण्याची आवश्यकता आहे.

## ११.१० पशु विम्याचे ग्रामीण भागातील महत्त्व

भारत सरकारने सन २००६-०७ व २००७-०८ करीता प्रायोगिक स्तरावर महाराष्ट्र राज्यातील अहमदनगर, पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली व सोलापूर या जिल्हयातील उच्च दुध उत्पादन सक्षम गायी म्हशींचे संरञ्चणासाठी पशुविमा योजना ५० टक्के अनुदानावर राबविण्यास मंजूरी दिली. याकरीता रूपये ७७० लक्ष्य निधी प्राप्त झाला. यामध्ये गायी म्हशींना ५० टक्के विमा हप्ता अनुदान अंतर्भुत असून सन २००९-१० वर्षासाठी केंद्र शासनाच्या मंजूर पशुविमा योजनेतील जिल्हयात (नागपुर, भंडारा, गोंदीया, वर्धा, यवत माळ, जालना) खर्च पडणार आहे. शेतीवर आधारित पूरक व्यवसायासाठी ज्या पाळीव प्राण्यांचे व पक्षांचे संगोपन सर्वसाधारणपणे करण्यात येते, त्या सर्व पशुंसाठी काही संस्थांद्वारे विम्याचे संरक्षण देण्यात येते व त्यासाठी ठराविक प्रमाणात वार्षिक हप्त्याची रक्कम स्वीकारली जाते त्यास प्रीमियम म्हणतात.

**१) पशुंचा अपघाती मृत्यू:**

पशुंचा आग, पूर, वीज, वादळ, भूकंप यासारख्या नैसर्गिक आपत्तीमध्ये अपघाती मृत्यू झाला तर पशुंचा विमा काढला असल्यास शेतकऱ्याला अथवा व्यवसायिकाला विमा कंपन्यांकडून विमा मिळतो. यामुळे शेतकऱ्यांना संरक्षण प्राप्त होते.

**२. पशुंचे विविध आजारांमुळे होणारे मृत्यू:**

विषाणूंचा अचानक प्रार्दुभाव उद्भवल्याने आजार किंवा रोगांची लागण लागते. यामुळे पशु दगावल्यास विमा कंपन्यांकडून नुकसान भरपाई प्राप्त झाल्याने शेतकच्याच्या नुकसानीची तीव्रता कमी होते.

**३. अचानक उद्भवणाऱ्या संसर्गजन्य रोगांपासून संरक्षण:**

बऱ्याचदा कोंबडया, गाई, म्हशी, शेळया, मेंढ्या याची योग्य निगा न राखल्यास तसेच स्वच्छला न राखण्यास संसर्गजन्य रोगांचा संभव वाढतो. यामुळे पशुपालकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते.हे नुकसान कमी होण्याच्या दृष्टीने पशु विमा महत्वाची भूमीका बजावतो.

**४. विदयुत वाहकाच्या स्पर्शाने मृत्यू:**

अनेकदा विदयुत वाहक तार झाडांवर, पाण्यात किंवा पशूंच्या गोठ्याच्या ठिकाणी पडल्यास त्यातून विदयुत प्रवाह जात असल्यास त्याच्या संपर्कात एकादा पशु आल्यास मोठे नुकसान होते. यामुळे पशु विमा कायदेशीर ठरतो.

**५. मोठ्या पशुपालकांना फायदेशीर:**

कुकूटपालन, दुग्धपालन, मेशपालन आदी पशुपालनाचा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर जेथे केलो जातो तेथे पशु वीमा मोठ्या प्रमाणावर फायदेशीर ठरतो व भवीष्यात उद्भवणाऱ्या धोक्यापासून सुरक्षितता मिळते.

**६. कर्जाची भीती नाही:**

पशुंची खरेदी व त्यांचे संगोपन करताना शेतकऱ्याला मोठ्या प्रमाणावर कर्ज घ्याव लागते. मात्र अचानक एखादया रोगाची लागण झाल्यास मोठे नुकसान होऊन कर्जबाजारी होण्याची भीती वीम्यामुळे कमी झाली आहे.

**७. नुकसान अलेक भागात विभागलेले:**

नैसर्गीक आपत्ती येत जात असल्या तरी एकाच वेळी व सर्व प्रदेशामध्ये सारख्याच तीव्रतेने येतीलच असे नाही. पशु वीमा योजनेत निरनिराळ्या भागातील शेतकरी सहभागी झालेल असतात. त्यामुळे होणारे नुकसान हे अनेकांमध्ये विभागलेले असते.

**८. मोठ्या प्रमाणाव पशुपालन करण्यास उत्साह:**

पशु विम्यामुळे पशुपालनात नवीन प्रयोग व मोठ्या प्रमाणावर पशुपालन करताना त्याला संरक्षण मिळत असल्यामुळे त्यांचा उत्साह वाढून जास्तीत जास्त व्यवसाय करण्याचा प्रयत्न केला जातो.

वरील प्रमाणे पशु विम्याचे ग्रामीण विकासातील महत्व स्पष्ट करता येते.

पशुधन विमा माहिती

पशुधनाचा विमा म्हणजेच पशूंना होणारे आजार किंवा अपघात यामुळे होणाऱ्या मृत्यूसाठी केला जातो (नुकसान भरपाई मिळावी).या दृष्टीकोनातून पशुधन विमा काढणे आजची गरज बनली आहे.

पशू निरोगी आहे, ठराविक वयोगटातील आहे, त्याचे लसीकरण झाले आहे.तसेच पशूचे बाजारातील मूल्य लय आहे.इत्यादी गोष्टींची तपासणी पशूंच्या डॉक्टरांकडून घेऊन नंतरच गायींचा विमा उतरविला जातो.
उदा. गायी, म्हशी खरेदी केल्यानंतर एक आठवड्याच्या आतच गायीचा विमा उतरविला गेला पाहिजे तरच नुकसान भरपाई मिळते. त्याकरीता खालील गोष्टींची पूर्तता करावी लागेल :
अ) विमा कंपनी अधिकाऱ्यांशी संपर्क साधणे.
ब) जनावरांचा डॉक्टरांकडून तपासणी करून घेणे व गायीचा विमा उतरवणे.
क) गायीचा विमा काढल्यानंतर गायीच्या कानावर खुणेचा बिल्ला लावला जातो.
(बिल्ला लावला म्हणजेच खऱ्या अर्थाने विमा उतरविला गेला आहे असे मानले जाते.) जर गाय, म्हशी, बैल यांच्यामध्ये संपूर्ण कायमची अपंगत्वता ही एक जास्त जोखीम घेता येते. दुभती जन्वारे किंवा उत्पादनाला पूर्णपणे अकार्यक्षम होणे किंवा बैल असल्यास काम करण्यास अपंग होणे हे धोके यामध्ये समाविष्ट आहेत.

munotes.in




https://www.youtube.com

| अ. | पशू | वयोगट | वार्षिक प्रिमियम दर |
|---|---|---|---|
| 1 | दुभत्या गायी | २ ते १० वर्षे | ४.०० % |
| 2 | दुभत्या म्हशी | ३ ते १२ वर्षे | ४.०० % |
| 3 | वळू | ३ ते ८ वर्षे | ४.०० % |
| 4 | बैल | ३ ते १२ वर्षे | ४.०० % |
| | वरील १ ते ४ साठी (संपूर्ण कायमची अपंगत्वता ही जादा जोखीम घ्यावयाची असल्यास) | | |
| 5 | बकरी / मेंढी | ४ महिने ते ७ वर्षे | ४.०० % |

टीप : पशुधन विम्याची पॉलिसी पाच वर्षापर्यंत दीर्घ मुदतीसाठी घेता येते.

दुदैवाने जर गाय आजारी होऊन मेली अथवा अपघातामध्ये मेली तर, खालील गोष्टींची खबरदारी घ्यावी.

- गाय खरेदी केल्यापासून एक महिन्याच्या नंतर जर गाय आजारी झाली अथवा अपघातामध्ये मेली तरच नुकसान भरपाई मिळते.
- विमा कंपनी अधिकाऱ्यांना बोलविणे? दाखविणे (आजारी असल्यास विमा अधिकाऱ्यांना पूर्व कल्पना दयावी.)
- गाय मेली असल्यास गायीचा बिल्ला असलेला कण कापून त्याची माहिती विमा कंपनी अधिकाऱ्यांना दयावी.
- डॉक्टरांकडून मृत्यूचा दाखला घ्यावा. (त्यावर मृत्यूचे कारण लिहिलेले असणे महत्त्वाचे आहे.)
- विमा कंपनी अधिकाऱ्यांकडून नुकसान भरपाई अर्ज भरून घ्यावा. हा अर्ज विमा कंपनी अधिकाऱ्याकडेच असतो.

खालील गोष्टींकरीता नुकसान भरपाई मिळू शकता नाही –

- पशूला जाणूनबुजून केलेली इजा, जास्त बोजा टाकणे.
- पॉलिसीच्या मुदतीपूर्वी झालेले आजार किंवा रोग.
- चोरी किंवा गुप्तपणे विक्री.

अधिक माहितीकरिता जवळच्या विमा कंपनीशी संपर्क साधावा.

munotes.in

## ११.११ सारांश

देशाचा विकास साधायचा असेल तर ग्रामीण भागाचा विकास साधणे गरजेचे आहे.कारण ग्रामीण भागाच्या विकासा शिवाय देशाचा विकास साधने शक्य नाही.म्हणूनच हा विकास साधायचा असेल तर शेती व शेतीशी संबंधित व्यवसायाच्या गरजा वेळीच पूर्ण झाल्या पाहीजे.

केंद्र सरकारची पशुधन विमा योजना आहे.या योजनेअंतर्गत देशी संकरीत गायी व म्हशी, पाळीव पशू (घोडे, गाढव, वळू, बैल, रेडे), शेळ्या-मेंढ्या या जनावरांचा विमा काढला जातो.पशुधन विम्याच्या रकमेत शासनाचे ५० ते ७० टक्के अनुदान आहे.परंतु अशा विम्याच्या बाबतीत शेतकऱ्यांमध्ये जाणीव-जागृती नाही.अनेक पशुपालक विमा हप्त्याची ३० ते ५० टक्के रक्कम भरू शकत नाहीत, तर जे भरू शकतात त्यांना ते गरजेचे वाटत नाही. अशा परिस्थितीमध्ये केवळ गायींचाच नाही, तर सर्व पशुधनाचा १०० टक्के विमा शासनाने भरण्याची योजना प्रायोगिक तत्त्वावर नाही, तर राज्यभर राबवायला हवी, अशी राज्यातील पशुपालकांची मागणी आहे. याबाबतच राज्य शासनाने निर्णय घेऊन योजनेची अंमलबजावणी त्वरित सुरू करायला हवी.पशुधन विम्याचे नियम-निकष पीकविम्याप्रमाणे किचकट नसावेत. जनावरांचा अपघाती मृत्यू झाल्यास भरपाई मिळतेच, याची खात्री पशुपालकांना वाटायला हवी.

## ११.१२ स्वाध्याय

१) पशु विमा संकल्पना स्पष्ट करूनपिक विम्याच्या उद्देश सांगून महत्व सांगा.

२) पशु विम्याचे ग्रामीण भागातील महत्त्व स्पष्ट करा.

३) पशु विमा संकल्पना स्पष्ट करून पशु विम्याचे महत्वांचा सांगा

४) भारतातील पिक विमा योजनेची थोडक्यात माहिती सांगा.

## ११.१३ संदर्भ सूची


- योजना मासिक मे, २००९ VOL - *XXX*VI.*X*
- योजना मासिक ऑगस्ट, २००८ VOL - *XXX*No. I
- योजना मासिक जून, २०१० VOL - *XXX* No.I*X*
- प्रकाशन विभाग, माहिती आणि प्रसारण मंत्रालय, भारत सरकार


❖❖❖❖

# RURAL MARKETING AND FINANCE

वेळ : ३ तास                                                                                              गुण : ७०

सूचना - १. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे

२. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत

प्रश्न.१. ग्रामीण वित्त पुरवठ्याचीसंकल्पना स्पष्ट करून ग्रामीण वित्त पुरवठ्याचे प्रकार स्पष्ट करा.

किंवा

ग्रामीण वित्त पुरवठ्याचे महत्त्व विशद करा

प्रश्न.२. ग्रामीण कर्जबाजारीपणाची कारणे सांगा.

किंवा

प्रादेशिक ग्रामीण बँकेचे उद्देश स्पष्ट करा.

प्रश्न.३. सहकारी वित्त पुरवठ्याची गरज स्पष्ट करा

किंवा

पीक विमाचे महत्त्व विशद करा

प्रश्न. ४ भूविकास बँकेचे कार्य स्पष्ट करा

किंवा

ग्रामीण विकासात बचत गटाचे महत्त्व विशद करा

प्रश्न. ५ खालीलपैकी कोणत्याही दोन टिपा लिहा

अ. नाबार्डचे उद्देश

ब. स्वयंसहायता बचत गटाची वैशिष्ट्ये

क. सूक्ष्म वित्त पुरवठा आणि गरिबांच्या विकास

ड. कृषी वित्त पुरवठ्याच्या समस्या

❖❖❖❖

munotes.in